श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प ८५

**।। श्रीदासरामचरित्र ।।**

SHRIDASRAMCHARITRA

✽ **प्रकाशक :**

**श्री. पांडुरंग सिताराम गोखले**
१००९, 'कृपा', वाडिकर स्वीटस् शेजारी,
अर्बन बँकेसमोर, गांवभाग, सांगली मो. ९४२०६७६२६२

✽ **लेखक :**

**श्री.प्रसन्न पांडुरंग गोखले**
फ्लॅट नं, एस् २, गिरीराज सदनिका, सेनामंदिर रोड,
गांवभाग, सांगली. मो. ९४२३२६९०८७

✽ प्रथम आवृत्ति : २०१५

✽ द्वितीय आवृत्ती : २०२०

✽ प्रकाशन दिन : वार दि.

✽ **मुद्रक :**

एस. बी. लिथो प्रेस, सांगली

✽ स्वागत मूल्य रुपये १००/-

© **श्री.दीपक चंद्रशेखर केळकर**

✽ **चरित्र मिळणेचे ठिकाण**

'श्रीरामनिकेतन', श्री. बापूरावजी केळकर वाडा,
गांवभाग, सांगली ४१६ ४१६.
दूरभाष-(०२३३) २३३२४६३ भ्रमणध्वनी - ०९८२२००७५२८

।। श्रीराम ।।

श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प **८५**

ॐ

**प. पू. समर्थ सद्‌गुरु श्रीदासराममहाराज केळकर**
**यांचे लिहिले गेलेले ओवीबद्ध चरित्र**

# ।। श्रीदासरामचरित्र ।।

लेखक

**श्री. प्रसन्न पांडुरंग गोखले**

प्रकाशक

**श्री.पांडुरंग सिताराम गोखले**

| द्वितीय आवृत्ति | सांगली | इ. स. २०२० |
|---|---|---|

## * अनुक्रमणिका *


- प्रथम आवृत्ती प्रकाशकाचे मनोगत एक
- आशीर्वाद याचना तीन
- गौरव पाच
- मनोगत सात
- माझिया मनिचे बारा
- निमित्ताचा धनी तेरा
- द्वितीय आवृत्ती प्रकाशकाचे मनोगत पंधरा

| प्रकरण | पृष्ठांक | ओवी संख्या |
|---|---|---|
| अध्याय -१ – अवतार बालयोगी वर्णन | १-१९ | १८९ |
| अध्याय- २ – लौकिक अधिकार वर्णन | २०-३५ | १६९ |
| अध्याय- ३ – श्रीगुरुलिंगगीता वर्णन | ३६-४७ | ११७ |
| अध्याय- ४ – मातृपितृ वर्णन | ४८-६० | १३३ |
| अध्याय- ५ – कीर्तन वर्णन | ६१-७५ | १५७ |
| अध्याय- ६ – संसारस्थिती, चित्‌शक्ती वर्णन | ७६-९२ | १७७ |
| अध्याय- ७ – पारमार्थिक अधिकार वर्णन | ९३-१०४ | १२५ |
| अध्याय- ८ – प्रचिती साक्ष वर्णन | १०५-११८ | १४७ |
| अध्याय- ९ – पुण्यधाम वर्णन | ११९-१२८ | १०१ |
| अध्याय- १० – राजयोग वर्णन | १२९-१३८ | १०० |
| अध्याय- ११ – संतभेट वर्णन | १३९-१५३ | १५९ |
| अध्याय- १२ – तत्त्वज्ञान वर्णन | १५४-१६६ | १४० |
| अध्याय- १३ – निर्याणप्रसंग वर्णन | १६७-१८७ | २२५ |
| | | १९३९ |
| ▪ भावे गावे गीत | १८८ | |
| ▪ आरत्या | १९४ | |
| ▪ श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा | १९६ | |
| ▪ श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची | १९८ | |


## श्री सद्गुरू नमन अष्टक

जयांचा जगी सिद्ध अवतार झाला । याचा कधी अर्थ आम्हा न कळला ।
सहज शब्दे जरी तुम्ही वदला । नमस्कार माझा श्रीसंतराया ।।१।।

आला तुम्ही ज्या मार्गावरूनी । स्वये दाखविला तो आचरोनी ।
भक्ता वळेना तरी तो अजुनी । नमस्कार माझा तुम्हा फिरफिरोनी ।।२।।

सत्ता जगी आपुली आहे नित्य । आम्हा पायाशी असो द्यावे नित्य ।
सेवा घडावी आपुली ही नित्य । नमस्कार माझा तुम्हा व्हावा नित्य ।।३।।

तुम्ही मार्ग चोखाळला चैतन्याचा । सदा पाहिला झोत पीतप्रभेचा ।
सुखाचे शेजारी असे वास तुमचा । नमस्कार स्वीकारावा या रंकाचा ।।४।।

संपूर्ण अवतारी प्रसन्न चित्त । कधी न झाला तुम्ही विचलीत ।
जरी व्याधी शिरल्या बहु या देहात । नमस्कार माझा मन होवो शांत ।।५।।

राजाधिराजा समर्थ स्वामीराया । किती गुण वर्णु कळेना मना या ।
बहु आदरे शीर लवूनी पाया । नमस्कार माझा सद्गुरू देवराया ।।६।।

खरे ज्ञान तुम्हीच आम्हा दिधले । बहु ऐकले तेणे मन शांत झाले ।
आपुलेपणाने किती शिकविले । नमस्कार माझे तुम्ही गोड केले ।।७।।

आता तुम्ही निर्गुणी घर केले । तरी आम्ही तुम्हा नित वंदियेले ।
आम्हा नित्य तुम्हीच ना सांभाळिले । नमस्कार अष्टक ते स्फुरविले ।।८।।

।। राजाधिराज सद्गुरूनाथ महाराज की जय ।।

**-- श्री. प्रसन्न गोखले**

## – प्रथम आवृत्तीच्या प्रकाशकाचे दोन शब्द –

**।। श्रीदासराममहाराज प्रसन्न ।।**

**हेचि मला हरिदे । दे रे ।। धृ ।।**

**तव चरणाची नित्यही सेवा अखंडीत घडू दे ।।१।।**

प.पू.समर्थ सद्गुरु श्रीदासराममहाराज तथा श्रीदादामहाराज यांचे श्री. प्रसन्न गोखले लिखीत ओवीबद्ध चरित्र प्रकाशित होत आहे ही खरोखरीच अत्यंतिक आनंदाची पर्वणी आहे. या ओवीबद्ध चरित्रामुळे भक्तांना नित्य पारायण सेवा करणे शक्य होणार आहे. त्यामुळे आमचे गुरुबंधु व माझे मित्र श्री. प्रसन्न गोखले यांच्या माध्यमातून आपल्या सर्व सद्गुरुभक्तांची सोय झाली आहे.

'श्रीदासरामचरित्र' या ओवीबद्ध चरित्राच्या प्रकाशनाची सेवा आम्हा कुलकर्णी कुटुंबियांना मिळाली हे आमचे थोर भाग्य आहे. या सेवेचा लाभ मिळाला याबद्दल आम्ही प.पू.श्रीआण्णांचे ऋणी आहोत व या ऋणातच राहणे हेही आमचे भाग्य आहे.

अशी प्रेरणा होण्यासाठी माझे सद्गुरु प. पू. श्रीदासराममहाराज यांचे कृपाशीर्वाद तसेच माझे पितृदेव श्री.खंडेराव विष्णुपंत कुलकर्णी व मातोश्री सौ. पद्मजा खंडेराव कुलकर्णी यांची पुण्याई व आशीर्वादच कारणीभूत आहेत. तसेच ज्यांच्यामुळे मला श्रीसद्गुरु चरणांची भेट झाली ते माझे परममित्र श्री. पंकज प्रतापसिंह राजपूत व त्यांच्या मातोश्री सौ. उषादेवी प्रतापसिंह राजपूत यांचा याठिकाणी आवर्जून उल्लेख करावासा वाटतो.

तसेच श्रीगुरुकृपेचा आणखी एक प्रसाद म्हणजे प.पू श्रीआण्णांच्या आज्ञेने व कृपाशीर्वादामुळे पुणे येथे आमचे घरी सुरु असलेली प्रत्येक महिन्याच्या चौथ्या रविवारची उपासना होय. श्रीदादांचे कृपानुग्रहीत सद्भक्त व त्यांच्या स्नेहाने आमचे गृही आलेल्या प.पू.सद्गुरु श्रीदासराममहाराजांच्या पादुका ही केवळ आनंदाची पर्वणी आहे. या सर्व गुरुबंधू व भगिनींचा लोभ व प्रेम असेच टिकावे ही कळकळीची प्रार्थना. आपल्या सर्वांवर प.पू. श्रीआण्णांची कृपा अशीच रहावी व आपणाकडून नित्योपासना, श्रीचरणांवरचा लोभ व निष्ठा अशीच उत्तरोत्तर वाढत जावी, ही प्रामाणिक



प्रार्थना!

**'श्रीहनुमद्गुरुपदी लीन । श्रीनारायण हृदयी विराजमान । सहज साधन कीर्तन । हेची श्रीदासरामचरित्र ।।'** या श्री. प्रसन्न गोखले यांच्या ओवीप्रमाणे प.पू.श्रीसद्गुरु दासराममममहाराज यांचे अद्भुत चरित्र हे प्रचंड गुरुनिष्ठा, आपल्या (चिमड) संप्रदायाचे अध्वर्यु प.पू.भगवान श्रीनिंबरगीकरमहाराज यांचा अखंड ध्यास व अखंड कीर्तनसेवा यामध्ये सामावले आहे. अशा या अद्भुत चरित्र पठणामुळे व प.पू.समर्थ सद्गुरु श्रीदासराममहाराज यांच्या कृपाशीर्वादामुळे हा भवसागर तरुन जावा व आपणा सर्वांकडून अशीच गुरुचरणांची सेवा अविरत घडत रहावी अशी प्रार्थना समर्थ सद्गुरु श्रीदासराममहाराज यांचे चरणी करतो.

या **'श्रीदासरामचरित्रा'**साठी प.पू.श्रीआण्णा यांची आशीर्वाद याचना, आदरणीय प्रा.डॉ. के.वा.आपटे काका यांचे गौरव शब्द, श्री.विनयानंदमहाराज यांचे मनोगत व आदरणीय श्री.दीपक चंद्रशेखर केळकर यांचे चार शब्द लाभले. या सर्वांचा मी ऋणी आहे. या ग्रंथाच्या छपाईचे काम श्रीदासराम ऑफसेटचे श्री.अनिल लोखंडे यांनी उत्कृष्ठ पध्दतीने केले आहे त्यांचाही मी आभारी आहे.

शेवटी प.पू.भगवान श्रीनिंबरगीकरमहाराज व समर्थ सद्गुरु श्रीदासराममहाराज यांच्या चरणी वंदन करुन माझे प्रकाशकाचे शब्द पूर्ण करतो.

**श्री.प्रसाद खंडेराव कुलकर्णी**
पुणे.

॥ श्रीराम ॥

# आशीर्वादाची याचना !

माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदासराममहाराज केळकर यांचे ओवीबद्ध चरित्र, माझे परमस्नेही श्री. बाळासाहेब गोखले यांचे चिरंजीव श्री.प्रसन्न गोखले यांनी तेरा अध्यायात लिहिले आहे. नावाप्रमाणेच ज्यांच्यावर काव्य आणि स्फूर्ती प्रसन्न आहे, तसे हे चरित्रपण प्रसन्नतेने लिहिले गेले आहे.

परमार्थात मन प्रसन्न पाहिजे, आपला चेहरा प्रसन्न पाहिजे, हे मन ज्या हृदयामध्ये आहे ते हृदय प्रसन्न पाहिजे, आपले दैवत प्रसन्न पाहिजे,आपले सद्गुरु प्रसन्न पाहिजेत. तसे आमच्या श्री.प्रसन्न गोखले यांचेवर आमचे ती.प.पू. श्रीदादा हे प्रसन्न आहेत हे जाणवते. श्री.प्रसन्न गोखले यांची काही पद्ये आपण जर ऐकली तर याची साक्ष आपणासही आल्याशिवाय राहणार नाही.

या चरित्राचे लेखक आहेत प्रसन्न, आणि प्रकाशक आहेत पुण्याचे श्री.प्रसाद कुलकर्णी! आणि मौज अशी आहे ‘‘प्रसादस्तु प्रसन्नता’’ आणि हे वाक्य श्रीदादांच्या कीर्तनात आपण ऐकले आहे आणि हे दोघेही श्रीदादांचे कृपांकित आहेत, म्हणून याला विशेष महत्त्व आहे.

‘गुरुचा पंखा असावा वरती । डंका गाजे त्रिजगती ।।१।।
गुरुकृपेचे असावे छत्र । श्रीराम हालवितो सूत्र ।।२।।
रामनामे रंगलिये वाणी । हीच लावण्याची खाणी ।।३।।
राम म्हणे नका धरु शंका । एक हालवा गुरुपंखा ।।४।।’

या गुरुच्या पंख्याचे वारे जे चैतन्याचे वारे आहे तोच आमच्या श्रीदादांचा देव आहे. श्रीदादांना पहिल्यांदा स्फुरलेल्या या पदातील आशयाप्रमाणे श्रीदादांची गुरुकृपा आमचेवर असावी व आमच्या जीवनाची सूत्रे श्रीदादांनी आपल्या हाती घ्यावीत म्हणजे आमच्या साऱ्यांचे जीवन आनंदमय होईल यात शंका नाही.

खरा देव आहे, थोरला देव आहे, देवांचा देव आहे. त्या देवाचा साक्षात्कार होणे हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे. जन्माने सिद्ध झालेला हक्क आहे. आणि तो मी



मिळविणारच असे आमचे श्रीदादा वरचेवर कीर्तनात सांगत असत. ते चैतन्याशिवाय दुसरे काही बोलतच नसत. आमचे श्रीमामा नामाशिवाय काही बोलतच नसत. यात काही वेगळेपण नाहीच आहे. नाम हेच चैतन्य आहे.

‘तुका म्हणे नाम । चैतन्य निजधाम’ यात काही द्वैत नाही, अद्वैतच आहे.

श्री. प्रसन्न गोखले यांचेकडून अशीच वाङ्मयीन सेवा प्रसन्नतेने घडत रहावी अशी श्रीदादांचे चरणी प्रार्थना करतो. श्री.प्रसाद कुलकर्णी यांनी हे ।। श्रीदासरामचरित्र ।। प्रकाशित करुन श्रीदादांच्या नामधारकांची मोठी सोय केली आहे.

भगवान श्रीसद्गुरु तात्यासाहेबमहाराज कोटणीस, माझे आजोबा ती.प.पू. श्रीमामामहाराज केळकर व माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी अनेक प्रणिपात करतो.

माझ्या प.पू.मातोश्री व पितृदेव श्रीसीतारामांचे चरणी आमचेसाठी व श्री.प्रसन्न गोखले यांचेसाठी आशीर्वादाची याचना करून येथेच थांबतो.

।। राजाधिराज श्रीसद्गुरुनाथ महाराज की जय ।।

।। श्रीसद्गुरु परंपरा की जय ।।

शेष श्रीराम स्मरण !

सांगली,
दिनांक - १७/७/२०१५
श्रीटेंबेस्वामी पुण्यतिथी

श्रीदादांचा कृपाभिलाषी,
**चंद्रशेखर**
**(चंद्रशेखर रामराय केळकर)**

# गौरव

प.पू.मामामहाराज केळकर यांनी श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज या आपल्या मोक्षगुरुचे 'श्रीहनुमद्गुरुचरित्रबोधसार' नावाचे चरित्र १३ अध्यायांत ओवीबद्ध केले. श्रीमामामहाराज केळकर या आपल्या सद्गुरुंचे चरित्र मा.न.दा.दिवेकर यांनी ओवी हा छंद वापरून १३ अध्यायांत लिहिले त्याच धर्तीवर श्री.प्रसन्न गोखले यांनी आपले सद्गुरु श्रीदासराममहाराज यांचे चरित्र ओवी हाच छंद वापरून १३ अध्यायांत केले. तेच येथे प्रस्तुत केले आहे.

या ओवीबद्ध १३ अध्यायांत श्रीदासराममहाराजांचे चरित्र कसे आले आहे, हे अध्यायांच्या पुढील नावांवरून स्पष्ट होईल.


अवतार बालयोगी वर्णन ................................ १ ला अध्याय

लौकिक अधिकार वर्णन .................................. २ रा अध्याय

श्रीगुरुलिंगगीता वर्णन .................................... ३ रा अध्याय

मातृपितृ वर्णन ............................................ ४ था अध्याय

कीर्तन वर्णन ............................................... ५ वा अध्याय

संसारस्थिति चित्शक्ती वर्णन .......................... ६ वा अध्याय

पारमार्थिक अधिकार वर्णन ............................. ७ वा अध्याय

प्रचीतिसाक्ष वर्णन ........................................ ८ वा अध्याय

पुण्यधाम वर्णन ............................................ ९ वा अध्याय

राजयोग वर्णन ............................................१० वा अध्याय

संतभेट वर्णन .............................................११ वा अध्याय

तत्त्वज्ञान वर्णन ...........................................१२ वा अध्याय

निर्याणप्रसंग वर्णन .......................................१३ वा अध्याय


शेवटच्या 'निर्याणप्रसंगवर्णन' या अध्यायात श्री.प्रसन्न गोखले यांनी श्रीदासरामहाराजांचे केवळ निर्याणाचे वर्णन केले आहे, असे नसून श्रीदासराममहाराजांच्या चरित्राचा धागा नंतरही कसा राहिला, हेही सांगितले आहे.



तसे पाहू गेल्यास संतांची चरित्रे लिहिणे हे काम फारच अवघड असते. श्रीदासराममहाराज प्रत्यक्षात योगी पुरुष होते, हे त्यांनी ज्ञानेश्वरमहाराजांच्या 'मुद्राक्रम' व 'ज्ञानदेवतेहत्तिशी' या ग्रंथांवर लिहिलेल्या भाष्यावरून स्पष्ट होते. तसेच ते दुसऱ्याच्या मनात काय चालले आहे हे जाणीत, यावरुन स्पष्ट होते. असे असूनही ते कीर्तनात रममाण झाले आणि त्यांनी ३९ वर्षे अखंड हरिकीर्तन केले. याच जोडीने ते संसारातही पुत्र, पिता, आजोबा या नात्याने वावरले. सांसारिक गोष्टींच्या जोडीने त्यांनी स्वानुभवजन्य तत्त्वज्ञान कीर्तनात मांडले. अशा विविधांगी संत दासराममहाराजांचे चरित्र लिहिणे हे अवघड काम श्री.प्रसन्न गोखले यांनी व्यवस्थितपणे हाताळले आहे हे प्रस्तुत चरित्रावरून स्पष्ट होते.

अनेकांना गद्य वाचायचा कंटाळा असतो. त्यांना पद्यबंध आवडतात. प्रस्तुतचे चरित्र ओवी या पद्यात असल्याने त्यांना हे वाचणे आवडेल तसेच ज्यांना चरित्रपठणाची पारायणे करावयाची आहेत, त्यांनाही हे चरित्र उपयोगी पडणारे आहे. असे हे चरित्र लिहिल्याबद्दल मा. प्रसन्न गोखले हे स्तुतीस आणि अभिनंदनास पात्र आहेत, यात शंका नाही.

प्रस्तुत चरित्राचे लेखक श्री.प्रसन्न गोखले आहेत. ते नावाप्रमाणेच सदा प्रसन्न असतात. प्रसन्न या शब्दाबद्दल श्री चंद्रशेखर उर्फ आण्णामहाराज केळकर यांनी आपल्या आशीर्वादपर शब्दात आपले विचार उत्तम प्रकारे व्यक्त केले आहेत. तुकाराममहाराज सांगतात- 'मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धींचे कारण ।।' या वचनानुसार मा. प्रसन्न गोखले यांचे मन सदा प्रसन्न असल्याने त्यांना सर्व सिद्धी प्राप्त होतील यात शंका नाही, आणि असे अधिकाधिक लेखन करून त्यांचा परिचय त्यांनी वाचकांना करून द्यावा, अशी विनंती करून येथेच विराम देतो.

**के.वा.आपटे,**
**सांगली.**

# – मनोगत –

**'पवित्र ते कुळ पावन तो देश । जेथे हरिचे दास घेती जन्म ।।'**

कोकणातील आचरे, जिल्हा सिंधुदुर्ग येथील श्रीदेव रामेश्वर हे ग्रामदैवत असून या गावातून व्यापारानिमित्त सांगलीमध्ये आलेले श्री गंगाधरपंत यांचे एकमेव चिरंजीव श्रीअंताजीपंत यांचा ।। ॐ नम: शिवाय ।। हा नित्याचा मंत्र होता व हे श्री टेंबेस्वामी आणि दीक्षितस्वामींचे दर्शनास नृसिंहवाडीस जात असत. पुढे सद्गुरु श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराजांकडून अनुग्रह घेतला. 'श्रीरामनिकेतन' ज्या वाड्यामध्ये आहे तो वाडा श्रीअंताजीपंत यांनी खरेदी केला आहे. श्री अंताजीपंत यांच्या अर्धांगिनी सौ.लक्ष्मीबाई ह्या श्रीगोंदवलेकरमहाराजांच्या अनुग्रहीत होत्या आणि अशा पावन कुळात श्रीअंताजीपंतांचे एकमेव सुपुत्र श्री गोविंद उर्फ मामामहाराज केळकर यांचा जन्म झाला असे. सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे आज्ञेवरुन प.पू.श्रीमामामहाराज केळकर यांचे माघ वद्य ३ शके १८४६ + ७८ म्हणजे सन १९२४ पासून नित्य हरिकीर्तन सुरु झाले.

**'श्रीरामनिकेतनी मामांनी । सुरु केले कीर्तन अखंडपणी ।।'**

श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या कृपाशीर्वादाचे फळ म्हणजे, निर्वाण समयी (शेवटच्या दिवशी देहाच्या नाड्या लागत नसतानाही) श्रीमामामहाराज यांनी 'श्रीराम जयराम जयजयराम' या त्यांच्या महामंत्राचा मोठ्यांदा गजर केला व श्रीमामामहाराजांनी ३८ वर्षे नित्यकीर्तन साधले.

**'राम स्मरे निरंतर । ते जाणावे पुण्य शरीर ।**
**नाना दोषांचे गिरीवर । राम नामे नासती ।।'**

श्रीमामामहाराजांचे सुपुत्र श्रीरामराय उर्फ सद्गुरु श्रीदासराममहाराज यांचा लौकिक अवतार कुरुंदवाड ग्रामी अधिक श्रावण व ।। ६ शके १८४२ वार गुरुवार, ६ ऑगस्ट १९२० रात्रौ २ वा. १० मि. सातवे मासी इंदिरामातेपोटी झाला असे. सद्गुरु श्रीतात्यासाहेब



महाराजांच्या आशीर्वादामुळे श्रीदासराममहाराज हे वयाच्या ५ व्या वर्षापासूनच ब्रह्म व माया या गूढ विषयावर कीर्तन करु लागले.

**'मामांचे कीर्तन नामाभोवती । दादांचे कीर्तन चैतन्याभोवती ।।'**

श्रीदादांची कीर्तनसेवा माघ शु।। दशमी सन १९६२ ते २००१ (समाधी श्रावण शु.६ बुधवार सायंकाळी ७.४० वा. शके १९२३+७८ = २००१) श्रीदादांनी ३९ वर्षे अखंड कीर्तनसेवा केली. त्यांनी चरित्रात्मक व अध्यात्मिक स्वरुपाच्या अनेकविध ग्रंथांची रचना व विपूल प्रासादिक लेखन केले आहे.

**'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती परोपकारे ।।'**
**'दासा हृदयी हनुमान । सदा करी तो कीर्तन ।।'**
**'दिव्य अमोघ वाणीतून । प्रवचन कीर्तन निरुपण ।।'**

पूजनीय श्रीदासराममहाराज (श्रीदादा) यांचे जीवन अत्यंत आश्चर्यचकीत करणारे आहे. श्रीदादा या जगात अवतरण्यापूर्वीच भगवंताने आमच्यासाठी ही योजना केलेली दिसते. एका पवित्र कुळात जन्म घेण्यापूर्वी थोर अवलीया वजीरबाबा यांचे कृपाशीर्वादाने व नंतरही जगद्गुरु राजाधिराज श्रीगुरुलिंगजंगममहाराज, निंबरगी यांचे थोर परंपरेतील संत व सद्गुरु श्रीहनुमंत उर्फ तात्यासाहेब कोटणीसमहाराज, सांगली यांनी, कुरुंदवाड मुक्कामी शिशु अवस्थेत (१४ वे दिवशी) असताना दर्शन, स्पर्शन व संभाषणाद्वारे अनुग्रह देवून श्रीदादांना 'राम' हे पवित्र नामाभिदान दिले.

**'ज्ञानीयाचे शरीर पडो रानी । अथवा स्मशानी । तो मुक्त जाणावा ।'**
**'मीपण मागे सांडिले । स्वये आपणाशी धुंडीले ।**
**तुर्येसी ओलांडिले । या नाव साधक ।।'**
**''अहंता स्वरुपी गळे । विषय तृष्णा मावळे ।**
**इंद्रियांचे लळे । क्रियेवीण पूर्ण होती ।।'**
**'कीर्तन ऐकता दादांचे । साम्राज्य अध्यात्मलहरींचे ।**
**तुषार उडती चैतन्याचे । अंतरामध्ये ।।'**

प्रात:स्मरणीय प.पू.सद्गुरु श्रीदासराममहाराज, सांगली (शके १८४२–१९२३) यांचे त्रयोदश अध्यायी, ओवीबद्ध चरित्र (अलौकिक जीवन गाथा) सद्गुरु सेवक (दीन

अर्पितो तुलसीपत्र अशी बिरुदावली असलेले) श्री.प्रसन्न पांडुरंग गोखले यांनी पद्यरुपात लिहिले असून ते पारायण प्रत म्हणून प्रत्येक सद्भक्ताकडे असणे आवश्यक आहे. चरित्र ग्रंथाचे लिखाण इतके सुलभ व सहजपणे झाले आहे की त्यातील रोज एक तरी अध्याय जरुर वाचावा. कारण ग्रंथात तेरा अध्याय असून ओवी संख्या १९३९ इतकी आहे. 'ये सब तेराही है । मेरा न कोई ।।' अशी स्थिती प्राप्त व्हावी असे वाटत असेल तर सद्गुरु व त्यांनी आपल्या जीवनातून दिलेला उपदेश सतत चित्तात राहिला पाहिजे.

श्रीरामराय (दादा) व सौ. सीतावहिनी यांना एकूण चार चिरंजीव पैकी श्री चंद्रशेखर आण्णा हे ज्येष्ठ, गेली १४ वर्षे किर्तन व प्रवचन सेवेने आम्हा सर्व साधकांना अत्यंत प्रेमाने मार्गदर्शन करीत आहेत.

**न गुरोरधिकं तत्त्वं । न गुरोरधिकं तप: ।**
**तस्मात् परतरं नास्ति । तस्मै श्रीगुरुवे नम: ।।**
**ध्यानं मूलं गुरोर्मुर्ती । पूजामूलं गुरो: पदम् ।**
**मंत्रमुलं गुरोर्वाक्यं । मुक्तिमूलं गुरो:कृपा ।।**

चरित्राचे वाचन करताना अनेक प्रसंगात मला अश्रु अनावर झाले. किती अगाध जीवन या महापुरुषांचे !

**'धर्मामाजी परम धर्म । स्वरुपी राहणे हा स्वधर्म ।**
**हेचि जाणिजे मुख्य वर्म । साधु लक्षणाचे ।।'**
**'स्वरुप गोडी लागता मना । सकळ जाती कामना ।**
**भोगेच्छा असेना । स्थितप्रज्ञासी ।।'**

श्रीदादांनी बालवयातच कीर्तनसेवेला आणि अध्यात्मिक लिखाणाला सुरुवात केली.

सद्गुरु श्रीनागाप्पाण्णामहाराजांचे आशीर्वचनाप्रमाणे श्रीगुरुलिंगजंगममहाराज यांनी आपले निर्याणानंतर श्रीदादांना प्रत्यक्ष दर्शनभेट देवून सुचविलेली कानडी भाषेतील अभंग रचना ही अघटीत बाब आहे. अनेक संप्रदायातील विभुतींनी दादांशी भेट घेवून केलेली चर्चा उल्लेखनीय होय.



चरित्र लेखक श्री. प्रसन्न गोखले यांचे भेटीनंतर प.पू.श्री चंद्रशेखर आण्णा व चिमड संप्रदायातील थोर पुरुषांचा परिचय झाला हे माझे परमभाग्य होय. चिमड संप्रदाय या ग्रंथातील मरुळसिद्धांची मठपरंपरा, यातील अर्वाचीन साधू कल्मेश्वर मथळ्याखाली श्रीदादांनी लिहिलेला सर्व तपशील, आमचे श्रीनिरंजनमहाराज आश्रम,मौजे वडगांव येथे ग्रॅनाईटवर कोरून, त्याचे रविवार दि. २४/५/२०१५ रोजी पूज्य श्रीआण्णा यांचे अमृत हस्ते अनावरण केले आहे.

पूजनीय श्रीकोटणीसमहाराज, मामा व दादा यांनी दिलेली कीर्तन परंपरा अखंडपणे वंदनीय श्री चंद्रशेखर आण्णा तसेच आदरणीय श्री.दीपक नाना यांनी चालू ठेवली असून सन २०१४ मध्ये शतमान महोत्सव अखंड कीर्तन सोहळा आपण सर्वांनी साजरा करुया.

संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वरमहाराज, तुकाराममहाराज, रेवणसिद्ध, गुरुलिंगजंगमममहाराजांनी श्रीदादांना प्रत्यक्ष दर्शन व मार्गदर्शन केले आहे. शिव संप्रदाय, कृष्ण यजुर्वेदिय शाखा, अद्वयानंद परंपरा, सहजराजयोग, साक्षात्कारी मालिका, शुध्द आचार विचार, सर्वधर्म समभाव, अखंडकीर्तन सेवा हा परंपरेचा अमुल्य ठेवा आहे.

श्रीदासराममहाराजांचे नांवे श्री अनिलप्रभू काकांनी सुबक व सर्वांगसुंदर वेबसाईट तयार करून परंपरेचा सर्व ठेवा सर्वांना खुला केला आहे. इतरही भावंडे आपापलेपरीने सेवा करीत आहेतच. परंतु विशेष बाब म्हणजे श्री आण्णांच्या अर्धांगी सौ. रोहिणी वहिनींचे मार्गदर्शनाखाली सांगली परिसरात अनेक महिला भजनी मंडळे तसेच श्री दीपक नानांच्या अर्धांगी सौ.अनुराधा वहिनी व सर्व केळकर कुटुंबीय आणि भक्तगण अत्यंत मधुर कंठाने भगवंताची व परंपरेची सेवा करीत आहेत.

श्री आण्णांचे चिरंजीव श्री. दिपक (नाना) हे सुद्धा कीर्तन प्रवचनाबरोबर संत सेवेत तत्पर आहेत. त्यांचे पुढाकाराने आणि लोकप्रतिनिधी व सर्व सद्भक्तांचे सहयोगातून देवनिंबरगी येथील श्रीगुरुलिंगजंगममहाराजांचे समाधी समोर सुरेख व पावित्र्याने भारित असे 'श्रीदासराममहाराज केळकर नामसाधना मंदिर' उभारिले आहे. दि. २५-५-२०१४ चे मंदिर लोकार्पण सोहळ्यास उपस्थित राहण्याचे परमभाग्य आम्हास लाभले.

जागतिक किर्तीचे श्री चिन्मयानंद स्वामींसारख्या अनेक सत्पुरुषांनी रामनिकेतन

सारख्या पवित्र स्थानाला भेट देऊन धन्यता व्यक्त केली आहे. यावरुन परंपरेची थोरवी अधोरेखीत होते.

संतचरित्रकार दासगणू म्हणतात, 'श्रीरामनिकेतन' हे नाथांचे घर आहे. श्रीदासराममहाराजांचा जन्म व निर्वाण शांतीब्रह्म एकनाथ महाराजांप्रमाणे षष्ठी या पावन तिथीचे आहे आणि घराण्यास लाभलेल्या सर्व माता भगिनी सेवाभावी आहेत ही विशेष उल्लेखनीय बाब आहे.

श्रीदादांचे अंतरंगातील शिष्य, संत साहित्याचे गाढे अभ्यासक प्रा. डॉ. के. वा. आपटे काका यांनी श्रीदादांची फार मोठी वाङ्मयीन सेवा केली आहे.

विहंगम मार्गाबाबत आपल्या परंपरेतील थोर संत सिद्धरामेश्वर महाराजांनी सविस्तर माहिती दिली आहे.

**आत्मप्रभा नित्य नवी । तेचि करुन ठाणदिवी ।**
**जो इंद्रियाते चोरून जेवी । तयासीच फावे ।।**
**सदाचार सार साचा । मंत्र दिधला जीवनाचा ।**

सिद्ध संप्रदायाचे सर्व महापुरुषांना माझे विनम्र दंडवत

**सदासर्वदा योग तुझा घडावा । तुझे कारणी देह माझा पडावा ।**
**उपेक्षु नको गुणवंता अनंता । रघुनायका मागणे हेचि आता ।।**

**।। राजारुढ मोक्षपती श्रीसद्गुरुनाथ महाराज की जय ।।**

स्थळ : हुपरी जि. कोल्हापूर ४१६२०३
तिथी कमला एकादशी (पुरुषोत्तममास)
अधिक आषाढ मन्मथ संवत्सर शके
१९३७ रविवार दि. २६-६-२०१५

आपला विनम्र
**के.डी.धनवडे (विनयानंद)**



।। श्रीराम ।।

# माझिया मनीचे ...

**तेहि प्राणापरौते । आवडती हे निरुते ।**
**जे भक्तचरित्राते । प्रशंसती ।।** (ज्ञा. १२-२२७)

वरील उक्तीप्रमाणे असणारे भक्तराज प.पू. सद्गुरु श्रीदासराममहाराज यांचे चरित्र श्री. प्रसन्न गोखले यांनी लिहिले आहे. त्यांनी मोठ्या भाविकतेने व रसाळवाणीने श्रीदादांचे चरित्र वर्णिले आहे.

ज्यांनी संतमहात्म्यांना प्रत्यक्ष पाहिले आहे, त्यांचे राहणीमान, जीवनमान पाहिले आहे, त्यांच्या संगतीत आपला बराच काळ व्यतीत केला आहे, तीच व्यक्ती खऱ्या अर्थाने ह्या संतमहात्म्यांचे चरित्र प्रभावीपणे लिहू शकते. याप्रमाणे श्री. प्रसन्न गोखले यांना श्रीदादांचा सहवास लाभला असल्याने त्यांचे हातून हे क्रमबद्ध चरित्र लिहिले गेले आहे. कमी वयात इतकी वाङ्मयीन स्फूर्ती असणे हे गुरुकृपेशिवाय शक्य नाही, कारण श्रीदादांचे चरित्र लिहिणे अवघड त्यात ओवीबद्ध चरित्र लिहिणे महाकर्म कठीण आहे. ओवीबद्ध चरित्र लिहिताना त्यात यमक जुळणे (विषयाला धरून) हे अत्यंत महत्त्वाचे असते. ते श्री.प्रसन्न गोखले यांनी समर्पकपणे सांभाळले आहे. गुरुकृपा असल्याशिवाय १९३९ ओव्यांचे चरित्र लिहिणे अत्यंत अवघड आहे. त्यामुळे ते अभिनंदनास पात्र आहेत यात शंका नाही.

सदरचे चरित्र हे ओवीबद्ध असल्याने ज्यांना कोणास या चरित्राचे पारायण करायचे आहे त्यासाठी ते अत्यंत उपयोगी पडणारे असे झाले आहे केवळ श्री. प्रसन्न गोखले यांनी विनंती केल्यामुळे या पुस्तकासाठी चार शब्द लिहिण्याचा मी माझ्या परीने प्रयत्न केला आहे. आणखी काय लिहू? प.पू.सद्गुरु श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी दंडवत घालून येथेच थांबतो.

सांगली दि. १७-७-२०१५
आषाढ शु. १ श्रीटेंबेस्वामी पुण्यतिथी

**श्री. दीपक चंद्रशेखर केळकर**

।। श्रीराम ।।

।। राजाधिराज सद्गुरुनाथ महाराज की जय ।।

# निमित्ताचा धनी....

**'पुण्याई आई वडिलांची । ताकद बहु संस्कारांची ।**
**झाली भेट समर्थ सद्गुरुंची । अध्यात्ममार्ग चालावया ।।'**

प. पू. समर्थ सद्गुरु श्रीदासराममहाराज केळकर म्हणजेच आपल्या सर्वांचे श्रीदादा यांचे ओवीबद्ध चरित्र लिहिले जाणे म्हणजेच त्यांची सत्ता चिरकाल असल्याची प्रत्यक्ष साक्ष आहे. संकल्प निर्मितीसाठी श्रीसद्गुरुंची स्फूर्ती व संकल्प सत्यात उतरण्यासाठी श्रीसद्गुरुंचीच शक्ती ही निर्विवादपणे कारणीभूत असते. यास आपण केवळ निमित्तमात्र असतो. **'निमित्ताचा धनी केला असे प्राणी'** हे स्मरणात रहावे, नाहीतर **'माझे माझे म्हणुनी वाया गेला'** अशी अवस्था होणे निश्चित आहे.

श्रीदादांनी सर्वांनाच आपल्या पदरी घेतले आणि निर्व्याज प्रेम दिले. आपल्या सर्व चुका आपणास कोणतीही विनवणी करावयास न लावता क्षणार्धात पोटात घालून सत्यमार्गाचे ज्ञान करुन दिले. माझेही कितीतरी अपराध झाले असतील, त्यातील एक उदाहरणादाखल येथे नमूद करतो.

श्रीरामनिकेतनमधील उत्सवाचा काळ, श्रीगोविंदनवमीचा प्रसादाचा दिवस. मी साधारणत: ७ वीत असेन. प्रसादाचे दिवशी आम्ही काही मुले दु. १ च्या सुट्टीत घरी येत असू. त्यदिवशीही मी लवकर घरी येऊन वाड्यात गेलो. त्यावेळी अंगणात पंगती वाढल्या जायच्या. आम्ही फक्त पाणी वाढण्याची सेवा करायचो. श्रीदादा पंगतीला बसले होते. पंगत सुरु व्हायची होती. मी पाण्याचा तांब्या जवळ ठेवून दादांच्या पाठीमागे बसलो होतो. इतक्यात गडबडीने माझ्या हातून तांब्या आडवा झाला आणि दादांचे धोतर ओलेचिंब झाले. पण आपले दादा एकाही शब्दाने बोलले नाहीत. इतकेच नव्हे तर कोणी पाणी सांडले हे मागे वळून देखील त्यांनी पाहिले नाही.



श्री.प्रकाशजी भावे सर व श्री.रेगोडकर काका हे दादांना घेऊन आत गेले व दादांना दुसरे धोतर नेसवून परत अंगणात घेऊन आले. दादा बसल्यावर पंगत सुरु झाली. विशेष म्हणजे गुरुगृहातील कोणीच मला काहीही बोलले नाहीत. अपराधी अपराध विसरला नाही मात्र ज्यांच्या बाबतीत हा अपराध घडला त्या माझ्या श्रीदादांच्या ते गावीही नव्हते. अशा महात्म्यांनीच म्हणावे,

'तुका म्हणे उगे रहावे । जे जे होईल ते ते पहावे ।। '

थोडक्यात दादांचे प्रेम हे नवनीतापेक्षाही कोमल, मृदु व पाण्यापेक्षाही नितळ, प्रवाही असे आहे हेच खरे.

**।। राजाधिराज सद्गुरुनाथ महाराज की जय ।।**

**प्रसन्न पांडुरंग गोखले**
सांगली.

# - द्वितीय आवृत्ती प्रकाशकाचे दोन शब्द -

।। श्रीदासराममहाराज प्रसन्न ।।

**सद्गुरू सेवा देई देवा । सार्थक होईल जन्माचे ।**
**जडता पाई मग भय नाही केल्या मागील कर्माचे ।।**

प.पू. सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर या माझ्या साक्षात्कारी सद्गुरूंचे ओवीबद्ध चरित्र ''**श्रीदासरामचरित्र**'' हे माझा मुलगा चि. प्रसन्न याचे हातून प.पू. श्रीदादांच्याच स्फूर्तीने लिहिले गेले आहे.

ते याआधीच म्हणजे २०१५ साली श्री.प्रसाद खंडेराव कुलकर्णी, पुणे यांनी सेवाभावाने प्रकाशित केले होते. आता या चरित्राच्या प्रती संपल्यामुळे माझे मनात हे चरित्र पुन्हा प्रकाशित करावे असे आले. व त्यानुसार या चरित्राची द्वितीय आवृत्ती प्रकाशित करणेची सेवा माझे हातून घडत आहे. हे मी माझे भाग्य समजतो. सद्गुरू हे देहकालातीत असून निर्याणानंतरही आपल्याला चरित्ररूपाने, स्मरणरूपाने चिरकाल प्रचिती देत असतात.

मला प.पू.श्रीमामामहाराज व प.पू.श्रीदासराममहाराज यांचा माझे वयाच्या १३ व्या वर्षापासून अखंड व प्रदीर्घ सहवास लाभला. त्यामुळे त्यांचे शुद्धाचरण, साधनष्ठिा, त्यांचा सद्गुरूप्रती असलेला दृढ सेवाभाव, तसेच शिष्यांबद्दलचा कळवळा, आपलेपणा असे सद्गुणाढ्य स्वरूप अनुभवण्यास मिळाले. खरोखरीच माझे जबरदस्त पूर्वसुकृत म्हणायचे!

इ.स.१९५२ मध्ये अचानक एके दिवशी सिटी हायस्कूलमधून संध्याकाळी घरी आल्यावर एका अनामिक पण तीव्र आंतरिक ओढीने मी श्रीरामनिकेतन येथे खेचला गेलो. आणि त्यांचाच झालो. तेव्हापासून प.पू.श्रीमामामहाराज यांचे नित्यकीर्तन, प.पू.श्रीदासराममहाराज यांची पेटीची साथ, त्यांच्या पेटीवादनावेळी मला भाता मारण्याची वरचेवर मिळलेली संधी, प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज यांचेबरोबर तासन्तास रंगलेल्या अध्यात्मिक चर्चा, दिवाळीमध्ये सकाळी प.पू. सौ. सीतावहिनींनी दिलेला फराळ, गुरूगृहाने आमच्या बाळगोपाळांवर पुत्रासमान केलेले कोडकौतुक, श्रीरामनिकेतनमध्ये इतक्या दीर्घ कालावधीत घडलेले सर्व समारंभ, सोहळे हे सारे आजही स्मृतीपटलावर ताजे आहेत. यातच गुरूगृहाचे अद्वितीयत्व स्पष्ट होते. प.पू.अण्णांचाही सहवास आजपर्यंत लाभत आहे.

इ.स.१९५५ साली मी प.पू.श्रीदादांचेकडे अनुग्रहाची इच्छा प्रदर्शित केली. पण प.पू. श्रीदादा म्हणाले, ''अरे बाळू, तू निदान मॅट्रिक हो म्हणजे तुझी नोकरीची सोय होईल. कारण



माझेवर तुझी प्रपंच आणि परमार्थ दोन्हीची जबाबदारी आहे.'' त्यानुसार दि.४.६.१९५६ रोजी मी मॅट्रिक पास झालो. त्या दिवशी प.पू.श्रीदादांनी प्रसादास पेढे वाटले आणि त्याच दिवशी बोलल्याप्रमाणे अनुग्रह दिला. आणि मला **''दया सागरे हो मला थोर केले । बहुसेवका माजी ते मेळविले ।।''** या उक्तीप्रमाणे कृतार्थ केले. आणि तेथून ते आजतागायत ''तुझा हस्त धरुनी जाता वाटे रे । पदोपदी समाधी सुख दाटे रे ।।'' अशा पद्धतीने आमचा सर्व प्रपंच आणि परमार्थ केवळ आणि केवळ प.पू.श्रीदादांच्या साक्षीनेच झाला व याही पुढे केवळ प.पू.श्रीदादांचेमुळेच होणार आहे. प.पू.श्रीदादांचे निर्याणानंतर तेच गाढ प्रेम, तीच पाखर प.पू.श्रीअण्णा व सर्व केळकर कुटुंबियांनी अबाधित ठेवली आहे. आजही श्री. दीपक बाळूकाका म्हणून प्रेमाने येतो, बोलतो हे नमूद केल्याशिवाय रहावत नाही. हे सर्व आठवताना मला माझ्या समकालीन मित्रांची तसेच प.पू.श्रीदादांच्या कृपाछत्रातील श्री. वसंत बापट (बापटलाल), श्री.सुरेश जोशी, श्री.मधुसूदन परचुरे, श्री. धनंजय भावे, श्री. शशिकांत मायदेव (My God )यांची आठवण आल्यावाचून रहात नाही.

माझ्या या जीवनप्रवासात माझी पत्नी सौ.मंजुषा हिनेही भक्कम साथ दिली. तिलाही प.पू.श्रीदादांचाच अनुग्रह होता. तसेच आमचे घरी प.पू.श्रीदादा अनेकवेळेला येत त्यावेळी तिने केलेले पदार्थ प.पू.श्रीदादांना फार आवडायचे.

अशी आमच्या सर्व गोखले कुटुंबियांकडून गुरूगृहावरील निष्ठा बळकट आणि वृद्धिंगत होवो व आमच्या सर्वांचा परमार्थ श्रीसद्गुरुकृपेने पूर्णत्वास जावो ही या प्रकाशन सेवेच्या निमित्ताने श्रीसद्गुरूचरणी प्रार्थना!

शेवटी या चरित्राचे मुद्रक एस. बी. लिथो प्रिंटिंगचे श्री.अमोल कुलकर्णी यांचे आभार मानतो. या चरित्रासाठी ज्यांचे मौलिक आशीर्वाद लाभले त्या सर्व आदरणीय महात्म्यांना वंदन करतो. पुन्हा एकदा श्रीरेवणसिद्धांचे पासून चालत आलेल्या श्रीनिंबरगी संप्रदायास साष्टांग नमस्कार करून येथेच थांबतो.

सामान्य जीव मी दुबळा । सद्गुरूचरणीचा पालापाचोळा ।
केवळ सद्गुरूकृपेचा उमाळा । हेचि ऐश्वर्य माझे ।। (श्रीदासरामचरित्र)

श्रीअनंतचुर्दशी
दि.०१.०९.२०२०

**पांडुरंग सिताराम गोखले**

।। श्रीराम ।।

**।। राजाधिराज सद्गुरुनाथमहाराज की जय ।।**

# प.पू.सद्गुरू श्रीचंद्रशेखर रामराय केळकर तथा श्रीअण्णामहाराज यांचे चरणी विनम्र भावसुमनांजली

सहज बोलणे हित उपदेश । करुनी सायास शिकविती ।।

आमचे अण्णा म्हणजे नम्रता, प्रसिद्धिपराङ्मुखता, सहजता, कोमलता, दयाभाव, अद्वैत साम्राज्य! किती सद्गुण सांगावेत तितके थोडेच आहेत. खऱ्या अर्थाने सद्गुणाढ्य असे त्यांचे स्वरूप होते.

प.पू.श्रीअण्णांनी आम्हा मुलांना व्यवहार आणि परमार्थ दोनही बाबतीत बोटास धरून शिकविले. सारे प्रसंग चटकन् डोळ्यासमोर येतात. अजुनही अण्णा आपल्याला हाक मारत आहेत, काही सांगत आहेत, कीर्तन करीत आहे असे वारंवार भासमान होते, हीच त्यांच्या अमरत्त्वाची प्रचिती आहे. 'साधुसंत नाही गेले । परी ते अजरामर होऊनी ठेले ।।' हेच खरे.

बुधवार दि.२३.०९.२०२० रोजी आमच्या श्रीअण्णांनी सद्गुरूस्मरणामध्ये, श्रीदादांच्या चिंतनामध्ये सायं.५ चे सुमारास देह ठेवला आणि हजारो जणांच्या हृदयाचा ठोका चुकला. असे अचानक काही होईल अशी किंचितही कल्पना आम्हास नव्हती. परंतु, दादा, अण्णा नेहमी कीर्तनात सांगतात की, संत आलेले कळत नाहीत, असताना कळत नाहीत, गेलेले कळत नाहीत, तेच खरे संत. 'सहजचि आलो सहजचि जातो । राहुनी जनी विजनी ।।' असे आमचे अण्णा म्हणजे प.पू. श्रीदासराममहाराज केळकर यांचे ज्येष्ठ श्रेष्ठ अधिकारी सुपुत्र होते.

श्रीदादांच्या कीर्तनात ३९ वर्षे श्रीअण्णांनी पेटीची साथ समर्थपणे केली आणि त्यानंतर अखंड १९ वर्षे ही कीर्तनपरंपरा अतिशय पवित्रतेने सांभाळली.



प्रापंचिक, दैहिक, मानसिक, कोणत्याही अडचणींचा परिणाम न होवू देता सदैव प्रसन्नतेने सर्वांना आनंद दिला, जो आला तो दर्शनाने धन्य झाला, असा अनेकांचा अनुभव आहे.

प्रवचन, कीर्तन करताना हे सर्व आमच्या दादांचे आहे, मी केवळ निमित्त आहे, असाच भाव आयुष्यभर सर्वांना पहाण्यास मिळाला. अण्णा आता तुम्ही प्रत्यक्ष दिसणार नाही, प्रत्यक्ष बोलणार नाही पण स्मरणरूपाने स्फूर्तीरुपाने, प्रचितीरूपाने तुमची आम्हास अखंड जवळीक लाभणार असा आम्हास विश्वास आहे.

या श्रीदासरामचरित्राच्या पुनर्मुद्रणाच्या निमित्ताने आपल्या पवित्र चरणी अंतःकरणपूर्वक आदरांजली !!!

**आरती गुरुवर्या । श्रीअण्णा नाम तया ।**
**अखंड कीर्तनासी । समर्पिली मन काया ।।ध्रु।।**
**पिता तेचि सद्गुरू । श्रीदासराम थोरू ।**
**सीता माता चित्शक्ती । शुद्ध प्रेमाचा सागरू ।।१।।**
**'जयदेवा' विनयाने । साऱ्या जगासी जिंकीले ।**
**मुक्तहास्य दर्शनाने । भक्त सुखात न्हाले ।।२।।**
**दासरामवचनांचे । आम्हा दिले नवनीत ।**
**दादांचे लेकरू हे । भक्तीभावे नमीत ।।३।।**

****
***

।। श्रीराम ।।

# अध्याय -(१)- अवतार बालयोगी वर्णन

।। राजाधिराज सद्‌गुरुनाथ महाराज की जय ।।

।। श्री गणेशाय नम: ।।

श्रीगजाननांचे चरणी । वंदूनी धरिली लेखणी ।
चौदा विद्या ज्यांचे अंगणी । उभ्या हात जोडोनी ।।१।।

कोणत्याही कार्याआधी । पूजावा गजानन निरुपाधी ।
जेणे योगे नुरे उपाधी । या संसाराची ।।२।।

अग्रपूजेचा मान । मिळाला गजाननांना सर्वांकडून ।
असा गजानन सर्वसंपन्न । सुखकर्ता विघ्नहर्ता ।।३।।

खरा गजानन कोणता । सर्व आद्यविश्वाचा प्रणेता ।
ओंकार गतीरुप तत्त्वत: । सांगितला दादांनीच ।।४।।

चत्त्वार वाचेसी मूळ । श्रीशारदामाता केवळ ।
स्तविली म्या देई बळ । सामर्थ्य जिचे अपार असे ।।५।।

वाग्देवता सरस्वती । असो वास तुझा चित्ती ।
तरीच होईल लेखनपूर्ती । हे मी जाणतो ।।६।।

आता नमन संप्रदायासी । जो आधारवड आम्हासी ।
पांथस्थ आतूर छायेसी । श्रीगुरुलिंगजंगमांच्या ।।७।।

सकलसिद्ध परंपरा । पायीक आम्ही करुणाकरा ।
साधन सेवत मिळतो खरा । आनंदचि आनंद ।।८।।

श्रीदासरामसद्‌गुरुंचे अधिष्ठान । सदासर्वदा स्फूर्तीस्थान ।
घालितो जी साष्टांग नमन । दंडवत स्विकारावे ।।९।।



श्रीदादांचे चरित्र अती गहन । तेथे मी अती सामान्य ।
परी इच्छा असे मनोमन । म्हणोन प्रार्थितसे ।।१०।।

महान साधुसंतांचे । चरित्र सादर करण्याचे ।
स्वप्न मी कधीचे । पाहतसे ।।११।।

एवढीच एक मनीची आस । महाराजे न्यावी पूर्णत्त्वास ।
आणखी काही नाही आस । खरोखरीच या जगती ।।१२।।

बाकीचे काम घडो न घडो । परि एवढे कार्य पार पडो ।
माथा-कर वारंवार जडो । आपुल्या पायाशी ।।१३।।

दादांसारख्या चैतन्यरुपाचे । चरित्र वर्णन करण्याचे ।
ते काम शब्दांचे । खचितचि नसे ।।१४।।

परंतु चैतन्याचा विषय । सांगण्या शब्द हाचि उपाय ।
म्हणोन मागतसे सहाय्य । आपुलेचि दादा ।।१५।।

सद्‌गुरु म्हणजे एक तत्त्व । ज्याचे असे जगती महत्त्व ।
आपण अनुभवावे अनन्यत्त्व । सद्‌गुरुकृपे ।।१६।।

असो एवढी प्रस्तावना । आता करु चरित्रवर्णना ।
आपण या बुद्धीहीना । क्षमा करावी ।।१७।।

अधिक ते दादांचे । न्यूनपण निश्चित माझे ।
दादांच्या पूर्णत्त्वाचे । वर्णन काय करावे ।।१८।।

जेथे येईल न्यूनपण । ते माझे असे संपूर्ण ।
आपण श्रोते सुलक्षण । अपराध पोटी घालावे ।।१९।।

आता पाहू सद्‌गुरु अवतार । जो असे मनोहर ।
वर्णन करिता पारावार । न उरे आनंदासी ।।२०।।

कोणताही संत अवतार । झाला पूर्वापार ।
करावया प्राणिमात्रांचा उद्धार । कराल कलीयुगी ।।२१।।

तसाच अवतार दादांचा । झाला कशासाठी कैचा ।
हेच वर्णन करण्याचा । प्रसंग पातला ।।२२।।

तात्यासाहेब महाराजांचे जरी । चरित्र लिहिणे असे निर्धारी ।
सुरुवात त्याची होतसे खरी । ब्रह्मस्वरुपापासोनी ।।२३।।

असे म्हणती दादा । परी त्यांचेच चरित्र पहाता ।
कोठोनही सुरुवात करता । वाटे अलौकिक ।।२४।।

जैसी का खडीसाखर । कशीही ठेविली जिभेवर ।
तरी ती लागे मधुर । आपणासी ।।२५।।

तैसाची विषय हा । वाटेल गोड सुमधुर पहा ।
दादाचि मुळी प्रेमळ पहा । किती असती ।।२६।।

दादांचे चरित्र सारभूत । म्हणजे चैतन्य सर्वगत ।
जीवन ते उपाधीभूत । दादांनीच सांगितले ।।२७।।

आपण समजतो ते जीवन नव्हे । आपण समजतो तो संसार नव्हे ।
आपण समजतो ते चरित्र नव्हे । दादांचे कदापिही ।।२८।।

आपणास दिसल्या त्या घटना । परि त्यातील भूमिका पहा ना ।
किती सहज वाटल्या दादांना । त्या सर्व ।।२९।।

माणूस काय म्हणतो । मीच सर्व करतो ।
ही त्याची अहंता चालवितो । तो देवचि असे ।।३०।।

दादांचे चरित्र कसे आहे । जसे गंगेचे वाहणे आहे ।
सर्वांचे हीतचि पाहे । जैसी गंगा ।।३१।।



अशी ही चरित्रगंगा । पावन करील अंतरंगा ।
म्हणोन ती पावनगंगा । तरणोपाय आपणासी ।।३२।।

अवतारापूर्वीचा इतिहास । जाणोन घेता खास ।
वाटेल कौतुक आपणास । खचितचि ।।३३।।

केळकर कुलाचा इतिहास । आहे बहु सुरस ।
तोचि येथे यथावकाश । पाहू आता ।।३४।।

दादांचे आजोबा अंताजीपंत । होते सरल आणि शांत ।
ज्यांना लाभले हनुमंत संत । महान सद्गुरु ।।३५।।

श्रीलक्ष्मणजी दीक्षितांकडून । घेतले पार्थीव पूजन ।
करु लागले आवर्जून । उपवास सोमवारचा ।।३६।।

त्यांना सर्व म्हणती नाना । त्यांचे महिमान पहा ना ।
आचरिती पार्थीवपूजना । अखेरवरी ।।३७।।

देह ठेविला तो सोमवार । साधिला शंकराचा वार ।
प्रकृती क्षीण जरी फार। आधी जाण्याच्या ।।३८।।

त्यांचेच अधिकारी पुत्र मामा । आचरिले रामनामा।
म्हणोनीच ठकविले यमा । अवताराशेवटी ।।३९।।

अशा परमाधिकारी कुलात । एक योगी होता वाट पाहत ।
म्हणे योग केंव्हा येत । अवतार घेण्याचा ।।४०।।

मामांना पहिली कन्या झाली । परी ती जास्त न राहिली ।
लवकरीच निघोनि गेली । अकस्मात ।।४१।।

त्यामुळे इंदिरामातेला । खूप शोक झाला ।
न विसरी कन्या विरहाला । दु:ख अनिवार ।।४२।।

सख्खा मामा इंदिरामातेचा । कुरुंदवाडग्रामी वास त्याचा ।
विचार या परिस्थितीचा । त्याच्या मनात ।।४३।।

आपण जावे औरवाडास । वजीरबाबांच्या दर्शनास ।
विचारु या दु:खास । काय उपाय ।।४४।।

तव वजीरबाबा अवलीया । म्हणती कारण नाही दु:खा या ।
साक्षात् लक्ष्मी होती कन्या । म्हणोनी गेली ।।४५।।

या वैराग्यप्रिय कुलात । मी काय करणार येथ ।
मनापासून कसली जेथ । चाड नाही ।।४६।।

पुढे महान विष्णुभक्त । येणार पोटी महान संत ।
इंदिरामातेस खारिक देत । प्रसाद म्हणुनी ।।४७।।

यथावकाश । दिवस राहिले इंदिरामातेस ।
अपुर्व योग त्यावेळेस । आला अनुग्रह प्राप्तीचा ।।४८।।

भाग्यवंत इंदिरामातेला । कोटणीस* महाराजे बोध केला ।
तव योगायोगे बोध झाला । अंतरी बाळाला ।।४९।।

जैसा अभिमन्यू सुभद्रेच्या पोटी । किंवा प्रल्हाद कयाधूचे पोटी ।
तैसाचा हा विष्णुभक्त इंदिरापोटी । शोभे पहा ।।५०।।

अशा अर्थाने जरी । म्हटले दादांना प्रल्हाद तरी ।
परंपरा प्रल्हादाची खरी । आली प्रल्हादापर्यंत ।।५१।।

पुढे इंदिरामाता भली । कुरुंदवाडग्रामा गेली ।
सातवे मासी प्रसवली । झाला दादांचा अवतार ।।५२।।

** प. पू. श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज*



शके अठराशे बेचाळीस । श्रावण वद्य षष्ठीस ।
दादा अवतरले महानयोगास । वार होता गुरुवार ।।५३।।

तो योगचि प्रबळ होता । विष्णुभक्त अवतरला होता ।
देवचि सदैव प्रसन्न होता । दादांच्यावरी ।।५४।।

त्याच सुमारला । कुरुंदवाडकर सरकारांनी आरंभला ।
गणेश चतुर्थीचा समारंभ आयोजिला । संस्थानी आपुल्या ।।५५।।

सांगली पंचांगाप्रमाणे अधिक श्रावण । कुरुंदवाडकरांचे पंचांग भिन्न ।
त्यांच्या पंचांगाप्रमाणे श्रावण नसून । होता भाद्रपद मास ।।५६।।

पटवर्धन सरकारांनी । पाचारिले श्रीकोटणीस मुनी ।
घडवतील काही साक्षात्कार म्हणुनी । जैसे गदगकर* सुचविती ।।५७।।

सरकार मनी योजिती । ते महाराज ओळखिती ।
अधिकारी अंतर्ज्ञानी असती । म्हणोनिया ।।५८।।

सुरु झाले कीर्तन । श्रीगजाननांचे केले स्मरण ।
करून केले आवाहन । करूण रस भक्तीचा ।।५९।।

काय चमत्कार झाला । गजानन सर्वांतरी प्रगटला ।
याचा दृक्प्रत्यय आला । पटवर्धन सरकारांना ।।६०।।

सरकार जो येतात । कीर्तन सभामंडपात ।
तो ते काय पाहत । आश्चर्याने ।।६१।।

सर्वच्या सर्व श्रोत्यांना । सोंडा फुटलेल्या दिसल्या त्यांना ।
मी नक्कीच जागा ना । विचारात गर्क ।।६२।।

** गदगकर हे पटवर्धन सरकारांचे पदरी होते. त्यांच्याजवळ सरकारांनी साक्षात्काराची तळमळ व्यक्त केली होती.*

चिमटा स्वत:स काढून । केली खात्री पूर्ण ।
दृष्य नसे भासमान । सार्थ अनुभव ।।६३।।

मनीची सुप्त आस । ओळखिली महाराजांनी खास ।
खरोखरीच या महापुरुषास । शतश: वंदन असो ।।६४।।

आटोपताच कीर्तन । धरीले संतचरण ।
म्हणती चरण न सोडीन । कृपा होईपर्यंत ।।६५।।

जरी हे संतश्रेष्ठ । अधिकारी पूर्ण वरिष्ठ ।
लगेच त्यांचा अनुग्रह प्राप्त । न व्हावयाचा ।।६६।।

सरकारांना हनुमंतसद्‌गुरुंचा । आला योग अनुग्रहप्राप्तीचा ।
चिमडमठाच्या परवानगीचा । संदेश आल्यावरी ।।६७।।

असा कीर्तन समारंभ संपल्यावरी । नाना गेले खोलीवरी ।
बोलाविण्यास आपुले घरी । विनम्रभावे ।।६८।।

विनंती केली नानांनी । आमुचे घरी या म्हणोनी ।
बाळास पहावेजी नेत्र भरुनी । दृष्य मी पाहीन सौख्यभरे ।।६९।।

अपार प्रेम नानांचेवरी । सद्‌गुरुंची आली स्वारी ।
स्वागताची होतीच तयारी । झाला प्रदेश पावन ।।७०।।

आसनी प्रेमे बैसविले । बाळास मांडीवरी दिले ।
महाराजही सुप्रसन्न जाहले । पुर्वनियोजित गुरुशिष्य ।।७१।।

महाराजांनी अमृत हस्त । फिरविला बाळाचे अंगावरी प्रशस्त ।
तो बालक नवजात । नेमस्त आपुल्यापरी ।।७२।।

अवघे चौदा दिवसांचे वय । काय स्पर्शजाणिवेची सोय ।
परि अमोलिक झाला उपाय । सद्‌गुरुकृपेचा ।।७३।।



श्रीहनुमंतसद्‌गुरु । व्यापक अखिल चराचरु ।
दिधला अभयकरु । शिष्यास यावेळी ।।७४।।

अमृतस्पर्श सद्‌गुरुंचा । जो नि:खळ अस्पर्शाचा* ।
दादांना प्रकर्षाने जाणवायचा । अखेरवरी ।।७५।।

महाराजांनी आपुले नेत्र । भिडवले बाळाचे नेत्री पवित्र ।
ओतले परमार्थसार समस्त । तयाचे हृदयी ।।७६।।

तात्काळ महाराजांनी । शिष्यास आपणासारिखे करोनी ।
नेत्रद्वारा स्पर्शद्वारा अनुग्रह करोनी । कृतकृत्य केले ।।७७।।

जसे श्रीकृष्णाने ज्ञान । दिधले पार्थासि जाण ।
तैसेचि घडले वर्तमान । अधिक श्रावणात ।।७८।।

आत्मा भेटे आत्म्याला । चैतन्य भेटे चैतन्याला ।
सुख भेटे सुखाला । दिवाळी गुरुशिष्यांची ।।७९।।

मूळ रेवणसिद्ध । रेवणसिद्ध कृपे मरुळसिद्ध ।
मरुळसिद्धकृपे काडसिद्ध । साधनसिद्ध परंपरा ।।८०।।

काडसिद्धमहाराज कृपे गुरुलिंगजंगम थोर । तयांनी देवोनी कृपाकर ।
श्रीरघुनाथप्रियसाधुराज गुरुवर । धन्य केले ।।८१।।

रघुनाथप्रियसाधुमहाराज । कृपा करिता श्रीरामचंद्रमहाराज ।
कृतकृत्य होवोनी भक्तिकाज । चालविले चिमडमठी ।।८२।।

श्रीरामचंद्रमहाराज यरगट्टीकर । करिती कृपा शिष्यावर ।
तेच शिष्योत्तम हनुमंतसद्‌गुरुवर । शोभती सिद्ध संप्रदायी ।।८३।।

---

** जडदेहाच्या पलीकडील चैतन्याचा स्पर्श*

अशी सिद्धपरंपरेची साखळी । दादांपर्यंत सहजी आली ।
श्रीरामरायमूर्ती विराजली । सिद्धांच्या मालिकेत ।।८४।।

अधिकार वाणीतून आशीर्वचन । करील कीर्तन लहानपणापासून ।
आमुचाच आहे असे म्हणून । सद्‌गुरु बाळास कुरवाळिती ।।८५।।

बाळाचे नाव ठेवावे काय? । विचारताच राम म्हणे सद्‌गुरुमाय ।
कारण एकच चित्ती विषय । सद्‌गुरु श्रीरामचंद्रांचा* ।।८६।।

जे असते मनोमनी । तेच संत बोलती जनी ।
मितभाषी असती म्हणोनी। साक्षात्कारी पूर्णावतार ।।८७।।

इंदिरामातेसह यथावकाश । आले 'राम' सांगलीस ।
आता मामांचे घरास । अधिक शोभा आली ।।८८।।

दिवस मास सरत होते । रामराय मोठे होत होते ।
आपुल्या भाग्याचे दिवस येत होते । अधिक जवळ ।।८९।।

पुढे एकोणीसशे तेवीस माझारी । माघ वद्य तृतीया रविवारी ।
काय सोहळा मामांचे घरी । झाला ते पाहू ।।९०।।

मामांनी विनंती केल्याप्रमाणे । आले घरी देवराणे ।
फिटले नयनांचे पारणे । सर्वांच्या ।।९१।।

देवराणे श्रीहनुमंतसद्‌गुरु । अधिकार ज्यांचा महाथोरु ।
तेच प्रवर्तले करुणाकरु । भोजनासाठी ।।९२।।

याच पवित्र राममंदिरात । महाराज बसले निवांत ।
राम बाळही आनंदात । पाही सद्‌गुरु सोहळा ।।९३।।

---

** श्रीरामचंद्रमहाराज यरगट्टीकर, चिमड*



राम बाळाचे वय अवघे तीन । उभे कोपऱ्यात शांतवदन ।
सद्‌गुरु मुखावलोकन । एकटक करीत राहिले ।।९४।।

बाळास मातोश्रींनी । सांगितले होते शांत रहा म्हणोनी ।
वास्तविक ते दंगा म्हणुनी । कधीच करीत नव्हते ।।९५।।

दादांचे शरीरावर संपूर्ण । एक ओरखडा किंवा खूण ।
दिसली नाही अवतारात पूर्ण । आपणासी ।।९६।।

एकच खूण सद्‌गुरुंची । तीच खूणगाठ मनीची ।
अंतरी वसती कायमची । सद्‌गुरुवचनाची असे ।।९७।।

भोजन पंचपक्वान्नाचे झाले । मामांनी दंडवत घातले ।
महाराजांनी सूचकतेने विचारले । मामांना ।।९८।।

तुमची* सिटी हायस्कूल शाळा । सुटते किती वाजता बोला ।
मामा उत्तरती पाचला । सुटते शाळा म्हणोनी ।।९९।।

महाराज वदले तत्काळ । ही तुम्हासाठी छान वेळ ।
मौन राखिती संतदयाळ । स्मितहास्य चेहऱ्यावरती ।।१००।।

उलगडा या वचनाचा । पुढे झाला कैचा ।
प्रसंग अद्‌भुत पहायचा । यथानुक्रमे ।।१०१।।

अशीच वर्षे पुढे सरली । सद्‌गुरुवचन पूर्तता झाली ।
जे बोलले अनुग्रहाचे वेळी । तेची आले सत्यात ।।१०२।।

हनुमंतसद्‌गुरुंचे महान वचन । ठरले सार्थ आशीर्वचन ।
सुरु झाले रामांचे कीर्तन । पाचव्या वर्षापासोनी ।।१०३।।

---

** श्रीमामा हे सिटी हायस्कूलमध्ये शिक्षक होते.*

पाचवे वर्षीही कीर्तनाचा । विषय सखोल असायचा ।
ब्रह्म आणि मायेचा । उहापोह होतसे ।।१०४।।

ज्यांनी दादांचे कीर्तन ऐकले । ते धन्य आणि धन्यचि झाले ।
त्यांनी खरे अनुभवले । परमार्थसार ।।१०५।।

तसेच पाचव्या वर्षापासोन । दादा साधिती साधन ।
हे केवढे आश्चर्य महान । जगती असे ।।१०६।।

पाचवे वर्षी एवढा अधिकार । कोणी ऐकला का आजवर ।
महिमान दादांचे खरोखर । अवर्णनीय असे ।।१०७।।

कीर्तनी रंग भरे वर्णनातीत । रामरायांना थोर अधिकार प्राप्त ।
विशेष घडले प्रसंगात । ते आता पाहू ।।१०८।।

मामांच्या वाड्यात । संत खटावकर नेहमी येत ।
बावणणा सोनारांचे घरी राहत । बऱ्याच वेळा ।।१०९।।

महाराज 'विवेकसिंधू' सांगती । श्रोते तल्लीन होती ।
ऐकता सहजी विसरती । देहभान ।।११०।।

रामरायही तेथे जायचे । दर्शन घेण्या महाराजांचे ।
महाराज आज्ञा करायचे । कीर्तन कर म्हणोनी ।।१११।।

माझा 'विवेकसिंधू' राहू दे । तुझे कीर्तन ऐकू दे ।
मन रंगून जाऊ दे । तुझ्या निरुपणी ।।११२।।

असेच एकदा कीर्तन । चालले चैतन्याचे वर्णन ।
रामराय होते निमग्न । कीर्तनविषयी ।।११३।।

तोच अमोलिक सुवास । सुटला कीर्तनप्रांगणी खास ।
अनुभव आला प्रत्येकास । त्यासमयी ।।११४।।



नंतर महाराजांना सर्वांनी । विचारले नवल वाटोनी ।
सुगंध हा कसला म्हणोनी । जो कधीच ना अनुभवला ।।११५।।

महाराज काय बोलले । ऐकावे शांतचित्ती वहिले ।
संप्रदायाचे* पीठाधिपती प्रगटले । भाग्य तुम्हा सर्वांचे ।।११६।।

श्रीनिंबरगीकरमहाराज । प्रगटले सिद्धानंदरुपाने आज ।
मान्य केले भक्तिकाज । प्रल्हादाचे त्यांनी ।।११७।।

असे लहानपणापासूनी । अधिकार जाणती संतमुनी ।
अलौकिक अधिकार पाहुनी । चकित होती ।।११८।।

सद्गुरुंची कृपाशक्ती । होती रामांचे मागुती ।
आत्मयाची काव्यस्फूर्ती । प्रगट झाली ।।११९।।

सातवे वर्षी पहिले । पद अंतर्यामी स्फुरले ।
सद्गुरुतत्त्व थोडक्यात साकारले । नाव 'गुरुचा पंखा' ।।१२०।।

एकदा खटावकर महाराजांनी । विचारिले रामांना बोलावोनी ।
हृद्गद लिहिशील का म्हणोनी । संतवचनाचे ।।१२१।।

राम त्वरित उत्तरती । हे करणे महाराजांचे हाती ।
ते जसे लिहिविती । तैसेचि होईल ।।१२२।।

ग्रंथाचे नाम 'रामदास बोध' । प्रगटला लेखणीतून अमृतसिद्ध ।
असे भक्तास सुखकंद । संतवचन संतामुखी ।।१२३।।

ग्रंथ अती बोधपर । ओव्या एकशेएकोणसत्तर ।
बसल्या बैठकीत सत्वर । नववे वर्षी लिहिला ।।१२४।।

---

*श्रीचिमड संप्रदाय*

ग्रंथ पाहताच महाराज । म्हणाले थक्क झालो मी आज ।
तुझ्या अवताराचे काज । कळले मनोमनी ।।१२५।।

पुढे अनेक अभंग पदे । चरित्रे हृद्‌गदे कूटपदे ।
लिहिती राम स्वानंदे । सहजतेने ।।१२६।।

अनेक प्रकारचे अध्यात्मलेखन । आहे सागरासमान ।
अभ्यासण्या आपुले जीवन । पडेल अपुरे ।।१२७।।

लेखणी धरिली कागदावरती । न येतसे फिरुन मागुती ।
फेरफार ना बदल कधी । आत्मबुद्धीचे अक्षरब्रह्म ।।१२८।।

बालयोगी असती दादा । गोष्टी सहज घडत सर्वदा ।
परि त्याची महनीयता । फार असे ।।१२९।।

एकदा मामांजवळ जाऊन । रामजी बसले आग्रह धरुन ।
मला करवा रामदर्शन । अधिकार तुमचा मी जाणतो ।।१३०।।

मामा म्हणती मनापासूनची । असेल इच्छा दर्शनाची ।
पूर्तता मनोकामनेची । होईल एकदा ।।१३१।।

मारुतीपुढे दर शनिवारी । भजन असायचे निर्धारी ।
बालगोपाळ मंडळी सारी । करीत भजन प्रेमाने ।।१३२।।

एका शनिवारी सर्व गोपाळ । लाविती तोरणे पताका माळ ।
अधिर होती पहाण्या मुखकमळ । श्रीप्रभूरामचंद्रांचे ।।१३३।।

भजन चालले कडाक्याचे । नाम घेता मारुतीरायांचे ।
भजन प्रेमाच्या परिसीमेचे । फळ दिसले ।।१३४।।

अचानक त्यावेळी । छपरावरी वानरे आली ।
कोठोनि एकाकी प्रगटली । ते कळेना ।।१३५।।



मामा हे पाहून बोलले । वानरसैन्य पुढे आले ।
तुमच्या मनीचे नक्कीच ऐकले । आर्त प्रभूंनी ।।१३६।।

इतक्यात पश्चिम दिशेसी । दिसू लागले आकाशी ।
चालली नाव सुंदरसी । राम सीतेस घेऊनी ।।१३७।।

आग्रह धरणारे समर्थ । दाखविणारेही समर्थ ।
तेथ आपण किमर्थ । शंका घ्यावी ।।१३८।।

आणखी प्रसंग एक । वाचता वाटेल कौतुक ।
दादांचा उपचार प्रत्येक । कसा सहज असे ।।१३९।।

महत्त्वाचे काही कामासी । गेले मामा परगांवासी ।
देवपूजनादी कार्यक्रमासी । दादा सांभाळिती ।।१४०।।

दादा सहज वर्तत होते । ओवळ्यांतच पूजा करीत होते ।
सोवळे नेसण्याचे नव्हते । रहात भान ।।१४१।।

तीन दिवस चालले । कुलदेव रामेश्वर प्रगटले ।
साक्षात् दर्शन दिधले । ऐकू आली देववाणी ।।१४२।।

अरे तू माझा भक्त । सर्वाधिकार तुज प्राप्त ।
पूजा करावी परी सोवळ्यात । ओवळे न चाले ।।१४३।।

भोळा शुद्ध भाव देखुनी । प्रसन्न मी मनोमनी ।
कैचा कोपेन सांग मी । तुझ्यावरी ।।१४४।।

सोऽहंकडे जे वळले । तेची झाले सोवळे ।
आता औपचारिक सोवळे । नेसणेचे राहिले ।।१४५।।

मामा परतोन आल्यावरी । सांगे दादांची स्वारी ।
झाला प्रकार परोपरी । प्रांजळपणे ।।१४६।।

मामा म्हणाले खरोखर । कृपाळू आमुचे रामेश्वर ।
सदैव प्रसन्न भक्तावर । भाग्य आमुचे ।।१४७।।

मंदिरात रात्रीचे वेळी । विश्रांतीसी मामांजवळी ।
असता दादांना ऐकू आली । कुजबूज काहीतरी ।।१४८।।

दादांनी मामांना विचारले । कोण आत्ता कुजबुजले ।
ना कोणी आले । ना गेले येथुनी ।।१४९।।

तव मामा शांतवदन । बोलले जी वचन ।
राम-सीताची* एकमेका उद्देशून । बोलताती आपुल्या मंदिरी ।।१५०।।

ऐसे स्थान जागृत । उपासना अखंड परंपरागत ।
एकांती असावे स्वस्थ । अनुभव यावया ।।१५१।।

असोनी पारमार्थिक अधिकार । साधनाही सहज अपार ।
वाटले करू कुंभकाचा प्रकार । श्रीदादांना ।।१५२।।

मामा-मामी आणि दादा । एक पंगतीस सर्वदा ।
अंतरी निमग्न तल्लीनता । अखंड जाहली ।।१५३।।

मुखी घास घेतला । तो तेथेच स्थिरावला ।
भोजनाचा विसर पडला । आले पडवीमध्ये ।।१५४।।

दादा अविचल निजले । तव मामा मामी आले ।
दादांचे शरीर थंड पडले । काळजी वाढली ।।१५५।।

मंदिरी दिवे लागले । भागवतमाईंचे* लक्ष गेले ।
त्यांनी लगबगीने गाठले । राम-मंदिर ।।१५६।।

---

** देव्हाऱ्यात स्थापिलेल्या राम-सीतेच्या मूर्ती*

** भागवतमाई श्रीमामांचे वाड्यात बिऱ्हाडाने राहत होत्या.*



भागवतमाईंची तळमळ किती । पटवर्धन डॉक्टरांकडे जाती ।
ताबडतोब घेऊन येती । वाड्यामध्ये ।।१५७।।

डॉक्टर दादांजवळ बसले । बारकाईने तपासू लागले ।
क्षणभर विचारात पडले । उपाय सुचेना ।।१५८।।

विचारांती उपाय शोधला । इंजेक्शन दिले मणक्याला ।
तोच विसावा मिळाला । सकळांसी ।।१५९।।

आता दादा देहावर । येऊ लागले भराभर ।
गरम होऊ लागले शरीर । दादांचे आता ।।१६०।।

मामा मामी निश्चिंत झाले । सहजी रामजीस विचारले ।
अचानक असे काय जहाले । सांग आम्हासी ।।१६१।।

दादांनी अनुभव कथिला । उर्ध्वगती श्वास रोखला ।
आणि तेथेच स्थिरावला । सुख वायुसाधनाचे ।।१६२।।

विशिष्ट मर्यादेपर्यंत । साधावा कुंभक निश्चित ।
पवन विजयाचे बळ अखंडित । साधावे मामांनी सांगितले ।।१६३।।

दादांचे साधन सुरु होते । सहजावस्थेत वावरत होते ।
सहजयोगी शोभत होते । बालपणापासूनी ।।१६४।।

परी त्यांना एकदा वाटले । त्यांनी मामांना विचारले ।
मी साधन करतो ते पाहिले । पाहिजे तुम्ही ।।१६५।।

होतो फार लहान । कोटणीसमहाराजे केले कृपादान ।
पुढे लगेच गेले निघोन । निजधामासी ।।१६६।।

असोनी मामा साधनाधिकारी । झाकोनी रहाती सर्वतोपरी ।
म्हणती हे तू विचारी । श्रीकोटणीसदादांना ।।१६७।।

दादा मामांबरोबर गेले । साधनास बसून दाखविले ।
दादामहाराजांसी विचारले । त्या प्रसंगी ।।१६८।।

गुरुवर्य कोटणीसदादांनी* । त्यास संमती देवोनी ।
म्हणती असेच साधन साधुनी । व्हावे कृतकृत्य ।।१६९।।

मामांचे पलीकडील वाड्यात । शालूमामा होते राहत ।
दादा त्यांचेकडे जात । अध्यात्मचर्चेसाठी ।।१७०।।

दादांचे वय फार लहान । परी सर्वचि देत होते मान ।
साक्षात्कारी संत म्हणोन । दादांना ओळखिती ।।१७१।।

शालूमामा अधिकारी । अंबूरावमहाराजांचे शिष्य निर्धारी ।
त्यांची स्वारी विचारी । दादांना एक प्रश्न ।।१७२।।

बाबा* असता साधनी मला । येत अनुभव अनेकवेळा ।
परी सध्या तसे मला । अनुभव येत नाहीत ।।१७३।।

दादांनी विचारले त्यांना । आपण भस्त्रिका करता ना? ।
आश्चर्य वाटले शालूमामांना । होय म्हणती ।।१७४।।

सद्गुरुंनी तुम्हासी । सांगितले का भस्त्रिका करणेसी ।
सद्गुरुंची आज्ञा जैसी । तेची साधन साधावे ।।१७५।।

मूळ साधन सुरु झाले । पुन्हा अनुभव येऊ लागले ।
पूर्व समाधान मिळाले । शालूमामांना ।।१७६।।

तसेच दादा आणि गोविंदपंत* । यांची होत असे भेट सतत ।
तोचि एका भेटीत । काय घडले ।।१७७।।

---

*✻ श्रीकोटणीसदादा म्हणजे श्रीतात्यासाहेब महाराजांचे चिरंजीव*
*✻ बाबा म्हणजे श्रीअंबुरावमहाराज ✻ श्रीगोविंदपंत घोसरवाडकर*



दादा म्हणाले गोविंदपंतांना । आपुल्या अंतरी संचार पहाना ।
आपुले ठायी हालसिद्धनाथांना । मी पाहतो ।।१७८।।

म्हणोन आपुल्या चरणांवर । ठेवितो मस्तक द्यावा वर ।
समाधान लाभेल थोर । सिद्धदर्शनाने ।।१७९।।

हसले हळुवार गोविंदपंत । मला नमस्कारावे हे न उचित ।
वस्तुस्थिती सांगतो स्पष्ट । जी दिसते मला ।।१८०।।

आमुच्या ठिकाणी केंव्हातरी । होतो संचार येते स्वारी ।
परि तुझे अंतरी परोपरी । सतत संचार आहे ।।१८१।।

मला तव नेत्राते । वेगळीच चमक दिसते ।
सुनील आत्मतेजचि ते । पुर्णाधिकारी म्हणोनी ।।१८२।।

वयाच्या अवघ्या विशीत । अधिकाराची पावती प्राप्त ।
दादांचे अवतारात । अशी मौजच मौज ।।१८३।।

एकदा असेच दादांनी । स्वप्नी पाहिले श्रीहनुमंतमुनी ।
त्यांचे संगती आणखी कोणी । संत विशेष दिसले ।।१८४।।

तेंव्हा श्रीहनुमंतसद्गुरु । सांगती हे महाराज थोरु ।
संप्रदायाचे महामेरू । श्रीगुरुलिंगजंगम असती ।।१८५।।

आणखी एकदा पहाटेस । महाराज* प्रगटले खास ।
दादांचेवरी प्रेम विशेष । म्हणोनिया ।।१८६।।

तेवेळी विशेष घटना घडली । दादांना आरती स्फुरली ।
तन मन वाहोन अर्पिली । यथार्थ वर्णन सद्गुरुंचे ।।१८७।।

---

*✻ श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज*

असे अलौकिक स्फुरण । स्फुरण अखंड स्मरण ।
दादांचे मुळी जीवन । आहे कल्पनातीत ।।१८८।।

सामान्य आणि संतजन । जसे धरती आणि गगन ।
येथे येई समजोन । बालयोगी वर्णन वाचता ।।१८९।।

इति श्रीदासरामचरित्र । गुरुचरणीची गंगा पवित्र ।
दीन अर्पितो तुलसीपत्र ।
अवतार बालयोगी वर्णननाम प्रथमोध्याय ।।१।।

*****



।। श्रीराम ।।

# अध्याय-(२)- लौकिक अधिकार वर्णन

रामराय अवतार । अलौकिक घटनांचा सागर ।
धुंडिता सर्वही चराचर । केवळ अतर्क्य ।।१।।

सर्व घटना असाधारण । काय जाणणार आपण ।
केवळ व्हावे अनन्य । सद्गुरुपायी ।।२।।

काही लौकिक घटनांचे अंग । पहाता होऊ दंग ।
लौकिकातही अलौकिकताच अभंग । दिसेल येथे ।।३।।

या संतांच्या जीवनात । प्रसंग यथोचित घडतात ।
परी संत मग्न कार्यात । आपुल्या मार्गावरी ।।४।।

सातव्या वर्षात पदार्पण । संस्कार विधी उपनयन ।
यज्ञोपवित धारण । कुलगुरुंच्या* आशीर्वादाने ।।५।।

संध्येचा खरा अर्थ । सांगितला दादांनी लक्ष्यार्थ ।
संदेह* जाण्याप्रित्यर्थ । संध्या करावी ।।६।।

उपनयन होईपर्यंत । दूध, पेढ्यावरीच तृप्त ।
दादा अति मितस्त । आहार घेती ।।७।।

उपनयन झाल्यावरी । भोजन झाले मातृअंकावरी ।
तेथूनच पुढे भोजन आहारी । राहू लागले दादा ।।८।।

आठ वर्षे झाल्यावरीं । नाव घातले शिक्षण मंदिरी ।
शाळा नंबर दोन कुसरी । 'रामां'चे शिक्षण ।।९।।

---

** कुळाचारांचे संस्कार करणारे गुरुजी*
**संदेह म्हणजे संशय*

शिक्षणातून मिळते ज्ञान । ते केवळ शब्दज्ञान ।
जाणणे आपणासी आपण । खरी व्याख्या ज्ञानाची ।।१०।।

हे अंतरी जाणले । तयानुरूप अनुसरले ।
अनुसरून सर्वा सांगितले । ज्ञानमार्गासी ।।११।।

रामांचा पारमार्थिक अधिकार । होता सकलांचे कानावर ।
शाळेमध्येही तो अधिकार । दिसे सर्वांना ।।१२।।

वर्गातील एका विद्यार्थ्याने । चुगली केली लबाडपणे ।
खोडी केली रामने । सांगे हेडमास्तरांना ।।१३।।

हेडमास्तर चिंचणीकर । रामचा स्वभाव जाणती थोर ।
म्हणती अरे खबरदार । त्या विद्यार्थ्याला ।।१४।।

अरे हा राम । असतो नेहमी आराम ।
तो खोडीचे काम । कधीच करणार नाही ।।१५।।

तव तो कबूल झाला । म्हणे माझा तोल सुटला ।
न जाणोन असामान्य व्यक्तीमत्त्वाला । कैचा मी फसलो ।।१६।।

रामास सर्व गोपाळ । मानीत होते फार ।
ह्याचे अध्यात्मबळ । न कळण्याजोगे ।।१७।।

असे सर्व बालगोपाळ । करिती होळी सालोसाल ।
रामास न रुचे ते स्थळ । म्हणोन न जाई ।।१८।।

विनविती मुले रामास । होळीसाठी तू यावेस ।
मान्य तुझी अट आम्हास । सांग नि:संकोच ।।१९।।

राम म्हणे होळी हा सण । परी अकल्पित तेथीचे वातावरण ।
जोवरी मी तिथे असेन । वावगे न वागावे ।।२०।।



ऐकती मुले प्रांजळ । रामास नेती अल्पकाळ ।
नंतर करिती हलकल्लोळ । राम परतल्यावरी ।।२१।।

असे दिवस सरता । चौथीची परिक्षा आली पुढता ।
परी प्रकृतीची अस्वस्थता । वाटू लागली ।।२२।।

भगवानबापू हेडमास्तर । सांगती डिप्यूटीसाहेबास सत्त्वर ।
राम हा विद्यार्थी खरोखर । आहे आजारी ।।२३।।

त्याकाळी डिप्यूटीसाहेब खास । आजारी विद्यार्थ्यांच्या परिक्षेस ।
येत पुन्हा भेटीस । आले पुढे त्याप्रमाणे ।।२४।।

भगवानबापू सहज सांगती । राम जरी लहान किती ।
कीर्तन करितो उत्तमरिती । तुम्ही ऐकाल का? ।।२५।।

दर्शविता उत्सुकतेने होकार । रामाचे कीर्तनाचा झाला गजर ।
म्हणे लेकरु तयार । थक्क आश्चर्य वाटुनी ।।२६।।

निश्चित झाला विचार । ह्याचा विशेष अधिकार ।
काय परिक्षा घेणार । सामान्य आपण ।।२७।।

साहेब सांगती हेडमास्तरांना । याला उत्तीर्ण केले समजाना ।
शाळा खरोखरीच अभिमाना । पात्र याच्यामुळे ।।२८।।

भगवानबापूंनी निवृत्त झाल्यावर । जवळ केले राम-मंदिर ।
लुटण्या ब्रह्मज्ञान अपार । आपुल्याच विद्यार्थ्याचे ।।२९।।

विद्यार्थी होता शाळेपुरता । एरवी त्याची योग्यता ।
जाणोन पावती समाधान चित्ता । हा विद्यार्थी लाभला म्हणोनी ।।३०।।

भगवानबापूंना नंतर । प्राप्त अनुग्रह दादांचा थोर ।
साधन मार्ग सुखकर । आमरण आक्रमिला ।।३१।।

आम्हा लहान मुलांसाठी । भगवानबापू खडीसाखर देती ।
सहजी आठवले चित्ती । म्हणोन सांगितले ।।३२।।

कीर्तन संपल्यावरी । ठेविती मस्तक चरणांवरी ।
पूर्णत्त्व जाणोनी अंतरी । सद्‌गद हृदय त्यांचे ।।३३।।

हे केवढे दुर्मिळ । जेथे शिक्षक प्रांजळ ।
अर्पिती सर्वस्व सकळ । विद्यार्थ्यांच्या चरणांवरी ।।३४।।

अशी होती योग्यता । परि शरीराची अशक्तता ।
व्यायामाची आवश्यकता । वाटू लागली ।।३५।।

गंगाधरसिंग पेहेलवान । घेती व्यायाम करवून ।
व्यायामाचा क्रम अनुदिन । वाढविणेस सांगती ।।३६।।

क्रम वाढत वाढत । जोर बैठका दीडशेपर्यंत ।
नेटाने करुन घेत । व्यायामपटू सिंग ।।३७।।

आता म्हणती उद्यापासून । साडे तीनशे तरी जोर एकूण ।
मारणे असे आवर्जून । म्हणजे बरे ।।३८।।

तोचि दादांनी विचार केला । हे तो न पेलणार आपल्याला ।
राम राम ठोकू व्यायामाला । आता आपण ।।३९।।

त्या दिवसापासोन विचार ठाम । कधी न केला व्यायाम ।
शेवटवरी आराम । सहजी साधिला ।।४०।।

सर्व व्यवहार सुरु होते । दादा आपलेपरी निमग्न होते ।
तब्बेतीच्या अशक्ततेचे होते । संकट निमित्तमात्र ।।४१।।

म्हणोन देसाई डॉक्टर । देती औषधाचा आधार ।
हवापालटाचा मात्र विचार । नक्की करावा सांगती ।।४२।।



औषधाने याची प्रकृती । अल्प सुधारेल तात्पुरती ।
हवापालटाने नक्कीच ती । खरी सुधारेल ।।४३।।

हवापालट होण्यासाठी । काही दिवसांसाठी ।
परगावी जावू द्या म्हणती । रामास आता ।।४४।।

औषध घेतल्यावर । तब्बेतीत पडला सुधार ।
परगावी जाण्याचा विचार । सुरु झाला ।।४५।।

छापखाने नातेवाईक । साताऱ्यात वर्षे अनेक ।
जाऊया त्यांचेकडेच मग । काही दिवस ।।४६।।

राम गेले साताऱ्यास । नारायण-हरी आतेभाऊ होते साथीस ।
असे दादांजवळी सोबतीस । नेहमीच कोणीतरी ।।४७।।

असो साताऱ्यात असता । काय घडले ते पाहू आता ।
अधिकार जाणोनी स्वत: । श्रीतुकाराम अवतरले ।।४८।।

स्वप्नात दादांनी पाहिले । पर्वतशिखरी श्रीतुकाराम भले ।
दादा बहु आनंदले । घातला नमस्कार ।।४९।।

साक्षात् दर्शन देऊनी । दिली सुपारी प्रसाद म्हणुनी ।
जागृत होताही सुपारी पाहुनी । गहिवरले दादा ।।५०।।

मुक्काम काही दिवसांचा । संपवोनी धरिला मार्ग सांगलीचा ।
विचार मनातून तब्बेतीचा । निघोन गेला ।।५१।।

पुढे दादांनी आता । न केली देहाची चिंता ।
स्मरोन राहिले आत्मयाअनंता । अखेरवरी ।।५२।।

आत्मा परमात्मा ज्ञान । नित्य अनुसंधान कारण।
हायस्कूलमध्येही गुरुजन । ओळखून होते ।।५३।।

मराठीच्या तासाला । श्रीतुकाराममहाराजांचा अभंग चालला ।
शिक्षकांनी समजावून दिला । विषय त्यांच्यापरीने ।।५४।।

पुढे बोलावले रामास । गर्भित अर्थ सांगणेस ।
ओघवत्या वाणीतून अध्यात्मरस । चाखविला छात्रगणांसी ।।५५।।

हाच फरक ज्ञानातला । पुस्तकीज्ञान आणि अनुभवातला ।
अनुभवजन्य ज्ञानाने थोर झाला । तोचि समर्थ यासाठी ।।५६।।

शाळेच्या हस्तलिखितासाठी । विद्यार्थी वाङ्मय लिहिती ।
रामने ही 'पाहणे' विषयावरती । इत्थंभूत लेख लिहिला ।।५७।।

हस्तलिखित वाचून । कवी गिरिश यांनी केला प्रश्न ।
आहे का काही लेखन । शिक्षकांचेही यात ।।५८।।

हेडमास्तर म्हणती हे विचारण्याचे । कारण सांगा तुमचे ।
कवी दाखविती 'पहाणे'चे । वाङ्मय त्यांना ।।५९।।

हे वाङ्मय नाही शिक्षकांचे । ते राम या विद्यार्थ्याचे ।
ऐकताच वाक्य हेडमास्तरांचे । कवी गिरिश थक्क ।।६०।।

तव रामला बोलावून । कवींनी केले गुणगान ।
अचाट सिद्धलेखन । जाणवले त्यांना ।।६१।।

कवी छात्रास गौरविती । अशी दादांची महती ।
अधिकाराची मिळाली आणखी पावती । शालेय वयात ।।६२।।

संत हा कवी निश्चित असतो । कवी हा संत क्वचित असतो ।
हाच फरक काय तो । कवी व संतांमधला ।।६३।।

होता पारमार्थिक आधार । तरी लौकिकासाठी सोपस्कार ।
मॅट्रिक परिक्षेसी हजर । झाले विलिंग्डनमध्ये ।।६४।।



मराठीचा पेपर । आला पहिला समोर ।
मनी अध्यात्माचा विचार । असे घर करुनी ।।६५।।

परीक्षेचे शांत वातावरण । निसर्गाचे मात्र वेगळे चिन्ह ।
आकाश आले दाटून । गारा पडू लागल्या ।।६६।।

या गारा पाहून । चढले प्रतिभेस स्फुरण ।
गारांवर कविता चालीतून । लिहिली त्यावेळी ।।६७।।

दृष्य दिसते सामान्यास । परी दृष्यातीत तत्त्व जे अविनाश ।
येई संतांचे अनुभवास । हे दिसोन आले ।।६८।।

लौकिक परीक्षा मॅट्रिक । दादा सर्व परीक्षांचे परीक्षक ।
कार्य करण्या अलौकिक । मुळात आले ।।६९।।

संसारासी मदत म्हणून । दादांनी करावे द्रव्यार्जन।
आग्रह अनेकांचा कारण । नोकरीसाठी ।।७०।।

दादांचा रुकार आला । मामांनी शब्द टाकला ।
संस्थान कार्यालयात नोकरीला । दादा जावू लागले ।।७१।।

असे सत्र नोकरीचे । सुरु झाले दादांचे ।
नोकरीतही वावरायचे । सहज सरळ मार्गाने ।।७२।।

कार्यालयातील काहीजण । येती कीर्तनास आवर्जून ।
ऐकून बहारीचे कीर्तन । तल्लीन होती ।।७३।।

मुमुक्षुंना पारमार्थिक उपदेश । करण्यास झाला आदेश ।
दादा पोचले सिद्धपदास । म्हणोनीया ।।७४।।

दादांचा अनुग्रहित पहिला । म्हणून मान मिळाला माणिकला ।
मामांच्या वाड्यात त्यावेळेला । होता राहत ।।७५।।

त्याचा एक अनुभव थोर । करितो येथे सादर ।
महत्त्व त्याचे दिसणार । या प्रसंगातुनी ।।७६।।

माणिकच्या वडिलांची बदली । कर्नाळग्रामी झाली ।
त्याच्या मनाची घालमेली । सुरु झाली ।।७७।।

आता लांब जावे लागणार । सद्गुरु दर्शनास अंतरणार ।
कसे समाधान मिळणार । मला आता ।।७८।।

सद्गुरुंचा चेहरा प्रसन्न । दिसता होते समाधान ।
सर्व जातो शीण । क्षण न लागता ।।७९।।

तयांसी जाता शरण । सापडे भक्तीचा सोपान ।
इतर जनांसी शरण । जाता काय मिळे ।।८०।।

तो म्हणे दादांना । यावे आमुच्या सदना ।
राहतील तेणे पाऊलखुणा । संतचरण दुर्लभ ।।८१।।

आपुल्या दर्शने सुख वाटते । सर्व चिंता दूर होते ।
चित्त माझे बहु झुरते । दर्शनासाठी ।।८२।।

असेच गेले काही दिवस । माणिक आला सांगलीस ।
दर्शन घेता दादा त्यास । काय म्हणाले ।।८३।।

तुझी ओढ पाहून । आलो होतो देण्या दर्शन ।
माणिक आश्चर्य वाटून । स्तब्ध जाहला ।।८४।।

दादा त्यास विस्तारून । करु लागले कथन ।
जे घडले वर्तमान । स्मरण होण्यासाठी ।।८५।।

काल तू गेलास परसात । स्मरण माझे अंतरात ।
नमस्कार केलास तेथ । मी उभा होतो ।।८६।।



सद्गुरुंची खूण अशी । कशी कळणार आपणासी ।
त्यासाठी सर्वस्व पायाशी । अर्पावे लागे ।।८७।।

म्हणोन दादा सांगत परोपरी । कोठेही खडा पडला तरी ।
त्याची उठते लहरी । संतांचे अंतरात ।।८८।।

हेची आपण जाणोनी । सदा वर्तावे जनी ।
न जावे आडरानी । म्हणजे बरे ।।८९।।

पुढे काही जणांना । अनुग्रह मिळाला सुजनांना ।
भाग्य कैचे समजाना । ह्या सर्वांचे ।।९०।।

इतुका जरी अधिकार । दिधला महाराजांनी साचार ।
न घेती तो अधिकार । आपुल्या शिरी ।।९१।।

अनुग्रह देत असताना । नेहमीच सांगती साधकांना ।
दासराम केवळ आपणा । पुढती माध्यम ।।९२।।

हा अनुग्रह नसे दासरामाचा । तो श्रीनिंबरगीकरमहाराजांचा ।
मनास स्पर्श अधिकाराचा । न शिवला शेवटवरी ।।९३।।

खरा अधिकारी असतो पूर्ण । याचेच हे मूर्तीमंत उदाहरण ।
दादा म्हणती हे संपूर्ण । महाराजांचे असे ।।९४।।

अशी मनाची विशालता । कधी आपणास दिसली का? ।
किंवा सांगा दिसेल का? । पुढे कधी ।।९५।।

आता काही नोकरीतील । प्रसंग पुढे येतील ।
तेथेही आपणा दिसेल । विशेषता दादांची ।।९६।।

ट्रेझरीतील सहकारी एक । होता काही दिवस विमनस्क ।
दादांनी साधिली जवळीक । विचारपूस करण्यासाठी ।।९७।।

दादांचे कळवळले अंत:करण । त्याने उघडले वदन ।
सारखा लेकास ताप फणफणून । म्हणे येतो टाईफाईडचा ।।९८।।

दादा म्हणती व्हा शांत । न व्हावे आपण सचिंत ।
उपाय सांगतो उचित । करुन पहावा ।।९९।।

महाराजांची प्रार्थना करून । दिला अंगारा प्रसाद म्हणून ।
त्यांची निष्ठा अनन्य । लाविला अंगारा मुलासी ।।१००।।

मुलगा हुशारीत येऊ लागला । तापात उतार पडला ।
चैतन्य स्फुरवी देहाला । त्या मुलाच्या ।।१०१।।

निष्ठा आणि प्रसाद । मग सर्व निर्वेध ।
जीवन होते सुखप्रद । गाठ गुरुपदी मनाची ।।१०२।।

असेच एकदा ऑफिसला । झाला उशीर जाण्याला ।
जाताच साहेब चिडलेला । दिसला त्यांना ।।१०३।।

साहेबाचे हाती दंड होता । कडक शब्दात विचारित होता ।
दंड पुकारला होता । उशीरा येण्याबद्दल ।।१०४।।

दादा अत्यंत प्रामाणिक । विनंती केली एक ।
तब्बेत नाही ठीक । म्हणोन क्षमा करावी ।।१०५।।

साहेबाची द्विधा मन:स्थिती । त्याने काढली युक्ती ।
माफी करितो आजच्यापुरती । म्हणे सर्वांना ।।१०६।।

संतांचे संगतीने । लाभते परमार्थाचे लेणे ।
व्यवहारातीलही होते जीणे । असे सुलभ ।।१०७।।

स्वातंत्र्यानंतर सांगली संस्थान । सरकारी झाले विलीन ।
कारभार क्रम नवीन । सुरु झाला ।।१०८।।



नवीन कारभारी आले । बदलीचे पेव फुटले ।
दादांनाही त्यातून जावे लागले । झाली बदली ।।१०९।।

दादांनी विचार केला । जरी परगावी गेलो नोकरीला ।
तरी अंतरणार कीर्तनाला । आपण मामांच्या ।।११०।।

अस्वस्थता मनामधली । मामांना कथन केली ।
विचाराअंती निश्चिती झाली । सोडावी नोकरी ।।१११।।

राजीनामा दिला । नोकरीचा भाग संपला ।
प्रश्न समोर उभारला । द्रव्यार्जनाचा ।।११२।।

मामा आणि दादा । न करिती चिंता कदा ।
असती आपुल्या रंगात सदा । सदैव प्रसन्न ।।११३।।

आप्तेष्टांनी आग्रह धरिला । दादांना मान्य करावा लागला ।
पुरवठा खात्यात नोकरीला । दादा जावू लागले ।।११४।।

थोडे दिवस काम केले । परी एकंदरीत हेरले ।
तंत्र कामाचे येथले । जमणार नाही ।।११५।।

जरी करीत राहिलो काम । चिंता राहील कायम ।
अंगाशी येईल असे काम । कसे करावे ।।११६।।

दादांचा फेरविचार । रजेचा अर्ज सत्त्वर ।
देवोनी घरी हजर । झाले ताबडतोब ।।११७।।

मामांना सर्व प्रकार । कसा विचित्र कारभार ।
सांगताच मामांनी रुकार । दिला दादांचे म्हणण्याला ।।११८।।

दादांनी सोडली नोकरी । केली देवाची चाकरी ।
निरुपण कीर्तनात खरी । वृत्ती रंगली ।।११९।।

जो देवाची काळजी करितो । त्याची काळजी देव वाहतो ।
याचा दृक्प्रत्यय दिसतो । मामा–दादांचे जीवनी ।।१२०।।

देहप्रपंच गौण । कीर्तनसेवा प्रधान ।
गाठ बांधली करकचून । मामा–दादांनी ।।१२१।।

कीर्तनव्रत सांभाळणे । हेचि आमुचे मेळविणे ।
नाहीतरी अवघे जीणे । आहे फुकाचे ।।१२२।।

केळकर आणि कीर्तन । घनिष्ठ संबंध पुरातन ।
इतिहास घ्यावा जाणून । श्रोते हो ।।१२३।।

एकोणीसशे तेवीस साली । जी घटना घडली ।
पहिले अध्यायी वर्णिली । आणावी लक्षात ।।१२४।।

पाचची वेळ छान । कोटणीसमहाराज गेले बोलून ।
त्याचे प्रत्यक्ष प्रमाण । दिसले वर्षाचे आत ।।१२५।।

महाराजांनी पौष महिन्यात । देह ठेविला एकोणीसशे चोवीसात ।
पंचवीस वर्षे अखंडीत । कीर्तनसुमने उधळुनी ।।१२६।।

माघ महिना आल्यावरी । स्फुरण झाले मामांचे अंतरी ।
रंगून जाऊ कीर्तनगजरी । कैवल्यसुखाच्या ।।१२७।।

जसे आपुले महाराज । प्रेमे करीत कीर्तनकाज ।
त्यांचेच म्हणुनी भक्तीकाज । चालेल पुढे ।।१२८।।

महाराजांचे सर्व देणे । लेवू आम्ही सुखाचे लेणे ।
निष्ठा गुरुपदी ठेवणे । दृढविश्वास मामांना ।।१२९।।

माघ वद्य प्रतिपदेला । विचारले एका विद्यार्थ्याला ।
येशील का कीर्तनाला । सायंकाळी आमुच्या घरी ।।१३०।।



पहिला श्रोता रानडे गोपाळ । खांबावरी ठोक्याचे घड्याळ ।
आणि गोजिरे मुखकमल । फोटो श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचा ।।१३१।।

मनी योजना निश्चित । शुभारंभाचे कीर्तनसत्र ।
मध्वमुनीश्वरांचे पद मुखात । ‘राम कथा रस पी’ ।।१३२।।

असे श्रीहनुमंतसद्गुरुंचे । कीर्तन गुरुपीठाचे ।
साधेपणाने घरी केळकरांचे । सुरु झाले ।।१३३।।

पुढे माघ वद्य तृतीयेसी । रात्री मध्यान्ह पर्वकाळासी ।
अभूतपूर्व सत्य घटना आपैसी । घडली दासबोध वाचनसमयी ।।१३४।।

प्रसंग अलौकिक घडला । नाही केला बोलबाला ।।
गुप्त अधिकार राखला । मामांनी संपूर्ण अवतारी ।।१३५।।

या थोर प्रसंगाची । महती आपणा कळली कैची ।
याचे वर्णन करणेची । हीच सुवेळ असे ।।१३६।।

गुरुतृतीया प्रसंग पर्व । आम्हा त्याचा अभिमान फार ।
सकस बीज तैसेच क्षेत्र । वृक्ष अखंडकीर्तनाचा ।।१३७।।

तात्यासाहेब महाराजांचे अवतार कार्य । गुंफू लागले साधुदास कविवर्य ।
आपुलेच मानुनी हे कार्य । निष्ठेने करिती ।।१३८।।

त्याचीच एक सुंदर प्रत । गणपतराव* होते करीत ।
आपुल्या सुवाच्य हस्ताक्षरात । पावन चरित्र संतांचे ।।१३९।।

त्या चरित्रामध्ये संक्षिप्त उल्लेख । मामांचा अधिकार अलौकिक ।
तोच आता विस्तारीत । पाहू पुढे ।।१४०।।

---

** श्रीगणपतराव कानिटकर*

मामा आपुल्या वाचनी । निमग्न जैसे ऋषी मुनी ।
अचानक दृष्य पाहुनी । क्षणभर थांबले ।।१४१।।

मामांच्या समोर । कोटणीसमहाराज सद्गुरुवर ।
प्रगट उभे निरंतर । त्या पर्वकाळी ।।१४२।।

मामांनी मनी विचार केला । नुकताच महाराजे देह ठेविला ।
विषय चित्तात भिनला । तेच दिसते आपणासी ।।१४३।।

पुन्हा पाहता वारंवार । प्रत्यक्ष महाराजची समोर ।
मामा उठले सत्त्वर । ठेविले मस्तक चरणांवरी ।।१४४।।

महाराजांचे वचन । चालू द्यावे वाचन ।
तुमचे सांगाती मी राहीन । होईल श्रवणभक्ती ।।१४५।।

बहु आनंद जाहला मनी । घातली शालजोडी आसन म्हणुनी ।
सद्गुरु सत्शिष्य ब्रह्मवर्णनी । झाले समरस ।।१४६।।

सात, आठ, नऊ व दहा । चार दशक वाचले पहा ।
महाराज म्हणती थोर शिष्य हा । माझा जिव्हाळ्याचा ।।१४७।।

मामा करिती नमस्कार । मनातील प्रेमळ विचार ।
प्रकट केला समोर । महाराजांच्या ।।१४८।।

ज्याप्रमाणे केले आपण । अखंड पंचवीस वर्षे कीर्तन ।
नगरी केली पावन । सांगली क्षेत्र झाले ।।१४९।।

तैसाच मनी संकल्प धरुन । सुरु केले जी कीर्तन ।
कालच्या प्रतिपदेपासून । आज तीन दिवस झाले ।।१५०।।

हृदयी आपुले वास्तव्य रहावे । हे कीर्तन अखंड चालावे ।
कृपेचे माप पदरी घालावे । माझ्या आता ।।१५१।।



महाराज पूर्णावतारी । ठेविती कृपाहस्त मामांचे शिरी ।
म्हणती तुमची इच्छा पुरी । होईल बापूराव ।।१५२।।

बापूराव तुमचेही कीर्तन । अखंड चालेल अनुदीन ।
आशीष दिधले होऊनी प्रसन्न । अवर्णनीय सुखसोहळा ।।१५३।।

असे या कीर्तनगंगेचे महिमान । अखंड सुरु असे वर्तमान ।
दासा हृदयी हनुमान । ही धारणा मामांची ।।१५४।।

एकोणीसशे चोवीस साली । कीर्तनाची सनद मिळाली ।
कीर्तनसरिता वाहू लागली । केळकरांचे घरी ।।१५५।।

श्रीपांडुरंग भेटे श्रीतुकारामांना । तैसेच श्रीहनुमंतसद्गुरु श्रीमामांना ।
प्रगट कीर्तनानुग्रह जाणा । प्रत्यय पिढ्यान् पिढ्याचे कीर्तन ।।१५६।।

असो कोणताही प्रसंग । जरी मामांचे झाले क्षीण अंग ।
अखंड कीर्तनी दंग । दिसले सर्वांना ।।१५७।।

सत्य सत्य हा वृत्तांत । घरी घडला एकांतात ।
नाही आणला प्रकाश झोतात । कटाक्षाने मामांनी ।।१५८।।

साधुदासांच्या टिप्पणी । वाचताच प्रसंग तत्क्षणी ।
दादांना आले गहिवरुनी । पाहुनी अधिकार मामांचा ।।१५९।।

रामजींनी वडिलांसी विचारले । मला मामा हे आज कळले ।
तपावरी वर्ष सरले । साष्टांग प्रणिपात तुम्हासी ।।१६०।।

एकोणीसशे चोवीसची घटना । कळली एकोणीसशे सदतीसात सर्वांना ।
किती प्रसिद्धीपराङ्मुखता पहा ना । असे मामांची ।।१६१।।

त्यावर्षीच दादांनी ठरविले । या दिवसाचे महत्त्व आगळे ।
साजरा केल्यास मिळे । अपूर्व आनंद ।।१६२।।

मामांची अनुमती घेऊन । केले कार्यक्रमाचे आयोजन ।
गुरुतृतीया सोहळा पावन । त्यावर्षापासोन सुरु झाला ।।१६३।।

गुरुतृतीयेचे महत्त्व थोर । केळकर घराण्यात अपरंपार ।
निष्ठा गुरुचरणी अपार । विषय अंतरीचा ।।१६४।।

गुरुतृतीयेचा विशेष दिन । प्रगटकाळी आनंद कीर्तन ।
श्रीहनुमंतसद्‌गुरु विराजमान । रत्नजडित सिंहासनावरी ।।१६५।।

कीर्तनोत्तर रात्रभर । होतो हरिजागर ।
भजन चरित्रवाचन साचार । पुढे रथोत्सव पंचपदी ।।१६६।।

अशा पुण्यपावनक्षणी । रहावे उपस्थित आवर्जुनी ।
भावभक्तीच्या लहरी अनुभवुनी । तृप्त व्हावे अंतरी ।।१६७।।

गुरुतृतीयेचा असा महिमा । ज्यास नाही दुजी उपमा ।
श्रीहनुमंतसद्‌गुरुंची प्रतिमा । उजळते यादिवशी ।।१६८।।

असो असे लौकिक अधिकाराचे अंग । श्रीगुरुतृतीयाही गोड प्रसंग ।
पाहिला आपण यथासांग । श्रीसद्‌गुरुकृपे ।।१६९।।

इति श्रीदासरामचरित्र । गुरुचरणीची गंगा पवित्र ।
दीन अर्पितो तुलसीपत्र ।
लौकिक अधिकार वर्णननाम द्वितीय अध्याय ।।२।।

*****



।। श्रीराम ।।

# अध्याय-③- श्रीगुरुलिंगगीता वर्णन

महंत श्रीमंत श्रीगुरुलिंगजंगम । प्रगटले पुनरपि तुकाराम ।
साधनमार्ग सुगम । ज्यांचेमुळे झाला ।।१।।

श्रीदादांच्या अवताराचा । सुवर्णकळस आता पहायचा ।
श्रीदादांच्या परमोच्च अधिकाराचा । प्रत्यय दिसे ।।२।।

श्रीदादा थोर अधिकारी । काय मी वर्णावी थोरी ।
शब्दास मर्यादा आहे खरी । वर्णन करिता ।।३।।

आधिच सोन्याचे । वरी असे जडावाचे ।
लेणे लेती दादा आमुचे । अभिमान आम्हासी ।।४।।

त्यांचे नाम उच्चारावे । आणि लीलया उद्धरावे ।
असेच दादांचे स्वभावे । आहे महत्त्व ।।५।।

दादांचे चरित्र रसभरीत । दादांचे चरित्र अद्‌भुत ।
दादांचे चरित्र सागरवत । अथांग असे ।।६।।

चरित्र म्हणजे तो आचार । चरित्र म्हणजे तो विचार ।
चरित्र म्हणजे तो उच्चार । अखंड ब्रह्मानुभूतीचा ।।७।।

**श्रीहनुमत्‌गुरुपदी लीन । श्रीनारायण हृदयी विराजमान ।**
**सहज साधन कीर्तन । हेची श्रीदासरामचरित्र ।।८।।**

याची सदैव खात्री । दिसते प्रत्यक्ष पदोपदी ।
मिळता त्यांची संगती । अनुभव देवत्त्वाचा ।।९।।

श्रीगुरुलिंगगीतेची पूर्वपिठीका । चिमडात तयाचा असे धागा ।
श्रोतेजी सावध ऐका । कळेल उत्तुंगता श्रीदादांची ।।१०।।

चिमडच्या उत्सवास । दादा गेले मुक्कामास ।
कार्तिकमास विशेष । मेळा बहुत जमतो ।।११।।

चिमडमठामाझारी । सोहळा साधुमहाराजांचा परोपरी ।
आखून देती श्रीगुरुलिंगजंगम अधिकारी । तसाच सुरु झाला ।।१२।।

गुरुद्वादशीपासून । सोहळा सुरु होऊन ।
रथोत्सव होतो गावामधून । पांडवपंचमीचे दिवशी ।।१३।।

दादा तेथे असता । काय घडले ते पाहू आता ।
दादांची असामान्यता । ठायी ठायी दिसतसे ।।१४।।

श्रीमाईसाहेब[१] यरगट्टीकर । कीर्तन आवडी ज्यांना फार ।
म्हणती दादांचे कीर्तनसार । ऐकू या उत्सवात ।।१५।।

श्रीनारायणमहाराजांची । आज्ञा झाली कीर्तन करण्याची ।
दादांनी लूट परमार्थाची । अपार केली ।।१६।।

हीच दादांची खासियत असे । वेगळेपण जाणवत असे ।
उत्स्फूर्त विनासायासे । प्रवचन कीर्तन वा निरुपण ।।१७।।

ते कीर्तन ऐकोनी । कौतुक केले नागाप्पाण्णा[२] महाराजांनी ।
प्रत्यक्ष प्रल्हाद म्हणोनी । दादांना गौरविले ।।१८।।

नागाप्पाण्णा महाराजांबरोबर । चर्चा दादांची अध्यात्मपर ।
चालली त्यात विचार । झाला दादांच्या शंकांचा ।।१९।।

काही शंका निरसन । केल्या महाराजांनी आवर्जून ।
उर्वरित शंकांचे निरसन । म्हणाले थोरले महाराज करितील ।।२०।।

---

*१ श्रीरामचंद्रमहाराज यांच्या पत्नी   २ प.पू.श्रीनिंबरगीकरमहाराजांचे नातू*



उत्सव सांग झाल्यावरी । दादा परतले माघारी ।
समाधान घेवून अंतरी । अत्यानंदे ।।२१।।

दोनच महिने झाले । श्रीनागाप्पाण्णामहाराज जे बोलले ।
तेची सत्यात आले । एकोणीसशे एकोणचाळीस साली ।।२२।।

दादा एकदा खोलीत । पहुडले रमले साधनात ।
तापही होता अंगात । म्हणोनिया ।।२३।।

जेथे नित्यकीर्तन दादांनी । साधले एकोणचाळीस वर्षे अखंडपणी ।
दादांचे समाधी लागोनी । आत खोली गुहेसम ।।२४।।

तोच ह्या खोलीत । ध्वनी ऐकू येवू लागला अवचित ।
ते पदचि होते कानडीत । 'येनू इल्लदानू' ।।२५।।

थोरले महाराज निंबरगीकर । प्रगट साक्षात् समोर ।
सिद्धानंदरुप मनोहर । उभे ठाकले ।।२६।।

जसे कानावर आले । तसेच देवनागरीत उतरविले ।
कारण कधीच ना बोलले । ना लिहिले कानडी ।।२७।।

पद उतरवीत असता । होती कमालीची शांतता ।
तशीच सात्त्विक पवित्रता । पुण्यक्षेत्र पुण्यधाम ।।२८।।

दिव्य प्रभा फाकली । अंतर्बाह्य दाटून राहिली ।
साधनाची परिणती जाहली । खऱ्या अर्थाने ।।२९।।

दर्शनाचा दृक्प्रत्यय आला । ताप सारा निघोन गेला ।
सुयोग भेटीचा आला । पौष शुद्ध नवमीसी ।।३०।।

पौष महिना साधनाचा । नवमी बोध एकत्त्वाचा ।
शुभारंभ श्रीगुरुलिंगगीतेचा । पौष शु. नवमी ।।३१।।

पुढे अनेक कानडी पदे स्फुरली । काही प्रकाशरुपे दिसली ।
काही नादरुपे ऐकू आली । प्रसाद महाराजांचा ।।३२।।

श्रीनिंबरगीकरमहाराजांनी । श्रीगुरुलिंगगीतेमधुनी ।
प्रत्यक्ष प्रल्हाद म्हणोनी । संबोधले दादांना ।।३३।।

तीच झाली श्रीगुरुलिंगगीता । जी बोधरुप परमार्था ।
केवळ शिष्योत्तम दादांकरिता । प्रगट झाली ।।३४।।

देह ठेवून झाली पुरी । पन्नासाधिक वर्षे सारी ।
थोरल्या महाराजांची स्वारी । प्रगटली प्रल्हादासाठी ।।३५।।

सद्गुरुंची वसती अंतरी । श्रीनारायण सरदार हृदयांतरी ।
वृत्ती रंगली अभ्यंतरी । ब्रह्मावस्था ।।३६।।

दादा कीर्तनात बहुत समयी । नि:संदेह वदती स्पष्टही ।
उमाळा महाराजांविषयी । अपरंपार असे ।।३७।।

असे एखादे मशिन । असेल जरी वर्तमान ।
जे सांगे हृदयीची खूण । छातीस लावता ।।३८।।

तरी ते आणावे झडकरी । ठेवावे माझे हृदयावरी ।
ते नक्कीच सांगेल परोपरी । आत 'नारायण' आहे ।।३९।।

कीर्तन ऐन रंगात येई । सर्वांसी म्हणे सद्गुरुमाई ।
मला सर्व ठायी ठायी । काय दिसते ।।४०।।

आत्ता जी माणसे आहेत । दिसतात महाराजांचे रुपात ।
'अवघाची महाराजा' जगात । 'कोण दुजा दासरामी' ।।४१।।

असे रामनिकेतन पावन । येथे नुरे देहाभिमान ।
साधक पावे समाधान । ध्येय परमार्थाचे ।।४२।।



वय अवघे एकोणीस वीस । प्राप्त अधिकार दादांस ।
पोहोचले दादा सिद्धपदास । एवढ्या अल्पवयी ।।४३।।

असे दिवस सरता । श्रुत होती पदे पुढता ।
संख्या सव्वीसावरी आता । झाली पदांची ।।४४।।

त्यातील चोवीस पदे । बेडेकर छापती आनंदे ।
सातारच्या हंस मासिकामध्ये । एकोणीसशे त्रेचाळीस साली ।।४५।।

पडवीत मंदिरात खोलीत । तसेच काही ट्रेझरीत ।
सिद्धरुपाने प्रगट होत । झाली पासष्ठ पदे ।।४६।।

एकोणीसशे अठ्ठेचाळीस साली । या संदर्भात घटना घडली ।
वर्णन करण्याची वेळ आली । येथे आता ।।४७।।

निंबरगीकर महाराजांचे पणतू अधिकारी । श्रीगुरुसिद्धप्पामहाराज अवतारी।
आले दादांचे घरी । एक दिवस ।।४८।।

याही आधी अनेकदा । देती महाराज आनंदा ।
येवून राम-निकेतनी बैसता । कीर्तनी मौज येई ।।४९।।

यावेळी महाराज अतिप्रसन्न दिसले । त्यांनी दादांकडे पाहिले ।
दाखविले पद स्फुरलेले । त्यांनी दादांना ।।५०।।

संप्रदायाची परंपरा थोर । गुंफलीसे त्या पदी साचार ।
श्रीगुरुसिद्धप्पा संतवर । साधनी मग्न असती ।।५१।।

पद सुंदर लिहिले होते । परि ते पूर्ण होत नव्हते ।
शेवट कसा करावा ते। विचार करिती ।।५२।।

दादा म्हणती त्यांना । प्रार्थूया श्रीनिंबरगीकरमहाराजांना ।
पूर्ण होईल मनोकामना । त्यांच्याच कृपे ।।५३।।

असे ठरवून दोघांनी । प्रार्थिले थोर संत मुनी ।
पूर्ण झाला हेत मनी । जो होता ।।५४।।

पद सुंदर पूर्ण झाले । संतहृदय आनंदले ।
आनंदाश्रु नेत्रामधले । विषय जाणण्याचा ।।५५।।

दादांनी गुरुसिद्धप्पा महाराजांना । विनविले काय पहा ना ।
गुरुपीठाच्या प्रत्यय खुणा । नित्य स्मरणीय ।।५६।।

हे पद गीतेच्या वहीत । लिहून द्या आपुल्या हस्ताक्षरात ।
या पदापासूनच आता सुरुवात । होईल गुरुलिंगगीतेची ।।५७।।

मोदभरे महाराजांनी । दिले पद लिहुनी ।
श्रीदादाही सद्गद मनोमनी । प्रसाद मूळपीठाचा ।।५८।।

श्रीगुरुसिद्धप्पा महाराज । आमुचे लेखी थोरले महाराज ।
साधनी रत अधिकारी वंशज । म्हणोनीया ।।५९।।

त्यांचे पद त्यांच्या हस्ताक्षरात । हा योगचि कल्पनातीत ।
श्रीदादांनी पाहून नमूद । केला तो दिन ।।६०।।

दिन रामराज्याभिषेकाचा । वैशाख वद्य सप्तमीचा ।
दिवस आता गुरुलिंगगीताजयंतीचा । निश्चित केला ।।६१।।

त्यासालापासून । आजतागायत वर्तमान ।
याच दिवशी आवर्जून । होते साजरी गीताजयंती ।।६२।।

सकाळी गीतापठण । पुढे रथोत्सव प्रदक्षिणा तीन ।
उजळती आठवण । प्रसन्नता उपस्थितांसी ।।६३।।

गीते संबंधीच्या । आणखी काही गोष्टी पहायच्या ।
प्रसाद ग्रंथाच्या । महत्त्व आकलनासाठी ।।६४।।



पालघर मुक्काम संपवून । दादा सर्वांसह जाण ।
वसतीस नेहमीच आवर्जून । थांबती लालबागला ।।६५।।

केशवकाका* अंतरंगातील । अधिकारी शिष्य निष्ठा अचल ।
अभ्यास संतवाङ्मयाचा सखोल । लेखनही अपार असे ।।६६।।

केशवकाकांचेवरी । प्रेम खूप दादांचे अंतरी ।
केशवकाकांचेही दादांवरी । तितुकेच गाढ प्रेम ।।६७।।

केशव म्हणजे ज्ञान आणि भक्ती । याचा सुरेल संगम जगती ।
असेच दादा सांगती । वारंवार ।।६८।।

अनेकवर्षे केशवकाकांनी । आणि सुमनताईंनी ।
गीताजयंती साजरी करोनी । पुण्यसंचय केला असे ।।६९।।

सुमनताईंचा अधिकार । शब्दबद्ध करता न येणार ।
गीतापठणाचे वेड फार । जडला सोस भारी ।।७०।।

शेवटी सुमनताईंनी । गुरुलिंगगीता श्रवण करोनी ।
गुरुपदी लीनता साधोनी । देह ठेविला ।।७१।।

संतमहात्म्यांची सेवा । करीत जन्म आपुला जावा ।
तरीच काही लाभेल ठेवा । पुण्याईचा ।।७२।।

असाच विचार करुन । गुरुलिंगगीतेचे प्रथम मुद्रण ।
वासुदेवराव जोशी यांनी करुन । सेवालाभ मिळविला ।।७३।।

जोवरी झाले नव्हते प्रकाशन । बापटकाका* व काही मंडळी देती लिहून।
सोय होई करण्या पठण । अनेकांची ।।७४।।

---

** प्रा. डॉ. केशवराव वामन आपटे – श्रीदादांचे एकनिष्ठ शिष्य*

** श्री. वसंत महेश्वर बापट – श्रीदादांचे शिष्योत्तम*

गणपतराव विनायकराव कानिटकर । दादांचेवरी प्रेम फार ।
तेही कष्ट घेती अपार । पदे लिहून देण्यासाठी ।।७५।।

वासुदेवराव जोशी यांचे । बापूराव बंधू निष्ठेचे ।
निर्णाय साधिले कैचे । गीताजयंतीसी ।।७६।।

उत्तम शिक्षण असोन । ना अहंकार भोळे मन ।
रोज अभंग नूतन । म्हणती कीर्तना अखेरी ।।७७।।

गुरुलिंगगीता प्रासादिक ग्रंथ । प्रगटला श्रीदादांचे अंतस्थ ।
पठण करिता वृत्ती संथ । होते अंतर्मुख ।।७८।।

एकोणीसशे त्रेपन्न साली । दादा गेले अंबुमावशींचे घरी ।
वहिनींची* बहीण स्वागत करी । प्रेमळपणे ।।७९।।

तोच अभूतपूर्व सुगंध सुटला । सर्वांना अनुभव आला ।
दादा बोलले त्या समयाला । अधिकारवाणीने ।।८०।।

श्रीनिंबरगीकरमहाराज । प्रगटले आहेत येथे आज ।
मान्य केलेसे भक्तीकाज । मावशी तुमचे ।।८१।।

दादांचे सांगण्याप्रमाणे । आरती लावली आनंदाने ।
महाराजांची आरती भावभक्तीने । करणेत आली ।।८२।।

दादांनी पंचांग मागितले । तिथी कोणती पाहिले ।
तिथी पाहून गहिरवले । पौष शुध्द नवमी ।।८३।।

मावशींना लगेच दादांनी । सांगितले यावर्षापासूनी ।
या दिवशी गीताजयंती आवर्जूनी । करा तुमचे घरी ।।८४।।

** प.पू.सौ.सीतावहिनी (श्रीदादांच्या पत्नी)*



हे भाग्य त्यांना लाभले । पूर्वसुकृत फळास आले ।
प्रतिवर्षी न चुकता चालवले । आमरणान्त ।।८५।।

असो असेच एका प्रसंगात । पालघरच्या मुक्कामात ।
महाराज श्रुत करीत । कानडी पद दादांना ।।८६।।

कानडी पदाचा भावार्थ । प्रगटला दादांचे अंतस्थ ।
त्याचा सारांश येथ । पाहू आता ।।८७।।

ताबडतोब आपण । जावे सांगलीस असे सांगून ।
महाराज सुचविती पदामधून । घरी रथाचे चाक अडले ।।८८।।

दादांनी लगेच । सांगलीकडे केले कूच ।
येवून लागलीच । मामांना पाहती ।।८९।।

मामांना अचानक । आला रक्तदाबाचा अटॅक ।
देवपूजा करिता एक एक । देव निसटू लागले ।।९०।।

तो दिवस होता गीताजयंती । दादांनी केली निश्चिती ।
असो कोणतीही परिस्थिती । यादिवशी सांगली न सोडणे ।।९१।।

गीतेची पदे अखंडित । होत होती श्रुत ।
स्थळ काळ नसे निश्चित । सत्ता महाराजांची ।।९२।।

बापटकाका, धनुकाका* यांस । बहुत लाभला दादांचा सहवास ।
दोघांनीं अनुभवला प्रत्यक्ष । विशेष प्रसंग ।।९३।।

हे दोघे व दादा खोलीत । बसले होते शांत ।
तेथे प्रकाश अवचित । दाटून राहिला ।।९४।।

** श्री धनंजय स. भावे - श्रीदादांचे भाचे व शिष्य*

प्रकाश नवल दैदिप्यमान । दिपून गेले दोघांचे नयन ।
पाहू न शकले जवळ असोन । बराचकाळ एकमेकांसी ।।९५।।

काहीवेळाने तो प्रकाश । मंद झाला सावकाश ।
नि:शब्द जाहला हर्ष । अद्‌भुत प्रकाशदर्शने ।।९६।।

दोघांनी दादांना विचारले । नक्की काय घडले ।
दादांनी त्यांस सांगितले । जे घडले सत्य ।।९७।।

आत्ता महाराजांनी येथ । कानडीतूनी केला बोध ।
काकडारती शेजारती प्रकाशरुपात । दृष्यमान झाल्या ।।९८।।

कागद आरत्या उतरविलेला । दादांनी दोघांस दाखविला ।
जपूनी आजही असे ठेविला । बापटकाकांनी आपणाकडे ।।९९।।

जशी आपुली निष्ठा असे । तैशी प्रचिती येतसे ।
निष्ठा नक्कीच मोल पावतसे । महाराजांचे दरबारी ।।१००।।

अध्यात्मपदांची शृंखला । अध्यात्मउपदेश दिधला ।
अलोट कृपेचा वर्षाव झाला । प्रल्हादावरी ।।१०१।।

काही पदे कानडीतून । काही मिळाली इंग्रजीतून ।
जपनामगीताही पावन । प्राप्त झाल्या ।।१०२।।

सहासष्ठ पदांचा अर्थ । प्रगट झाला अंतरात ।
दादांनी करुन ठेविला लिखित । एकत्रितपणे ।।१०३।।

अशा सर्व पद–जपगीतांचे । सोबत मराठी अर्थाचे ।
संपूर्ण प्रकाशन गीतेचे । केले शिरुकाकांनी* ।।१०४।।

---

** श्री. श्रीधर वि. सहस्रबुद्धे – श्रीदादांचे शिष्य*



ज्ञान प्रकाशाचे प्रकाशन । संतोषला भक्तगण ।
वेदचि पुन्हा अवतीर्ण । प्रमेये अध्यात्मसाधनेची ।।१०५।।

सद्‌गुरुंवरील प्रेमाची । तशीच त्यांच्यावरील निष्ठेची ।
एक गोष्ट महत्त्वाची । वर्णन करतो आता ।।१०६।।

भावेसर* सुपुत्र अंबुमावशींचे । प्रकाशजी नाव त्यांचे ।
व्रत चालविती गीताजयंतीचे । जे चालत आले ।।१०७।।

शेवटी भावे सरांना । झाले दुखणे होती वेदना ।
शब्दही नीट बोलवेना । खेळ प्रारब्धाचा ।।१०८।।

दुर्धर रोगाने ग्रासले । परि लक्ष न विचलित झाले ।
अनुसंधानात सद्‌गुरुंच्या राहिले । शेवटपर्यंत ।।१०९।।

शेवटी झाले बेजार । मनी एकचि विचार ।
गीताजयंतीचा उत्सव पार । पडावा जाणेपूर्वी ।।११०।।

त्याप्रमाणे पंचप्राण । एकवटून आणिती अवसान ।
पौष शुद्ध नवमीचेच जाण । स्मरण केवळ ।।१११।।

पौष शुद्ध नवमी उजाडली । म्हणती आता प्रतिक्षा संपली ।
गुरुमूर्ती समोर प्रगटली । सांगे काही ।।११२।।

तुझे व्रत पार पडले । तू ते प्राणासम सांभाळले ।
महाराज अतिप्रसन्न झाले । तुझ्या भक्तीवरी ।।११३।।

गीतापठण झाले । आरती प्रसादवाटपही झाले ।
सर्वजण घरी परतले । आपापल्या ।।११४।।

---

** श्री. प्रकाश स. भावे सर – श्रीदादांचे भाचे व शिष्य*

गीताजयंती साजरी झाली । भावेसरांची तन्मयता दिसली ।
प्राणज्योत क्षणात मालवली । विजय गुरुनिष्ठेचा ।।११५।।

असे प्रासादिक ग्रंथाचे महिमान । नियमित करिता पठण ।
कृतकृत्यता सार्थकता होवून । जीव होई परपार ।।११६।।

गुरुलिंगगीतेचे वर्णन । शब्दात करणे आहे कठीण ।
यथाशक्ती नाममात्र स्मरण । केले इतुकेच ।।११७।।

इति श्रीदासरामचरित्र । गुरुचरणीची गंगा पवित्र ।
दीन अर्पितो तुलसीपत्र ।
श्रीगुरुलिंगगीता वर्णननाम तृतीय अध्याय ।।३।।

*****



।। श्रीराम ।।

# अध्याय-④- मातृपितृ वर्णन

जप तप सायास निजध्यास। शुद्धाचरण भक्तीचा सोस ।
सद्‌गुरुंची कृपा विशेष । संपादिली साधन करुनी ।।१।।

श्रीदादांचे पितृवर । गोविंद अनंत केळकर ।
बालपणापासून ओढ फार । देवभेटीची ।।२।।

'महाराज ज्ञानेश्वर माऊली' । त्यांसी प्रेमाची साऊली ।
तल्लीन होती देत टाळी । भजन करिता ।।३।।

तासन् तास भजन करावे । देहभान विसरुन जावे ।
भजनरंगी रंगून जावे । ना तहान ना भूक ।।४।।

नियमित सूर्यनमस्कार । गायत्री मंत्राचा उच्चार ।
देहयष्टी पिळदार । दिसे त्यांची ।।५।।

गुरुचरित्र पारायणे । ज्ञानेश्वरीची पारायणे ।
गोमुत्राची भाकरी खाणे । चित्तशुद्धीसाठी ।।६।।

शिक्षण उत्तम झाले पूर्ण । उपजीविकेचे मिळाले साधन ।
कोर्टात लेखनिक म्हणून । झाले सेवारत ।।७।।

पुढे काही शिक्षणप्रेमींनी । सांगली शिक्षण संस्थेची केली उभारणी ।
नोकरी सुखाची दिली सोडुनी । समरस झाले मामाही ।।८।।

वादविवाद नितीशास्त्र । चित्रकलाही उत्तम अवगत ।
या विषयातून संवाद । साधिती विद्यार्थ्यांशी ।।९।।

खेळीमेळीतून शिकवणे । सखोल मार्गदर्शन करणे ।
उत्तम पिढी तयार करणे । आनंद ज्ञानदानाचा ।।१०।।

पुत्र असा प्रज्ञावंत । शरीर सौष्ठवही शोभिवंत ।
नोकरीतही निष्ठावंत । आई वडील संतोषले ।।११।।

करु याचे विवाहबंधन । जाईल वंशवेल बहरुन ।
जबाबदारीतून मुक्त होवून । आपण कृतार्थ व्हावे ।।१२।।

विवाहाचा काढता विषय । मामा म्हणती हे काय ।
संसार करिता कैसी सोय । होईल परमार्थाची ।।१३।।

विवाह केला जरी । अंतरेल माझी भक्ती खरी ।
देवाचीच करीन चाकरी । हेची मनी माझ्या ।।१४।।

आग्रह धरिला माता-पित्यांनी । मग मार्ग काढला मामांनी ।
श्रीज्ञानेश्वरमहाराज माझे धनी । विचार त्यांचा घेतो ।।१५।।

टाकोटाक गेले आळंदीस । श्रीज्ञानेश दर्शनास ।
लोटांगण घालून समाधीस । मनोमन गहिवरले ।।१६।।

प्रश्न विचार मनीचा । ठाव घेतला पिंपळपाराचा ।
संकेत काय माऊलींचा । येतो ते पहावे ।।१७।।

श्रीज्ञानेश्वरीचे पारायण । इंद्रायणीकाठ प्रसन्न पावन ।
एकाग्र झाले सहजी मन । दीप अध्यात्ममार्गीचा ।।१८।।

तिसरे दिवशी साक्षात् । माऊली कफनी वेषात ।
आणि कमंडलू हातात । राजस रुपात प्रगटली ।।१९।।

श्रीगोविंदजी झाले सद्गद । नेत्री आसू सुखद ।
धरिले कोमल पदारविंद । चाले अभिषेक श्रीचरणांवरी ।।२०।।

संवाद संत-भक्ताचा । निवाडा झाला प्रश्नाचा ।
लाभ मधुर श्रवणाचा । झाला मामांना ।।२१ ।।



इ.सन एकोणीसशे चार । श्रीज्ञानेश्वर माऊली थोर ।
प्रगटली मामांचे समोर । धन्य धन्य ते मामा ।।२२।।

माऊलींचे आशीर्वचन । म्हणाले स्विकार विवाहबंधन ।
योग्य गुरुपदेश होवून । होशील कृतार्थ संसारी ।।२३।।

मामा झाले निवांत । आले परत सांगलीत ।
समग्र ऐकता वृत्तांत । आई वडील थक्क झाले ।।२४।।

यथाकाले विवाह झाला । इंदिरामाता घरी आल्या ।
परी जीवनालेख मनी आखिला । प्रधान निश्चित अध्यात्म ।।२५।।

सद्गुरुही अधिकारी भेटले । श्रीनारायणमहाराजांनी* उपदेशिले ।
चिमडमठी साधनी रंगलेले । अंतरबाहेरी ।।२६।।

साधनक्रम सुरु झाला । कैवल्यवृक्ष वाढू लागला ।
नामसाधनेचा सोस जडला । चाले रात्र रात्र साधन ।।२७।।

एकोणीसशे चोवीसपासून । सुरु झाले अखंड कीर्तन ।
परमश्रेष्ठ अधिष्ठान । श्रीहनुमंतसद्गुरुंचे ।।२८।।

होता होता या व्रतास । झाली वर्षे पंचवीस ।
सूत्रचालक जगदीश । पाठीशी सर्वदा ।।२९।।

पंचवीस वर्षे पुरी झाली । याची गणतीही नाही केली ।
मूर्तीमंत प्रसिद्धीपराङ्मुखता पाहिली । अनेकांनी मामांची ।।३०।।

मामांनी जे मिळविले । ते आपणास नंतर कळले ।
नंतर कळोन काय मिळविले । सांगा आपण ।।३१।।

---

** श्रीरामचंद्रमहाराजांचे अधिकारी चिरंजीव*

संत ओळखिती संतांना । खुणा पटती एकमेकांना ।
आपण शरण जावे त्यांना । हेचि उत्तम ।।३२।।

श्रीदादाही परम अधिकारी । मामांचे प्रेम त्यांचेवरी ।
कीर्तन रौप्यमहोत्सव मंदिरी । आनंदाने योजिला ।।३३।।

निमंत्रणे संतमहंतांना । तैशीच नातेवाईकांना ।
गुरु शिष्य उभयतांना । आनंदी आनंद ।।३४।।

श्रीभैय्यासाहेबमहाराज । श्रीगुरुदेव रानडेमहाराज ।
अधिकारी श्रीटाकीमहाराज । आशीर्वाद पत्रे पाठविती ।।३५।।

आदरणीय श्रीकेतकरमहाराज । श्री सोनोपंत दांडेकरमहाराज ।
गौरविती हे भक्तिकाज । आपुल्या मामांचे ।।३६।।

आणखी एक विशेष । घडले या समयास ।
जणू सोहळ्याचा कळस । श्रीनारायणमहाराज पातले ।।३७।।

श्रीसद्गुरुंचे प्रेम शिष्यावरी । सद्गुरुनिष्ठा शिष्याचे अंतरी ।
कृपाप्रसाद महाभारी । समाधान पावावयास ।।३८।।

आता आणखी एक सोहळा । श्रीरामनिकेतनी आयोजिला ।
त्याचा थाटचि निराळा । दिसलासे ।।३९।।

मामांचे वय साठावरी । परि गाती सर्वांची थोरी ।
नोंद याची घेतली खरी । माईसाहेब दांडेकरांनी ।।४०।।

माईसाहेब दांडेकर । मामांवरी निष्ठा फार ।
ठरविती साठीशांत सत्त्वर । लगबगीने ।।४१।।

दादांनीही आनंदून । सोहळ्याचे केले आयोजन ।
वझे गुरुजींना बोलावून । समारंभ आरंभला ।।४२।।



यथोचित मंत्रपठण । वेद गाती शास्त्रप्रवीण ।
मामा स्थितप्रज्ञ शांतवदन । तेंव्हाही दिसले ।।४३।।

श्रीज्ञानेशांची मूर्ती गोजिरी । श्रीमामांचे हृदयांतरी ।
श्रीज्ञानेशआशीषाची परी । केवळ अवर्णनीय ।।४४।।

घटनाक्रम काळाच्या ओघात । संत सावध अंतरात ।
अखंड चालविती व्रत । आशीर्वचन महाराजांचे ।।४५।।

दिवस सरु लागले । एकोणीसशे साठ साल उजाडले ।
भाग्य शिष्यांचे उदेले । म्हणोन असा सोहळा ।।४६।।

श्रीमामांनी नित्यकीर्तन । आरंभिले एकोणीसशे चोवीस पासून ।
त्यास आता तपे तीन । पूर्ण झाली ।।४७।।

श्रीदादांना आनंद झाला । म्हणाले करु शतगुणित याला ।
बोलावू संतमंडळी समारंभाला । हा योग अपूर्व ।।४८।।

मामा म्हणाले हे सहजी घडले । यातील मी काहीच न केले ।
कौतुक त्याचे काय वहिले । सत्ता तात्यासाहेब महाराजांची ।।४९।।

तरी श्रीदादांचे रहावेना मन । सोहळा व्हावा हे मनोमन ।
ठरविती निश्चय करुन । पर्वकाळ भक्तीसेवेचा ।।५०।।

तीन तपे कीर्तननेम साधुनी । सर्वस्व वेचिले श्रीगुरुचरणी ।
कीर्तन प्रिय प्राणाहुनी । दुसरी भक्ती ।।५१।।

श्रीदादांनी अनेक संतवर । पाचारिले ज्यांचा अधिकार थोर ।
श्रीकाडसिद्धप्रभुवर । प्रमुख अतिथी कार्यक्रमाचे ।।५२।।

निरुपण कीर्तन । भजन प्रवचन ।
श्रोते गेले रंगून । धन्य धन्य ते वक्ते ।।५३।।

यथोचित समारंभ पार पडला । गुरुकृपेचे बळ त्याला ।
समजले जो उपस्थित राहिला । त्यास महत्त्व याचे ।।५४।।

पुढे काही मंडळींना । वाटले गौरवू मामांना ।
समाधान काही ना । काही आपणास मिळावे ।।५५।।

भा.द.लिमये, वासुदेवराव । करंदीकर बापूराव।
म्हणती आता मिळाला वाव । करु सत्कार मामांचा ।।५६।।

मामा म्हणाले नको सत्कार । मंडळींचा नाईलाज फार ।
युक्ती काढली त्यावर । आमंत्रण कीर्तनमंदिर उद्‌घाटनाचे ।।५७।।

कीर्तनाचा विषय आला । मामांनी होकार दर्शविला ।
निमित्त साधुनी पुढे केला । नजराणा मामांसाठी ।।५८।।

मामांनी त्यास स्पर्शही । नाही केला पूर्ण निस्पृही ।
म्हणाले मम मनास कधीही । सत्कार न रुचे ।।५९।।

श्रीमामा बोलले सूचक । सद्‌गुरुस्मरणपूर्वक ।
नजराणा पाठवावा सम्यक । श्रीनिंबरगीपीठासी ।।६०।।

गुरुपीठ गुरुस्मरण । त्यायोगे पाहिला आजचा दिन ।
बिंबले मनी पूर्ण । त्याचीच ही प्रचिती।।६१।।

येथूनही पुढे अनुदीन । सुरु होते नित्य कीर्तन ।
परी क्षीण प्रकृतीमान । राज्य रोगांचे ।।६२।।

रक्तदाब वाढला । मधुमेहही होता झालेला ।
मणक्याचा क्षयही शिरला । परिक्षा सर्वस्वाची।।६३।।

शेवटी मूत्रपिंडाचा कॅन्सर । व्यापले मामांचे शरीर ।
अशक्त झाले फार । मामा यामुळे ।।६४।।



एकेक अशा रोगांनी । वसती केली मामांचे ठिकाणी ।
तरी अपार शांत समाधानी । धन्य धन्य ते मामा ।।६५।।

मामांना कोणी विचारिती । कशी आहे प्रकृती ।
नेमके उत्तर कानावरती । पडे त्यांच्या ।।६६।।

मामा म्हणती हे कीर्तन । जोवरी चालले अनुष्ठान ।
तोवरी माझे प्रकृतीमान । ठीकचि आहे ।।६७।।

अशी योग्यता जरी । देह झिजला परोपरी ।
नाजूक प्रकृती आशा पुरी । संपू लागली ।।६८।।

एकोणीसशे बासष्ठ सालचा । दिवस आला रथसप्तमीचा ।
श्रोते लाभ घेती दोन कीर्तनांचा । त्यादिवशी ।।६९।।

दुसरे दिवशी रविवार । देह झाला बेजार ।
वरी ज्वर करी जोर । काय सांगावे ।।७०।।

गादीवरच कसेतरी बसून । मामांनी केले कीर्तन ।
अखंडत्त्वाचे महिमान । ऐसे आहे ।।७१।।

कीर्तनोत्तर दादांनी हळुवार । मामांचे डोके घेतले मांडीवर ।
वडिलांचेवरी प्रेम फार । अस्वस्थ काळजीने ।।७२।।

दादांनी मामांचे नेत्रात । नीलज्योत पाहिली शांत ।
तपाचे तेज याची निश्चित । दिसली प्रचिती ।।७३।।

माघ शुद्ध नवमी सोमवार । आले तपासणीसाठी डॉक्टर ।
निराशा त्यांच्या चेहऱ्यावर । म्हणती नाड्या सुटल्या ।।७४।।

डॉक्टरी शास्त्रानुसार । आयुष्य न उरले फार ।
जेमतेम दुपारी दोनवर । रहातील मामा ।।७५।।

दुपारी दोनचे ठोके पडले । परी श्वासोच्छ्वास मंद चाले ।
आशेने चेहरे प्रफुल्लीत झाले । रहातील मामा म्हणोनी ।।७६।।

सायंकाळी पाचचे ठोके ऐकले । कीर्तननेमासी प्राण एकवटले ।
मान वर करुनी मोठ्यांदा सांगितले । म्हणा 'श्रीराम जयराम जयजयराम' ।।७७।।

कॅन्सरची फुटली होती गाठ । तोंडावाटे येत होते अशुद्ध रक्त ।
इतक्याही अवस्थेत एकचित्त । बिंबले नाम सर्वांगी ।।७८।।

हाच खरा साधनाभ्यास । नामाचा अविरत सोस ।
देहभाव संपूर्ण ओस । परिपूर्ण संत ।।७९।।

'श्रीराम जयराम जयजयराम' । संदेश निर्वाणीचा परम ।
देऊनी झाले पूर्ण काम । जे आजवरी साधले ।।८०।।

रात्री अकरा पन्नास । सद्गुरुंनी बोलाविले निजधामास ।
मामांचा पूर्ण सत्यमानस । झाली एकरुपता गुरुपदी ।।८१।।

मामा निघोन गेले । श्रीदादांचे पितृछत्र हारपले ।
विरह दुःख व्यक्त झाले । सहजी अभंगातुनी ।।८२।।

माघ शुद्ध दशमीस । उभे राहिले दादा कीर्तनास ।
मामांच्या अखंडकीर्तनास । निष्ठेने चालविण्यासाठी।।८३।।

दिवस सरु लागले । अनेकजण सांत्वनास येऊन गेले ।
श्रीदादाही गहिवरले । महिमान मामांचे सांगताना ।।८४।।

श्रीमामांना करण्या नितवंदन । समाधी करविली पावन ।
वरी पदकमले विराजमान । प्रतीक दया क्षमा शांतीचे ।।८५।।

घर आपुले केले । अखंड येथेच राहिले ।
सिंहासन वंदिता पटले । जागृत स्थान पुण्यपुरुषाचे ।।८६।।



एकदा सिंहासनामधून । एक अभंग चालीतून ।
'माझा नामरुप भगवान' । दादांना श्रुत झाला।।८७।।

मामांनी देह ठेविल्यावर । मामींनाही शोक अनिवार ।
त्यावेळेसचि सत्त्वर । काय म्हणाल्या होत्या ।।८८।।

एक वर्षाचे आत । मीही जाणार असे म्हणत ।
पक्का निश्चय मनात । इंदिरामातोश्रींनी केला ।।८९।।

दादा म्हणाले मातेला । मामा सोडून गेले मजला ।
नको तू या बालकाला । एकटे ठेवून जावू ।।९०।।

परि बोले तैसा चाले । खाणे पिणे कमी केले ।
मार्गक्रमण आरंभिले । ध्यास पतीचरणाचा ।।९१।।

बारा अभंगाचे तेरा पाठ । हाती यावया वैकुंठ ।
प्रकृती अत्यंत अशक्त । दमही लागे म्हणताना ।।९२।।

तरी पठण अखंड चाले । फळ त्याचे मिळाले ।
जे मनाशी होते ठरविले । ते झाले साध्य ।।९३।।

पुढील माघ शुद्ध नवमीस । उरले अवघे पाच दिवस ।
ज्योत मिळोन गेली ज्योतीस । श्रीगणेशजयंतीचे दिवशी ।।९४।।

यामुळे आधी मामींची पुण्यतिथी । मग येते मामांची पुण्यतिथी ।
पतिव्रतेच्या आचरणाची प्राप्ती । वेगळी ती काय ।।९५।।

मातृ पितृ दोनही आधार । एकाच वर्षात संपले साचार ।
श्रीदादांना दुःख अनिवार । नक्कीच झाले ।।९६।

परी हे संत अधिकारी । आले विशिष्ट कार्यासी भूवरी ।
भक्तीध्वजा फडकते अंबरी । संत अवतारांमुळे ।।९७।।

श्रीमामांनी केली पायाभरणी । केली कार्यक्रमांची आखणी ।
रेखीव शिस्तबद्ध आणि । जी कायम चालेल ।।९८।।

नित्यपाठाचे अभंग वीस । श्रीरामपाठाचे बत्तीस ।
अधिक महिन्याचेही सुरस । अभंग स्वरचित मामांचे ।।९९।।

जवळीक श्रीज्ञानेशांची । श्रावणात उजळणी हरिपाठाची ।
सकाळ संध्याकाळ नित्यक्रमाची । शृंखला चाले ।।१००।।

एकोणीसशे एक्याऐंशीसाली । अभंगगाथा प्रकाशित झाली ।
'अमृतवाणी' मामांची वर्षली । मार्गदर्शक बहुतांसी ।।१०१।।

अभंग पदे मामांची । जणू सूत्रे पाणिनीची।
सांगितले परोपरी नामसारचि । साधन सोपे ।।१०२।।

नाम तेचि अमृत । तेचि नामामृत ।
मामांचे वाणीत अमृत । म्हणोन अमृतवाणी ।।१०३।।

अशी सारभूत अमृतवाणी । म्हणजे दिव्यरत्नांची खाणी ।
कलीयुगी आधार घेवोनी । उद्धरुन जावे ।।१०४।।

कीर्तनाचे तारु दारात । वेल गेला गगनात ।
श्रीदादाही निरुपण कीर्तनात । गेले रंगुनी ।।१०५।।

भक्तीरस प्रधान । आले एकोणीसशे सत्त्याऐंशी सन ।
मामांच्या जन्मशताब्दीचे आयोजन । केले दादांनी।।१०६।।

पूर्ण एक वर्षभर । निरनिराळे संतवर ।
बोलाविले करण्या परमार्थगजर । प्रतिमासी शु. दशमीसी।।१०७।।

मामांच्या जन्मतिथीसंबंधीचे । आहे महिमान कैचे ।
संयुक्तिक वाटले म्हणोन त्याचे । करु वर्णन ।।१०८।।



मामांची जन्मतिथी वा वार । उपलब्ध नव्हता कागदावर ।
दादांनी एकसष्ठसाली विचारल्यावर । मामा म्हणाले ।।१०९।।

मला असे आठवते । आमचे नाना म्हणत होते ।
की तुझे जन्मशक १८१० होते । तिथी फाल्गुन शु. दशमी ।।११०।।

सहज दादांनी पंचांग काढले । ती तिथी केंव्हा ते पाहिले ।
त्याच दिवशी ती तिथी पाहून वाटले । आश्चर्य दादांना ।।१११।।

लगेच विचारले मामांना । काय करु सांगा ना ।
तुम्हास आवडते ते केल्याविना । नाही बरे वाटणार ।।११२।।

मामांनी स्मितहास्य केले । जोंधळ्याच्या चकल्या करा म्हणाले ।
वहिनींनी काम हाती घेतले । सदैव सिद्ध कामासी ।।११३।।

कोणतीच विशेष इच्छा नव्हती। मामांना कसलीच अपेक्षा नव्हती ।
सदा सर्वदा प्रसन्न मूर्ती । काही मिळो वा नामिळो ।।११४।।

उत्कृष्ठ चकल्या झाल्या । मामांना खूप आवडल्या ।
सुनेसही आनंद झाला । वाढदिवस करता आला म्हणोनी।।११५।।

अशाप्रकारे साधेपणाने । दिवस साजरा समाधानाने ।
दादा म्हणाले आठवणीने । करु पुढला वाढदिवस ।।११६।।

फाल्गुन शु. दशमीचे आधीच । मामा गेले निजधामास ।
सोहळा वाढदिवसाचा एकदाच । झाला त्यांचा ।।११७।।

असो मामांच्या जन्मशताब्दीचा । दिवस फाल्गुन शु. दशमीचा ।
अलौकिक कडाका कार्यक्रमांचा । झाला तेंव्हा ।।११८।।

समाधीस महारुद्राभिषेक सकाळी । मंत्रोच्चार पर्वकाळी ।
मंदिरात जमली मांदियाळी । भक्तगणांची ।।११९।।

पुढे झाला दिंडी सोहळा । पालखी टाळ पुष्पमाळा ।
मामांनी लाविला लळा । आपुल्या आचरणाने ।।१२०।।

लहान थोर सारे । म्हणती 'राम कृष्ण गोविंद' रे ।
दंग होऊनी जाऊ रे । मामांच्या भजनात ।।१२१।।

गोविंद गोविंद गोविंद । जडो मामा तुमचाच छंद ।
मिळतो नित्य नूतन आनंद । तुमच्या स्मरणाने ।।१२२।।

सिटी हायस्कूल, कैवल्य धाम । सेना मंदिर, समाधी धाम ।
परतोन श्रीरामनिकेतनी विराम । दिंडीचा झाला ।।१२३।।

उपस्थितांसी प्रसाद दिधला । मांडवात अनेकजण पंगतीला ।
प्रसाद सेवनाचा लाभ झाला । लहान थोरांसी ।।१२४।।

सायंकाळी नित्यकीर्तन । 'श्रीदासरामगाथा' प्रकाशन ।
अध्यात्माचे सखोल विवरण । दादांच्या अभंग पदातुनी ।।१२५।।

अनुभूतीजन्य ज्ञान । तेच ते खरे ज्ञान ।
परमार्थाची स्पष्ट खूण । पानापानांवरी ।।१२६।।

श्रीमामांच्या गौरवपर । 'अखंड कीर्तनानंद' ग्रंथ सुंदर ।
प्रकाशजी भावे यांची प्रतिभा सादर । चरित्र मामांचे ।।१२७।।

कीर्तनोत्तर अंगणात । आण्णा निरुपणासाठी उभे रहात ।
विठोब्बा रखुमाईचे गजरात । निरुपण सुरु झाले ।।१२८।।

आण्णांचे निरुपण रंगले । मन मनपण विसरले ।
बहुतेकांनी अनुभवले । फार काय सांगावे ।।१२९।।

चरणांवर येती चरण । परंपरेचे असे महिमान ।
आपण आधी ठरवून । असा विषय होणे नाही ।।१३०।।



निरुपणानंतर भावपूर्ण भजन । मामांचेवरी निष्ठा म्हणून ।
करिती मंडळी भान हरपून । बरडे विठ्ठल मंदिरातील ।।१३१।।

असा अलौकिक सोहळा । प्रेम आणि जिव्हाळा ।
म्हणोनीच भक्तांचा कळवळा । देवास येतसे ।।१३२।।

श्रीमामा मामींचे महिमान । केवळ अव्यक्त वर्णन ।
वेचले भावार्थ सुमन । यथाशक्ती यथामती ।।१३३।।

इति श्रीदासरामचरित्र । गुरुचरणीची गंगा पवित्र ।
दीन अर्पितो तुलसीपत्र ।
मातृपितृ वर्णननाम चतुर्थोध्याय ।।४।।

*****

।। श्रीराम ।।

# अध्याय-(५)- कीर्तन वर्णन

यज्ञ नामजपाचा । तोचि आत्मा कीर्तनाचा ।
नित्य नामसंकीर्तनाचा । चौघडा वाजतो ।।१।।

नि:शब्द ब्रह्म साकार । स्वानुभवाचा उच्चार ।
जडजीवांचा तारणहार । हे नित्यकीर्तन ।।२।।

कीर्तनगंगा सुमधुर । आली अशी आळशावर ।
फोडिले अपार भांडार । मामा-दादांनी ।।३।।

दादांची योग्यता जाणून । मानीत होते सर्वजण ।
म्हणोनीच कीर्तनास देती आमंत्रण । कर्ण तृप्त व्हावया ।।४।।

किती एक स्थळे । पुनित झाली दादांच्यामुळे ।
समाधान पावती श्रोते सगळे । या कीर्तनी ।।५।।

दादांच्या कीर्तनाचे शब्दांकन। मी कसे करु शकेन ।
परी यथामती प्रयत्न । आपुल्या सुखासाठी ।।६।।

अनेक संतांची अवतरणे । येती कीर्तनात उत्स्फूर्तपणे ।
सकल संप्रदाय एकत्रपणे । उभे ठाकती ।।७।।

जरी अनुदिन कीर्तन । तरी नित्य नूतन ।
शिळेपणा कधीच न । जाणवला कोणासी ।।८।।

हा थाट महाराजांचा । हा थाट भक्तीचा ।
हा थाट प्रेमाचा । इतरत्र नसे ।।९।।

ही प्रिती लाभावीण । तळमळे सद्गुरुंचे अंत:करण ।
असे सत्य महिमान । दादांच्या कीर्तनाचे ।।१०।।



मामांचे कीर्तन नामाभोवती । दादांचे कीर्तन चैतन्याभोवती ।
नाम तेच चैतन्य ही अनुभूती । मिळे आपणा ।।११।।

अंतरी चैतन्य असल्याने । जीव धुंद दिव्य श्रवणाने ।
चैतन्याच्या श्रेष्ठ अनुभवाने । जीवास सर्वसुख ।।१२।।

दादा रंगून कीर्तनात । उड्या मारीत निरुपणात ।
वृत्ती रंगली अविरत । चैतन्याच्या ठायी ।।१३।।

ब्रह्मानंदी टाळी लागली । जीवुबाई जीवपणा विसरली ।
विसरोनी निवांतचि ठेली । ब्रह्मस्वरूपी ।।१४।।

कीर्तनी दादा तल्लीन । होती विसरती देहभान ।
वरच्या पट्टीत चरण । सहज म्हणती ।।१५।।

डाव्या कानावर हात ठेवून । म्हणती चरण घोळघोळून ।
खड्या स्वच्छ आवाजातून । पकड नेमकी विषयावरी ।।१६।।

ऐसे अधिकारी दुर्लभ । दादांचे कीर्तन महालाभ ।
रंग भरे भरे माप । आपुल्या पुण्याईचे ।।१७।।

आण्णांची पेटी सफाईदार । साथ गायन तत्पर ।
तबल्याचे स्पष्ट बोल कानावर । ऐसे वादन नानाकाकांचे[१] ।।१८।।

आप्पाकाका[२] तात्याकाका[३] । अचुक धरिती झांजेचा ठेका ।
प्रसंगानुरूप म्हणती देखा । पदे अभंग ।।१९।।

बर्वे आजोबा बुक्का लाविती । सरल शांत त्यांची वृत्ती ।
रामनवमीचा दिवस अंती । साधिला त्यांनी ।।२०।।

---

*[१]श्री.अनिलप्रभू केळकर-श्रीदादांचे अधिकारी चिरंजीव [२]श्री.सूर्यकांत केळकर, [३]श्री.अनल केळकर-श्री.दादांचे अधिकारी चिरंजीव*

बर्वे आजोबांनंतर । बुक्का लावणेचा मान आजवर ।
व्हीकेकाकांची* नियमितता फार। निष्ठाही वाखाणण्याजोगी ।।२१।।

प्रकाशजी भावेसर ही अनेकदा । तबला उत्तम वाजविता ।
नादाने जीव पुरता । वेडा होई ।।२२।।

याबरोबर अनेक साथीदार । अखंड नित्यकीर्तनास हजर ।
कोणाकोणाचा उल्लेख करणार । प्रेम कीर्तनावरी ।।२३।।

अखंड नित्यकीर्तन करणे । तैसेच ते अखंड श्रवण करणे ।
ही दोनही व्रते सांभाळणे । आहे तितकेच अवघड ।।२४।।

बाह्याकर्षणाचा पसारा । अध्यात्मास कैचा थारा ।
परी तो निष्प्रभ होई सारा । जबरदस्त आकर्षण कीर्तनाचे ।।२५।।

कीर्तन ऐकता दादांचे । साम्राज्य अध्यात्मलहरींचे ।
तुषार उडती चैतन्याचे । अंतरामध्ये ।।२६।।

शुभ्र सदरा शुभ्र धोतर । काळी टोपी डोक्यावर ।
दिव्य तेज चेहऱ्यावर । ब्रह्मसुख पाहणाऱ्यासी ।।२७।।

सदऱ्याची तीन बटणे । गाती रामकृष्णहरी गाणे ।
बुक्क्याचे भाळी लेती लेणे । प्रसाद पांडुरंगाचा ।।२८।।

दादांची अधिकारवाणी । निर्विवाद दिव्यरत्नांची खाणी ।
बाहेर कोणत्याही ठिकाणी । असा विषय नसे ।।२९।।

चैत्र महिन्यात रामपाठावरी । श्रावणमासी हरिपाठावरी ।
उर्वरीत महिन्यात नित्यपाठावरी । विवरण चाले ।।३०।।

---

** श्री. वसंत केरोपंत कुलकर्णी – श्रीदादांचे निष्ठावान भक्त*



हरिपाठावरील कीर्तने । ज्ञानाईंचा गर्भित अर्थ सांगणे ।
सखोल मार्गदर्शन करणे । स्वानुभवाचा आधार ।।३१।।

श्रोते जेवढे उत्सुक । तेवढा महात्म्यासी हरिख।
दृष्टांत उदाहरणे मार्मिक । तत्त्वाचे सत्यत्त्व पटण्यासी ।।३२।।

अनुभूतीस धरोन विषय । म्हणोनीच सापडे सोय ।
आपण न करावी हयगय । अभ्यासाची ।।३३।।

नवरात्रीचे कीर्तनातून । अद्‌भुत मिळे रसायन ।
मूळ विषय घटस्थापनेपासून । उकलत जाई ।।३४।।

बहारीचे कीर्तन । श्रोत्यांचे हरपे श्रोतेपण ।
वक्ता–श्रोता वेगळेपण । नुरेचि तेथे ।।३५।।

एकदा दादांचे कीर्तन । तुंगास ठेवले आवर्जून ।
काय घडले महिमान । त्या कीर्तनात ।।३६।।

जाताना बैलगाडीत । दादा बसले निवांत ।
उधळले बैल अवचित । उलटली गाडी ।।३७।।

याचा भारी परिणाम झाला । दादांना मुका मार लागला ।
परी सर्वांनी मार्ग धरिला । तुंगग्रामीचा ।।३८।।

कशीबशी सर्व मंडळी । पोहोचली उशिरा इच्छितस्थळी ।
लगेच वाजवू करटाळी । म्हणाले दादा ।।३९।।

झाले त्याचा विसर पूर्ण । दादांचे रंगले कीर्तन ।
सर्वांवरी औषध रामबाण । एक कीर्तन ।।४०।।

जो देहावरी विसंबला । त्याचा कार्यभाग बुडाला ।
जो देहाचे पलीकडे गेला । तोच साधेल निजस्वार्थ ।।४१।।

मामा दादांची कित्येक उदाहरणे । पाहता वाटेल आपुले जीणे ।
किती जगतो लाजिरवाणे । आम्ही या नरदेही ।।४२।।

तुंगक्षेत्री रंग भरला । जागृत आहे देव तिथला ।
प्रकाशरुपे प्रगट झाला । दर्शन अमोघ लाभलेसे ।।४३।।

खटावमधील काही भक्तांनी । आग्रह धरिला या म्हणोनी ।
आम्हास कीर्तन पर्वणी । उत्सुकता ऐकण्याची ।।४४।।

कीर्तनाचे आमंत्रण । न दुखावले कोणाचे मन ।
कीर्तनास नाही म्हणोन । कैसे म्हणावे ।।४५।।

जाताना खटावात । पाऊस पडला अतोनात ।
चिखल झाला समस्त । वाटेमध्ये ।।४६।।

कशीबशी मंडळी सारी । पोहोचली ठिकाणावरी ।
गेली दमून भारी । पोहोचेपर्यंत ।।४७।।

कोणताच विश्रांतीचा विचार । न करिता श्रमाचा विचार ।
सुरु झाला कीर्तनगजर । क्षण न लागता ।।४८।।

कीर्तन करता करता । विषय रंगला अनवरता ।
स्थल कालाचे भान न रहाता । तीन तासावरी कीर्तन चाले ।।४९।।

शुकाचार्य आद्य श्रेष्ठ । कीर्तन परंपरेतील वरिष्ठ ।
हजारो वर्षे दुमदुमते हे पीठ । अनेक अध्वर्युंमुळे ।।५०।।

कीर्तनसमारंभ पुण्याला । मोठ्या प्रमाणात आयोजिला ।
कीर्तनकार कीर्तनसेवा करण्याला । अनेक होते उपस्थित ।।५१।।

आग्रहाचे येता निमंत्रण । दादा गेले करण्या कीर्तन ।
नारदमंदिर भव्य पुरातन । स्थळ समारोहाचे ।।५२।।



नव्हे कीर्तन दांभिक । तसेच नव्हे औपचारिक ।
सहज उत्स्फूर्त उद्‌बोधक । जनसमुदाय स्तब्ध झाला ।।५३।।

पुण्यातील कीर्तनाचे वर्णन । करिती एक श्रोते जाण ।
तेच ऐकू येथे आपण । येईल पुरी कल्पना ।।५४।।

ते गृहस्थ पुण्याचे । करंदीकर नाव त्यांचे ।
कीर्तन ऐकून दादांचे । काय बोलले ।।५५।।

तुमचे कीर्तन ऐकले । कोटणीसमहाराजांचे कीर्तन आठवले ।
तेची डोळ्यासमोर उभारले । असे प्रासादिक कीर्तन ।।५६।।

आता एका संतांचे । प्रेम दादांवरी कसे असायचे ।
आप्तसंबंध उभयतांचे । पूर्वअवताराचे कारण ।।५७।।

सांगली नगरीत । होते मळणगांवकर संत ।
राजयोगी म्हणून विख्यात । त्याकाळचे ।।५८।।

मळणगांवकर महाराजांचा अधिकार । आपण ऐकतो वरचेवर ।
ज्यांच्या लाह्यांचा स्विकार । आळंदीत माशांनी केला ।।५९।।

मळणगांवकर महाराजांचे मठात । दादांचे कीर्तन प्रसंगोपात ।
होत होते उत्साहभरीत । अनेकवेळा ।।६०।।

चालला एकदा निरुपणाचा गजर । महाराज नव्हते हजर ।
सद्‌गुरुंच्या दर्शनासी फार । दूर गेले होते ।।६१।।

निरुपण सांगलीतले । महाराजांनी तेथे ऐकले ।
छान झाले म्हणून कळविले । तार करुनी ।।६२।।

अखिल विश्वाच्या लहरी । उमटतात संतांचे अंतरी ।
तद्रूपता चैतन्यठायी खरी । म्हणोनीया ।।६३।।

श्रीतुकारामबीजेला । बोलाविले निरुपण सेवेला ।
एकमेकांवरील प्रेमाला । उपमा नव्हती ।।६४।।

निरुपण कीर्तनावरील प्रेम निर्व्याज । बहु आनंदे म्हणाले महाराज ।
हार मी घालणार आज । वेगळ्या अर्थाने ।।६५।।

कीर्तन ही भगवंताची सेवा । माझी तेथे काय वाहवा ।
मिळाला वारसा ठेवा । दादा म्हणाले ।।६६।।

हा दरबारी हार घालून । मठाचा चार्ज आजपासून ।
देतो तुम्हास संपूर्ण । रामभाऊ ।।६७।।

त्यावर्षापासून । दादा दरवर्षी जाऊन ।
करिती थाटात निरुपण । मळणगांवकर मठात ।।६८।।

गणेशदुर्गात संस्थानचे । कीर्तन ठेवले दादांचे ।
उभे केले अध्यात्माचे । वास्तवचित्र ।।६९।।

कीर्तन झाल्यावर । बिदागी घेवून समोर ।
आले देवू लागले हातावर । एक कारभारी ।।७०।।

स्मितहास्य चेहऱ्यावरती । म्हणाले याची आवश्यकता काय ती ।
आम्ही सेवालाभास संगती । आलो श्रीगजाननांच्या ।।७१।।

त्यास बहु आश्चर्य वाटले । म्हणे असे कीर्तनकार न पाहिले ।
जे खरोखरीच तृप्त जाहले । अंतर बाहेरी ।।७२।।

एकदा दादा तासगावला । गेले होते कीर्तनाला ।
गणपतीसमोर झाला । आरंभ कीर्तनाचा ।।७३।।

तेथे संत एक । महादूबुवा आले अचानक ।
दर्शनाचे मिळाले सुख । संत संगतीमुळे ।।७४।।



असा एकदा योग आला । कीर्तनाचा कोल्हापूरला ।
विशेष प्रसंग घडला । त्या ठिकाणी ।।७५।।

एक अधिकारी स्वामी । नाव त्यांचे कुंभारस्वामी ।
आनंद वाटला नामी । संतदर्शने ।।७६।।

दादांच्या त्या कीर्तनात । सुगंध पसरला अद्भुत ।
अनुभवोनी स्वत:स मानीत । धन्य सर्वजण ।।७७।।

महिमान साक्षात्कारी कीर्तनाचे । तसेच दादांच्या अधिकाराचे ।
विशेषत्त्व दिसले सर्वदा त्याचे । अनेक ठिकाणी ।।७८।।

माईसाहेब दांडेकर । गाव त्यांचे पालघर ।
वाड्यात प्रेमळ विठ्ठल मंदिर । पुरातनीचे ।।७९।।

मे महिनाभर । बालगोपाळही बरोबर ।
दादांचे कीर्तनसत्र । होतसे अनेक वर्षे ।।८०।।

सहजी दादा तल्लीन । कीर्तन भक्तिरसप्रधान ।
लुटती परमार्थसार संपूर्ण । जन आनंदती ।।८१।।

या माईसाहेबांनी । सांगलीस वरचेवर राहुनी ।
मामांची सेवा मनापासूनी । केली निस्वार्थपणे ।।८२।।

पालघरहून एके वर्षी देहूला । आले श्रीतुकाराममहाराजांच्या पुण्यभूमीला ।
देहूकर महाराज स्वागताला । हजर जय्यत तयारीने ।।८३।।

महाराज मनोमन गहिवरले । म्हणती थोर भाग्य आपुले ।
म्हणोनीच संत थोरले । आले आपुल्या भेटीसी ।।८४।।

व्यासपीठ श्रीतुकोबांचे । जे कळस झाले भागवत धर्माचे ।
अभंगलहरीत दादांचे । झाले कीर्तन ।।८५।।

तुकाराममहाराजांचे वंशज । असती स्वतः महाराज ।
पाहूनी कीर्तननिष्ठेचे गूज । भावातीत होती ।।८६।।

बहुत केला थाटमाट । पंचपक्वान्नाचा योजिला बेत ।
उदबत्त्यांचा घमघमाट । होता भोजनसमयी ।।८७।।

बड्या पाहुण्यांचे स्वागत । यथायोग्य बडदास्त ।
श्रीशिवरायांचे बाबतीत । श्रीतुकाराममहाराजे केली ।।८८।।

त्याचीच पुन्हा चुणुक । देहूतचि झाले कौतुक ।
राजे महाराष्ट्राचे एक । एक वैकुंठीचे ।।८९।।

देहूकर महाराज म्हणाले । आपल्या घरी नित्य कीर्तन चाले ।
कीर्तनसेवा कलीयुगातले । श्रेष्ठतम भक्तीसाधन ।।९०।।

आम्हीही करितो कीर्तन । परि आपुले नित्य अखंड कीर्तन ।
खरे वंशज नक्कीच आपण । शोभता श्रीतुकाराममहाराजांचे ।।९१।।

सोहळा देखणा झाला । नसे पार भाग्याला ।
वातावरणाचा रंगचि बदलला । भावपूर्ण प्रेमरस ।।९२।।

एकदा बरडे विठ्ठल मंदिरात । निरुपणासी उभे राहत ।
गर्दी जमली बहुत । श्रोत्यास पर्वणी ।।९३।।

विषय रंगला निरुपणाचा । नामदेव महाराजांच्या कीर्तनाचा ।
महाद्वारी मान नित्याचा । सप्रेम गजर ।।९४।।

नाम तोचि देव । म्हणोन नाव नामदेव ।
नामात प्रगटे देव । ऐसा महिमा नामाचा ।।९५।।

नामाचा महिमा देवास न कळला । संतांनी तो ओळखला ।
ओळखून गोडवा चाखला । देहभान हरपुनी ।।९६।।



निरुपण सुरु झाल्यावर । एक पखवाजवादक दादांसमोर ।
मुद्दाम येवानी साथीदार । म्हणून आपणहून बसले ।।९७।।

पखवाजवादकांचे वादन । सफाईदार होते असामान्य ।
ऐसा पखवाज आजवरी न । ऐकला कित्येकांनी ।।९८।।

नामदेव कीर्तन सभांगणी । नाचे पांडुरंग उड्या मारुनी ।
ऐसे महिमान निरुपणी । दादा सांगत होते ।।९९।।

तव पखवाजवादक म्हणाले । आम्हीही असे ऐकिले ।
परंतु आज ऐसेचि पहा घडले । आपुल्याही निरुपणी ।।१००।।

उत्सुकतेने मूर्तीकडे पाहिले । आश्चर्याश्चर्य वाटले ।
सर्वांनाच हे पटले । पांडुरंगाचा हार पाहोनी ।।१०१।।

पांडुरंगास हार घातलेला । जानव्याप्रमाणे दिसला झालेला ।
देव दादांचे निरुपणी नाचला । स्पष्ट झाले ।।१०२।।

अशी मौजच मौज । चालले तळमळीने भक्तीकाज ।
धन्य धन्य हे कीर्तनकाज । सुलभ भक्ती ।।१०३।।

रुकडीकर महाराजांचे उत्सवामाझारी । सांगवडेकरदादांचे घरी ।
दादांचे कीर्तन कोल्हापूरी । ठेविले होते ।।१०४।।

जेथे जाती तेथे ठरविती । विषय उत्स्फुर्त घेती ।
सिद्ध नेहमीच असती । विवरण करावया ।।१०५।।

सोऽहं स्वरुप ते जाण । नकळे सद्गुरुवाचोन ।
सहज सखोल वर्णन । बोल अनुभवाचे ।।१०६।।

सोऽहं हा बीजमंत्र । स्वरुपानंद जपती अहोरात्र ।
देह झाला पुण्यवंत । विष्णुदर्शन जाहले ।।१०७।।

धरिता सो टाकिता हं । अखंड चाले सोऽहं सोऽहं ।
प्राणी निजला तरी सोऽहं । देही अखंड स्फुरतसे ।।१०८।।

सोऽहं सोऽहं चौदा चक्रे । दावि अनुहात ।
नि:शब्दासी ठाव नाही । कैचा गहिनीनाथ ।।१०९।।

विषय झाला बहारीचा । अवाच्य श्रोत्यांची वाचा ।
सोऽहं साधना व अनुभूतीचा । झाला आज उलगडा ।।११०।।

स्वामी अमलानंद होते अशक्त झाले । तरी उर्मी येवोनी उठले ।
दरबारी हार आणण्यास सांगितले । त्यांनी साधकांना ।।१११।।

हार घेवोनी हातात । म्हणाले मला हे आहे माहीत ।
आपण घालून नाही घेत । हार गळ्यामध्ये ।।११२।।

परी मज स्वामी स्वरुपानंदांनी । अंतस्थ आज्ञा केली म्हणुनी ।
गौरवितो हा हार घालुनी । नाही म्हणू नका ।।११३।।

काय वर्णावा तो सोहळा । एकमेकांचा जिव्हाळा ।
देह दोन परी आत्मा एकला । सर्वाभूती समान ।।११४।।

ऐसे ज्ञान ज्यांसी झाले । तयांचे भिन्नत्त्व सरले ।
जगापासून निराळे । जगात असुनी ।।११५।।

अमलानंदांचे सार शब्द । दादा आपण अनुभवसिद्ध ।
विषय सारा इत्थंभूत । सहज सोपा मांडला ।।११६।।

नकाशावरुन वर्णन करणे । आणि प्रत्यक्ष प्रवास करून सांगणे ।
यातील फरक प्रत्यक्षपणे । दिसला असे ।।११७।।

जो महात्मा सिद्ध असतो । तेथे तयारीचा प्रश्न नसतो ।
केंव्हाही सांगताच सुरु करतो । तो कीर्तन ।।११८।।



असेच दादा माळबंगल्यावरी । प्रेम असल्याने गुरुदेवांवरी ।
दर्शनाची इच्छा झाली खरी । म्हणोन गेले ।।११९।।

दादा तेथे जाता । म्हणती गुरुदेव आपण आत्ता ।
सांगावे सार सर्वांपुढता । श्रीज्ञानदेवतेहत्तिशीचे ।।१२०।।

थोडक्यात पंधरा मिनिटात । सांगावे सार समस्त ।
माऊलींना जे अपेक्षित । आहे ज्ञान ।।१२१।।

तेहत्तिशीच्या विषयात । गती असेल असे संत ।
श्रीगुरुदेवांनी मन्मनात । अचूक हेरले ।।१२२।।

दादांनी प्रवचनातून । प्रगट केले गर्भित ज्ञान ।
थोडक्या वेळात उलगडोन । अस्खलित विषय विस्तारला ।।१२३।।

श्रीगुरुदेव प्रसन्न झाले । त्यांसी समाधान झाले ।
जसे मामांनी* उत्स्फूर्त कीर्तन केले । तैसाचि हा प्रसंग ।।१२४।।

सांभारे गणपतीसमोर । उत्सवात निरुपणासी तयार ।
कीर्तन निरुपणावरी अपार । कैसी निष्ठा पहा ।।१२५।।

निरुपण सुरु झाले । ऐन रंगात आले ।
पावसाने ठाण मांडले । बराचवेळ ।।१२६।।

सर्व माणसे उठली । शेजारील ओसरीत गेली ।
दादा म्हणती परिक्षा आपुली । कैसे निरुपण थांबवावे ।।१२७।।

व्यत्यय झाला कोणताही । निरुपण थांबणार नाही कदापीही ।
दादा स्पष्ट देती ग्वाही । काय निष्ठा वर्णावी ।।१२८।।

* *श्रीमामांनी एकट्या श्रीगुरुदेवांसमोर दीड दोन तास कीर्तन केले होते*

पाऊस थांबतो का निरुपण । हेच पहायचे आपण ।
तसाच उत्साह टिकून । राहिला हे विशेष ।।१२९।।

निरुपण अखंड चालले । पावसाला थांबावे लागले ।
सारेच अवाक् झाले । हा प्रसंग पाहोनी ।।१३०।।

निष्ठेने नेम चालवणे । हेची ब्रीद सांभाळणे ।
कोणत्याही क्षणी न डगमगणे । नेम साधिता ।।१३१।।

एकदा एका मंदिरातील । काही नियोजकांची झाली धांदल ।
आले दिंडीत होवून व्याकुळ । रात्रीचे वेळी ।।१३२।।

हाक मारली दादांना । दादा आले पहाण्या ।
विचारले कोणत्या कारणा । साठी आला तुम्ही ।।१३३।।

आमुच्या उत्सवात । कीर्तन होते एक नियोजित ।
कीर्तनकारांनी धाडले परत । श्रोते अत्यल्प म्हणोनी ।।१३४।।

आमुची असे विनंती । आपण याल हा विश्वास चित्ती ।
भिस्त आमुची तुमच्यावरती । आलो ऐनवेळी ।।१३५।।

काही कारणास्तव आमच्यात । फूट पडली उत्सवात ।
बाका प्रसंग अनुभवीत । आहो आम्ही ।।१३६।।

दादांनी विचारले नियोजकांना । तुम्ही तरी कीर्तनास थांबणार ना? ।
की आम्हास सोडून कीर्तना । घरी जाणार? ।।१३७।।

ते बोलले तसे नाही । ऐकणार कीर्तन आम्ही ।
कीर्तन होणार ही । समाधानता मनात ।।१३८।।

रात्री अकराची वेळ । दादां गेले तात्काळ ।
सेवा साधिली अल्पकाळ । सामान्यता असामान्य असुनही ।।१३९।।



कार्यक्रम जरी पूर्वनियोजित । तरी वक्ते नकार कळवितात ।
आवडी कीर्तनाविषयी येथ । खरी आतुनी ।।१४०।।

श्रोता एक किंवा अनेक । यांना तेवढाच हरीख ।
न जमेल कोणासही नाटक । मामा–दादांचे ।।१४१।।

प्रत्येक दत्तजयंतीस । जन्मकाळाचे कीर्तनास ।
बापट मंदिरी आपुल्या सेवेस । अर्पिती श्रीदत्तगुरुंचे चरणी ।।१४२।।

दत्तजयंती आली एक । पोटात दुखु लागले अचानक ।
औषधानेही काही फरक । नाही पडला ।।१४३।।

सायंकाळची वेळ झाली । मंडळी कीर्तनास जमली ।
घालमेल दादांची चालली । कीर्तनासाठी ।।१४४।।

दादांनी मनी ठरविले । वेळेस कीर्तन पाहिजे झाले ।
उपस्थितांसी सांगितले । करा उपाय सांगतो तो ।।१४५।।

दादा म्हणाले पोटावरी । घट्ट धोतर, बांधा निर्धारी ।
वर शर्ट घालुनी मंदिरी । जाऊ कीर्तनासाठी ।।१४६।।

सर्वांना आश्चर्य वाटले । म्हणती ऐसे कोठे न देखिले ।
काय दादांनी निष्ठेने जिंकले । आपुल्या प्रकृतीसी ।।१४७।।

दादा गेले मंदिरी । रंग भरला दरबारी ।
मागमूस न चेहऱ्यावरी । दिसला वेदनेचा ।।१४८।।

अनेक ठिकाणी दादांचे । प्रवचन कीर्तन निरुपण व्हायचे ।
वर्णन प्रत्येक ठिकाणचे । करणे आहे अवघड ।।१४९।।

उदाहरणादाखल आपण । काही विशेष प्रसंगांचे वर्णन ।
संक्षिप्त वेचिले काही कण । कीर्तनसभांगणीचे ।।१५०।।

गुरुवाणीतील अमृतभाष्य । मन देहाचा होई लय ।
सांध वेध अतुलनीय । प्रस्तुत विषयाचा ।।१५१।।

श्रीरामनिकेतनी मामांनी । सुरु केले कीर्तन अखंडपणी ।
कीर्तनापूर्वी सांगितली दादांनी । ज्ञानेश्वरी बरेच दिवस ।।१५२।।

दुपारची वेळ प्रशांत । दादांचे चाले ज्ञानसत्र ।
ज्ञानेश्वरीवरी इत्थंभूत । प्रवचन चाले ।।१५३।।

ईश्वरी ज्ञान म्हणजे ज्ञानेश्वरी । ओघवती चाले वैखरी ।
ज्ञान, प्रज्ञा, प्रचिती शिदोरी । मग काय अवघड ।।१५४।।

ज्ञानेश्वरी लेखनसमयी । ज्या अवस्थेत ज्ञानाई ।
त्याच ज्ञानावस्थेत सद्‌गुरुमाई । म्हणून गूढ उकले ।।१५५।।

विश्वाचे चैतन्य आर्त । संतांचे ठायी प्रकाशित ।
ग्रंथीचा गाभा प्रगट । उपदेश मोलाचा ।।१५६।।

दिव्य अमोघ वाणीतून । प्रवचन कीर्तन निरुपण ।
अवतार घ्यावयाचे कारण । स्पष्ट कळो येई ।।१५७।।

इति श्रीदासरामचरित्र । गुरुचरणीची गंगा पवित्र ।
दीन अर्पितो तुलसीपत्र ।
कीर्तन वर्णननाम पंचमोध्याय ।।५।।

*****



।। श्रीराम ।।

# अध्याय-(६)- संसारस्थिती, चित्‌शक्ती

राहोनी सर्वदा संसारी । रंगले अध्यात्मात अंतरी ।
संसार संगती निमित्तमात्र धरी । तेची खरे साधु ।।१।।

संसारस्थिती म्हणजे काय । संसार म्हणजे काय ।
याचा सांगितला उपाय । संसारी राहोनी ।।२।।

नाव असावी पाण्यात । पाणी येवू न द्यावे नावेत ।
यालाच म्हणावे विरक्त । गोंदवलेकरमहाराज सांगती ।।३।।

संसारात जो स्थित । तोचि आत्मा अंतरात ।
हे ओळखून सत्य । विचरे विरक्त संसारी ।।४।।

तीच संसारस्थिती । जीवनाची जेथे असे गती ।
गतीत नामाची अनुभूती । कळ आकळिता ।।५।।

हे दाखविले मामांनी । आणि तसेच दादांनी ।
संसारी स्वत: राहोनी । साधिला निजस्वार्थ ।।६।।

संसार आपल्या हातात नाही । प्रारब्ध चुकविता येत नाही ।
परमार्थ करावा सर्वदाही । कटाक्षाने ।।७।।

सर्व आटापीटा परमार्थासाठी । शेवट गोड होण्यासाठी ।
लक्षात अलक्ष त्यासाठी । व्हावे लागे ।।८।।

सोस जरी परमार्थाचा । संसार करोनीच पुरवावयाचा ।
म्हणोन विषय लग्नाचा । मामांनी काढला ।।९।।

रामजीसही विचार मानवला । संसाराचे कुंपण परमार्थाला ।
राखू परमार्थ बागेला । निरंतर ।।१०।।

रामजीने रुकार दिला । मामा–मामींना आनंद झाला ।
योग विवाहाचा आला । चिंता सर्व मिटली ।।११।।

इचलकरंजीमधील एक स्थळ । गोवंडे नाव ज्यांचे सोज्वळ ।
कन्या मालती प्रांजळ । सांगोन आली ।।१२।।

गोवंडे कुटुंबीय । असती बहु लाघवीय ।
म्हणोनीच झाली सोय । त्यांच्या कन्येची ।।१३।।

मामांनी सून म्हणून । पसंत केले मालतीस आनंदून ।
सात्त्विक सच्छिल जिचे मन । जैसी वाहे गंगा ।।१४।।

असा सहजी विवाह ठरला । योग्य दिवस पाहिला ।
मामीही आनंदे तयारीस लागल्या । रामजीच्या विवाहासाठी ।।१५।।

कार्य करणे सांगलीत । असेचि ठरले विचारांत ।
उत्साहाने तयारी करीत । उभय कुटुंबे ।।१६।।

परी आपण योजिलेले असते । तसेच सर्वदा न घडते ।
हीच ईश्वराची सत्ता असते । या भूमंडळी ।।१७।।

मी रामच्या लग्नात । देवक ठेवणार निश्चित ।
जानकीमातोश्री* पुत्र मानीत । दादांना आपुला ।।१८।।

मामा रुकार देती वाचे । म्हणती आपणचि आईवडील रामजीचे ।
गुरुघराण्यावरील निष्ठेचे । अनुपमेय उदाहरण ।।१९।।

विकल्परहित मामांचे मन । एकुलता एकच पुत्र असोन ।
संमती दिली मनापासुन । ना आग्रह ना अट्टाहास ।।२०।।

---

** प.पू.श्रीकोटणीसदादांच्या पत्नी*



हाचि मामांचा विशेष स्वभाव । वागणे बोलणे सदैव ।
जसे पाटाचे पाणी सुखनैव । जाते पाट फोडिता ।।२१।।

परंतु ईश्वरी योजना । कधी कोणास कळली ना ।
जानकीवहिनी गेल्या निजसदना । अवचित ।।२२।।

मामा करु लागले विचार । उपाय काय यावर ।
पेचप्रसंग समोर । ठाकला आता ।।२३।।

मामांनी व्याह्यांच्याबरोबर । मसलत केली त्यांचा विचार ।
काय ठरला तोचि साचार । योजिला याप्रसंगी ।।२४।।

लग्न करावे नृसिंहवाडीला । श्रीदत्तप्रभू जेथे वास्तव्याला ।
मान्य केले ईश्वरीयोजनेला । सर्वांनी ।।२५।।

एकोणीसशे बेचाळीस । माघ वद्य एकादशीस ।
चित्शक्ती मिळोन गेली सगुण ब्रह्मास । ऐक्य पुण्यात्म्यांचे ।।२६।।

मंगलविवाह होताक्षणी । मालती झाल्या सीतावहिनी ।
मिळाल्या माता आणि भगिनी । अनेकांना ।।२७।।

विवाह छोटेखानी झाला । वरातीचा प्रसंग आला ।
टांगा होता उभारलेला । बसू लागले वधुवर ।।२८।।

टांग्यात पाय ठेवल्यावर । दादांच्या गळ्यातील तुटला हार ।
तोच दादा सत्त्वर । बोलले मामांजवळी ।।२९।।

अहो चिमडच्या माईसाहेबांनी । देह ठेविला या पुण्यक्षणी ।
बोले दादांची अधिकारवाणी । त्यासमयी ।।३०।।

श्रीमाईसाहेबांचे कठोर व्रत । करावे येणाऱ्यांचे स्वागत ।
स्वार्थाचा विचारही न करीत । हसतमुख सर्वदा ।।३१।।

श्रीमाईसाहेब चिमडच्या महाराजांना । काय म्हणायच्या पहाना ।
माझेकडून नामसाधना । होत नाही ।।३२।।

महाराजांनी त्यांना सांगितले । तू आचरतेस व्रत आगळे ।
तुझे साधन नसे वेगळे । चिंता नसावी ।।३३।।

अलौकिक व्रत श्रीमाईसाहेबांचे । सोपविले हाती सीतावहिनींचे ।
संक्रमण घडले शक्तीचे । अशाप्रकारे ।।३४।।

श्रीमाईसाहेबांच्या निर्याणाची वार्ता । ऐकली सांगलीस येता ।
दादांचा अधिकार थोर होता । कळले याही वेळी ।।३५।।

आगमन सुनबाईंचे । झाले घरी मामांचे ।
तेंव्हा मन प्रत्येकाचे । झाले प्रफुल्लित ।।३६।।

सासर आणि माहेर । जयांना एकचि आयुष्यभर ।
वहिनींची महानता थोर । पहाण्या मिळाली ।।३७।।

वहिनींचे करण्या यथार्थ वर्णन । मी तो कस्पटासमान ।
नातवंड त्यांचे मी लहान । प्रेम लाभले आशीषही ।।३८।।

पहाटे लवकर उठावे । सडासंमार्जन करावे ।
सडा पडताचि सर्वांनी ओळखावे । वाजले चार ।।३९।।

देवाच्या पूजेची तयारी । विशेष कार्यक्रमांची तयारी ।
न्याहारीचीही तयारी । वहिनी करिती ।।४०।।

वहिनींनी मुलांना बाळकडु दिले । ज्यास अमृतहस्त लागले ।
त्याचे महत्त्व दिसले । पुढे आपल्याला ।।४१।।

अत्यल्प सामुग्री वहिनींजवळी । परी अन्नास चवी निराळी ।
अन्नपूर्णा प्रेम मिसळी । म्हणोन गोडी अनन्य ।।४२।।



शिळे असले जरी अन्न । मुखात जाता मिष्टान्न ।
कर्त्याचे हे महिमान । अनुभवले घरच्यांनी ।।४३।।

असे असोनी प्रत्यक्षात । वहिनी मोठ्या मनाने सांगत ।
आमुचे मुलांचे मुखात । अमृत आहे ।।४४।।

जे पुढे ठेविते प्रेमाने । खातात घास आनंदाने ।
कोणत्याही परिस्थितीत मार्गक्रमणे । सोपे जाते त्यामुळे ।।४५।।

सारे धुणे घेवोन डोईवर । वहिनींची लगबग रस्त्यावर ।
जाती कृष्णाकाठावर । पायी काही न घालता ।।४६।।

तेथे कपडे धुवावे । परत डोक्यावर घ्यावे ।
हसतमुखाने पुन्हा यावे । आपुल्या घरी ।।४७।।

घरचे निवडण कांडण । सर्व खोल्यांचे सारवण ।
करिती वहिनी एकामागुन । एकेक दिव्य कामे ।।४८।।

वहिंनींनी जितुके काम केले । न होणार शतहात जरी लागले ।
हे म्हणणे अयोग्य ठरले । असे होणार नाही ।।४९।।

कष्ट घेतले अतोनात । मनी नित्य शांत ।
चेहऱ्यावरी हास्य प्रशस्त । दिनरात दिसले ।।५०।।

परिस्थिती कितीही प्रतिकूल । कधी न झाल्या व्याकुळ ।
राखिती सर्वदा समतोल । कौशल्याने ।।५१।।

मामंजींची सेवा । प्रेमाने घास भरवावा ।
क्षीण प्रकृतीस बरवा । आधार मिळे ।।५२।।

संसाराचा रथ असो । किंवा उत्सव समारंभ असो ।
उधाण उत्साहाचे पाहतसो । आम्ही नेहमी ।।५३।।

वहिनींनी जसा उत्सव केला । आहे फार महत्त्व त्याला ।
आत्ताच्या परिस्थितीवरुन आपल्याला । कळणे अवघड ।।५४।।

वहिनींनी सर्वस्व आपुले । पतीदेवांचे चरणी अर्पिले ।
देहास अतोनात झिजवले । चंदनापरी ।।५५।।

वहिनींनी कष्टचि घेतले । सुख कधीच ना अपेक्षिले ।
प्राप्त परिस्थितीत मानले । सुख आणि आनंद ।।५६।।

हीच लक्षणे पतीव्रतेची । आस नाही सुखाची ।
पतीसेवा कुटुंबसेवाच जिची । जीवनशैली असे ।।५७।।

येणाऱ्यास वाटे हे कुटुंब आपुले । वेगळेपण कधीच न जाणवले ।
कुटुंब मर्यादित न राहिले । आजवरी केळकरांचे ।।५८।।

आता पुढे आपण । करु संसार वर्णन ।
सुख मिळेल यातुन । कंगोरे जीवनाचे ।।५९।।

दादांना पुत्ररत्न पहिले । अमोलिक अपूर्व लाभले ।
नाव त्याचे ठेविले । चंद्रशेखर ।।६०।।

नावाप्रमाणेच शांत । दिसती जगती सदोदीत ।
फळ असे रसभरीत । शुद्ध बीज म्हणोनी ।।६१।।

आण्णा हे टोपणनाव । घेई सर्वांचे मनीचा ठाव ।
सर्वांना वाटताती सदैव । आण्णा आपुले ।।६२।।

उत्तीर्ण होता मॅट्रिक परिक्षेत । नोकरी मिळाली त्वरीत ।
संस्थेच्या कार्यालयात । सिटी हायस्कूलच्या ।।६३।।

सिटी हायस्कूल आणि केळकर । यांचा संबंध पूर्वापार ।
सांगली शिक्षण संस्थेचे लाईफमेंबर । शिक्षकही होते मामा ।।६४।।



योग्य वेळी आण्णांचा । विवाह झाला साचा ।
रोहिणीकाकूस दादांच्या सुनेचा । मान मिळे ।।६५।।

पुढे या दांपत्यासी । कन्या झाली साजेसी ।
ज्योती नाव तिजसी । बहू आनंदे ठेविले ।।६६।।

कोडकौतुक ज्योतीचे । चाले घरी केळकरांचे ।
लहान असून मुखात तिचे । पाठ अध्यात्माचे ।।६७।।

अचानक श्वास घेण्यास । होऊ लागला त्रास ।
उपाय धावपळ प्रयत्नास । सीमा नव्हती ।।६८।।

प्रारब्धाचा खेळ चाले । जीव दैवाधीन हे समजले ।
प्रयत्नांतीही वाचू न शकले । प्राण ज्योतीचे ।।६९।।

'सद्गुरुनाथ माझे आई । मला ठाव द्यावा पायी ।'
भजन करीत गेली सद्गुरुपायी । अवघ्या तिसऱ्या वर्षी ।।७०।।

आत्मज्योत जीवनज्योत । दोन परी एक होत ।
सत्यता वचनाची दाखवत । पणजोबांच्या ।।७१।।

अलौकिक परंपरा घराण्याची । परोपरी साकार कैची ।
प्रत्येक पिढीत अधिकाराची । साक्ष दिसे ।।७२।।

पुढे सुपुत्र दीपक । आण्णांना लाभला कुलदीपक ।
नावाप्रमाणेच दीपक । असे अनेकांना ।।७३।।

दीपकचे पाठी अंजनी । आनंदल्या वहिनी ।
हनुमानजयंतीच्या विशेष दिनी । जन्म झालासे ।।७४।।

सोयीसाठी एकेक सुपुत्रांचे । वर्णन एके ठिकाणीच केलेसे ।
कालक्रमानुसार समजायचे । तारतम्याने आपण ।।७५।।

आण्णांनंतर यथावकाश । दादांना तीन पुत्र झाले खास ।
त्याचेच एकेक वर्णन करण्यास । उत्सुक झालो ।।७६।।

दुसऱ्या पुत्ररत्नाचे नाव । सूर्यकांत ठेविले झाला उत्सव ।
बहु आनंदती सर्व । पुत्ररत्न होता ।।७७।।

चंद्र सूर्य दोघांचे । परमार्थी महत्त्व नित्याचे ।
व्यवहारातही प्रतीक याचे । दाखविले ।।७८।।

चंद्र सूर्य इडा पिंगला । एकरुप होता नाम हाताला ।
येई म्हणूनी महत्त्व याला । वेगळेची ।।७९।।

सूर्यकाकांना नोकरी । इचलकरंजीत मिळाली ।
जे येईल सामोरी । ते स्विकारले ।।८०।।

त्यांचा पुढे विवाह झाला । कुंटे कुटुंबियांना आनंद झाला ।
पाहून आपुल्या कन्येला । यथायोग्य स्थळी ।।८१।।

काकूचे नाव असे सुनिता । जिची असे अपार योग्यता ।
आलीसे सर्वांच्या पुढता । यथाकाले ।।८२।।

सुनिता काकूचे अंतरी । नाथांची स्वारी संचार करी ।
तसेच देवीही पुकारा करी । 'उदयोस्तु' म्हणुनी ।।८३।।

सिध्द आणि शक्ती । याची येतसे प्रचिती ।
अनेक प्राणिमात्र उद्धरती । भंडाराप्रसादे ।।८४।।

त्यांना पुढे यथाकाले । पुत्ररत्न लाभले ।
सुनील नाव ठेविले । या बालकाचे ।।८५।।

दुसरी एक कन्या झाली । सुचिता नावे शोभली ।
धन्य कुळी जन्मास आली । परमभाग्य म्हणोनी ।।८६।।



दादांना तिसरेही पुत्ररत्न झाले । त्याचे नाव अनल ठेविले ।
नावाप्रमाणेच सरल पाहिले । नेहमी त्यांना ।।८७।।

ज्यांच्यामुळी नावात पहा । ना उकार मात्रा वेलांटी पहा ।
सरल तीन अक्षरे पहा । अनल ऐसी ।।८८।।

अनलकाका बुद्धीमान । बी.कॉम. शिक्षण केले पूर्ण ।
नोकरीचा करिता प्रयत्न । मिळाली सांगली बँकेत ।।८९।।

त्यांचे विवाहबंधन । झाले ती वधू धन्य ।
परांजपे कुटुंबियांचे पुण्य । ऋणानुबंधही तसेच ।।९०।।

विवाह झाल्यावर काकूचे । अर्चना नाव ठेवले सासरचे ।
पूर्वसुकृत कारण त्याचे । केळकर कुळी यावया ।।९१।।

यथाकाले अनलकाकांना । झाल्या दोन सुकन्या ।
प्राजक्ती शारदा नावे दोघींना । अनुक्रमे ठेविली ।।९२।।

आईवडिलांप्रमाणेच हुशार । शांत नेहमी स्कॉलर ।
दोघींनीही अभ्यासात कसर । कधी न केली ।।९३।।

दादांना चौथेही पुत्ररत्नच झाले । तेंव्हा एक महिमान घडले ।
त्याचे रुदन न ऐकिले । चिंता वाढली ।।९४।।

माईसाहेब दांडेकर मामांकडे आल्या । त्यांना तळमळीने सांगू लागल्या ।
उपाय यावर विचारिला । काय करावा ।।९५।।

मामांनी आरती रामेश्वरांची । केली प्रार्थना कुलदैवताची ।
तीर्थ, अंगारा उपाय हाचि । म्हणती लागू होईल ।।९६।।

बाळाचे सर्वांगास । अंगारा लावला हुरहुर मनास ।
येईल यश आशीर्वादास । हीच आशा ।।९७।।

तीर्थ अंगारा मिळता । गुण आला क्षण न लागता ।
चेतना आली अवचित आता । बाळ रडू लागले ।।९८।।

देह आणि चैतन्य । यांचा संगम म्हणजे जीवन ।
चैतन्य नसता जीवन । व्यर्थचि आहे ।।९९।।

वारा हाचि देव । वारा नसता सर्व वाव ।
आत नसता वाऱ्याची खेव । सर्व शून्य होई ।।१००।।

अनिल म्हणजे वारे । प्रभू हे देवाचे नाव बरे ।
अनिलप्रभु नाव साजिरे । शोभले बाळाला ।।१०१।।

सर्वांना आनंद झाला । पुत्रजन्मोत्सव झाला ।
चिंता गेली लयाला । बारसे झाले थाटात ।।१०२।।

अनिलप्रभूंनी घेतले शिक्षण । यश गाठले दैदिप्यमान ।
कीर्तन निरुपणांचे श्रवण । लाभले वडिलांच्या ।।१०३।।

चित्तात विषय ठसला । आहे महत्त्व त्याला ।
पुढे अध्यात्म अभ्यासाला । दिले प्राधान्य ।।१०४।।

त्यांचा विवाह ठरला । साधना वधूस आनंद झाला ।
तिने मानिले भाग्याला । धन्य आपुल्या ।।१०५।।

विवाहोत्तर वधूचे । अपर्णा नाव ठेवले सासरचे ।
कौतुक धाकट्या सुनेचे । आपसुकच झाले ।।१०६।।

अपर्णाकाकूने यथाकाले । दोन सुपुत्रांना जन्म दिले ।
अनिरुद्ध अनिकेत नाव ठेविले । दोघेही हुशार ।।१०७।।

चारही व्याही दादांना । कसे मिळाले पहा ना ।
आवड असे सर्वांना । परमार्थाची ।।१०८।।



त्यांचे आता संक्षिप्त वर्णन । पाहू येथे आपण ।
पहिले व्याही घारपुरे मामा म्हणून । होते निष्ठावान ।।१०९।।

त्यांना आवड गायनाची । गाता गाता पेटी वादनाची ।
सुंदर आवाजात बहारीची । म्हणत अभंग पदे ।।११०।।

श्रीगोंदवलेकर महाराजांवर । होती निष्ठा फार ।
रामनवमी दिवस सुंदर । साधिला शेवटी ।।१११।।

दुसरे व्याही पोलीस खात्यातले । तरी सरळमार्गी आयुष्य जगले ।
शेवटपर्यंत न चुकवले । त्यांनी दादांचे कीर्तन ।।११२।।

रोज न चुकता । ऐकून कीर्तनसरिता ।
खरी मिळविली समाधानता । अखेर त्यांनी ।।११३।।

तिसरे व्याही पुण्याचे । परांजपे नाव त्यांचे ।
कुटुंबावर दादांचे । त्यांचे प्रेम पार ।।११४।।

चौथे बापूसाहेब पटवर्धन । कर्नाटकात शेती सांभाळून ।
मोरयांचे अनुसंधान । नित्य ठेविती ।।११५।।

सर्व व्याह्यांचे अंत:करण थोर । दादांचा जाणुनी अधिकार ।
ठेविती मस्तक चरणांवर । दृष्य दुर्मिळ ।।११६।।

असा सुखसंपन्न संसार । चालला सहज सुखकर ।
दादांची मात्र अवस्था फार । वेगळीच होती ।।११७।।

व्यवहार ही सामान्य पातळी । दादांची योग्यता निराळी ।
खरी आनंदाची दिवाळी । ते अनुभवीत होते ।।११८।।

वहिनींनी सर्व व्यवहार । सदा दक्ष आत-बाहेर ।
सव्यसाचित्त्वाने संसार । समाधाने केला ।।११९।।

वहिनींनी आपणा प्रेम दिले । ते शब्दात सांगू शकले ।
असे कोणास जमले । सांगता येणार नाही ।।१२०।।

किती एक माणसे वहिनींनी । जोडली गोड बोलोनी ।
जाता येता आवर्जूनी । करिती विचारपूस ।।१२१।।

लहान मोठा कोणी असो । परिस्थिती कशीही असो ।
स्त्री-पुरुष कोणीही असो । वहिनींच्या लेखी समान ।।।१२२।।

एखादे दिवस जरी । नाही दिसले आलेले मंदिरी ।
आवर्जून विचारपूस करी । ही प्रेमळ माय ।।१२३।।

वहिनींनी जे साधले । कळण्यास अंत:करण वेगळे ।
पाहिजे सामान्य बुद्धीच्या पलीकडले । व्हावे नतमस्तक ।।१२४।।

सर्वांची मनापासून सेवा केली । सुखाची मागणीही न शिवली ।
आयुष्यभर वहिनींनी आचरली । अलौकिक जीवनधारा ।।१२५।।

परि प्रारब्धशक्तीच्या समोर । सांगा कोणाचे चालणार ।
जे येईल समोर । स्विकारावे लागते ।।१२६।।

एकोणीसशे त्र्याऐंशी साल । उजाडले दु:ख घेवून सकल ।
ज्या घटनेने कोलाहल । झाला सर्वांचे अंतरी ।।१२७।।

त्यासालची गोविंदजयंती । आनंदास उधाण किती ।
फाल्गुन शुद्ध दशमीस साजरी करिती । जय्यत तयारीने ।।१२८।।

सकाळी भजन झाले । दिलीपचे* कीर्तन झाले ।
प्रथमच त्याने कीर्तन केले । वहिनींच्या प्रेरणेने ।।१२९।।

---

** श्री दिलीप कुलकर्णी- श्रीदादांचे शिष्य, बरेच वर्षे केळकरांचे वाड्यात रहात होते.*



वहिनींच्या उत्साहास भरती । कौतुकाची थाप पाठीवरती ।
प्रोत्साहन मिळे ही अनुभूती । किती एकांना ।।१३०।।

वहिनींनी पडवीत बसून । ऐकले भजन कीर्तन ।
आत आल्या लगबगीनं । पुढील तयारीसाठी ।।१३१।।

अचानक वहिनींना । वाटू लागला अस्वस्थपणा ।
त्रास सहन होईना । झोपल्या बेडवर ।।१३२।।

नाहीतरी शब्द बेडरेस्ट । नव्हता वहिनींच्या कोषात ।
कामात दंग अविश्रांत । ना दम ना आळस ।।१३३।।

वहिनींच्या भगिनी । अंबुमावशी आल्या धावोनी ।
बहिणीचे जवळी बसोनी । घेतले डोके मांडीवरी ।।१३४।।

वहिनी म्हणाल्या बहिणीला । मी न दुखावले कोणा एकाला ।
मग देव कां गं मला । इतका त्रास देतो ।।१३५।।

काही सुचेना कोणास । म्हणती बोलवा डॉक्टरांस ।
तातडीने काही उपाय खास । सत्त्वर होतील ।।१३६।।

तीर्थ अंगारा दिला दादांनी । महाराजांचे स्मरण करुनी ।
वहिनींची निष्ठाही मनोमनी । केले प्राशन ।।१३७।।

वहिनी उठू लागल्या । नमस्कार करण्यास प्रयत्न चालला ।
दादा म्हणाले कष्ट कशाला । पोचला मला नमस्कार ।।१३८।।

वहिनींना उठू दिले असते । तर आपणा काय दिसले असते ।
पतीदेवसद्गुरुंच्या चरणावर ते । चित्शक्तीचे महानिर्वाण ।।१३९।।

वहिनींचे बोलणे चालणे । सहज सामान्यांप्रमाणे ।
अधिकार झाकून रहाणे । वसा मामांजींचा ।।१४०।।

एकदा दादा साधनात । असता वहिनी गेल्या तेथ ।
दैवी दृष्य मंदिरात । पाहुनी स्तब्ध झाल्या ।।१४१।।

वहिनींना दिसले तेथ । विठ्ठलरखुमाई साक्षात ।
संत ऋषीमुनी जोडोनी हात । उभे सभेमध्ये ।।१४२।।

कल्पना यावया अधिकाराची । आवश्यकता या गोष्टीची ।
शितावरुन भाताची । परिक्षा करावी ।।१४३।।

वहिनींचा कळण्या अधिकार । ओघाने आला प्रसंग साचार ।
आता मागील धागा जोडला जाणार । वहिनींची अस्वस्थता ।।१४४।।

कळेल तसे पाय उचलले । ज्याने त्याने दर्शन घेतले ।
दादांना मात्र दिसले । वेगळेच चित्र ।।१४५।।

वहिनींच्या देहामधून । लोळ प्रकाशाचे दैदिप्यमान ।
बाहेर पडले म्हणून । दादांनी सांगितले ।।१४६।।

नीलप्रकाश झगझगीत । दिसला दादांना वहिनींचे मुखात ।
वहिनी कोण होत्या हे सत्य । ओळखावे ।।१४७।।

गोविंदजयंती गुरुपुष्यामृत । दिवस होता नियोजित ।
देहाचा आला अंत । दुपारी सुमार बाराचा ।।१४८।।

कार्यकाल संपून गेला । वहिनींनी देह ठेविला ।
जबरदस्त धक्का बसला । उपस्थित जीवांसी ।।१४९।।

तोच हलकल्लोळ उठला । अश्रू अनावर प्रत्येकाला ।
कळेना या घटनेला । कसे सत्य मानावे ।।१५०।।

वहिनी अशा अचानकपणे । सोडोनी गेल्या कोण्या कारणे ।
काय आमुचे वागणे । एवढे चुकले ।।१५१।।



अशा तुम्ही अकस्मात । आम्हास सोडून गेलात ।
पत्ताही लागू न दिलात । कशाचाही ।।१५२।।

रीघ लागली भक्तांची । ही संधी अखेरची ।
वेळ साधली दर्शनाची । माऊलीच्या ।।१५३।।

वहिनींना तेंव्हाही पहाता । मुखावरी दिसे प्रसन्नता ।
वाटले विश्रांती घेऊन आता । उठतील काही वेळाने ।।१५४।।

भोळ्या मनास न पटते । परी ते कटू सत्य असते ।
ते टाळता येत नसते । कदाकाळी ।।१५५।।

अंगणात वहिनींना ठेविल्यावरी । केले सौभाग्य उपचार त्यांचेवरी ।
नयनाश्रूंचे सिंचन सर्वांगावरी । उमाळा हृदयीचा ।।१५६।।

सौभाग्य लेणे अर्पिले । तो अधिकचि तेज फाकले ।
वहिनींचे ठिकाणी दिसू लागले । लक्ष्मीचे रुप ।।१५७।।

श्रीपतीबुवांना* अचानक सुचले । पदकमलास केशर लावले ।
चरणांचे ठसे घेतले । एका कागदावरी ।।१५८।।

हे पदकमल पावन । देव्हाऱ्यात ठेविले आहेत जपून ।
उत्सवात अत्तर लावून । होते पूजन चरणकमलांचे ।।१५९।।

काहींना विचार सुचला । भजन करावे यावेळेला ।
भजनी मंडळी सेवेला । झाली हजर ।।१६०।।

तोवरी सर्वत्र जयजयकार । चालला रामनामाचा गजर ।
तसाच सुरु होता हळुवार । वहिनींजवळी ।।१६१।।

---

** श्री श्रीपतीबुवा धोंगडे श्रीदादांचेकडे अनेक वर्षे येत.*

वहिनींची अंत्ययात्रा निघाली । अनेक मंडळी निघाली ।
हजारो माणसे वहिनींनी जोडली । हे प्रत्यक्ष समजले ।।१६२।।

शोकाधीन बापुडे । जड पावलाने नदीकडे ।
चालले येऊन समाधीपुढे । श्रीहनुमंतसद्गुरुदर्शनार्थ ।।१६३।।

देह ठेविला चितेवर । चालले अंत्यसंस्कार ।
श्रद्धांजली सुमने चरणांवर । सूर्य कलला पश्चिमेकडे ।।१६४।।

देह अग्निच्या स्वाधीन । आठवणी मनात घर करुन ।
दादांसह वाड्यात येवून । मंडळी परतू लागली ।।१६५।।

इतक्यात दादा बोलले । आजचे कीर्तन पाहिजे केले ।
संतुलन मनाचे राखिले । धन्य धन्य हे अवतारी संत ।।१६६।।

दादा म्हणाले आपण । कीर्तन करुया काही क्षण ।
वहिनींचेच पुण्यस्मरण । हेची कीर्तन आजचे ।।१६७।।

नित्याचे करिता कीर्तन । दादा दिसले शांत वदन ।
पत्नीचे अकस्मात देहावसान । होऊनही ।।१६८।।

ऐसी परंपरा कीर्तनाची । कटाक्षाने सांभाळणेची ।
चिरसमाधान त्यातची । स्थितप्रज्ञ राहता ।।१६९।।

दोन दिवस गेले निघोन । तिसरे दिवशी अस्थिविसर्जन ।
दृष्य वेगळेच पाहोन । विस्मित सारे ।।१७०।।

सर्व अग्निरुप झाले । तरी तेथे काय उरले ।
निऱ्या व ओटीतील पाने न झाले । अग्निरुप ।।१७१।।

हेच खरे चित्शक्तीचे रुप । जे न होई अग्निरुप ।
प्रत्यक्ष अग्निही समीप । येवू न शके चित्शक्तीच्या ।।१७२।।



वहिनींचे महानिर्वाण । दादा होते जाणून ।
त्याचे प्रत्यक्ष प्रमाण । आपणा दिसलेसे ।।१७३।।

वहिनींच्या निर्वाणादिवशी । दादांनी सांगितले बापटकाकांसी ।
लवकर परतावे सांगलीसी । पुण्याचे काम संपवून ।।१७४।।

तसेच शिंगाडे* यांना । दादांनी सांगितले पहा ना ।
लवकर परतावे आपुल्या सदना । सूचक शब्द संतांचे ।।१७५।।

अंबुमावशी* वाटवे यांना । दादांनी दाखविल्या खुणा ।
म्हणाले रहावे लागेल आपणा । येथेच पंधरा दिवस ।।१७६।।

असो आता किती वर्णावे । शब्दांचे नाही काम स्वभावे ।
लोटांगण पुन्हा पुन्हा घालावे । सीतावहिनींच्या चरणांवरी ।।१७७।।

इति श्रीदासरामचरित्र । गुरुचरणीची गंगा पवित्र ।
दीन अर्पितो तुलसीपत्र ।
संसारस्थिती चित्शक्ती वर्णननाम षष्ठोध्याय ।।६।।

*****

** श्री कृष्णा शिंगाडे – श्रीदादांचे आज्ञाधारक शिष्य*
** श्रीमती अंबुमावशी वाटवे – निष्ठावान् सेवाभाव असणाऱ्या होत्या.*

।। श्रीराम ।।

# अध्याय-⑦- पारमार्थिक अधिकार वर्णन

मतिदार्थ अवताराचा । प्रयत्न आहे मांडण्याचा ।
ना तरी दादांच्या अवताराचा । काय थांग लागे ।।१।।

सगुणरुपे येवोन । शिकविले बोटास धरुन ।
महाभाग्य याहून । आणखी ते काय ।।२।।

होते स्वत: ब्रह्मरुप । धरिले सामान्यरुप ।
अनुभवले अरुपाचे रुप । सदैव ज्यांनी ।।३।।

असेच एकदा स्वप्नात । दादा संतमंडळींना पाहत ।
एक स्वयंभू मूर्तीही तेथ । साक्षात् विठोबाची ।।४।।

दादांना हे पाहून आनंद झाला । साष्टांग प्रणिपात घातला ।
विठोबा अंतर्धान पावला । तत्क्षणी ।।५।।

संत सन्मुख देव प्रगट । कारण ध्यान त्याचे अंतरात ।
आत असे म्हणूनच प्रगट । बाहेर प्रासंगिकपणे ।।६।।

दादांना नेहमीच दिव्य कवने । स्फुरत होती उत्स्फूर्तपणे ।
पारमार्थिक उपदेश सहजपणे । व्यक्त शब्दात ।।७।।

दादांचे लेखन अद्भुत । अनेक विषय हाताळीत ।
अभ्यास करेल तो प्राप्त । करील ज्ञान तेथीचे ।।८।।

अनेक संतांची चरित्रे । अनुभवजन्य कूट पदे ।
अनेक ग्रंथांवरी टीका स्वानंदे । दादा लिहिती ।।९।।

आरत्या लिहिल्या अनेक । भावार्थ अन्वयार्थ अनेक ।
सारे वाचणारा वाचक । आहे दुर्लभ ।।१०।।



अभंग पदे सिद्धस्तुती । लेखन प्रसादिक अशी महती ।
श्लोक, लेख प्रसिद्ध किती । झाले म्हणुनी सांगावे ।।११।।

याहीवरी कोणी इच्छा व्यक्त । करी त्याचे मन तृप्त ।
ज्ञानप्रसाद होई प्राप्त । सद्गुरुंच्या लेखनातुनी ।।१२।।

लेखनाची नुसती यादी । करिता वेळ लागेल किती ।
लिहिण्यासी मर्यादा आहे ती । प्रत्यक्ष अनुभवावे ।।१३।।

असाच ग्रंथ सिद्धकथामृतसार । दादांनी लिहिला साचार ।
रेवणसिद्धांपासुनी परंपरा थोर । सिद्धांची वर्णिली ।।१४।।

होता काव्यप्रसाद प्राप्त । घातला देवापुढे प्रणिपात ।
तोच पुकारा करीत दारात । एक बैरागी आला ।।१५।।

दादा आले दारापाशी । साष्टांग दंडवत घातले त्यासी ।
श्वानही एक होते बाजूसी । विशेष वाटले ।।१६।।

उठोनी वर पहाता । बैरागी अदृष्य झाला क्षण न लागता ।
सिद्धमूर्तीच प्रगट आत्ता । झाली हे कळले ।।१७।।

सिद्धांना सिद्ध भेटले । खूण दाखविण्यासी आले ।
खूण कळताचि अदृष्य झाले । निमिषमात्रे ।।१८।।

संतास संत ओळखती। आपुली तेथे काय गती ।
साधनेची होय परिणती । हेच खरे ।।१९।।

दादा एकदा पडवीत । होते विश्रांती घेत ।
ब्राह्ममुहूर्त वेळ प्रशांत । समोर काय दिसले ।।२०।।

बाहेर छपरावरी । विमान घेई भरारी ।
झगझगीत नयन मनोहारी । गरुड नाव त्याचे ।।२१।।

‘गरुड येतो फणत्कारे । ना–भी ना–भी करी त्वरे’ ।
याचा अनुभव पाहिला रे । प्रत्यक्ष दादांनी ।।२२।।

आला एक गणेशोत्सव । मनी पूर्ण भक्तीभाव ।
पाच दिवसांचा उत्सव । असतो केळकरांकडे ।।२३।।

प्रतिष्ठापना गणरायांची । मौज न्यारी वातावरणाची ।
मात्र वेळ येता विसर्जनाची । वाईट वाटे दादांना ।।२४।।

श्रीगणेशासी अतिशय । उकडीचे मोदक प्रिय ।
दाखविला त्यापुढे नैवेद्य । महिमान घडले ।।२५।।

तबकातील वरील मोदक । उकलला एकाएक ।
श्रीगजाननांस प्रसाद निःशंक । पोहोचला खऱ्या अर्थाने ।।२६।।

जसा प्रत्यक्ष पांडुरंग । श्रीनामदेवांसाठी यथासांग ।
नैवेद्य खाई तैसाच प्रसंग । वाटे मज ।।२७।।

दादा अधिकारी पूर्ण । असती श्रेष्ठ वर्तमान ।
म्हणोन वस्तू येती चालोन । संतांचे हातच्या ।।२८।।

चंपूताई सांगलीच्या । शिष्या गोंदवलेकर महाराजांच्या ।
चिपळ्या सद्गुरुंचे हातच्या । होत्या त्यांचे घरी ।।२९।।

त्यांचे अंतरी झाले स्फुरण । चिपळ्या दास्तानी कराव्या स्वाधीन ।
जेथे आस्था मनापासून । महाराजांविषयी ।।३०।।

गोंदवलेकरमहाराजांचा । संबंध केळकरांशी पूर्वीपासोनचा ।
दादांच्या आजीस त्यांचा । अनुग्रह होता ।।३१।।

मामाही होते लहान फार । तेंव्हा गेले बुधगाव स्टेशनवर ।
भेटण्याची ओढ फार । महाराजांसी ।।३२।।



मामा भेटले महाराजांना । आनंद झाला उभयतांना ।
अश्रू नयनातून थांबती ना । दर्शन घेतल्यावरी ।।३३।।

भेटता ब्रह्मचैतन्य माऊली । वाटले जन्मदात्री आईच भेटली ।
कमरेस मिठी मारली । तिच्या बाळाने ।।३४।।

आशीर्वाद महाराजांचा । पाठीवरी हात वात्सल्याचा ।
लाभ वचन श्रवणाचा । भाषा बाळबोध ।।३५।।

छंद असावा रामदर्शनाचा । तीर्थ अंगारा रामाचा ।
घेऊन पाठ अध्ययनाचा । करीत जावा ।।३६।।

हा महासाधू होईल । ऐसे उत्स्फूर्त बोल ।
मुखातून आले तात्काळ । महाराजांच्या ।।३७।।

अशी दोन पिढीतील जोड । रहावी पुढेही अखंड ।
म्हणोन महाराज करिती निवड । चंपूताईंची ।।३८।।

महाराजांनी स्फुरविले । चंपूताईंनी पाऊल उचलले ।
दादांचे मंदिर गाठले । ताबडतोब ।।३९।।

महाराजांच्या चिपळ्या घेवोन । मंदिरी येता समाधान ।
तव दादा सुहास्यवदन । पाहती बसलेले ।।४०।।

दादा त्यांना विचारिती । चिपळ्या कोणाच्या तुमच्या हाती ।
चंपूताई विनयाने बोलती । सूचकतेने ।।४१।।

त्या म्हणाल्या आपण सर्व । जाणता नेहमी सदैव ।
अंतर्ज्ञानाने आपणा ठाव । लागतो प्रत्येक गोष्टीचा ।।४२।।

दादांनी स्मितहास्य केले । महाराजांच्या फोटोकडे पाहिले ।
हात करोनी म्हणाले । चंपूताईंना ।।४३।।

हेच ना ते संत । ज्यांच्या चिपळ्या तुमच्या हातात ।
ज्या तुम्ही येथे सुपूर्त । करण्यासी आला ।।४४।।

चंपूताईंना आनंद झाला । तो त्यांनी बहु अनुभवला ।
अनुभवाचे महत्त्व ज्याचे त्याला । असतसे ।।४५।।

त्यावर्षीपासून । चिपळ्यांचे सुरु झाले पूजन ।
सादर सप्रेम आवर्जून । महाराजांचे पुण्यतिथीला ।।४६।।

परांजपे पेण गावचे । भविष्य सांगितले होते त्यांचे ।
जाणार आत एक वर्षाचे । ज्योतिषमजकुरांनी ।।४७।।

त्यांनी गंभीरपणे विचार केला । जावे आता सांगलीला ।
दादांच्या पुण्यनगरीला । भेट देवू ।।४८।।

पवित्र ठिकाणी आपणास । मरण येता होईल विशेष ।
एवढीच आता मनी आस । आहे आपुल्या ।।४९।।

दादांचेकडे आले । भविष्याविषयी सांगितले ।
दादांनी शांतपणे ऐकले । समाजाविती त्यांना ।।५०।।

तुमचा मृत्यू निश्चित । नाही या वर्षात ।
रहावेजी निश्चिंत । वचन विश्वासाचे ।।५१।।

अशक्य ते शक्य होई । शक्य ते अशक्य होई ।
हीच सद्गुरुसामर्थ्याची नवाई । असे या जगी ।।५२।।

तुम्ही आता कोठे न जावे । मंदिरात थांबावे ।
मामांच्या पुण्यतिथीचे कीर्तन ऐकावे । आज्ञा दादांची ।।५३।।

मृत्यूयोग त्यादिवशी निश्चित । होता त्यांचा लिखित ।
यमराज दादांचे परिसरात । कैचा प्रवेशील ।।५४।।



दादांचे परवानगीवाचोन । यम कसा जाईल प्राण घेऊन ।
परांजपे गृहस्थ भाग्यवान । वाचले दादांचेमुळे ।।५५।।

जैसे समर्थांचे महिमान । तैसेचि घडले वर्तमान ।
संतसंगती पावन । आहे खरी ।।५६।।

असे दादा समर्थ । वावरले आपल्यात ।
संतचि संताना ओळखतात । हीच वस्तुस्थिती ।।५७।।

सोन्याची पारख जरी करावी । तरी सराफाची दृष्टी हवी ।
डोळे मोठे असोन ती पदवी । आपणास न मिळे ।।५८।।

एकदा काही मंडळी । आली दादांचे जवळी ।
तुकाराम मंदिराविषयी त्यावेळी । इच्छा केली प्रगट ।।५९।।

दादांच्या आशीर्वादाने । उभारले मंदिर डौलाने ।
बोलाविले दादांना आग्रहाने । मूर्ती स्थापनेसाठी ।।६०।।

श्रीरामरायांच्या हस्ते स्थापना झाली । मंडळी अतीव संतोषली ।
आशीर्वाद पावुनी धन्य झाली । दादांचा ।।६१।।

आता निंबरगीकरमहाराजांचे । महिमान आपण पहायचे ।
वाचता धन्य व्हायचे । आनंद पुनर्प्रत्ययाचा ।।६२।।

एकोणीसशे पंच्याऐंशी सन । शंभर वर्षे झाली पूर्ण ।
निंबरगीकरमहाराजांना देह ठेवून । योग भाग्याचा ।।६३।।

जरी या पुण्यपर्वकाळी । अनेक संतांची होईल नामावली ।
तरी ही योजना आगळी । दादांची मनोकामना ।।६४।।

असे पक्के ठरले । दाविकाकांना बोलावले ।
त्यांना मनीचे सांगितले । आनंदले तेही ।।६५।।

दाविकाकांनी* अभ्यास करून । परिश्रम खुशीने घेऊन ।
नामावली तयार करुन । दादांना दाखविली ।।६६।।

अशी समग्र नामावली । सहस्रसंतांची नावे सामावली ।
शताधिक पंथांची एकमेळी । साधिली या निमित्ताने ।।६७।।

असे हे अद्वैतपीठ । जातीपंथाचा नसे भेद ।
हेच आगळेपण अगाध । श्रीरामनिकेतनाचे ।।६८।।

निंबरगीकरमहाराजांचे पुण्यतिथीला । रंगला अपूर्व सोहळा ।
संतसहस्रनामावली पठणाला । सुरुवात झाली ।।६९।।

दाविकाकांनी पठण केले । अंगणी मंडपात सारे बसले ।
प्रत्येक नामास एक अर्पिले । पुष्प प्रत्येकाने ।।७०।।

यथासांग समारंभ सुंदर । साजरा झाला थोर ।
आनंदले नारीनर । भक्तीरस अनुभवुनी ।।७१।।

एकदा बोलाविले शिरोळात । नाम सप्ताहाची सुरुवात ।
करण्यास दादांना नेत । शिष्य तेली महाराजांचे ।।७२।।

एकाच कोणाच्याही बोलावण्यावर । जाती दादा करुणासागर ।
मन राखणे अवघड फार । हर एकाचे ।।७३।।

डॉ. जोगळेकरांची निष्ठा दादांवर । त्यांची इच्छा होती फार ।
सद्गुरुशक्तीचे सार । सूत्रबद्ध सद्गुरुंनी मांडावे ।।७४।।

भक्ताची इच्छा मान्य केली । ओवी मालिका उत्स्फुर्त गुंफली ।
एकशे आठ ओव्यांची झाली । 'गुरुमहिमा' पुस्तिका ।।७५।।

---

** प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी–श्रीदादांचे शिष्योत्तम*



एकदा दादा असता ध्यानस्थ । दिव्य तेज पसरले मंदिरात ।
महागणपती देव्हाऱ्यात । विराजमान दिसले ।।७६।।

रामाचे ठिकाणी गणपती । अद्वैताचीच ही अनुभूती ।
वारंवार दिसे खूण ती । अद्वैतपीठाची ।।७७।।

आणखी एकदा साधनास । दादा बसले एकांतवास ।
आवाज काहीसा वरील बाजूस । ऐकू आला ।।७८।।

दादांनी वर पाहिले । निंबरगीकरमहाराज दिसले ।
दर्शन देवोनी अंतर्धान पावले । थोरले महाराज ।।७९।।

सर्व महात्मे येथे प्रगट । कोणतीही शंका नाही यात ।
अखंडत्त्वाने उपासना नित्य । चालली म्हणोनी ।।८०।।

एकदा गणेशोत्सवाचे । विसर्जनादि पूजन प्रतिवर्षाचे ।
उत्तरपूजेत गणेशाचे । ध्यान लागले अंतरी ।।८१।।

श्रीगजाननांचे नेत्रांमधुनी । अश्रु आले ओघळुनी ।
पाहिले दादांनाही गहिवरुनी । आले विरहाने ।।८२।।

असे व्हावया निर्मळ मन । तसेच आवश्यक वातावरण ।
चित्तशुद्ध आणि तल्लीन । देवत्त्वाचे ठिकाणी ।।।८३।।

संत म्हणजे शक्ती । संत हीच अनुभूती ।
संतांची सामर्थ्यशक्ती । अचाट असे ।।८४।।

संत देहापासून निराळे । प्रारब्धाचे बळ न चाले ।
निजकार्यात रंगलेले । व्याधी असुनी ।।८५।।

दादांना मूळव्याध झाली । त्याची फिकीरही नाही केली ।
नित्य उपासना अखंडीत चालली । चेहरा आनंदी सर्वदा ।।८६।।

मूळव्याध करी जर्जर । रक्ताने भिजे धोतर ।
तरी कीर्तनाचा गजर । सुरुच असे ॥८७॥

कीर्तन संपल्यावर । जेंव्हा उठती सद्‌गुरुवर ।
पाहता आश्चर्य फार । वाटे सर्वांना ॥८८॥

देहास होतात आजार । देहास होती कष्ट फार ।
जे मुळीच नव्हते देहावर । त्यांना काय याचे ॥८९॥

जेथे जाणीव राहिली नाही । नेणीवेचाही पत्ता नाही ।
तेथे काहीच उरले नाही । आहे एकच ब्रह्म ॥९०॥

याची प्रत्यक्ष साक्ष । देती सद्‌गुरु प्रत्यक्ष ।
आपले तेवढे लक्ष । तेथे नसे ॥९१॥

दादांचा पाय एकदा घसरला । फ्रॅक्चर झाले पायाला ।
तातडीने दवाखाना गाठला । पायास घातले प्लॅस्टर ॥९२॥

जास्त हालचाल न करावी । म्हणोन येथे वसती करावी ।
डॉक्टरांची विनंती ऐकावी । लागली तेथे ॥९३॥

दादा म्हणाले रहातो । एक तुम्हासी विचारतो ।
आमुचा नित्यकीर्तनाचा नेम असतो । तो दवाखान्यात चालले ना ॥९४॥

डॉक्टरही भाविक । करिती दादांचे कौतुक ।
असे नेमनिष्ठ एक । आपणचि दिसता ॥९५॥

त्या निमित्ताने या वास्तूत । उपासना होता आनंद ।
भाग्य म्हणुनी संतसंगत । लाभली आम्हा ॥९६॥

दादा म्हणाले त्यांना । दवाखान्याचे नाव भक्ती क्लिनीक ना ।
तुमच्या मनी आदर भावना । देवाविषयी ॥९७॥



कीर्तन नेम झाल्यानंतर । कधी वाटली साखर ।
कधी बिस्किट हातावर । प्रसाद म्हणुनी ॥९८॥

असे प्रेम कीर्तनावरी । पहाण्यास न मिळे चराचरी ।
कोटणीसमहाराजांची कृपा घराण्यावरी । कारण याचे ॥९९॥

काही दिवसांनी घरी आणले । दादांना बेडवरी झोपविले ।
आण्णांनी आता ठरविले । पडवीतचि करु कीर्तन ॥१००॥

दादांची पाहून अवस्था । आण्णा करिती व्यवस्था ।
अंतःकरणाची कोमलता । वेगळीच असे ॥१०१॥

कॉट सोयींनीयुक्त असलेली । जोशीकाकांनी* पाठविली ।
निष्ठा न बोलता दिसली । श्रीदादांवरची ॥१०२॥

पडवी असो वा मंदिर । कीर्तनाचा तोच गजर ।
सुखकंद मिळे विसर । सर्व परिस्थितीचा ॥१०३॥

वेळ येता प्लॅस्टर काढले । मंदिरात कीर्तन सुरु झाले ।
कैवल्यधामातही कीर्तन झाले । प्रतिवर्षाप्रमाणे ॥१०४॥

काही दिवसांनंतर । पायाची पुन्हा झाली तक्रार ।
चालणे अवघड झाले फार । भेट घेतली डॉक्टरांची ॥१०५॥

डॉक्टरांनी तपासल्यावर । सांगितले प्लॅस्टर घालावे लागणार ।
हाड नाही बसले जाग्यावर । नाईलाज आहे ॥१०६॥

मोडक डॉक्टरांचे म्हणणेनुसार । दादांना घातले प्लॅस्टर ।
विशेष काळजीने उपचार । केले त्यांनी ॥१०७॥

** श्री.अशोककाका जोशी –*
*प.पू.श्रीदिगंबरदासमहाराजांचे शिष्य,पुणे*

त्या हॉस्पिटलमध्येही कीर्तन । साधिला अखंड नेम ।
कीर्तन म्हणजे जीव की प्राण । पुन्हा कळले ।।१०८।।

काही पुढे गेला काळ । आला आणखी व्यत्यय ।
मोतीबिंदूमुळे गैरसोय । झाली पहाणेची ।।१०९।।

परांजपे डॉक्टर तज्ञ । करिती शस्त्रक्रिया लक्ष देऊन ।
मोतीबिंदू दूर सारून । अडसर काढला ।।११०।।

दादांना आनंद झाला । हॉस्पिटलवर श्लोक केला ।
'नयनतारा' चा अर्थ गुंफला । दिव्य प्रतिभाशक्ती ।।१११।।

असा महात्मा जेथे राहिला । तो परिसरचि बदलुन गेला ।
भक्तीमय शांत जाणवला । तेथे उपस्थितांसी ।।११२।।

ऑपरेशन जरी झाले । तरी कीर्तन अखंड चालले ।
नेमावरी सदैव ठेविले । लक्ष परोपरी ।।११३।।

दादांचे हॉस्पिटलमध्ये कीर्तन । आण्णा घरी करिती कीर्तन ।
मौज वेगळीच अडचण असुन । ही विशेषता ।।११४।।

तपासणी केली डोळ्यांची । काळजी काय घ्यायची ।
सांगून घरी जाण्याची । परवानगी दिली डॉक्टरांनी ।।११५।।

काही दिवस अखेर । परिणाम होवू नये डोळ्यावर ।
म्हणोन भक्त खोलीबाहेर । राहून दर्शन घेती ।।११६।।

दर्शन ते दर्शन । त्यास अंतराचे न परिमाण ।
सद्गुरु हृदयी वसोन । समाधान देती ।।११७।।

पुढे परत काही दिवसांनी । एक प्रसंग गेला घडोनी ।
शांत तरीही मनोमनी । खरे संत ।।११८।।



दादा कॉटवरुन पडले । खांद्याचे हाड दुखावले ।
तात्काळ मोडक डॉक्टरांकडे नेले । झाली तपासणी ।।११९।।

अशा ठिकाणचे फ्रॅक्चर । प्लॅस्टर कैसे घालणार ।
पट्टा बांधून सांगती डॉक्टर । जपून रहावे ।।१२०।।

कोणतीही येवो अडचण । अनुदिन न चुकता कीर्तन ।
आधार कोणाचातरी घेऊन । मंदिरात जाती ।।१२१।।

सर्व त्रास बाजूस ठेवावा। उपासनेचा ठेका चालवावा ।
मुख्य गौण याचा करावा । विचार नेहमी ।।१२२।।

आजार यातना देहाशी निगडीत । परमार्थ आत्म्याशी संबंधित ।
साधावे आपुले निजहित । गुरुपदी अनुसंधान ठेवुनी ।।१२३।।

हे स्वतः संतांनीं साधले । आचरुन दाखविण्यासाठी अवतरले ।
संतांचे संगतीत अनुभवले । त्यासीच म्हणावे श्रेष्ठ ।।१२४।।

गुरुपदाशी तादात्म्य होता । साधते कल्याण सर्वथा ।
सद्गुरुंचे स्मरण सदासर्वदा । आपणासी पाहिजे ।।१२५।।

इति श्रीदासरामचरित्र । गुरुचरणीची गंगा पवित्र ।
दीन अर्पितो तुलसीपत्र ।
पारमार्थिक अधिकार वर्णननाम सप्तमोध्याय ।।७।।

*****

।। श्रीराम ।।

## अध्याय-(८) - प्रचिती साक्ष वर्णन

जरी दादा ब्रह्मरुप । आपणास न दिसले ते रुप ।
होतो बराच काळ समीप । तरीही ।।१।।

प्रचिती साक्ष काही दिधल्या । त्यातील काही जरी पाहिल्या ।
त्यावरुन आपल्याला । लक्षात येईल ।।२।।

अनेकांना अनेक अनुभव । जैसा जैसा ज्याचा भाव ।
प्रसंगानुरूप वेगळी जाणीव । तत्त्व सारखे सर्व ठिकाणी ।।३।।

प्रेमाचे बीज पेरले । अमर्याद क्षेत्र फोफावले ।
सामान्य अशिक्षितासही वाटले । दादा माझे ।।४।।

सूचक बोल संतांचे । लक्ष पाहिजे आमुचे ।
म्हणजे अर्थ त्याचे । उमगतील ।।५।।

दादा असता सगुण । ऐकू शकत होतो भाषण ।
आता त्या संतांची आठवण । पुन्हा पुन्हा करत रहावे ।।६।।

प्रचितीस देहाचे न बंधन । जरी झालेसे निर्याण ।
केंव्हाही कोठेही संकेत देवून । दादा मार्ग दाखविती ।।७।।

हेच वैशिष्ट्य संतांचे । अवतारी सिद्धपुरुषांचे ।
कर्म फेरे अजाण मानवाचे । चुकावे ही तळमळ ।।८।।

कोणाचे दुखणे बरे झाले । कोणाचे संकट दूर झाले ।
कोणास अध्यात्माचे अनुभव आले । सद्‌गुरुकृपेने ।।९।।

कोणताही नाही चमत्कार । केवळ सद्‌गुरुंचा आधार ।
मग जगणे होते सुकर । ना चिंता ।।१०।।



म्हणोनीच धरावी सोय । सद्‌गुरुकृपेवीण नाही तरणोपाय ।
आचार विचार जपता भय । नाही मायेचे ।।११।।

शरदकाका आपटे एकदा । पाहोन आपुल्यावरील आपदा ।
धावोनी आले दादांपुढता । अडचण आपुली सांगितली ।।१२।।

दादा म्हणाले त्यांना । न घाबरावे संकटांना ।
येतात तशीच जातात पहा ना । आपण स्थितप्रज्ञ रहावे ।।१३।।

केळे प्रसाद दिले हातावर । ठेव हे जवळ जरुर ।
यातून होशील परपार । दादा म्हणाले ।।१४।।

निष्ठा शरदकाकांची । साक्ष सद्‌गुरुवचनाची ।
संकट गेले दूर त्याची । काळजी न वाटली ।।१५।।

अशी खूण दादांची । आपणा कळे कैची ।
ज्यांना संगती घडली दादांची । ती मंडळी धन्य ।।१६।।

मायदेवकाका* दादांच्या मर्जीतले । मॅट्रिकपूर्व परिक्षेत अनुत्तीर्ण झाले।
चिंतातूर होऊन आले । मॅट्रिकचा फॉर्म नाकारल्याने ।।१७।।

दादा लगोलग त्यांच्याबरोबर । गेले हेडमास्तरांसमोर ।
फॉर्म देण्यास सत्त्वर । विनंती केली ।।१८।।

त्यावर बोलले हेडमास्तर । पूर्वपरिक्षा अनुत्तीर्ण झाल्यावर ।
आम्हासी नाही अधिकार । फॉर्म देण्याचा ।।१९।।

दादांनी पुन्हा विनंती केली । मी याची जबाबदारी घेतली ।
म्हणोन फीही पुढे केली । द्यावा फॉर्म याला ।।२०।।

---

** श्री शशिकांत ग. मायदेव-श्रीदादांचे शिष्य*

दादांच्या शब्दाखातर । फॉर्म देण्यास झाले तयार ।
सहस्रबुद्धेसर हेडमास्तर । विद्यार्थी आनंदला ।।२१।।

दादांनी फी भरली । मायदेवकाकांची सोय झाली ।
दादा हीच सावली । दादा हेच माता-पिता ।।२२।।

परिक्षेसाठी कष्ट घेतले । मॅट्रिक परिक्षा उत्तीर्ण झाले ।
बी.ए.,एम.ए.पर्यंत शिकले । जेलरचा मान पोलीस खात्यात ।।२३।।

दादांचे अंतरंगात । अवघड होणे प्रविष्ट ।
दादा अधिकारी बहुत । दृष्टी आमुची सामान्य ।।२४।।

ज्ञानदृष्टी व्हावी प्राप्त । तरीच कळेल ही मात ।
साधक नित्य अनुसंधानात । असेल जरी ।।२५।।

सद्गुरुंकडे व्यक्ती म्हणुनी । पाहत आलो आम्ही अजुनी ।
नियम व्यवहाराचे लावुनी । चुकतो आम्ही ।।२६।।

संसार नाशिवंत गोष्टी । सद्गुरु अवतरले सुख देण्यासाठी ।
जे अविनाशी घडवी भेटी । जगन्नायकाची ।।२७।।

दृष्य जड नाशीवंत । चैतन्य अविनाशी दृष्यातीत ।
भास आभासरहीत । नि:खळ परब्रह्म ते ।।२८।।

शब्दज्ञान तोकडे । सद्गुरुतत्व सर्वापलीकडे ।
शब्द नि:शब्द ज्यापुढे । रोकडी प्रचीत ।।२९।।

आले एके दिवशी एक गृहस्थ । मनी त्यांच्या काही हेत ।
हात दादांचा घेऊन हातात । सुवर्ण अंगठी बोटात घातली ।।३०।।

दादा थांबले क्षणभर । अंगठी काढली सत्त्वर ।
ठेवून त्यांच्या हातावर । म्हणाले राहू दे आपल्याचकडे ।।३१।।



सोने आणि माती । आम्हा समान हे चित्ती ।
याच वचनाची अनुभूती । दाखविली ।।३२।।

एके वर्षी रामनवमीला । भाऊसाहेब ऐनापुरे आले कीर्तनाला ।
कीर्तनोत्तर विषय निघाला । त्यांच्या चर्चेमध्ये ।।३३।।

दादा म्हणाले भाऊसाहेबांस । जपत रहावे सद्गुरुवचनास ।
सहज वाटले ते तुम्हास । मी सांगितले ।।३४।।

तुम्हास सांगितले सद्गुरुंनी । जपत रहावे द्विअक्षरी मंत्र म्हणोनी ।
रामकृष्णहरी या मंत्रात लपोनी । जो राहिला असे ।।३५।।

त्यांना विशेष फार वाटले । दादांना कसे हे कळले ।
दादांच्या माध्यमातून नक्कीच सुचवले । आपुल्या सद्गुरुंनी ।।३६।।

दादांची योग्यता खरी । दिसे त्यांच्या ग्रंथांतरी ।
असाच एक ग्रंथ अवधारी । भावार्थ नमन ।।३७।।

किसनराव भिडे यांनी । हा ग्रंथ प्रकाशोनी ।
सेवा साधिली मनापासुनी । संतवाङ्मयाची ।।३८।।

मामा-दादांवर । निष्ठा त्यांची जबर ।
याचे कारण कळणार । या प्रसंगातुनी ।।३९।।

ते एकदा आजारी । पडले ताप होता भारी ।
निपचित अंथरुणावरी । ग्लानीत झोपले ।।४०।।

मनाची उभारी संपली । घालमेल अंतरी चालली ।
यात्रा जीवनाची संपली । असे विचार मनात ।।४१।।

त्यांचे दोस्त शेजारचे । बाळासाहेब गोखले नाव त्यांचे ।
धीर देण्या जायचे । गप्पा गोष्टी करणेसी ।।४२।।

मामांचे गोष्टी सांगून । रिझवले त्यांचे मन ।
ऐकता ऐकता तल्लीन । महिमान मामांचे ।।४३।।

किसनरावांना रहावेना । म्हणाले मामांचा फोटो आण ना ।
ऐशा अवतारी संतांना । पाहीन डोळे भरुनी ।।४४।।

शांतवदन पाहत मामांचे । झाले मन शांत त्यांचे ।
विचारचक्र शमविण्याचे । बळ आहे संतदर्शनात ।।४५।।

अश्रू ओघळले नेत्रातून । मिटले पुन्हा लोचन ।
वाचवा मामा मला यातुन । प्रार्थना केली ।।४६।।

फोटो उशाशी ठेवला । नमस्काराचा क्रम चालला ।
काही काळानंतर उगवला । दिवस आनंदाचा ।।४७।।

किसनराव बरे झाले । इतक्यातुनही बाहेर पडले ।
हिंडू फिरु लागले । पूर्वीप्रमाणे ।।४८।।

संतदर्शन ते दर्शन । केले भावभक्तीने जरी नमन ।
करिताती संकटविमोचन । करुणाघन दयाळ ।।४९।।

मामांची काही सेवा घडावी । चरणी दृढ निष्ठा रहावी ।
उतराई काही अंशी व्हावी । अशी इच्छा ।।५०।।

किसनरावांची झाली इच्छा पूर्ण । गोविंदस्मृतीचे झाले प्रकाशन ।
मिळाले अंतरी समाधान । मामांच्या भक्ताला ।।५१।।

ह्या किसनरावांचे । भविष्य खरे व्हायचे ।
स्मरण करूनी मामा-दादांचे । सांगायचे भविष्य ।।५२।।

मोठया मोठ्या व्यक्ती यायच्या । अडचणीवरी मार्ग विचारायच्या ।
सांगतील ते ऐकायच्या । अशी श्रद्धा त्यांचेवरी ।।५३।।



केळकरमहाराजांचे मंदिरात । शनीची प्रतिमा देव्हाऱ्यात ।
जाऊन नाक घासा तेथ । साष्टांग प्रणिपात घालावा ।।५४।।

नाक घासता की नाही । हे पहाण्यास स्वत: सर्वदाही ।
उपस्थित राहती किसनरावही । समक्ष त्यांचेबरोबर ।।५५।।

नाही विघ्न साडेसातीचे । केंव्हाही कवच गुरुकृपेचे ।
आहे खरे महत्त्वाचे । हे पटते यावरुनी ।।५६।।

असो प्रत भावार्थ नमनाची । शंकरमामांकडे* पाठविण्याची ।
इच्छा असे दादांची । बोलाविले कुंभोजकरांना ।।५७।।

नारायणराव कुंभोजकरांनी । शंकरमामांना पुस्तक दिले नेऊनी ।
भंडाराप्रसाद शंकरमामांनी । दिला दादांसाठी ।।५८।।

भंडाराप्रसाद घेऊन निघाले । वाटेत सहज लक्ष गेले ।
भंडाऱ्यात पावलीचे नाणे दिसले । रुपयाची नोटही ।।५९।।

काय हा प्रकार कळेना । परत येऊन विचारले शंकरमामांना ।
ते म्हणाले ही सिद्धांचीच योजना । केवळ भंडाराच मी दिला ।।६०।।

सव्वा रुपयाचा प्रसाद । देती श्रीहालसिद्धनाथ ।
सर्व संप्रदायाचे कृपाछत्र । सदैव अधिकारी सत्पुरुषांवरी ।।६१।।

एक गृहस्थ भागवत नावाचे । शिष्य श्रीस्वरुपानंदस्वामींचे ।
आले ऐकावया कीर्तन दादांचे । उत्सुकता मोठी ।।६२।।

दादांना भेटून । सोऽहं विषयीचे शंका निरसन ।
करुन घ्यावे विचारुन । असा मानस ।।६३।।

---

** श्री. शंकरमामा शिपूरकर*

कीर्तन ऐकण्यास बसले । कीर्तन रंगू लागले ।
सोऽहंचेच महत्त्व विषद झाले । त्या कीर्तनात ।।६४।।

कीर्तन संपल्यावर । सद्गद होऊन नमस्कार ।
केला भारावून फार । गेले भागवत ।।६५।।

दादांनी सस्मित होऊन । विचारले त्यांना उद्देशून ।
झाले का शंकांचे निरसन । भागवत तुमच्या ।।६६।।

अवाक् झाले गृहस्थ । झाले त्यांचे चित्त स्वस्थ ।
संतांचे कळले सामर्थ्य । प्रासंगिकपणे ।।६७।।

कोणतेही कार्य करताना । विचारावे आपुल्या दादांना ।
अशी मनीची भावना । निष्ठाही तशीच ।।६८।।

असेच एक भक्त दादांचे । जाधवसाहेब नाव त्यांचे ।
विचार आपल्या मनीचे । केले व्यक्त ।।६९।।

बरडे विठ्ठल मंदिरात । करावी विठ्ठलमूर्ती प्रतिष्ठित ।
दादांचे निरुपण तेथ । दरवर्षी होत होते ।।७०।।

जाधवसाहेबांनी विचारले । मनीचे हेत व्यक्त केले ।
दादांनी आनंदाने सांगितले । अवश्य मूर्ती द्या म्हणोनी ।।७१।।

त्याप्रमाणे जाधवसाहेबांनी । मूर्ती आणिली पंढरपुराहुनी ।
मंदिरात दिसली शोभुनी । प्रतिष्ठित केली दादांच्या हस्ते ।।७२।।

बरडे विठ्ठल मंदिर पुरातन । दरवर्षी सप्ताहाचे आयोजन ।
कार्यक्रम उत्तम ठेवून । श्रोतृवर्गासी आनंद देती ।।७३।।

बापू मायदेव आजऱ्याचे । मनात आले विहिर काढणेचे ।
घरी येवून दादांचे । सांगितले मनोगत ।।७४।।



दादा म्हणाले सत्त्वर । काही न करता विचार ।
कार्य पाडावे पार । जे तुमच्या मनी असे ।।७५।।

बापू तुमच्या विहिरीस । पाणी लागेल विनासायास ।
त्याप्रमाणे केवळ दहाफुटास । भरपूर पाणी लागले ।।७६।।

पाणी लागले विहिरीसी । गोडी ज्याची साखरेजैसी ।
चिमडचीच आली तापनाशी । दादांनी सांगितले ।।७७।।

शब्द सद्गुरुमुखातले । ते महावाक्यचि ज्यांनी मानले ।
विकल्प मनास न शिवले । तेच खरे शिष्योत्तम ।।७८।।

चिरंजीव शिपूरकरांचे । वैद्य होते कोल्हापूरचे ।
निमित्त होते मिटिंगचे । आले सांगलीत ।।७९।।

मिटिंग संपवून । कोल्हापूरकडे केले प्रस्थान ।
स्टँडपर्यंत गाडी येवून । अचानक बंद पडली ।।८०।।

बराच वेळ प्रयत्न केला । यश न आले प्रयत्नाला ।
जाणवले काही आपल्याला । ऐकू येते ।।८१।।

आता परत फिरावे । कीर्तन ऐकण्यास जावे ।
मोटार फिरवून पहावे । श्रीरामनिकेतनाकडे ।।८२।।

ते होते निष्ठावंत । मोटार फिरवली परत ।
गाडी सुरु झाली क्षणात । किती आश्चर्य करावे ।।८३।।

अधिकार अलौकिक दादांचा । ठाव घेई मनीचा ।
अनुभव त्यांच्या अलौकिकतेचा । आल्यावरी ।।८४।।

अनुभवाचे बळ । आहे अवर्णनीय केवळ ।
गुरुकृपेची कळता कळ । मग आनंद स्वर्गीचा ।।८५।।

कित्येक अनुभव कित्येकांना । आले असतील पहा ना ।
सर्व प्रत्ययांची गणना । उल्लेखही अशक्य ।।८६।।

दादांचे भक्त अगणित । प्रत्येकाची आठवण संग्रहित ।
करणे वा मांडणेही येथ । माझ्या आवाक्याबाहेरचे ।।८७।।

प्रत्येक प्रचिती श्रेष्ठ । नित्य सर्वथा स्पष्ट ।
सद्गुरुतत्त्व वर्णनातीत । ही वस्तुस्थिती ।।८८।।

कार्लेकर डॉक्टर प्रज्ञावंत । होते तसेच निष्ठावंत ।
काही वेळा तपासणी करीत । दादांच्या प्रकृतीची ।।८९।।

एके दिवशी तपासत । असता ध्वनी अवचित ।
ऐकुनी झाले विस्मित । कार्लेकर डॉक्टर ।।९०।।

तो ध्वनी सोऽहं चा । अंदाज आला अवस्थेचा ।
चैतन्य तत्त्व तद्रुपतेचा । देहभावाचा विसर ।।९१।।

त्यांनी दादांना विचारले । गमक सांगा यातले ।
सोऽहं स्पष्ट ऐकले । आपुल्या अंतरंगामधुनी ।।९२।।

दादा म्हणाले रामकर्ता। मनुष्य केवळ अकर्ता ।
एवढेच बोलोनी गुप्तता । दादांनी राखिली ।।९३।।

सोऽहं देही अखंडीत । जीवत्त्व प्रत्येक जीवात ।
देहभाव संपुष्टात । प्रत्यय सोऽहंभावाचा ।।९४।।

दादांची सेवा ज्यांनी केली । त्यांनी विशेषता अनुभवली ।
काही अंशी झलक दाखविली । ब्रह्मरुप असल्याची ।।९५।।

पादसेवा करीत असताना । कधी मऊ लागले पाय हाताना ।
कधी लागले कठीण चेपताना । अनुभव अनेकांचा ।।९६।।



शरीरावर संपूर्ण । नव्हता ओरखडा किंवा व्रण ।
वयानुरूप सुरकुतलेपण । देखील फार नाही दिसले ।।९७।।

सतेज सुनील नितळ कांती । चैतन्यप्रभा चेहऱ्यावरती ।
सुहास्यवदन गौरमूर्ती । लोचनी परब्रह्म चमके ।।९८।।

अशी ब्रह्मरुप मूर्ती । ब्रह्मचि साकार आपुल्यापुढती ।
परी महानता न कळली ती । या स्वरुपाची ।।९९।।

याचा आणखी प्रत्यय । किती दयाळू सद्गुरुमाय ।
सहज लाभला तरणोपाय । आपल्यासारख्यांना ।।१००।।

श्री मुरलीधर मानेसाहेबांचे घरी । दादांना बोलाविले निष्ठा अंतरी ।
स्वागताची उत्तम तयारी । केली होती ।।१०१।।

नारळीपौर्णिमा पावन दिन । एकोणीसशे सत्याऐंशी सन ।
करण्या पाद्यपूजन । राजाधिराजांचे ।।१०२।।

गुरुगृहातील आदरणीय । सद्गुरुंसमवेत शिष्य समुदाय ।
श्रीदादांच्या आसनाची सोय । केली खुर्चीवरी ।।१०३।।

घरगुती भावपूर्ण सोहळा । सपत्नीक बैसले पाद्यपूजेला ।
देवपूजनाचाच योग आला । अशाप्रकारे ।।१०४।।

कार्यक्रम झाला यथासांग । कृपाप्राप्तीने रोमांचित अंग ।
सत्य सत्य हाच संतसंग । सद्गुरुदादांचा ।।१०५।।

पाद्यपूजेस पदकमलाखाली । ठेविले जे कापड मखमली ।
पूजा होताच लावून भाळी । जपून ठेविती ।।१०६।।

पुढे काही कारणासाठी । घेतले कापड हाती ।
त्यावरी पाऊले उमटली होती । स्पष्ट दिसली त्यांना ।।१०७।।

काय झाली असेल मन:स्थिती । भारावून गेले असतील किती ।
या आनंदाची गणती । कैसी करता येईल ।।१०८।।

एल. के. काकांना* घेवून । आले दादांकडे धावून ।
धरिले पुन्हा श्रीचरण । अश्रुंचा अभिषेक पदकमलांवरी ।।१०९।।

वस्तुस्थिती केली कथन । दादांचे सहज आचरण ।
म्हणाले आले आपणहून । निंबरगीकरमहाराज आपल्या घरी ।।११०।।

ही खूण जपून ठेवावी । तुमच्या भाग्याची परी काय वर्णावी ।
सद्गुरुकृपेची थोरवी । अगम्य अतर्क्य ।।१११।।

श्रीमानेसाहेबांनी* त्या कापडास । फ्रेम करुन घेतली खास ।
दरवर्षी नारळीपौर्णिमेस । होतो वाढदिवस साजरा ।।११२।।

हा खरा वाढदिवस । पारावार न आनंदास ।
वृद्धिंगत निष्ठा दिवसेंदिवस । जाण्यास सद्गुरुंचेजवळी ।।११३।।

अशीच हुबेहुब घटना घडली । एल.के.काकांघरी पाद्यपूजेच्या वेळी ।
निष्ठा सद्गुरुंवरची दिसली । स्पष्ट सर्वांना ।।११४।।

प्रत्येक पाद्यपूजेच्या आधी । दादा नेहमीच सांगती ।
ही पूजा दासरामाची नसून ती । आहे निंबरगीकरमहाराजांची ।।११५।।

अनेक शिष्य-भक्तांनी । श्रीदादांची पाद्यपूजा करोनी ।
पादसेवन भक्ती आचरुनी । सेवालाभ मेळविला ।।११६।।

काही भक्तांनी याहीवरी । सद्गुरुपादुका स्थापिल्या घरी ।
पादुकारुपाने श्रीदादाचि घरी । चिरंतन राहिले ।।११७।।

** श्री. एल. के. कुलकर्णी - श्रीदादांचे नि:स्सिम भक्त*
** श्रीदादांचे शिष्य*



बोले तैसा चाले । नव्हे चाले तैसा बोले ।
म्हणूनीच त्यांची वंदावी पाऊले । पुन:पुन्हा ।।११८।।

हेच ओळखून सत्य । मनीचा सांगितला हेत ।
खामकरबाईंनी येवून प्रत्यक्ष । श्रीदासराममहाराजांना ।।११९।।

माझिया मनीची । आहे इच्छा कधीपासूनची ।
श्रीज्ञानेश्वरमंदिर उभारणेची । फार ओढ असे ।।१२०।।

दादांनी सांगितले आनंदाने । होईल तुमच्या मनाप्रमाणे ।
मंदिर डोलेल भक्तीगजराने । श्रीज्ञानेशांच्या ।।१२१।।

होता आशीर्वाद प्राप्त । कार्यास झाली सुरुवात ।
प्रयत्न कष्ट अविश्रांत । उत्साह काय वर्णावा ।।१२२।।

सद्गुरुंचे जेथे अधिष्ठान । तेथ अडचणी जाती विरुन ।
मार्ग मोकळा होऊन । भक्त तृप्त होतो ।।१२३।।

मंदिर उभारणी झाली । मनोकामना पूर्ण झाली ।
श्रीदासराम गुरुमूर्ती आठवली । पदोपदी ।।१२४।।

श्रीज्ञानेशांच्या मूर्तीस्थापनेस । घेऊन गेल्या दादांस ।
भक्ताचा सुप्त मानस । सत्यात आला ।।१२५।।

संतांचे अंतरंग । जाणेल त्याचे उजळे भाग्य ।
आशीर्वाद मिळता मग । काय उणे राहील ।।१२६।।

एक गुरुपौर्णिमेचा पावन दिन । माझे वडिलांना घेतले बोलावून ।
जवळी बैसवोन पाठीवरुन । दादांनी हात फिरवला ।।१२७।।

म्हणाले तुझे चांगले होईल । आशीश देती भक्तवत्सल ।
एक रुपया तात्काळ । दिला प्रसाद हातावरी ।।१२८।।

महाराजांनी आत्ता मला । सांगितले म्हणून प्रसाद दिला ।
अंतरी स्फुरले अनुसरून त्याला । घडली ही गोष्ट ।।१२९।।

माझे आईस दादांनी । अनुग्रह दिला घरी येवोनी ।
कळवळ्याची जाती याहोनी । काय सांगावी ।। १३० ।।

आईची ऐकण्याची शक्ती । काही कारणाने कमी होती ।
परि तिचे पाठी सद्गुरुमूर्ती । समर्थ सर्वदा ।।१३१।।

ती म्हणे जरी मी घरात । एकटी असले तरी निश्चिंत ।
श्रीदादा सोबतीस असतात । स्मरणरूपे ।।१३२।।

ते नेहमी सुचवितात । नेमके मज अंतरात ।
जाऊन बघ दारात । आले कोणीतरी ।।१३३।।

बऱ्याचदा असे घडते । मी जाऊन डोकावते ।
तेंव्हा तेंव्हा दारात दिसते । कोणीतरी आलेले ।।१३४।।

घरी राहूनच अनुदिन । चिन्मय नित्यपाठ पठण ।
श्रीदासबोध ज्ञानेश्वरीही पठण । क्रम चाले अनेकवर्षे ।।१३५।।

मार्गशीर्षमासी गुरुवार । गुरुपुष्यामृत योगावर ।
साधिली जीवनाची अखेर । अहेवपणी ।।१३६।।

एकदा डी. वाय.पाटील कोल्हापूरचे । दर्शनास आले दादांचे ।
दादांना पाहताच त्यांचे । मन संतोषले ।।१३७।।

दादांचे दर्शन घेतले । तेंव्हा साईबाबाच दिसले ।
संतांचे विशालत्त्व प्रत्ययास आले । अनेकी एकत्त्व ।।१३८।।

असेच दादा पडवीत । बसले होते निवांत ।
एक भिक्षेकरी दारात । अवचित आला ।।१३९।।



त्यास सांगितले थांबा म्हणून । धोतरजोडी घरातून मागुन ।
घेतली आणि केली दान । त्या भिक्षेकऱ्याला ।।१४०।।

आदल्यादिवशीच्याच कीर्तनात । सांगितली जी गोष्ट ।
श्रीकोटणीसमहाराजांची बहुश्रुत । रुमाल दिला भिक्षेकऱ्याला ।।१४१।।

कोणताही केंव्हाही किंत । नाही संतांचे मनात ।
सर्वदा सर्वांचे हीत । पाहणे हे ब्रीद त्यांचे ।।१४२।।

मन मोकळे हास्य मोकळे । हृदय प्रसन्नतेने भरले ।
चैतन्याच्या अनुभूतीत रमले । सदैव आनंदी ।।१४३।।

जो जो आला दारासी । किंवा बसला पायाशी ।
तळमळ अध्यात्माविषयी ज्यासी । तसेच अंतरी ओलावा ।।१४४।।

तेथे तेथे बीज पेरले । उपेदश करुनी वृद्धिंगत केले ।
साधनाचे ज्याने संगोपन केले । त्याचे संपले द्वैत ।।१४५।।

तयास म्हणावे श्रेष्ठ । जो गुरुमार्गावरी चालला नीट ।
सद्गुरुस्वरुपाची झाली भेट । तेच देवदर्शन ।।१४६।।

सद्गुरुंना पहाता पहाता । तेच व्हावे आपण आता ।
याऊपरी जीवाची इतिकर्तव्यता । नाहीच वेगळी ।।१४७।।

इति श्रीदासरामचरित्र । गुरुचरणीची गंगा पवित्र ।
दीन अर्पितो तुलसीपत्र ।
प्रचिती साक्ष वर्णननाम अष्टमोध्याय ।।८।।

******

।। श्रीराम ।।

# अध्याय-⑨- पुण्यधाम वर्णन

यत्न बहु नेम साधन । सद्‌गुरुचरणी फलद्रुप संपूर्ण ।
पदी ठेवावा भाव अनन्य । निश्चित पडे लाभ पदरी ।।१।।

नाम म्हणजे पुण्य । अनाम पापाचा संचय ।
मामांचे वचन सूत्रमय । प्रसिद्ध असे ।।२।।

नाम अनुभूतीचे धाम । तेची ते पुण्यधाम ।
मिळतसे सर्वा विश्राम । असे पुण्यक्षेत्र ।।३।।

श्रीरामेश्वर सोमेश्वर कुलदैवत । केळकरांचे कोकणात ।
तशीच काही परंपरागत । स्थाने संप्रदायाची ।।४।।

निंबरगी चिमड हिंचगेरी । निंबाळ उमदी परोपरी ।
परमार्थसूत्रे सारी । महाराजांचे हाती ।।५।।

भेट देता पुण्यधामासी । आनंद होय मानसी ।
काय शब्द वर्णावयासी । स्थानाची महती निश्चित ।।६।।

सकल दैवते स्वगृही प्रगट । असे साधन निघोट ।
साधनसुखाचे घेती घोट । ठायीच एकचित्ते ।।७।।

परी प्रसंगोपात । हरिख भक्तांसही बहुत ।
श्रीदादा पुण्यधाम क्षेत्रात । गेले संप्रदायाच्या ।।८।।

दादा मामांसह साचार । गेले श्रीक्षेत्र करवीर ।
श्रीनिंबरगीकरमहाराजांचे सद्‌गुरुवर । श्रीकाडसिद्धदर्शना ।।९।।

---

** श्रीपंडितराव परचुरे हे श्रीमामांचे शिष्य होते*



मंदिरी प्रवेशता भेटीस । प्रगट श्रीकाडसिद्ध त्यावेळेस ।
सगुणरुपे दर्शन प्रत्यक्ष । दिधले मामा-दादांना ।।१०।।

श्रीकाडसिद्धांनी आशीर्वचन । देताच झाले समाधान ।
दादांना आले गहिवरुन । ऐसा अनुभव ।।११।।

गंगाधररावसिंगाचेही बरोबर । दादा गेले श्रीक्षेत्र करवीर ।
तेंव्हाही दादांचा अधिकार । दिसला असे ।।१२।।

दोघेही बसले ध्यानस्थ । शब्द ऐकू आले अवचित ।
दर्शन देईन साक्षात् । पिंडीमधुनी ।।१३।।

पिंडीचे घेता दर्शन । दादांचे ठायी झाले स्फुरण ।
श्रीकाडसिद्धांची आरती झाली पूर्ण । सुवासही सुटला ।।१४।।

काही क्षण गेले । श्रीकाडसिद्ध दैवत प्रगटले ।
मुखवट्यासह दर्शन घडले । आपुल्या दादांना ।।१५।।

जशी अवस्था तसे ज्ञान । ज्ञान होता होई दर्शन ।
दर्शन होता समाधान । लाभते भक्तासी ।।१६।।

परचुरे* यांचेबरोबर । दादा गेले रेणागिरी स्थानावर ।
आनंद झाला फार । रेवणसिद्ध दर्शनाने ।।१७।।

तेथेही अनुभव आला । अद्‌भुत सुवास सुटला ।
दोघांनाही जाणवला । महिमान सत्संगतीचे ।।१८।।

श्रीदादांचा विवाह झाल्यावर । श्रीमामांचे मनी विचार ।
देवदर्शनास सत्त्वर । गेले पाहिजे ।।१९।।

केळकरांचे कुलेश्वर । कोकणात श्रीरामेश्वर ।
मंत्रपुष्पपठणाचा मान पुर्वापार । जेथे केळकरांचा ।।२०।।

घरातील सर्व मंडळी । निघाली त्या पवित्र स्थळी ।
पोहोचताच कणकवली गावातळी । काय घडले ।।२१।।

पुढे जाण्यासी तेथून । काय करावे वाहन ।
तो लागलीच एक गाडीवान । आला बैलगाडी घेऊनी ।।२२।।

सर्व रस्ता खडबडीत । हादरे बसले बहुत ।
त्रास सहन करीत । आली मंडळी रामेश्वरासी ।।२३।।

श्रीरामेश्वरांचे मंदिर प्रशस्त । वातावरणही प्रशांत ।
घेतले दर्शन, प्रसाद । वेळ सायंकाळची ।।२४।।

कीर्तननेम साधावयासी । मामा उभे कीर्तनासी ।
गावकरी बरेच ऐकण्यासी । येवून बैसले ।।२५।।

श्रीरामेश्वरांसमोर । कीर्तननेमाचा गजर ।
डोलले लहान थोर । सुगम श्रवणाने ।।२६।।

आग्रह धरला गावकऱ्यांनी । उद्या परतावे आज राहुनी ।
ऐकू तुमचे कीर्तन आम्ही । आणखी एक ।।२७।।

नाही म्हणता ऐकेना कोणी । कौल लावला देवास त्यांनी ।
कौल लागला गावकऱ्यांचे बाजुनी । नाईलाज झाला मामांचा ।।२८।।

दुसरे दिवशी सकाळी । कीर्तनासी जमली मंडळी ।
त्यांना तीच दिवाळी । संतवाक्ये कर्णी पडता ।।२९।।

स्मरण करीत कुलदैवतांचे । आठविती क्षण आनंदाचे ।
समाधान अंतरी कायमचे । येथेही असता ।।३०।।

द्विशत सांवत्सारिक सोहळा । घोसरवाडक्षेत्री आयोजिला ।
दादा गेले कीर्तनाला । दिले निमंत्रण म्हणोनी ।।३१।।



आगळे श्रीदादांचे कीर्तन । एकामागोन एक चरण ।
श्रोते क्षण न लागता तल्लीन । शंकरमामाही संतोषले ।।३२।।

शंकरमामांनी कौतुक केले । म्हणती कीर्तन उत्तम झाले ।
अभूतपूर्व शब्दब्रह्म कानी पडले । आज सर्वांच्या ।।३३।।

आणखी एकदा दसऱ्यास । दादा गेले घोसरवाडास ।
विशेष पालखी सोहळ्यास । सन एकोणीसशे सत्तेचाळीस ।।३४।।

दसऱ्यास पालखी निघते । गावप्रदक्षिणा होते ।
गर्दी दुतर्फा बहु होते । देवदर्शनासाठी ।।३५।।

श्रीहालसिद्धनाथ जागृत । विराजमान पालखीत ।
दादाही होते वाट पहात । दर्शनासाठी ।।३६।।

पालखी आली पुढे । मार्ग बदलला आश्चर्य केवढे ।
येवून थांबली दादांचेपुढे । साक्ष अधिकाराची ।।३७।।

गंगा मिळते सागरास । भक्त मिळतो परमात्म्यास ।
येथे देवचि चालून भेटीस । आला दादांचेकडे ।।३८।।

सर्वांनाच आश्चर्य वाटले । थोर भाग्य खरे आपुले ।
साक्षात्कारी संत पाहिले । प्रत्यक्ष आम्ही ।।३९।।

श्रीपंडीतराव परचुरे । निश्चयी गृहस्थ भले ।
त्यांच्या मनाने फार घेतले । मामांना निंबरगीस नेणेचे ।।४०।।

व्यवस्था केली मोटारीची । मनस्वी काळजी सद्गुरुंची ।
जाणोनी मनोधारणा त्यांची । मामांनी होकार दिला ।।४१।।

पावसाचे वातावरण । तरी मोटारी आणून ।
केले यात्रेचे नियोजन । कुशलतेने ।।४२।।

मामा मामी भक्तमंडळी । निघाली संप्रदाय मूळस्थळी ।
ओढे वाहती वाट सगळी । बंद झाली ।।४३।।

थोडे जाऊ मागे परत । मुक्काम करु चडचण गावात ।
निर्णय झाला निश्चित । गाड्या माघारी फिरल्या ।।४४।।

चडचणगावात येवुन । मारुती मंदिरात उतरले सर्वजण ।
मामांनाही हातास धरुन । आणले सावकाश ।।४५।।

प्रवास फार दगदगीचा । शीण आला प्रवासाचा ।
विचार विश्रांती घेण्याचा । हरएकाच्या मनामध्ये ।।४६।।

मामांनी देवास नमस्कार करून । सुरु केले कीर्तन ।
हसतमुखाने करताल धरुन । वंदिले रघुनाथप्रियसाधु ।।४७।।

सामान्य आणि असामान्य । जन आणि संतजन ।
दोघांचे विश्रांतीस्थान । नेहमीच वेगळे ।।४८।।

साधिता नेम कीर्तनाचा । तोचि विसावा मामांचा ।
विसर पडे देहाचा । मग कैचा श्रम ।।४९।।

वाट न पाहता श्रोत्यांची । झांज वाजली कीर्तनाची ।
चुणुक मामांच्या निष्ठेची । दिसे पुन:पुन्हा ।।५०।।

कीर्तनात महिमान घडले । मामांचे भाळी भस्माचे पट्टे उमटले ।
सर्वांना ते स्पष्ट दिसले । एकत्त्व देवभक्ताचे ।।५१।।

मारुतीरायांचे दुर्मिळ मंदिर । शिवलिंग धरिले आहे शिरावर ।
भस्माचे जैसे पट्टे शिवलिंगावर । तैसेच भाळी उमटले ।।५२।।

दुसरे दिवशी सकाळी । मंडळी निंबरगीस निघाली ।
ओढ दर्शनाची लागली । निंबरगीकरमहाराजांच्या ।।५३।।



उतरले निंबरगीस येवून । दर्शन घेता निवले मन ।
समाधीसमोर कीर्तन । झाले मामांचे ।।५४।।

अवघाचि महाराजा । माहित नाही देव दुजा ।
सदैव प्रगट भक्तकाजा । हाती सूत्र धरुनी ।।५५।।

निंबरगीयात्रा झाली संपन्न । परचुरे यांचे लक्ष पूर्ण ।
मामांना आणले जपून । परत सांगलीला ।।५६।।

एकोणीसशे पासष्ठासी । दादा जाती चिमडासी ।
श्रीनारायणमहाराजांना भेटण्यासी । आजारी असल्याने ।।५७।।

श्रीनारायणमहाराज अधिकारी । संत असती साक्षात्कारी ।
मामांचे सद्गुरु निमग्न अंतरी । होते पहुडलेले ।।५८।।

दादांनी त्यांना नमस्कार केला । म्हणती आलो भेटीला ।
आजारी असल्याचे कळताच मला । अस्वस्थ वाटले ।।५९।।

महाराजांनी त्यावेळी । बोलाविले दादांना जवळी ।
देवविला प्रसाद नारळ करतळी । पंडितराव महाराजांकरवी ।।६०।।

पुढे माघ शु. दशमीस । वंदिला साधुदेवालयाचा कळस ।
महाराजे सोडिली देहाची आस । प्राण सोडिले निजसत्तेने ।।६१।।

संत महात्म्यांचा प्रसाद । बरोबरी अमृत आशीर्वाद ।
संतांमधील सुखसंवाद । शिदोरी अतुल्य असे ।।६२।।

असेच एकदा आप्पाचेवाडीस । गेले दादा सिद्धदर्शनास ।
शिपुरकर गादीचे वारस । शंकरमामा विद्यमान ।।६३।।

शंकरमामांना करिती नमस्कार । भंडारा भक्तांचे हातावर ।
एक भक्त आपुल्या समस्येवर । विचारी उपाय ।।६४।।

स्वारी बोलली त्यावेळेस । आपण जावे सांगलीस ।
रामरायांच्या दर्शनास । होईल संकटमोचन आपुले ।।६५।।

चिमडसंप्रदायातील अधिकारी । संत थोर साक्षात्कारी ।
रामराय केळकर खरोखरी । स्पष्ट सांगतो ।।६६।।

अशी सर्वासमक्ष । दिली अधिकाराची साक्ष ।
ब्रह्मचि वावरले प्रत्यक्ष । पाहिले आम्ही ।।६७।।

आणखी एकदा आप्पाचेवाडीला । काय चमत्कार झाला ।
हालसिद्धनाथांनी परमभक्ताला । पुनीत केले ।।६८।।

प्रथम भंडारा लावणेचा । मान होता शंकरमामांचा ।
परी दादांनाच कैचा । प्रथम भंडारा लागला ।।६९।।

सर्व आश्चर्यचकित झाले । म्हणती हे नवल वर्तले ।
तो शंकरमामा काय बोलले । ते ऐका ।।७०।।

झाले तेच बरोबर । रामभाऊंचा अधिकार थोर ।
पहिला मान खरोखर । त्यांचाच या दरबारी ।।७१।।

दादांच्या असामान्यत्त्वाला । शिक्कामोर्तब झाले या समयाला ।
अनेकजण साक्षीला । होते त्यावेळी ।।७२।।

आणखी प्रसंग अद्‌भुत । घडला हालसिद्धांच्या घुमटीत ।
काही शिष्यही समवेत । होते दादांचे ।।७३।।

दादांनी नमस्कार केला । तेवेळी सुगंध पसरला ।
सर्वांनी तो अनुभवला । लाभ सद्‌गुरुसंगतीचा ।।७४।।

दादा बाहेर येताक्षणी । सुवास विरला तत्क्षणी ।
आत जाऊन कोणी । पाहिले येतो का सुवास ।।७५।।



हा चमत्कार कोणामुळे । हे प्रत्येकास समजले ।
असामान्यत्त्व संतांचे दाखविले । प्रत्यक्ष देवांनी ।।७६।।

संतांचा कळण्यास अधिकार । देव घडवतो चमत्कार ।
नातरी संतांसी आवड फार । साक्षात्काराची ।।७७।।

सर्व चमत्कारांपलीकडे । संत जीवशिवापलीकडे ।
म्हणोनीच प्रसिद्धीचेही वावडे । साक्षात्कारी सत्पुरुषांसी ।।७८।।

एकोणीसशे ऐंशी एक्यांशी साली । निंबरगीयात्रा घडली ।
दोन एस. टी.भरुन भक्त मंडळी । निघाली जयजयकारात ।।७९।।

साक्षात्कारी संतांचे बरोबर । यात्रेचे महत्त्व फार ।
म्हणोन लगबगीने तत्पर । निघाले भक्तगण ।।८०।।

सत्ता मत्ता नव्हे भाग्य । पैसा आडका नव्हे भाग्य ।
संतकृपा हेच खरे भाग्य । या कराल कलीयुगी ।।८१।।

समाधीचे घेतले दर्शन । केले साष्टांग नमन ।
सुरु झाले कीर्तन । सभामंडपात ।।८२।।

आरती सद्‌गुरुमाहेराची । सुखसहित दु:खरहित अवस्था जीवाची।
पाहू जाता महती समर्थांची । बहु उपकार त्यांचे ।।८३।।

या सर्व कार्यक्रमास । लागले दीड दोन तास ।
तहानभूकही नाठवे यास । काय म्हणावे।।८४।।

श्रीभीमरायांचे दर्शन । मंदिर प्रशस्त पुरातन ।
एक पंगतीने भोजन । केले सर्वांनी ।।८५।।

बरवे समाधान अंतरी। समाधानी हरएक आपल्यापरी ।
यात्रा संपन्न होवून घरी । सुखे परतले ।।८६।।

आता एक खास घटना । संतांच्या पाहू खुणा ।
संतसाधुंच्या पाऊलखुणा । न्याहाळीत जावे पुढे ।।८७।।

चिमडच्या माईसाहेबांनी । देह ठेवल्यावर काही वर्षांनी ।
समाधी बांधणेचे योजुनी । गंगाधरसिंग पुढे झाले ।।८८।।

चिमडमठाची परवानगी घेतली । सुंदर समाधी बांधली ।
गंगाधरसिंगांनी साधली । संधी सेवेची ।।८९।।

कार्यक्रम समाधीस्थापनेचा । प्रत्यय गुरुनिष्ठेचा ।
सोहळा असा महत्त्वाचा । दादाही उपस्थित राहिले ।।९०।।

नुरे देहभाव नुरे काम । आधी व्याधी झाली सम ।
समत्त्वाचे सुख परम । तीच समाधी हरीची ।।९१।।

अशा समाधी सुखात । संत रहाती निवांत ।
म्हणोनीच सर्वभावे शरणागत । व्हावे संत समाधीवरी ।।९२।।

दादा बापूसाहेब चाफळकरांबरोबर । गेले जेथ श्रीदत्तप्रभुवर ।
कृष्णा पंचगंगा संगम मनोहर । वास श्रीनृसिंहसरस्वतींचा ।।९३।।

दत्त परंपरेतील । संत श्रीम्हादबा पाटील ।
त्यांना प्रिय वाडीचे स्थळ । प्राणाहुनी ।।९४।।

विदेही अवस्था असामान्य । धोतर सदरा कोट परिधान।
करोन फेटाही बांधून । हाती काठी घेती ।।९५।।

अनेक ठिकाणी संचार । बोलणे कमी असे फार ।
पाहोन त्यांची लहर । वर्तावे लागे ।।९६।।

आमचे भिडे वाड्यात । चक्रदेव कुटुंब भाड्याने रहात ।
दर पौर्णिमेसी वाडीत । असती न चुकता ।।९७।।



त्यांचेही घरी सांगलीत । वरचेवर पाटीलबुवा येत ।
येताचि आम्हीही तेथ । जात असू दर्शनासी ।।९८।।

श्रीरामनिकेतनीही अनेकदा । येता आनंदी होती दादा ।
वाडीतही कीर्तन होता । मौज वाटे दरवर्षी ।।९९।।

एकदा झाले दादांचे कीर्तन । पाटीलबुवांनी मनापासून ।
कौतुक केले प्रल्हाद म्हणुन । दादांना संबोधले ।।१००।।

अशाप्रकारे आपण । पाहिले पुण्यधाम वर्णन ।
चराचरी वेगळेपण । आहे या पावनक्षेत्रांचे ।।१०१।।

इति श्रीदासरामचरित्र । गुरुचरणीची गंगा पवित्र ।
दीन अर्पितो तुलसीपत्र ।
पुण्यधाम वर्णननाम नवमोध्याय ।।९।।

*****

।। श्रीराम ।।

# अध्याय-(१०)- राजयोग वर्णन

जरी केले देहधारण । ते केवळ कार्याचे साधन ।
देही असून विदेहपण । वैशिष्ट्य दादांचे ।।१।।

संत अधिकारी कैचे । हे आपणा न कळायचे ।
संत होऊनीच पहायचे । त्यासाठी ।।२।।

नातरी नतमस्तक व्हावे । संत देव हेचि स्वभावे ।
अखंड समाधानी रहावे । संताचिये पायी ।।३।।

श्रीदादांचे सोहळे झाले । खरे राजयोगी शोभले ।
परि सहज सामान्यांप्रमाणे वावरले । संपूर्ण अवतारी ।।४।।

आता दादांच्या राजयोगाचे वर्णन । म्हणजे चरित्राचे सुवर्णपान ।
दादांचे सोहळे पाहून । आपण धन्य होवू ।।५।।

खरा राजयोग दादांचा । नसे भाग लौकिकाचा ।
आहे अंतरी संबंध याचा । असा राजयोग ।।६।।

एकोणीसशे ऐंशी साली । साठ वर्षे पुरी झाली ।
तयारी सुरु झाली । केळकरांचे घरी ।।७।।

श्रीआण्णांचे नियोजन । आखिती कमालीचे कार्यक्रम ।
निष्ठा प्रेम दादांवरी म्हणोन । असा सोहळा ।।८।।

'श्रीदासरामगौरवग्रंथ' । घडवी दादांचे दर्शन यथार्थ ।
श्रीदादांच्या गौरवाप्रित्यर्थ । प्रकाशित झाला ।।९।।

मंगलसमयी प्रात:काळी । होमहवन पर्वकाळी ।
साधक भक्त मंडळी । जमली बहुसंख्येने ।।१०।।



सायंकाळी अनेक वक्ते । वाक्पुष्प उधळित होते ।
ते नक्कीच प्रतीक होते । सद्‌गुरुप्रेमाचे ।।११।।

वातावरण भावपूर्ण । नित्याचे नामसंकीर्तन ।
चेहऱ्यावरी तेज अनुपम । साधनाचे ।।१२।।

दादा सूचक बोलले । साठी कशासाठी वर्णिले ।
देहाचेच अस्तित्त्व नाही भले । तेथे साठीशांत काय ।।१३।।

साठावरची कळ साधुनी । जे झाले धन्य जनी ।
शिवचिंतने शिवचि होऊनी । ठेले असती ।।१४।।

जीवा-शिवाचा संयोग झाला । हाचि राजयोग साधला ।
बाह्यदर्शनी कधी न दिसला । जवळी असोनी ।।१५।।

असा सोहळा अलौकिक । म्हणजे भाव निष्ठेचे प्रतीक ।
श्रीरामनिकेतनी असे सोहळे अनेक । झाले, होतात, होतील ।।१६।।

हे विश्वकुटुंबीय ठिकाण । कुटुंबातील संख्येस न प्रमाण ।
जो येतो त्यास सामावून । सहज घेतले जाते ।।१७।।

समारंभ घरच्यापुरता येथ । ऐसा कधीच न विचार संकुचित ।
जय्यत तयारी बुद्धी निस्वार्थ । कितीही येवोत माणसे ।।१८।।

एकोणीसशे सत्त्याऐंशीस । पंचवीस वर्षे कीर्तनास ।
पुरी झाली खास । रौप्यमहोत्सव कीर्तनाचा ।।१९।।

दोन तपावरी एक । लूट अध्यात्माची अलौकिक ।
सहजानंद मिळोनि साधक । जाई धुंद होवोनी ।।२०।।

रुपेरी महोत्सव कीर्तनाचा । म्हणजे क्षण भाग्याचा ।
केळकरांच्या कठोर व्रताचा । चढता वाढता आलेख ।।२१।।

मामा साधिती वर्षे अडतीस । दादा चालविती पुढे त्यास ।
श्रीरामनिकेतनाचा डोले कळस । परमानंद भूवरचा ।।२२।।

महाराजांचे सदैव आशीष । हेचि आमुचे भाग्यविशेष ।
हरिकथेचा नित घोष । प्राप्ती सर्वसुखाची ।।२३।।

रौप्यमहोत्सवी वर्ष दादांच्या कीर्तनाचे । जन्मशताब्दी वर्ष श्रीमामांचे ।
प्रेम पितापुत्रांचे । ऐसे आहे ।।२४।।

श्रीदादा रामजी मामांचे । ओघवते कीर्तन सदा त्यांचे ।
संत परमअधिकाराचे । जन्मत:च ज्ञानी ।।२५।।

इतके वर्षांची थोर परंपरा । परिणाम करी खराखुरा ।
पेशीन्पेशी बदलती साऱ्या । येणाऱ्या जाणाऱ्यांच्या ।।२६।।

अखंड उसळे नादब्रह्म । दशदिशा घुमले रामनाम ।
मुर्तीमंत मुक्तीचे धाम । अध्यात्मपंढरी ।।२७।।

एकोणीसशे नव्वद साली । दादांना सत्तर वर्षे पुरी झाली ।
तेंव्हाही मांदियाळी जमली । कार्यक्रम सत्तरीचा ।।२८।।

घरगुती थाटात महोत्सव । झाला आनंदे अतीव ।
कैसे प्रेमळ सद्गुरुराव । आपल्याला भेटले ।।२९।।

एकोणीसशे पंच्याण्णवात । सोहळा केला आयोजित ।
योजना अपूर्व इत्थंभूत । पंच्याहत्तरीची ।।३०।।

निमंत्रणे छापली सुंदर । पाठविली परगावी सत्त्वर ।
फुरसत ना अवसर । गडबड कुटुंबियांची ।।३१।।

---

*✻ श्री. सुधाकर व्यं. रेगोडकर–श्रीदादांचे शिष्य*



गावातील सर्व भक्तांकडे । आण्णा समक्ष जाती प्रेम केवढे ।
म्हणती सर्वांनी आमच्याकडे । यावे सोहळ्यासी ।।३२।।

घरचाच उत्सव समजून । यावे असे आग्रहाचे आमंत्रण ।
याहून वेगळे आपलेपण । सांगा कोणते ।।३३।।

दीपकने असे सुचवले । म्हणे केळकर आडनाव आपुले ।
तुला केळ्याचीच यावेळे । करु आपण ।।३४।।

केळी बहुत आणली । हौसेने अंगणात तुला झाली ।
मागुती ती हातावर ठेविली । प्रसाद म्हणून ।।३५।।

यथासांग भोजन । करिता झाले समाधान ।
आनंदे तृप्त होऊन । भक्त परतले ।।३६।।

सायंकाळी नित्यकीर्तनी । सोहळा झाला कीर्तनभुवनी ।
श्रीप्रकाशजी यांच्या भावातूनी । व्यक्त श्रीदादांचे चरित्र ।।३७।।

हे चरित्र 'फुल चैतन्याचे' । विहंगम दर्शन दादांचे ।
बराच काळ निकट दादांचे । होते प्रकाशजी भावेसर ।।३८।।

शालेय शिक्षणापासून । जिव्हाळ्याचे श्रीरामनिकेतन ।
दादा–वहिनींचे भाचे म्हणून । अभिमान वाटे त्यांना ।।३९।।

पंच्याहत्तरीच्या आधीही दोन ठिकाणी । तुला दादांची करोनी ।
साधिती अमूल्य पर्वणी । संतपूजेची ।।४०।।

दाविकाकांनी आपुला हेत । पूर्ण केला रानडे वाड्यात ।
तुला साखरेची योजित । श्रीदादांची ।।४१।।

रेगोडकरकाकाही✻ गुळसाखर । ठेविती भारंभार ।
तुला दादांची करोन नंतर । दान केले गुळसाखरेचे ।।४२।।

असो सहजी आठवले । लिहिले जे स्मरणात राहिले ।
आता पाहू वर्णन पुढले । श्रीदादांच्या सोहळ्यांचे ।।४३।।

मामांचे कीर्तन अडतीस वर्षे । पुढे दादांची छत्तीस वर्षे ।
त्रिपतमहोत्सव अनायासे । आला सेवेचा ।।४४।।

देह ठेविल्यावरी हनुमंतसद्‌गुरुंनी । कीर्तनानुग्रह दिला प्रगट होवोनी ।
म्हणती आपुल्या बापुरावांनी । अनुग्रह सत्य केला ।।४५।।

तेच हे महाराजांचे कीर्तन । कीर्तनाबरोबर साधन ।
साधती प्रसंगी देह कष्टवून । अहोरात्र ।।४६।।

केवळ नोकरी उद्योगासाठी न जिणे । केवळ संसार करीत न रहाणे ।
त्यापलीकडील चिरसुखात रमणे । ऐसी परंपरा ।।४७।।

परमार्थाच्या आड नोकरी आली । तो मनाची होई घालमेली ।
नोकरी सुखाचीही नाही मानवली । त्याग नश्वर सुखाचा ।।४८।।

मामांनी नोकरी सोडली । दादांनीही सरकारी सेवा त्यागिली ।
आण्णांचे बाबतीतही घडली । काही अंशी अशी गोष्ट ।।४९।।

सिटी हायस्कूल संस्थेत । आण्णा होते सेवारत ।
कीर्तन प्रवचनासही जात । जैसे आज्ञावचन दादांचे ।।५०।।

दादांची अवस्था प्रकृतीमान । बऱ्याच रात्री होई जागरण ।
संस्थेचीही जबाबदारी पूर्ण । होती आण्णांवरी ।।५१।।

दादांकडेही लक्ष पूर्ण । नोकरीतही न पडावे न्यून ।
अवघड दोन्हीकडील अनुसंधान । साधले कटाक्षाने ।।५२।।

विचार केला मनोमनी । परंपरा पितृसेवा श्रेष्ठ म्हणुनी ।
स्वेच्छानिवृत्ती घेवोनी । सेवेस सिद्ध झाले ।।५३।।



दादांचे अविरत कीर्तनात । त वरुन ओळखावा ताकभात ।
चरण, अवतरणे म्हणोनी साथ । गायनही पेटीसवे ।।५४।।

असो आला विषय ओघाने । परी आवश्यक वाटले सांगणे ।
आता वर्णन आहे करणे । त्रिपतमहोत्सव कीर्तनाचा ।।५५।।

हा त्रितपमहोत्सव कार्यक्रम । भावना व प्रेमाचा संगम ।
दादांची मात्र अवस्था कायम । सेवक महाराजांचा ।।५६।।

मांडवशोभा विद्युत रोषणाई । वाजे मंगलमय सनई ।
वातावरण अवर्णनीय होई । मौज गुरुगृहीची ।।५७।।

पूर्वीचे आठवता मंदिर । नव्हती दीपसंख्या फार ।
साधे दीप आत बाहेर । होते लावलेले ।।५८।।

परी हा प्रकाश बाहेरचा । अध्यात्मास काय उपयोग त्याचा ।
संतांनी अंतरात प्रकाशाचा । लखलखाट पाहिला ।।५९।।

पूर्वीची परिस्थिती वेगळी । तरी त्यांची तीच दिवाळी ।
आत्मज्योत ज्ञानाने झळाळी । सदासर्वदा ।।६०।।

दादा सद्‌गुरु सर्वेश्वर । आपल्या सर्वांचे आधार ।
सिंहासनी शोभती तेज अपार । मुखावरी विलसतसे ।।६१।।

हे तेज तपाचे । साधना उपासना कारण याचे ।
'तप टू शाईन'* या सूत्राचे । मूर्तीमंत उदाहरण ।।६२।।

अनेक भक्तांची दाटी । प्रेम भरले आकंठी ।
उधळती पाठी पोटी । मोती परमार्थाचे ।।६३।।

---

* *तप म्हणजे प्रकाशित होणे*

सोहळ्याचे अतिथी मान्यवर । श्रीशंकराचार्यांचा सत्कार ।
शिंग फुकोनी सत्त्वर । केला असे ।।६४।।

आशीर्वाद करवीरपीठाचा । म्हणाले हा योग भाग्याचा ।
गौरव कीर्तन परंपरेचा । केला शंकराचार्यांनी ।।६५।।

इतुके वर्षे कीर्तन । साधणे खरेच कठीण ।
असेच चालावे अनुदिन । वदले आनंदाने ।।६६।।

ऐसे पुण्यक्षेत्र श्रीरामनिकेतन । काही आपुले पूर्वपुण्य ।
पडले पाऊल म्हणोन । या आवारात ।।६७।।

कीर्तनाचे अनुष्ठान । अलोट करिती गुणगान ।
त्यास आता वर्षे पूर्ण । सदतीस झाली ।।६८।।

शुभारंभ एकोणीसशे चोवीस । मामा-दादांचा कीर्तनरस ।
मिळोन पंच्याहत्तर वर्षे खास । झाली या व्रतासी ।।६९।।

एकोणीसशे पंच्याणवात आला । हा महायोग भला ।
गगन तोकडे आनंदाला । ऐसे झाले ।।७०।।

रंगी रंगला श्रीरंग । पंच्याहत्तर वर्षे चालला याग ।
सुखाहुती देवोनी वैराग्य । मिळविले संसारी राहोनी ।।७१।।

नेम केवढा हा भाग गौण । तो कसा किती चालला हे प्रधान ।
याचेच प्रत्यक्ष उदाहरण । येथे मिळे पहाण्यासी ।।७२।।

दिन माघ शु. दशमीचा । वाढदिवस दादांच्या कीर्तनाचा ।
सोहळा आजही याचा । बहु उत्साहे होतो ।।७३।।

ह्या दिवसाचे महत्त्व अपार । तीन कारणे यास साचार ।
एक तुकाराम महाराजांचा अंगिकार । श्रीपांडुरंगाने केला ।।७४।।



दुसरे महत्त्वाचे कारण । श्रीनारायणमहाराजे केले निर्याण ।
तिसरे असे कारण । वाढदिवस दादांच्या कीर्तनाचा ।।७५।।

हा कीर्तनरस दादांचा । लाभ श्रवणाचा घ्यायचा ।
चाखू गोडवा नामामृताचा । जे आहे ते दादांचे ।।७६।।

फोडिले भांडार अध्यात्माचे । धनी दादाच याचे ।
माझे काम हमालाचे । तुम्हापर्यंत पोहोचवण्या ।।७७।।

ज्याचा माल त्याचेच लेबल । लावूनी वाटावा हा माल ।
एकाचा माल एकाचे लेबल । घातक अयोग्य सर्वदा ।।७८।।

आपण पायीक दादांचे । ज्ञान जागते ठेवू त्यांचे ।
पालन याच जबाबदारीचे । करु आण्णा म्हणती ।।७९।।

अशी मनोधारणा विनयाची । नाही कोठे दिसायची ।
सहज नम्रता आण्णांची । पदोपदी दिसे ।।८०।।

असो कीर्तन अमृतमहोत्सव । आनंद प्रेमाचा वर्षाव ।
पंधरा दिवसांचे पुण्यपर्व । आयोजिले असे ।।८१।।

शुभारंभ श्रीगणेशजयंती । इंदिरामातोश्रींची पुण्यतिथी ।
गुरुतृतीया महोत्सव शेवटी । जागर प्रगटकाळाचा ।।८२।।

श्रीमद् दासबोध पठण । प्रवचन कीर्तन भजन ।
नित्य कीर्तन भक्तीप्रधान । थाट समारंभाचा ।।८३।।

नामामृताची गोडी । संतांना सर्वकाळ आवडी ।
जाहली देवाची जोडी । नित्यसहवासाने ।।८४।।

थाट घरगुती कार्यक्रमांचा । मधुर रव तबला पेटीचा ।
चित्तात बिंबला कायमचा । भावपूर्ण वातावरण ।।८५।।

पन्नासाधिक कार्यक्रमांचा उत्सव । ऐकून भक्त समुदाव ।
रंगून विसरे देहभाव । लाभ संतदर्शनाचा ।।८६।।

दादांनी पुढील वर्षात । पदार्पण केले ऐशींव्या वर्षात ।
सहस्रचंद्रदर्शन सोहळा यथोचित । साजरा झाला ।।८७।।

दोन हजार साल । प्रपौत्र पार्थ उर्फ अतुल ।
केळकरवंशातील बाळ । श्री.दीपक-अनुराधा यांचे ।।८८।।

मंडपात अंगणी होमहवन । वेदमंत्रांचे पठण ।
आनंदाश्रूंनी भरले नयन । उपस्थितांचे ।।८९।।

दादांचे औक्षण केले । सुवासिनींनी ओवाळले ।
तो अधिकचि तेज फाकले । दीपज्योती अष्टदश ।।९०।।

दादांना फेटा बांधला । आनंदाने बांधून घेतला ।
सहजभाव तेथेही दिसला । मुद्दाम नव्हे ते सहज ।।९१।।

राजाधिराज सद्‌गुरुनाथ । जयजयकार सर्वतोमुखात ।
परमार्थातील उच्चपदस्थ । सद्‌गुरु आमुचे ।।९२।।

पार्थला दिले मांडीवरी । उधळली सुवर्णफुले त्याचेवरी ।
या आशीर्वादाची परी । सांगा कोणती ।।९३।।

सहजभाव दादांचा । सहज उपचार दादांचा ।
सहजयोग दादांचा । देवराणा भुवैकुंठीचा ।।९४।।

पणजोबा वात्सल्यसिंधू । आजोबा करुणासिंधू ।
तात दीपक प्रेमसिंधू । लाभले पार्थासी ।।९५।।

सायंकाळी मंदिरात । दादा खुर्चीत आसनस्थ ।
श्रीआप्पाकाका काकू रत । पाद्यपूजेत दादांच्या ।।९६।।



'श्रीदासरामगौरवगीत' गायन । श्री केशवकाकांचे प्रभावी लेखन ।
यातचि सकल समाधान । मिळते आम्हासी ।।९७।।

संत सद्‌गुरुंचा आशीर्वाद । तोचि सदा बोधप्रद ।
म्हणोन हे पदारविंद । कदापि न सोडावे ।।९८।।

गुण गावू श्रीदादांचे । हेची क्षण आनंदाचे ।
महत्त्व या आठवणींचे । नित्य आम्हा ।।९९ ।।

स्फूर्ती द्यावी दादांनी । दिशा दर्शवावी दादांनी ।
सेवा गोड करवावी त्यांनी । हेच खरे ।।१००।।

इति श्रीदासरामचरित्र । गुरुचरणीची गंगा पवित्र ।
दीन अर्पितो तुलसीपत्र ।
राजयोग वर्णननाम दशमोध्याय ।।१०।।

*****

।। श्रीराम ।।

# अध्याय-(११)- संतभेट वर्णन

यथा होय ज्ञानप्राप्ती । साधनाची साधे परिणती ।
आत्मसुखाची अनुभूती । संतपदवी शोभून दिसे ।।१।।

संत संतांना भेटले । तेथ निर्व्याज प्रेम उंचबळले ।
सर्व काही आपणा मिळाले । या भेटीतुनी ।।२।।

सुख येई सुखाला । प्रवेश नसे दुःखाला ।
सहज पावावे मोक्षाला । या आनंदातुनी ।।३।।

अशाच काही आठवणी । ज्याची करावी कोरणी ।
जेणे नुरे चिंता मनी । या संसाराची ।।४।।

दादा अनेक संतांना भेटले । अनेक संतही दादांकडे आले ।
संत येताच दादांनी म्हटले । 'भले सार्थक झाले' ।।५।।

काही संतभेटींचे वर्णन । पाहिले प्रसंगानुरूप आपण ।
आता उर्वरीत संतभेटवर्णन । पाहू या अध्यायात ।।६।।

अध्वर्यू अनेक संप्रदायाचे । आले रामनिकेतनी अनेक पीठाचे ।
महत्त्व अद्वैतपीठाचे । दिसेल येथे ।।७।।

दादांना अनेकांनी गौरविले । अधिकारसंपन्न मान्य केले ।
आणि आपुले व्यक्त केले । प्रशंसोद्गार ।।८।।

विदेही संत रामूमाळी । भेटले दादांना त्यावेळी ।
दादा औदुंबरास ज्यावेळी । गेले होते ।।९।।

ते दादांजवळी आले । दादांना वंदन केले ।
हात पुढे करून म्हणाले । आणा द्या ।।१०।।



एरवी कोणी केंव्हाही त्यांना । पैसे हवे का विचारताना ।
म्हणत आम्हा संतांना । पैसा काय उपयोगी ।।११।।

एका भक्ताने विचारणा केली । गुरुलिंगगीता कोणी दिली ।
ते बोलले ती दिधली । प्रत्यक्ष शंकरांनीच ।।१२।।

'शिवपीठ हे जुनाट । ज्ञानाबाई तेथे मुकुट' ।
वचन घ्यावे लक्षात । उगमस्थान बहुतेक संप्रदायांचे ।।१३।।

श्रीगंगाधरकाका दीक्षित । रहाती श्रीहनुमानसमाधी मंदिरात ।
दरवर्षी समाधी उत्सवात । करिती स्वागत दादांचे ।।१४।।

उत्सव संपता फिरफिरुन । देती निरोप गहिवरुन ।
परत या विनविती हात जोडून । पुढल्या वर्षी ।।१५।।

असे प्रेम आजवरी । दुर्लभ असे चराचरी ।
ह्या प्रेमाची परी । काय सांगता येईल ।।१६।।

सिद्धगिरीचे महाराज । आले रामनिकेतनी खास ।
गौरविण्या अखंड कीर्तनकाज । मामा-दादांचे ।।१७।।

गुंडुबुवा विदेही संत । येती श्रीहनुमानसमाधी मंदिरात ।
मामांचे कीर्तनी उड्या मारित । ब्रह्मानंदी ।।१८।।

सामान्यास वाटे वेडाचार । परि हा जीवशिवापैलीचा आचार ।
विदेही अवस्था खरोखर । आहे दुर्मिळ ।।१९।।

दादांना उद्देशून म्हणती । हे पोर ग्वाड किती ।
परमार्थाचे पेव जगती । घेऊन आले ।।२०।।

श्रीपांडुरंगमहाराज ताम्हणकर । मामा-दादांवरी प्रेम फार ।
तसाच मोठा आदर । दोघांविषयी ।।२१।।

स्वत: होते प्रेमयोगी । विनय तेवढाच अंगी।
तल्लीन होत दत्त अभंगी । ऐसे भजनप्रेमी ।।२२।।

ते दादांना उद्देशून म्हणायचे । अनेक जन्मींचे ज्ञान याचे ।
'राम केळकर' म्हणजे ज्ञानमार्गीचे । विमान ज्ञान वाटावया ।।२३।।

किती अभंग, अवतरणे । म्हणतो कीर्तनात सहजपणे ।
याच्या भांडाराचा पत्ता लागणे । अवघड फार ।।२४।।

संत उपळेकर फलटणचे । विदेही अवस्थेत असायचे ।
एकदा कीर्तनात मामांचे । आले माधवनगरात ।।२५।।

त्यांनी दादांना पाहिले । गौरवोद्गार काढले ।
मामा-दादांचे कौतुक केले । उत्स्फूर्तपणे ।।२६।।

श्रीकाकासाहेब तुळपुळे थोर । गाजविती अध्यात्मविद्यामंदिर ।
जाणत दादांचा अधिकार । साधननिष्ठ वरिष्ठ ।।२७।।

'अध्यात्माची जागती ज्योत' । दादांना संबोधित ।
दादांचे वर्णन संतांचे मुखात । दिसे शोभुनी ।।२८।।

श्रीमामासाहेब दांडेकर । वारकरी पंथी प्राप्त अधिकार ।
येत प्रतिवर्षी जरुर । श्रीकोटणीसमहाराजांचे घरी ।।२९।।

ते म्हणायचे ही माझी वारी । कीर्तनात वृत्ती रंगते अंतरी ।
दादांकडेही येता स्वारी । आनंदुन जाई ।।३०।।

पाऊस असतानाही भिजत । न चुकता यायचे येथ ।
असे प्रेम अतोनात । दादांवरी होते ।।३१।।

अधिकारसंपन्न श्रीटाकीमहाराज । आले एकदा सांगलीस ।
दाणेकरी दादांना बोलावण्यास । आले निरोप घेऊन ।।३२।।



दादा तेथे गेले । कीर्तन उत्स्फूर्त केले ।
परमार्थाचे भांडार लुटले । इच्छा पूर्ण महाराजांची ।।३३।।

श्रीटाकीमहाराजांना आनंद झाला । उपस्थितांनाही लाभ जाहला ।
संतदर्शन संतवाणीने न्हाला । भाग्यवंत समुदाय ।।३४।।

श्रीटाकीमहाराज उठले । दादांना हसून म्हणाले ।
आम्ही आपणास न पाहिले । हार घालून घेताना ।।३५।।

परी हा जो हार घालणार । तो सोहिरोबानाथांचा प्रसाद साचार ।
अतुलनीय आपुला अधिकार । म्हणून गौरवितो ।।३६।।

सोहिरोबानाथांनी मज सांगितले । यापुढे कीर्तन आपुले ।
अधिकचि रंगेल असे दिले । आशीर्वादवचन ।।३७।।

श्रीधुंडामहाराज देगलुरकर । आले भेटण्या जरुर ।
दादांनाही संतोष फार । वाटला तेंव्हा ।।३८।।

अध्यात्मिक चर्चा रंगली । दोघांची खूप त्यावेळी ।
महाराजांची मूर्ती दिसली । प्रसन्न तेंव्हा ।।३९।।

दादा पुण्याहून होते येत । इस्लामपूर येथे झाली भेट ।
धोंडिराममहाराजांना आनंद निघोट। मनस्वी झाला ।।४०।।

दादा भेटीस येणार । म्हणोन उभे होते रस्त्यावर ।
वाट पाहत होते संतवर । सांगलीच्या संतांची ।।४१।।

निसर्गदत्त महाराज आले । पडवीतचि स्वागत केले ।
मंदिरात होते काम चाललेले । म्हणोनिया ।।४२।।

पुढे त्यांच्या स्मरणिकेत । लेख श्रीदासरामलिखित ।
छापून आला असे सूत्र । संतप्रेमाचे ।।४३।।

श्रीपांडुरंगशास्त्री मुंबईचे । संस्थापक सनातन संस्थेचे ।
रामनिकेतनात दादांचे । भेटीस आले ।।४४।।

मंदिर पाहोन दादांबरोबर । चर्चा केली अध्यात्मपर ।
हास्य प्रशस्त चेहऱ्यावर । उमटले तेंव्हा ।।४५।।

सूरदास भक्त श्रेष्ठ । अधिकार त्यांचा श्रेष्ठ ।
दर्शन गजाननांचे प्राप्त । झाले देवाच्या वाटेवरी ।।४६।।

दादा आणि वहिनींना । म्हणती या रामसीताचि पहा ना ।
चर्मचक्षू नसून त्यांना । दिव्य शक्ती ज्ञानचक्षुंची ।।४७।।

दादांशिवाय त्यांच्या मनी । दुसरा देव नव्हता कोणी ।
रामदादाचि ध्यानी मनी । होते त्यांच्या ।।४८।।

लेदरले अभ्यासक जर्मनीचे । आले उत्सुकतेने घरी दादांचे ।
कौतुक अखंड कीर्तनाचे । केले आश्चर्य वाटुनी ।।४९।।

जगाचा प्रवासी मी खरा । पिंजून काढला प्रदेश सारा ।
अखंडकीर्तनाची मात्र परंपरा । येथेच फक्त दिसली ।।५०।।

अनेक ठिकाणे कीर्तनाची । काही दिवस मास सेवा तेथीची ।
पिढ्यान् पिढ्या जागृती परंपरेची । एकमेव क्षेत्र हे ।।५१।।

आर. एन. जोशी या संतांचे । प्रवचन उत्सवात असायचे ।
गुरुनिष्ठा व सज्जनतेचे । आदर्श उदाहरण ।।५२।।

हरभटरोडवरुन जेंव्हा जायचे । आणि कोटणीसवाड्यासमोर यायचे ।
साष्टांग प्रणिपात घालायचे । भर रस्त्यात ।।५३।।

निष्ठा अंतरीची गुप्त । अशी अवश्य व्हावी प्रगट ।
लज्जा भय अहंकार नष्ट । होईल तेंव्हाच हे घडे ।।५४।।



त्यांच्याकडे पाहिल्यावर । आठविती गुरुदेव संतवर ।
म्हणत दादा वारंवार । विषय येताच ओघाने ।।५५।।

श्रीगणपतरावमहाराज कन्नूर । श्रीसिद्धरामेश्वरमहाराजांचे शिष्यवर ।
प्रेमाचा वर्षाव दादांचेवर । अनेक वर्षे केला असे ।।५६।।

दादाही जेंव्हा कन्नूरला । गेले होते वस्तीला ।
महाराजांनी गौरव केला । दादांचा तेथे ।।५७।।

श्रीनानामहाराज बर्वे संत । येत अनेकदा सांगलीत ।
श्रीरामनिकेतनी निश्चित । कीर्तन ऐकण्यास थांबायचे ।।५८।।

अनुदिन अभिनव कीर्तन । कीर्तन वर्णनाचे पद करुन ।
व्यक्त केले प्रेम । वेचक शब्दातुनी ।।५९।।

श्रीचिन्मयानंदस्वामी अधिकारी । म्हणाले हे स्थळ महाभारी ।
येथील तुळया भिंतीही निर्धारी । गातात रामनाम ।।६०।।

श्रीबालदासजीमहाराज गुजराथचे । प्रभावित झाले मन त्यांचे ।
श्रीदादांना मुक्कामी येण्याचे । आमंत्रण दिले ।।६१।।

दादा तेथे गेले । श्रीसरस्वतीबापू महाराजही होते आलेले ।
संत भेटुनी रंगून गेले । अध्यात्मचर्चेत ।।६२।।

श्रीबाबामहाराज सातारकर । निरुपण कीर्तनी वाणी मधुर ।
सपत्नीक येऊन भेटल्यावर । दादांना आनंद झाला ।।६३।।

श्रीबापूसाहेब देशमुख वकील । सांगत चांगदेवपासष्ठी सालोसाल ।
घरच्या माडीवर दरसाल । प्रवचन दादांचे व्हायचे ।।६४।।

त्यांचेही उत्सवात आवर्जुन । दादा ठेवायचे प्रवचन ।
प्रथम सेवापुष्पाचा मान । असे त्यांचा ।।६५।।

आंध्रप्रदेशातील अम्मा साध्वी । मान्य करिती दादांची थोरवी ।
अश्रूंचा प्रवाह अखंड वाही । दर्शन घेता ।।६६।।

देहभान विसरुन गेल्या । वहिनींचे फोटोसमोर उभारल्या ।
प्रेमाश्रू थांबवू न शकल्या । ऋणानुबंध संतांचे ।।६७।।

श्रीआकारामबापू पाटीलमहाराज । त्यांच्या मनी असे काज ।
अखंड वीणा उभारणेची मज । म्हणती इच्छा असे ।।६८।।

ते भेटले दादांना । म्हणाले यावे शुभारंभ करण्या ।
होईल पूर्ण मनोकामना । त्यायोगे ।।६९।।

दादा म्हणाले मी न वारकरी । बोलवा कोणी अधिकारी ।
कार्यक्रमास शोभा खरी । नक्कीच येईल ।।७०।।

त्यावरी महाराज म्हणाले । अखंड कीर्तन येथ चालले ।
आपणचि योग्य हे मी जाणले । अखंड वीणा उभारणेसाठी ।।७१।।

प्रेमाग्रहामुळे दादा गेले । मनोरथ पूर्ण झाले ।
त्यावेळच्या मिरवणुकीत दिले । दादांना मानाचे स्थान ।।७२।।

श्रीगजाननमहाराज अक्कलकोटचे । घरी अग्निहोत्री गाडगीळांचे ।
आले तव भक्तगणांचे । थवे लोटले दर्शनासी ।।७३।।

दादाही तेथे गेले । त्यांनी दर्शन घेतले ।
रेगोडकरकाकांनाही दर्शन लाभले । दादांचे बरोबर ।।७४।।

श्रीकवीश्वरमहाराज दत्तपंथ । विद्वान गाढे पंडित ।
कृष्णाच्या गोष्टी सांगत । रंगवूनी ।।७५।।

आले महाराज घरी । केली उत्तम तयारी ।
भेटताच प्रमुदित स्वारी । बहु झाली ।।७६।।



श्रीनानामहाराज तराणेकर । त्यांचे भक्तही होते बरोबर ।
मंदिरात येवुनी समाधीवर । डोके ठेवले मामांच्या ।।७७।।

तेथेच खाली बसले । डोळे मिटले ध्यान लागले ।
समाधी अवस्थेत राहिले । अर्ध्यातासावरी ।।७८।।

सावकाश नेत्र उघडले । सहज शब्द बाहेर पडले ।
फार शुद्ध वायुमंडल येथले । जाणवले मज ।।७९।।

श्रीमाधवनाथस्वामी पुण्याचे । सांगलीत ठरविले येण्याचे ।
आनंदाने मन त्यांचे । भरुन गेले ।।८०।।

पुण्याच्या भक्तिहॉलमध्ये । प्रवचन दादांचे ठेवले ।
दादांचे प्रवचन रंगले । श्रोते मंत्रमुग्ध ।।८१।।

श्री वसंतराव गाडगीळ पंडित । दादांच्या कीर्तन रौप्यमहोत्सवात ।
प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित । होते त्यावेळी ।।८२।।

संस्कृतमधून भाषण केले । दादा अत्यंत आनंदले ।
दिंडीतही सहभागी झाले । दादांचेसह ।।८३।।

श्री गं.वि.कुलकर्णी आबांच्या मना । आनंद दादा भेटले जेंव्हा ।
बोलले काय पहा ना । दादांविषयी ।।८४।।

अनेक पीएच्ड्या तुम्हावरुन । टाकाव्याजी ओवाळून ।
ऐसा अधिकार अतुलनीय । आपला असे ।।८५।।

श्रीगुळवणीमहाराज योगीराज । सद्गुरु त्यांचे श्रीटेंबेस्वामीमहाराज ।
मामांनी देह ठेविला हे समजताच । आले दादांचे भेटीला ।।८६।।

खूप नाजुक प्रकृती । शिष्य धरून बसविती ।
झाल्या मामांच्या काही गोष्टी । दादांचेसह ।।८७।।

हारास आपण लावा हात । अंगात उठण्यास नाही ताकद ।
शिष्य म्हणाले करु समर्पित । आम्ही मामांचे समाधीवरी ।।८८।।

इतक्यात महाराज बोलले । माझ्या प्रकृतीसी काय झाले ।
देवाला हार घालण्यात कसले । कष्ट मजला ।।८९।।

हार केला अर्पण । वंदिले श्रीमामांचे चरण ।
अश्रू ओघळले नेत्रांमधुन । मामांचा फोटो पाहता ।।९०।।

सहज उद्‌गार बाहेर पडले । या महात्म्यास कोणीच नाही ओळखिले ।
एवढेच बोलोन मौन धरिले । श्रीगुळवणीमहाराजांनी ।।९१।।

विठ्ठलवाडीचे श्रीनिळकंठमहाराज । महान योगीराज ।
अष्टांगयोग सिद्धी प्राप्त । यायचे श्रीरामनिकेतनी ।।९२।।

श्रीज्ञानेश्वरमाऊली ज्ञानेश्वरीत । ज्या निगुढ मठाचे वर्णन करीत ।
आणि जो खरा अपेक्षित । तो म्हणजे श्रीरामनिकेतन ।।९३।।

असे श्रीनिळकंठमहाराज म्हणायचे । ठामपणाने सांगायचे ।
संतांच्या सूचक बोलण्याचे । नेहमीच अर्थ गूढ ।।९४।।

ते म्हणाले दादांना । जाऊ म्हणतो निजसदना ।
परवानगी द्या आम्हा । देह ठेवणेची ।।९५।।

एक वर्ष राहिले । सांगलीस दादांना येऊन भेटले ।
एकादशीस समाधिस्थ झाले । कार्तिक महिन्यात ।।९६।।

श्रीकुमारस्वामी धारवाडचे । असती बहु अधिकाराचे ।
अनेक होते त्यांचे । सांगलीत कार्यक्रम ।।९७।।

वेळ नव्हता फार त्यांना । दादांना आले भेटण्या ।
येताच भारावून गेले रहावेना । म्हटले कानडी अभंग ।।९८।।



येथे वेगळेच वातावरण । विसरलो मी देहभान ।
भाग्यात होते संतदर्शन । हेच खरे ।।९९।।

हाटे इंग्रजी कीर्तनकार । परदेशात करिती कीर्तनगजर ।
दादांना भेटताच फार । आनंद झालासे ।।१००।।

कोल्हापूरचे सांगवडेकर दादा । त्यांना आवडायचे दादा ।
भेटी झाल्या अनेकदा । सांगली व कोल्हापूरात ।।१०१।।

हसनशाह मुस्लिम संत । येवून दादांची घेतली भेट ।
असे हे अद्वैतपीठ । भेद नसे जातीपंथाचा ।।१०२।।

जुनोनी मठाधिपती पांडुरंगमहाराज । दादांवरी प्रेम निर्व्याज ।
गौरविती भक्तीकाज । आपुल्या दादांचे ।।१०३।।

महाराजांनी फेटा आपुला । दादांचे पायाशी ठेविला ।
म्हणाले दादा आपण मला । आशीर्वाद द्यावा ।।१०४।।

दादांनी त्यांना उठविले । जाणतो मी तुम्हास म्हणाले ।
स्वहस्ते गौरविले । श्रीपांडुरंगमहाराजांना ।।१०५।।

हरिकाका गोसावी संत । आले एकदा सांगलीत ।
जोशी यांचे घरात । मुंजीसाठी ।।१०६।।

दादाही तेथे गेले । हरिकाकांना भेटले ।
श्रीहरिकाकांनी सर्वांना सांगितले । जावे बाहेर म्हणूनी ।।१०७।।

मग बंद खोलीत । अध्यात्मचर्चा एकांतात ।
दोन महात्मे भेटीत । महत्त्वाचे काही बोलले ।।१०८।।

एकोणीसशे छप्पन्न साली । अवतार मेहेरबाबांची भेट झाली ।
दादांना भेटले ज्यावेळी । आले इस्लामपूरला ।।१०९।।

धोंडीराममहाराजांची भेट घेऊन । दादांनाही भेटले आनंदून ।
परमाधिकारी, चव्वेचाळीस वर्षे मौन । होते मेहेरबाबांचे ।।११०।।

श्रीदासगणु संत । ज्यांचा गजानन विजय ग्रंथ विख्यात ।
श्रीसाईबाबांचेही कृपाछत्र । ज्यांच्यावरी असे ।।१११।।

ते आले श्रीरामनिकेतनी । दादांची आज्ञा झाली म्हणुनी ।
ऐकण्या मिळाली प्रसादवाणी । श्रीदासगणुमहाराजांची ।।११२।।

ते म्हणाले श्रीनाथांच्या दरबारात । आलो मी या पवित्र वास्तूत ।
अखंड कीर्तन चालले येथ । खरोखरीच धन्य झालो ।।११३।।

शिष्य श्रीधरस्वामींचे । श्रीनिळकंठमहाराज भेटीस दादांचे ।
आले तेंव्हा प्रवचन दादांचे । ऐकले श्रीविष्णुमंदिरात ।।११४।।

ऐकून तेथील प्रवचन । महाराज गेले भारावून ।
परमानंद झाला असे आपणहून । सांगितले तेंव्हा ।।११५।।

श्रीशंकरमहाराज मिरीकर । ज्यांचा पुणे येथे संचार ।
नेहमीच देहभावाचा विसर । रमायचे ब्रह्मानंदी ।।११६।।

मामा सगुण असताना । श्रीशंकरमहाराज भेटले त्यांना ।
दादांना तेथे पाहताना । महाराजांनी कौतुक केले ।।११७।।

श्रीमाणिकप्रभू हुमणाबादचे । सांगलीत होते कार्यक्रम त्यांचे ।
यशवंत मंगल कार्यालय पूर्वीचे । तेथ होती भोजनव्यवस्था ।।११८।।

महाराजांची व दादांची । खास व्यवस्था भोजनाची ।
महापुरुषांच्या भेटीची । काय मौज वर्णावी ।।११९।।

दृष्टादृष्ट संतद्वयांची । उधळण दैवी आनंदाची ।
दाविकाका व शिंगाडेकाकांनीही या भेटीची । मजा लुटली ।।१२०।।



श्रीमाणिकप्रभूंच्या मातोश्री । अचानक आल्या एके दिवशी ।
अलभ्य लाभ उपस्थितांसी । संतदर्शनाचा ।।१२१।।

त्यांच्या गाडीचा ड्रायव्हर । करुन दादांना नमस्कार ।
म्हणाला तुमचे कीर्तन सुंदर । झाले हुमणाबादच्या मठात ।।१२२।।

कीर्तन झाल्यानंतर । तुम्हास मी सोडले खोलीवर ।
ओळखले का खरोखर । मला तुम्ही ।।१२३।।

प्रत्यक्षात दादा गेले नव्हते । याचे गणित अनाकलनीय होते ।
दिक्काल देहात मर्यादित नव्हते । श्रीदादा आपुले ।।१२४।।

श्रीमृदुंगाचार्य आपेगांवकर । मृदुंगातून बोल काढीत सुस्वर ।
दर्शन घेण्यास सत्त्वर । आले दादांकडे ।।१२५।।

श्रीदादांचे धरिले चरण । हृदय आले उचंबळून ।
किती वेळ तरी तल्लीन । झाले दर्शन सुखात ।।१२६।।

उठून उद्‌गार भावपूर्ण । म्हणाले नक्कीच मी भाग्यवान ।
झाले आज देवदर्शन । सुखावलो सुखावलो ।।१२७।।

श्रीझेंडेमहाराज ब्रह्मचारी । श्रीकृष्णसरस्वतींचे शिष्य अधिकारी ।
आले दर्शनास दादांचे घरी । वहिनींच्या महानिर्वाणाचे वेळी ।।१२८।।

श्रीझेंडेमहाराजांना दादा म्हणाले । भेट होताच बरे वाटले ।
वरचेवर पाहिजे येत राहिले । आता तुम्ही ।।१२९।।

श्रीरामण्णामहाराज आले । वातावरण मंगलमय झाले ।
दादांवर प्रेम केले । फार त्यांनी ।।१३०।।

श्रीदादासाहेब रोटीथोर । श्रीगुळवणीमहाराजांचे शिष्यवर ।
ज्ञानेश्वरी भागवतावरी प्रभुत्त्व फार । होते त्यांचे ।।१३१।।

अनेक उत्सवांमध्ये त्यांचे । प्रवचन व्हायचे बहारीचे ।
आपुल्या खुर्चीवरी बसवायचे । दादा त्यांना ।।१३२।।

श्रीशंकराचार्य करवीरपीठाचे । भेटता वर्णन करिती दादांचे ।
दादांच्या अध्यात्मिक अधिकाराचे । जाणले महत्त्व ।।१३३।।

श्रीपतीबुवा धोंगडे कनकेश्वरचे । दैनंदिन श्रवण कीर्तनाचे ।
करता रमते मन त्यांचे । राममंदिरी ।।१३४।।

श्रीदाजीसाहेब गावडे । येती वरचेवर दादांचेकडे ।
प्रवचन करिता भारावून केवढे । जात बराचवेळ ।।१३५।।

श्रीरावसाहेब सहस्रबद्धेमहाराज । त्यांचे शिष्य श्रीदिगंबरदासमहाराज।
त्यांचे शिष्य श्रीअशोककाका जोशी आज । असती पुण्यामध्ये ।।१३६।।

त्यांनी दिगंबरदास महाराजांना । विचारले देह ठेवताना ।
यापुढील कोणतेही कार्य करताना । कोणाचे मार्गदर्शन घ्यावे ।।१३७।।

तुम्हास एक संत भेटतील । अधिकारही त्यांचा कळेल ।
आशीर्वाद मार्गदर्शन लाभेल । खूप मोलाचे ।।१३८।।

अशोककाकांना दृष्टांत झाला । श्रीदादांचा चेहरा दिसला ।
दिगंबरदास महाराजांना सांगितला । येऊन सत्त्वर ।।१३९।।

महाराज म्हणाले हेच ते संत । रहातात सांगलीत ।
जाऊन करावे मस्तक नत । चरणांवरी ।।१४०।।

सद्‌गुरुंनी देह ठेवल्यावर । हुडकत आले दादांचे घर ।
दादांना कळले कोण येणार । परि मौन राखिले ।।१४१।।

श्रीदादांना जो पहातात । अश्रू साठले नेत्रात ।
जे अपेक्षित संत । भेटले त्यांना ।।१४२।।



घट्ट धरिले चरण । अश्रूंचे चालले अभिषेकसिंचन ।
ऋणानुबंध आले जुळुन । जन्मोजन्मींचे ।।१४३।।

आनंदाश्रुंचे भरते नेत्रांना । अशोककाकांना रहावेना ।
भेटीप्रीत्यर्थ उंची नजराणा । भेट दिला दादांना ।।१४४।।

तेंव्हापासून दादांसमोर । न बैसती अशोककाका खुर्चीवर ।
अधिकारी असून जमिनीवर । विनम्रभावे विराजती ।।१४५।।

कोणतेही कार्य हाती घेताना । आणि शुभारंभ करताना ।
श्रीदादाचि सदैव प्रमाण त्यांना । अमृतहस्ते कार्यसिद्धी ।।१४६।।

कोल्हापूरचे श्रीकाटकरमहाराज । अकोळचे श्रीकुलकर्णीमहाराज ।
बालब्रह्मचारी श्रीगणेशनाथमहाराज । श्रीदादांना भेटले ।।१४७।।

एकदा दादा माधवनगरला । गेले होते प्रवचनाला ।
श्रीडेव्हिडमहाराज त्यावेळेला । होते तेथे ।।१४८।।

अरे हा बादशाह संतांचा । अधिकार अलौकिक याचा ।
असा गौरव दादांचा । केला त्यांनीं ।।१४९।।

दादांनी त्यांना संबोधले । ट्रिनिटी आहेत असे म्हणाले ।
संत जाणती वर्म यातले । एकमेकांकडे पाहून हसले ।।१५०।।

श्रीजगनागिरीमहाराज जुनोनीचे । दादांकडे यायचे ।
कुंभमेळ्याची हकीकत सांगायचे । आश्चर्य वाटुनी ।।१५१।।

ते गेले होते कुंभमेळ्यास । अचानक संकट ओढवले त्यावेळेस ।
त्यांनी दादांचा धावा करताच । अलगद काठावर आणले कोणी ।।१५२।।

श्री.म.अ.कुलकर्णी तथा स्वामी प्रज्ञानंद । सद्‌गुरु ज्यांचे स्वामी अमलानंद।
स्वामी अमलानंदांचे सद्‌गुरु स्वामी स्वरुपानंद । श्रीक्षेत्र पावसचे ।।१५३।।

लहानपणापासून । स्वामी प्रज्ञानंद बुद्धीमान ।
अध्यात्मिक अधिकार संपन्न । अभ्यासपूर्ण प्रवचन त्यांचे ।।१५४।।

सोऽहं साधना साधिली । वृत्ती स्वरुपी तल्लीन झाली ।
रसाळ अनुभवजन्य वाणी झाली । लाभदायक बहुतांसी ।।१५५।।

मामा असतान्पासून । आजतागायत वर्तमान ।
श्रीरामनिकेतनी प्रवचन । करण्यास येती ।।१५६।।

आणखी अज्ञात संत असतील । ज्यांचा उल्लेख राहिला असेल ।
क्षमा मनापासून त्याबद्दल । मी मागतो ।।१५७।।

संतांची संख्या, नावे हे गौण । तत्त्व लक्षात घेणे हे प्रधान ।
अध्यात्मिक कार्याचे सूत्र धरुन । होते संतभेट नेहमी ।।१५८।।

म्हणोन संतांची भेट दुर्लभ । उपस्थितांसी महालाभ ।
जेणे जोडे पद्मनाभ । सूक्ष्म विचार तेथीचा ।।१५९।।

इति श्रीदासरामचरित्र । गुरुचरणीची गंगा पवित्र ।
दीन अर्पितो तुलसीपत्र ।
संतभेट वर्णननाम एकादशोध्याय ।।११।।

*****



।। श्रीराम ।।

# अध्याय-(१२)- तत्त्वज्ञान वर्णन

रास्त अचूक वैशिष्ट्यपूर्ण । श्रीदादांचे समग्र तत्त्वज्ञान ।
नित्य नैमित्तिक चिंतन । घडता सुख अध्यात्माचे ।।१।।

श्रीदादांनी जो सांगितला विषय । त्याचाच घेवू प्रत्यय ।
तोकडा प्रयत्न सूत्रमय । हिमालयासम ज्ञानाचा ।।२।।

हा सर्व दादांचा विषय । हाच मनी असो द्यावा भाव ।
तरीच त्याचा प्रभाव । जाणवेल अंतरी ।।३।।

शैली विशेष दादांची। सांगितली खाचखोच विषयांची ।
उत्सुकता दररोज श्रवणाची । राहिली कायम ।।४।।

सद्गुरु म्हणजे एक शक्ती । कधीच नोहे सामान्य व्यक्ती ।
शक्ती नसता व्यक्ती । काय करे ।।५।।

सद्गुरु म्हणजे वारे । देव म्हणजेही वारे ।
भक्त म्हणजेही वारे । विश्वाचे मूळ ।।६।।

वारा हाचि देव । नाहीतरी सर्व वाव ।
वाऱ्याशिवाय कोणाचाच ठाव । लागणार नाही ।।७।।

नयनात वारे भरले । तो दृष्यचि सारे विरले ।
मग सारे समत्त्वास आले । हरिरुप ।।८।।

उबारा म्हणजे वारा । गारवा म्हणजे वारा ।
आत्मा म्हणजे वारा । या जगताचा ।।९।।

अहंकारही वायुस्वरुप । वासनाही वायुस्वरुप ।
पाहण्या आत्मस्वरुप । उपाय अनुग्रहाचा ।।१०।।

सद्‌गुरुकृपे नाश अहंकाराचा । उलगडा होई खऱ्या मी चा ।
पडदा अज्ञान तिमिराचा । दूर होई ।।११।।

देहास मानूनी गौण । व्हावे देवाचे भजन ।
देव म्हणजे चैतन्य ही खूण । लक्षात ठेवावी ।।१२।।

चैतन्यामुळे देहाचे भान । देहयोगे न कळेचि चैतन्य ।
शाश्वत अशाश्वत जाणून । वर्तावे संसारात ।।१३।।

मनुष्याचे जे असते नाव । ते देहास असा आपुला भाव ।
चैतन्य नसता देहाचा गाव । सांगा कोणता ।।१४।।

देह चैतन्याच्या कक्षेत । असे तोवरी आम्ही मजेत ।
चैतन्याचे महत्त्व लक्षात । काही केल्या येईना ।।१५।।

देह हे देवाचे । वित्त कुबेराचे ।
तेथे या जीवाचे । काय कौतुक ।।१६।।

देहाचे साधून माध्यम । त्यामध्ये चालला जो क्रम ।
एक वारेच सहज रातंदिन । आत बाहेर करी ।।१७।।

तेच आपुले व्हावे लक्ष्य । म्हणजे साधेल अलक्ष्यात लक्ष ।
जेंव्हा होईल लक्ष्यात अलक्ष्य । साधनाभ्यासाने ।।१८।।

दृष्य नव्हे तो देव रे । हाच खरा अनुभव रे ।
पांढरी रेघ काळ्या दगडावरील रे । सांगती सद्‌गुरु ।।१९।।

डोळे जोवरी उघडे । लक्ष सर्व दृष्याकडे ।
डोळे झाकता सर्व कोडे । उकलले जाईल ।।२०।।

शेवटी तरी डोळे झाकायचे । त्याचे प्रॅक्टीस आत्तापासून करायचे ।
म्हणजे शेवटी न वाटायचे । आपणा अवघड ।।२१।।



दृष्यापेक्षा देव वेगळा । सृष्टीनिर्माता सृष्टीवेगळा ।
जैसा टेबल घडवणारा सुतार वेगळा । टेबलापेक्षा नेहमी ।।२२।।

यासाठी आवश्यक साधन । साधन म्हणजे अनुसंधान ।
श्वासगतीवरील हंस दोलायमान । साधनी पहावा ।।२३।।

जरी प्राणी निजला । किंवा असे जागला ।
हंस निजस्थितीला । सोडत नाही ।।२४।।

ही गती जाणावी । जाणोनी अखंडीत साधावी ।
तरी दासानुदासाची पदवी । प्राप्त होईल ।।२५।।

अनावश्यक हालचाल टाळावी । चैतन्याची गत अनुभवावी ।
साक्षात्काराची चवी चाखावी । जन्मसिद्ध हक्क जीवाचा ।।२६।।

साक्षात्कार सदोदित असतो । चमत्कार केंव्हातरी घडतो ।
परंतू माणसास चमत्कार आवडतो । हाच चमत्कार मनुष्यस्वभावाचा ।।२७।।

नादप्रकाशयुक्त आपुले जीवन । हेच नरदेहाचे वेगळेपण ।
नरजन्मात ठेविली सोय करून । परमात्म्याने ।।२८।।

जीव निसर्गत:च बहिर्मुख । प्रथम आवश्यक होणे अंतर्मुख ।
स्थिर होऊन जीवन उर्ध्वमुख । अशा पायऱ्या साधनेच्या ।।२९।।

अंतर्मुख होवोनी काय करणे । आत्म्याची चळवळ पहात बसणे ।
शांती अंगी बाणणे । हे साधण्यासाठी ।।३०।।

आत पहाता अनुभवी कळतो । जो साऱ्याचा अनुभव घेतो ।
आत बसून डोळ्यातून पाहतो । तो सर्वत्र ।।३१।।

डोळा म्हणजे खोबण । डोळा म्हणजे दुर्बीण ।
डोळा हा कॅमेरा असाधारण । देवाने दिलेला ।।३२।।

डोळा अधिक पाहण्याची शक्ती । कान अधिक ऐकण्याची शक्ती ।
पहाणे ऐकणे अखील कृती । शक्ती सर्वासी कारक ।।३३।।

शक्ती सर्वांतरी एक । शक्तीत नसतो फरक ।
स्त्री–पुरुष, गरीब श्रीमंतात एक । शक्ती कार्यरत ।।३४।।

शक्ती म्हणजे प्राणशक्ती । जेथे न चले कोणती युक्ती ।
जाता प्राण मागुती । कृती सर्व शून्य ।।३५।।

कोणता सत्य धर्म । सर्वांचे अंतरी जो सम ।
स्थूलदृष्टीने खरा धर्म । कळणार कैसा ।।३६।।

बाह्यवेष बाह्याचरण । धर्म न लेखावा यावरुन ।
जीवाचे ज्यावरी होय धारणपोषण । तो खरा धर्म जाणावा ।।३७।।

सकळ धर्मामाजी धर्म । स्वरुपी रहाणे हा स्वधर्म ।
श्रीसमर्थांनी सांगितले वर्म । समता व्हावया ।।३८।।

स्वरुप म्हणजे नव्हे रुप । अंतरी विद्यमान ते स्वरुप ।
निर्गुण निराकार चैतन्य स्वरुप । आहे दृष्यातीत ।।३९।।

आत नाद म्हणून नाद बाहेर । आत प्रकाश म्हणून प्रकाश बाहेर ।
आत रस म्हणून रस बाहेर । अनुभवता येतो ।।४०।।

इतर कोणताही नाद न लागता । नादानेच नाद घेता ।
नादरुप समाधी लागता । शिव कळतो ।।४१।।

नाद म्हणजे नाम भगवंताचे । प्रकाश हे रूप भगवंताचे ।
अविष्कार हे चैतन्याचे । अनुभव अंतरीचा ।।४२।।

साक्षात्कार होण्यासाठी । करावी लागे साधना मोठी ।
साधनी रमता मौज मोठी । अनुभवली संतांनी ।।४३।।



प्राण अपानाची होय घासणी । कंठात होतो प्रगट वन्हि ।
जीवनाची वाफ वर जाऊनी । साक्षात्कार सहस्रदलात ।।४४।।

साक्षात्कार होतो वरच्या हृदयात । शिरोहृदय ही संज्ञा वैद्यकशास्त्रात।
खाली काहीच नाही प्राप्त । परमार्थामध्ये ।।४५।।

जड जीवन अधोगामी । हलके जीवन उर्ध्वगामी ।
हलकी वस्तू वर नेहमी । जाते हे विज्ञान ।।४६।।

करतो आटापीटा प्रपंचाचा । जरी तो दैवाधीन अनुभव नित्याचा ।
अट्टाहास करावा कैवल्यप्राप्तीचा । हाच खरा पुरुषार्थ ।।४७।।

कैवल्य म्हणजे मोक्षच तो । जो जीवंतपणी मिळावा लागतो ।
तरीच मृत्यूनंतर मिळतो । ही वस्तुस्थिती ।।४८।।

जाणीव नेणीव रहित । नामोच्चाराशी तादात्म्यता प्राप्त ।
जीव होई उपाधीरहित । तोच मोक्ष सर्वथा ।।४९।।

नाम म्हणजे चैतन्य । चैतन्य नाम नसे भिन्न ।
नाम स्फुरद्रुप पावन । पवनात असे ।।५०।।

श्रोतृ वाणी चक्षुपैल । नाम असे सकलापैल ।
नामगर्जना होते ते स्थल । गगनचि असे ।।५१।।

हे नव्हे पंचभूतामधले आकाश । सोऽहंमधले जे अवकाश ।
तेचि ते चिदाकाश । चैतन्यरुप असे ।।५२।।

जेंव्हा शब्द खुंटोनी जातो । व्यवहार संपून जातो ।
तेंव्हाच साक्षात्कार घडतो । सदोदित ।।५३।।

व्यवहाराचा शेवट होतो । तिथे परमार्थ सुरु होतो ।
मग परमार्थचि मुख्य होतो । व्यवहार शून्य होवोनी ।।५४।।

आवश्यक गोष्टींचे स्मरण । अनावश्यक गोष्टींचे विस्मरण ।
व्यवहाराची ही व्याख्या जाण । सद्‌गुरुंनी सांगितलेली ।।५५।।

चैतन्याने चैतन्याद्वारा जेंव्हा । चैतन्याशी तादात्म्य होवून जेंव्हा ।
चैतन्याची अनुभूती येईल आम्हा । तोच नि:खळ परमार्थ ।।५६।।

चैतन्य व्हावे प्रधान । देह दृश्य व्हावे गौण ।
तरीच परमार्थसार पूर्ण । येईल हाता ।।५७।।

परमार्थ प्राप्तीसाठी । हिंडून न व्हावे कष्टी ।
ठायीच बैसोन जगज्जेठी । एकचित्ते आवडी आळवावा ।।५८।।

ठाय तो कोणता । देहाच्या निरसने तो पावता ।
मी–माझे नाठवे चित्ता । अवस्था विरक्तीची ।।५९।।

अहंभाव खलास झाला । तो देवचि होऊन ठेला ।
'मी'पणे वेगळेपणा निर्माण झाला । मायेचा प्रभाव ।।६०।।

जोवरी संग अहंकाराचा । नाही अनुभव देवत्त्वाचा ।
खरा त्याग तो अहंतेचा । उलट जावे मुळाकडे ।।६१।।

जे उत्पन्न झाले ते नाशिवंत । तेच पुनरपि दृष्य रुपात ।
असे चक्र अखंडित । चालले असे ।।६२।।

कर्म, वासनेमुळे जन्म । संसारी पुन्हा कर्म ।
क्रिया घडली की कर्म । लागतेच पाठीशी ।।६३।।

कर्तेपणाची जाणीव ठसली । कर्ता म्हणून क्रिया जडली ।
क्रिया जडल्याने अखंडित राहिली । शृंखला कर्म, जन्ममरणाची ।।६४।।

म्हणावे राम कर्ता । मी केवळ अकर्ता ।
तरीच क्रिया कर्माचा पुरता । पाश तुटेल ।।६५।।



मी–तू ही व्यवहाराची सोय । विवेके शोधावा खरा उपाय ।
धरावे श्रीसद्‌गुरुंचे पाय । ज्ञानप्राप्तीसी ।।६६।।

संतांचे अवतार कलीयुगात । तेचि देव निर्विवाद ।
प्रतिमा, मूर्ती निमित्तमात्र । प्रचिती रोकडी संतांजवळी ।।६७।।

ज्यांच्या दृष्टीस नाही सृष्टी । संथ झाली ज्यांची वृत्ती ।
शाश्वत अशाश्वत गोष्टी । निवडून अलिप्त सृष्टी वेगळे ।।६८।।

संत म्हणून कपाळावर । नाही चिठ्ठी ना दारावर ।
पूर्वपुण्य साठून वेळ आल्यावर । होते संतभेटी ।।६९।।

संतभेट झाल्यावरी । न उघडावी आपुली वैखरी ।
आज्ञापालनाची हवी तयारी । शंका न घेता ।।७०।।

संशय हा अध्यात्मास घातक । याहून मोठे नाही पातक ।
संशयाचे पर्यवसान एक । विनाश आत्म्याचा ।।७१।।

कोणतीही न घ्यावी शंका । हालवावा गुरुचा पंखा ।
एके ठिकाणी भाव पक्का । शेवटपर्यंत असावा ।।७२।।

अचूक मार्गदर्शन मिळणे । याचे महत्त्व जाणणे ।
जाणून मार्गावरी चालणे । बिनचूक ।।७३।।

क्षणोक्षणी असावा विचार । कैसा गाठता येईल परपार ।
आत्मा धर्म नाम आचार । सदाचार संतांचा ।।७४।।

नामाचा अपार महिमा । ज्यासी खरोखरीच नाही सीमा ।
जन्म गोड यासाठीच आम्हा । श्रीतुकाराममहाराज सांगती ।।७५।।

करावीच नित्य हरिभक्ती । उपयोगी येईल शेवटी ।
यमापासून सोडवील ती । निश्चितपणे ।।७६।।

यमानी सांगितले यमदूतांसी । सत्ता नाही तेथे तुम्हासी ।
जेथे हरिकथा सुंदरसी । घोष चालला नामाचा ।।७७।।

हरिकथा म्हणजे देवाचे ध्यान । काही नाही लागत साधन ।
देवासमोर बसावे ठाण मांडून । विसर सर्व गोष्टींचा ।।७८।।

नवविधा भक्ती जाणावी । जी मानवेल ती करावी ।
सातत्य अखंडता राखावी । म्हणजे प्राप्ती निश्चित ।।७९।।

श्रेष्ठ श्रेष्ठ गुरुभक्ती । सद्‌गुरुयोगे देवप्राप्ती ।
गुरु अलगद पार करिती । श्रेष्ठ गुरुभक्तासी ।।८०।।

शिष्याने व्हावे सद्‌गुरुंशी समरस । सद्‌गुरु असतात चैतन्याशी समरस ।
म्हणजेच आपलेही कार्य सिद्धीस । सहजची जाते ।।८१।।

अखिल जगाच्या बुडाशी । एक चैतन्यची असे प्रकर्षी ।
चेतना चालवी जीवासी । म्हणोन सर्व हालचाल ।।८२।।

विषय इंद्रिये जड ओळखणे । हीच विरक्तीची खूण जाणणे ।
चैतन्याकडे वृत्ती वळविणे । याचेच नाव भक्ती ।।८३।।

भक्त असतो उदास । उदास म्हणजे नाही भकास ।
ज्यास सदैव उत्कर्षाची आस । नुरले बंध आशेचे ।।८४।।

विभक्त नव्हे तो भक्त । भक्त नव्हे तो विभक्त ।
विभक्ती प्रत्यय होऊनी नष्ट । आत्मप्रत्यय यावा ।।८५।।

व्हावे मन समर्पण । अस्तित्त्व करावे शून्य ।
म्हणजेच देवाचे दर्शन । नक्कीच होईल ।।८६।।

मन म्हणजे काय । त्याची नेमकी व्याख्या काय ।
सांगे आमुची सद्‌गुरुमाय । अधिकारवाणीने ।।८७।।



जीवाचे इंद्रियाद्वारा शरीरामार्फत । दृष्याशी तादात्म्य होत ।
हीच मनाची व्याख्या होत । इंद्रिय अदृश्य अकरावे ।।८८।।

मन हे न परिमाण । हा असे परिणाम ।
मनास लावावा लगाम । उन्मन होण्यासाठी ।।८९।।

हे ज्ञान वेगळे । गुरुकृपेवीण न आकळे ।
कळ कळताचि आकळे । खरे ज्ञान ।।९०।।

ज्याच्यामुळे ज्ञान । ज्याच्यामुळे अज्ञान ।
त्याचे ज्ञान म्हणजे ज्ञान । ही व्याख्या ज्ञानाची ।।९१।।

ज्याच्यामुळे ज्ञान । ज्याच्यामुळे अज्ञान ।
त्याचे अज्ञान म्हणजे अज्ञान । ही व्याख्या अज्ञानाची ।।९२।।

व्यवहारात पहिली बाराखडी 'अ' ची । शेवटची 'ज्ञ' ची ।
म्हणजे वट्ट अज्ञची । साक्ष असे ।।९३।।

पोट भरावयासाठी । व्यवहारज्ञान असावे गाठी ।
परि ईश्वरप्राप्तीसाठी । लागते ईश्वरीज्ञान ।।९४।।

जे जन्मताच ज्ञानी असतात । ते ईश्वरीज्ञान प्रगट करतात ।
सामर्थ्य या ज्ञानात । अफाट आहे ।।९५।।

डोळसपणे परमार्थाकडे पहावे । परमार्थ हे शास्त्र आहे ।
परमार्थात आधार आहे । प्रत्येक गोष्टीला ।।९६।।

परमार्थासाठी वेळ काढावा लागतो । असे आपण डोक्यात ठेवतो ।
मात्र जो वेळ फुकट जातो । तोच वेचावा परमार्थासाठी ।।९७।।

परमार्थ म्हणजे काय करणे । अखंड अनुसंधान ठेवणे ।
चेंडू खाली पडू न देणे । रामनामाचा ।।९८।।

परमार्थ अंतरीची गोष्ट । उगीच न करावा बोभाट ।
अंतरंगचि सर्वदा श्रेष्ठ । न जावे बाहेर भुलुनी ।।९९।।

सर्व महत्त्वाचे आहे आत । हाच सर्वांचा लक्ष्यार्थ ।
देव भक्तीही आत । पसारा अनावश्यक वाढे भ्रम ।।१००।।

म्हणोन प्राण उपासावा । निजदेव कोणता ओळखावा ।
तरीच पावेल विसावा। आपणासी ।।१०१।।

देहास विश्रांतीची गरज । मन बुद्धीसही विश्रांतीची गरज ।
तशीच प्राणासही आहे गरज । विश्रांतीची ।।१०२।।

प्राणास विश्रांती देण्याचे । सामर्थ्य जवळी सद्गुरुंचे ।
प्राण जाण्याआधी ओळखायचे । नंतर उपयोग काय ।।१०३।।

जीवास विसावा नामात । कळेल केवळ सद्गुरुधामात ।
नाठवे तरी आठवण देतात । तेच सद्गुरु ।।१०४।।

आठव तो ब्रह्म । नाठव तो भवभ्रम ।
मायेचे पटल कायम । असे आच्छादलेले ।।१०५।।

प्रपंचाची झापड पडली। मूळ स्वरुपाची ग्लानी आली ।
मूळ शक्तीची ओळख विसरली। तिचाच अंश असून ।।१०६।।

वेगळेपण करण्या दूर । होतो संतांचा अवतार ।
जेथून आलो ते घर । सद्गुरु दाखवतात ।।१०७।।

त्यासाठी सर्वस्व आपुले । सद्गुरुचरणी पाहिजे अर्पिले ।
सर्वस्व म्हणजे समजले । पाहिजे नेमके ।।१०८।।

स्व म्हणजे सर्व । सर्व म्हणजे स्व।
स्वत्त्व म्हणजे सर्व । हे लक्षात घ्यावे।।१०९।।



ज्याने ‘स्व’ चा त्याग केला । त्याने त्यागिले सर्वस्वाला ।
परमात्मा येई भेटीला । अशा त्यागमूर्तीच्या ।।११०।।

जेंव्हा सर्वस्वाचा वीट येतो । त्याच विटेवरी परमात्मा उभारतो ।
भक्तास येऊन भेटतो । अलिंगन देऊनी ।।१११।।

यासाठी प्राणोपासना करावी । श्वसनाची गती सूक्ष्म व्हावी ।
हळूहळू साधना साधावी । कोणतीही गडबड न करता ।।११२।।

नासापुटोनी जो वारा । बाहेर वाहतो अंगुळे बारा ।
तोच आत घालावा माघारा । श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगती ।।११३।।

निशिदिनी तोचि ध्यास धरावा। बहुयत्ने अभ्यास करावा ।
साधन करुनिया वळवावा । आत्माराम (श्रीचिमडचे महाराज) ।।११४।।

गेलेला श्वास परत येईल । याची खात्री कोण देईल ।
म्हणोन प्रत्येक श्वास जपेल । त्यास साधेल अटकळ ।।११५।।

मनाची गती श्वसनावर । श्वसनाची गती मनाच्या गतीवर ।
अवलंबून आहे म्हणून आवर । मनास घालावा ।।११६।।

मन स्थिर होण्यासाठी । नियंत्रित व्हावी लागे श्वसनाची गती ।
श्वसन सूक्ष्मतर सूक्ष्मतम यासाठी । व्हावे लागे ।।११७।।

मन स्थिर होणे । हाचि मोठा अनुभव साधणे ।
मग मनाचे उन्मन होणे । आहे सोपे ।।११८।।

नाम घेता अनुभव येतो । आपला प्रयत्न कमी पडतो ।
नामातचि नामी प्रगट होतो । अंतर्यामी ।।११९।।

नामाच्या योगाने । पेशीन् पेशी बदलतात कालांतराने ।
जीवास सोस जडतो सातत्याने । नामाची गोडी लागता ।।१२०।।

नामतारक हा । प्रचितीचा असे डंका ।
काही धरु नको शंका । मामांनी सांगितले ।।१२१।।

जसा मोरावळा कोचतात । तसे सर्वांगी बिंबावे नाम आत ।
अनुभव घेतला अवतारात । प्रत्यक्ष मामांनी ।।१२२।।

मनास घट्ट धरावे । ऐसे सामर्थ्य आघवे ।
एका नामाच्याच ठायी स्वभावे । नक्कीच आहे ।।१२३।।

नाम स्फुरद्रुप आहे । नाम हे स्वसंवेद्य आहे ।
नाम चैतन्यरुप आहे । गतीरुपही ।।१२४।।

काय सांगते विज्ञान हे । प्रत्येक पदार्थास गती आहे ।
अध्यात्मशास्त्र त्यापुढचे आहे । कसे ते पहा ।।१२५।।

गतीमुळे पदार्थ आहे । म्हणून पदार्थास गती आहे ।
सर्व जग गतीमान आहे । हे महत्त्वाचे सूक्ष्म ज्ञान ।।१२६।।

गतीशिवाय पदार्थ नाही । स्पंदाशिवाय गती नाही ।
श्वसनाविना स्पंद नाही । नाही जीवाशिवाय श्वसन ।।१२७।।

याचा अर्थ उघड आहे । आहे ते सर्व सजीव आहे ।
सर्व जग चैतन्यरुप आहे । काहीच नाही निर्जीव ।।१२८।।

नामाचे स्मरण ही गती । विस्मरण हीच अधोगती ।
हे न जाणता आपली गती । काय होईल ।।१२९।।

गुरुपदी स्थिर होता मन । पडते नेत्रात गुरुकृपांजन ।
गुरुसेवा-श्रेष्ठ सेवा साधून । प्राप्त गुरुसुख ।।१३०।।

सेवा म्हणजे काय । त्याची व्याख्या काय ।
सांगितला मामांनी उपाय । खऱ्या सेवेचा ।।१३१।।



से म्हणजे आठवण । वा म्हणजे उत्तम ।
उत्तम आठवण म्हणजे नाम । भगवंताचे ।।१३२।।

साधना करीत असता । विचारांची गडबड होता ।
काय उपाय यावरुता । करावा पहा ।।१३३।।

विचारांनो येताय या । विचारांनो बसताय बसा ।
विचारांनो जाताय जावा । हीच ट्रीटमेंट द्यावी ।।१३४।।

निसर्गाने विचार येतात । पण निसर्गाने न जातात ।
त्यावरी अशी मात । करावी लागे ।।१३५।।

निसर्गाने केर येतो । तो आपोआप न जातो ।
मुद्दाम काढून टाकावा लागतो । घर स्वच्छ होण्यासाठी ।।१३६।।

स्वच्छ नि:खळ परमार्थ । साधावा आपण यथार्थ ।
नेमका तत्त्वत: सार्थ । श्रीदादांनी कथिला ।।१३७।।

सर्व कळेल अभ्यासाने । वृत्ती वळेल नित्यनियमाने ।
निजरुप दिसेल प्रयत्नाने । प्रयत्नांती परमेश्वर ।।१३८।।

चिमड संप्रदायाचे साधन । म्हणजे वायुसाधन ।
निश्चित त्यातचि समाधान । एकमेव उद्दिष्ट नरदेहाचे ।।१३९।।

यातील उत्तम ते श्रीदादांचे । जे चुकले असेल ते माझे ।
तत्त्वज्ञान श्रीसद्गुरुंचे । अनुभवातून प्रगट ।।१४०।।

इति श्रीदासरामचरित्र । गुरुचरणीची गंगा पवित्र ।
दीन अर्पितो तुलसीपत्र ।
तत्त्वज्ञान वर्णननाम द्वादशोध्याय ।।१२।।

****

।। श्रीराम ।।

# अध्याय-(१३)- निर्याणप्रसंग वर्णन

मन हेचि तुलसीपत्र । वाङ्मयसेवा व्हावी पात्र ।
दासाचे अस्तित्त्व किंचित्‌मात्र । वेगळे न रहावे ।।१।।

आत्तापर्यंत आपण । ऐकले दादांचे महिमान ।
सार्थ वर्णन माझेकडून । कधीच होणार नाही ।।२।।

जे दादांनी स्फुरविले । तेचि ओवीत गुंफले गेले ।
त्यांच्याच सत्तेने सर्व झाले । हा विश्वास अंतरी ।।३।।

देह मिळाला देवदयेने । देह चाले देवाच्या इच्छेने ।
तेथे वाऊगे अभिमानाने । आपण का शिणावे ।।४।।

जे झाले ती महाराजांची इच्छा । जे होत आहे ती महाराजांची इच्छा।
जे होईल तीही महाराजांची इच्छा । हीच धारणा आमुची ।।५।।

बारा विविध अध्यायात । दादांचा अधिकार अद्‌भुत ।
पाहता आपण कृतकृत्य । झालो असे वाटे ।।६।।

दादांचा अवतार विलोभनीय । म्हणोनीच तो अद्वितीय ।
दादांचे चरित्र अनाकलनीय । असे सदा ।।७।।

या चरित्राचा लक्ष्यांश । त्याचा झाला असेल समावेश ।
त्या लक्ष्यांशाकडे लक्ष । रहावे ही प्रार्थना ।।८।।

दादांची अशी थोरवी । जाणून घ्यावी आघवी ।
त्यांच्या दासानुदासाची पदवी । प्राप्त व्हावी ।।९।।

दादांनी सांगत रहावे । आपण ऐकतचि रहावे ।
ऐकून समाधान पावावे। तरी इच्छा न संपे ।।१०।।



सद्‌गुरुंनी जे सांगितले । ते आणि तेच पाहिजे केले ।
जेणे जीवन आपुले । सार्थकी लागेल ।।११।।

दादा अनेकांचे आधार । दादा खरोखरीच दयासागर ।
माय-पिता सगोत्र अपार । दादाच असती ।।१२।।

दादा म्हणजे ज्ञान । दादा म्हणजे विज्ञान ।
जेथे ज्ञान आणि विज्ञान । दोन्ही स्थिरावती ।।१३।।

दादा म्हणजे परमार्थ । दादांचे तत्त्वज्ञान यथार्थ ।
सर्वथा शक्ती समर्थ । दादा आपुले ।।१४।।

कसा करावा व्यवहार । कसा पावावा पैलपार ।
सांगे अधिकारवाणी समग्र । आमुच्या दादांची ।।१५।।

सांगणारे बहु असतात । आचरणारे न दिसतात ।
दादा आपणास दाखवित । बोटास धरुनी ।।१६।।

दादा म्हणजे सहजता । दादा म्हणजे विशालता ।
दादा म्हणजे परमोच्चता । अध्यात्मातील ।।१७।।

दादा आपुले सद्‌गुरु । दादा आपुले करुणाकरु ।
दादा म्हणजे सर्वेश्वरु । तारु भवपार होण्यासी ।।१८।।

दादा परमार्थाचा कळस । दादांचे वागणे सालस ।
आपण न करावा आळस । कदाकाळी ।।१९।।

दादा भक्तीमार्गाचे सोपान । दादा आपुले निधान ।
दादा म्हणजे अखंड समाधान । प्रसन्न सर्वदा ।।२०।।

किती जीव वाट चुकलेले । दादांचे चरणी लागले ।
त्यांचे मन न गुंतले । पुन्हा इतरत्र ।।२१।।

दादांचा असामान्य अधिकार । मान्य करिती संतवर ।
आपुले पुर्वपुण्य जबर । म्हणोनीच दादा भेटले ।।२२।।

सद्‌गुरुंचा शोध घेण्यासाठी । कराव्या लागतात अनेक खटपटी ।
देहास करावे लागते कष्टी । सद्‌गुरुप्राप्तीसी ।।२३।।

आपणास सद्‌गुरु घरबसल्या मिळाले । म्हणोन महत्त्व न वाटले ।
आता तरी पाहिजे वळले । दादांच्या विषयाकडे ।।२४।।

किंमत प्राप्त वस्तूची। नाहीच कधी कळायची।
किंमत अप्राप्त वस्तूची। करावी तेवढी थोडी असे ।।२५।।

आता दादांनी ठरवले । कार्य आपुले पूर्ण झाले ।
निजधामास जाण्याचे आले। दिवस आता ।।२६।।

परंतु ही घटना । तडकाफडकी घडेल ही कल्पना ।
कोणाच्याच न शिवली मना । जो तो आश्चर्य करे ।।२७।।

सर्व अवतारी संतमहंत । सहज सूचक शब्दात ।
सुचवित ते कळण्याइतपत । आपुली बुद्धी नसे ।।२८।।

आपणास वाटे हे सहज बोलले । महत्त्व द्यावे असे न वाटले ।
परि सहजातचि वर्म दडले । हे कळेना ।।२९।।

आण्णांना कित्येकदा । प्रश्न विचारीत दादा ।
चंदा आपल्या घरी आता । कधी जायचे ।।३०।।

आण्णा म्हणायचे दादांना । हे आपुलेच घर पहा ना ।
तरीही दादा पुन:पुन्हा । तोच प्रश्न विचारीत ।।३१।।

तो प्रश्न ऐकताना । चित्तात चर्र होई आण्णांना ।
तीव्रता या प्रश्नाची त्यांना । नक्कीच जाणवे ।।३२।।



नानाकाकांना पूर्वी एकदा । काय म्हणती दादा ।
मी केंव्हा गेलो याचा पत्ता । लागणार सुद्धा नाही ।।३३।।

दोन हजार एक इसवीसन । श्रवणाचा महिना श्रावण ।
हरिपाठावरील कीर्तन । प्रतिवर्षाप्रमाणे ।।३४।।

हरिपाठ ज्ञानाईंचे शेंडेफळ । सामावले अद्‌भुत अध्यात्मबळ ।
त्यातील नेमके सूत्र सकळ । दादांनी वर्षानुवर्षे मांडले ।।३५।।

तीन तपावरी वर्षे तीन । झाली आता करुया विराम ।
सूत्र चंद्रशेखरकडे सोपवून। आपण निवांत व्हावे।।३६।।

कीर्तनव्रत मामांपासूनचे । सहज सांभाळतील आण्णा याचे ।
आणि महाराजांच्याही सत्तेचे । दादांना त्रिकालज्ञान ।।३७।।

दादांचे ज्येष्ठ चिरंजीव आण्णा । सर्वदा नम्र भावना ।
मोठेपणा देतात सर्वांना । कमीपणा सोसून ।।३८।।

सर्वांची विचारपूस करणे । मग आपल्याकडे पहाणे ।
कधी कोणास न दुखावणे । हे ब्रीद आण्णांचे ।।३९।।।

दादांच्या कीर्तनाची उत्तुंगता । साथीस आवश्यक समर्थता ।
तैशीच समयसूचकता । एकाग्रता अवधान ।।४०।।

सर्व हे आण्णांजवळ । सहवासाचेही लाभले बळ ।
चित्तात बिंबले सर्वकाळ । नित्यसमाधी हरिनाम ।।४१।।

कीर्तनात जी अवतरणे आली। ती अनुक्रमे भराभर सगळी ।
कित्येकदा रात्री जेवणाचे वेळी । आण्णा सांगत दादांना ।।४२।।

असे आदर्श श्रवण । आणि तसेच चिंतन ।
नित्य योग्य अनुसंधान । विशेषता आण्णांची ।।४३।।

चंद्रशेखर पुढे कीर्तनातून । नवनीत देईल काढून ।
असे सत्य दादांचे वचन । ऐकले बहुतांनी ।।४४।।

दादांची करिता सेवा । देहभाव आपुला विसरावा ।
म्हणोनीच मिळालासे ठेवा । जन्मोजन्मींचा ।।४५।।

दादांची सेवा आपुल्यापरीने । केली अनेकांनी निष्ठेने ।
उल्लेख करिता कितीतरी पाने । वाढतील चरित्राची ।।४६।।

ज्यांनी ज्यांनी सेवा केली । ती सर्व मंडळी धन्य झाली ।
प्रत्यक्ष देवाचीच सेवा घडली । यात संशय नाही ।।४७।।

आतेभाऊ श्रीदादांचे । भरतकाका नाव त्यांचे ।
भोळे गरीब स्वभावाचे । येत मुक्कामासी ।।४८।।

त्यांनीही दादांची सेवा केली । श्रीरामांची योग्यता जाणली।
न बोलता समज दिसली । सेवेतून ।।४९।।

ते दादांचे पाय चेपायचे । दादांना कसेसे व्हायचे ।
भरत आता बास म्हणायचे । तरी थांबून पुन्हा सेवारत ।।५०।।

श्रीराम–भरत प्रेम विख्यात । श्रीराम–भरत भेटही विख्यात ।
चरणसेवाभावही आदर्शवत । तसेच नाते हेही ।।५१।।

असो दादांनी पक्के मनात । ठरविले निर्याणाबाबत ।
तिथी दिवस इच्छित । पूर्णविराम कार्याचा ।।५२।।

श्रावण शुद्ध चतुर्थी दिनी । दादा निमग्न होते नेमी ।
फोटो त्यादिवशीचा नामी । आला शिरुकाकांनी काढलेला ।।।५३।।

त्यादिवशी सर्व नित्यक्रम । झाले न कळले वर्म ।
सायंकाळी नित्यकीर्तन । मंदिरात झाले ।।५४।।



श्रीतात्यासाहेब महाराजांनी । पुढे मामा–दादांनी ।
वेड कीर्तनाचे लावूनी । कीर्तनमय केले ।।५५।।

आम्ही आहोत वेडे । परि गेलो जीवशिवापलीकडे ।
शब्द बोलके केवढे । आहेत सांगा ।।५६।।

मंगळवारी रात्रभर । घडला दादांना जागर ।
पित्ताने जळजळ फार । होत होती ।।५७।।

बुधवारी सकाळी दूध घेतले । परांजपे डॉक्टरांना बोलावले ।
त्यांनी तपासून दिले । यथायोग्य औषध ।।५८।।

सकाळपासून खाल्ले नसल्याने । अशक्तपणा अंगात असल्याने ।
दादा ग्लानीत शांतपणे । पहुडले होते ।।५९।।

संत थोर निग्रही । देहयातना सर्वही ।
सोसतात समर्थ असूनही । परी देही विदेहपण ।।६०।।

निग्रह कसा संतांचा । आपणास न पेलायचा ।
निग्रह पाहता आश्चर्याचा । धक्का बसे ।।६१।।

निग्रहावरुन एक । गोष्ट आठविली यकायक ।
ती ऐकूनी नि:शंक । पटेल साक्ष आपणासी ।।६२।।

पूर्वी बरेच वर्षे सवय होती । दादांना तपकीर लागत होती ।
परी ती ताब्यात होती । सवय त्यांच्या ।।६३।।

आपण सवयींच्या ताब्यात असतो । त्यामुळे मार्ग चुकतो ।
आणि काळही व्यर्थ जातो । बराच आपुला ।।६४।।

मन दादांच्या ताब्यात होते । तरीही ते म्हणत होते ।
मनापासून मला वाटते । तपकीर सुटावी ।।६५।।

एवढी तपकीर सुटल्यावर । मला बरे वाटेल फार ।
मोकळा यातून खरोखर । होईन मी ।।६६।।

अचानक एके दिवशी । ठरविले पक्के मनाशी ।
ठेवून टाकली डबी जशी । पाहिलेही नाही पुन्हा ।।६७।।

त्यादिवसापासोन । कधी न त्याची आठवण ।
निश्चयाचे बळ दिसोन । आले असे ।।६८।।

विषय निघाला असा । येथे कसा आपैसा ।
आता पाहू घटना कशा । घडल्या पुढे ।।६९।।

बुधवारी नागपंचमी । दिवस होता नामी ।
महाराजांच्या मात्र मनी । काही वेगळेच ।।७०।।

सायंकाळी सांगलीवाडीला । आण्णा जाणार होते प्रवचनाला ।
त्यांना दादांनी अंगारा लावला । नेहमीप्रमाणे ।।७१।।

आण्णांनी विचारले दादांना । मी प्रवचनासी जाऊ ना? ।
अवश्य जा असे त्यांना । दादांनी सांगितले ।।७२।।

तू परत आल्यावरी । जावू आपण मंदिरी ।
कीर्तनसेवा करु निर्धारी । काही झाले तरी ।।७३।।

दादा अगदी सहज बोलले । आण्णा प्रवचनाहून आले ।
दादांना उठवू लागले । कीर्तनासाठी ।।७४।।

कर्णेकर आणि आण्णा । धरुन उठवू लागले दादांना ।
पायचि पुढे पडेना । काय करावे ।।७५।।

मागे खुर्ची सरकविली । पायात ताकदच नव्हती त्यावेळी ।
कीर्तनाची तरी वेळ झालेली । काय करावे ।।७६।।



तुम्ही रहावे पडून । ठीक नाही प्रकृतीमान ।
वाचतो पडवीत तुमचेच कीर्तन । आण्णांनी सांगितले ।।७७।।

दादा शांत निजले । नानाकाका दादांजवळ बसले ।
कीर्तनवाचन सुरु झाले । निश्चय नेमाचा ।।७८।।

दादा जरी निजले होते । अनुसंधान कीर्तनाचेच होते ।
एकसारखे विचारित होते । कीर्तनास केंव्हा जायचे ।।७९।।

नानाकाका सांगत समजावून । आण्णा वाचतो तुमचेच कीर्तन ।
तुम्हास उठणेही अशक्य म्हणून । कीर्तननेम सुरु आहे ।।८०।।

कीर्तन होईपर्यंत । 'कीर्तन कीर्तन' शब्द मुखात ।
अखंड कीर्तनाचे अनुसंधानात । होते हरिकीर्तननिष्ठ ।।८१।।

श्री व्ही.के.काका आरती घेऊन । आले दादांनी घेतले दर्शन ।
तोवर पंचपदी सर्वजण । म्हणू लागले ।।८२।।

इतक्यात गडबड झाली । दादांनी मान वर केली ।
श्री नानाकाकांनी मानेखाली । दिला आधार हाताचा ।।८३।।

काय होत आहे ते कळेना । दादांचे ठीक वाटेना ।
हाक मारली आण्णांना । काळजी मनात ।।८४।।

फोन केले भराभर । आले परांजपे डॉक्टर ।
वैद्य डॉक्टरही येऊन हजर । झाले तपासणीसाठी ।।८५।।

डॉक्टरांनी ठोके तपासले । चेहऱ्यावर काहीच न दिसले ।
म्हणाले हृदयक्रिया संथ चाले । अवघड दिसते ।।८६।।

नानाकाकांनी धाडस करुन । विचारले ॲडमिट करुया का म्हणून ।
डॉक्टरांनी धरीले मौन । काही क्षण ।।८७।।

म्हणाले काही उपयोग नाही । हृदयाची धडधड होत नाही ।
संथ होत होत हृदयक्रियाही । झाली बंद ।।८८।।

याचा अर्थ काय होता । दादांनी देह ठेवला होता ।
क्षणात सगुणरुपातून आता । दादा ब्रह्मरुप झाले ।।८९।।

श्वासाचे केले रोधन । ही समाधीच संजीवन ।
नाही दिले काही कळोन । अधिकारी योगी ।।९०।।

शके एकोणीसशे तेवीस । श्रावण शुद्ध षष्ठीस ।
आत्मज्योत झाली समरस । श्रीसद्‌गुरुपदी ।।९१।।

सद्‌गुरुंची तिथी षष्ठी । दादांनीही साधिली षष्ठी ।
सद्‌गुरुंची झाली भेटी । खऱ्या अर्थाने ।।९२।।

सायंकाळी सात चाळीस । वेळ निवडली निर्याणास ।
नित्यकीर्तन येते मध्यास । वेळ नामस्मरण बुक्क्याची ।।९३।।

बुक्का हा प्रसाद भगवंताचा । भाळी प्रेमाने लावावयाचा ।
नित्य सद्‌गुरुस्मरणाचा । पावन क्षण ।।९४।।

काय करावे ते कळेना । कोणास काही सुचेना ।
कोणाचाच विश्वास बसेना । या परिस्थितीवरी ।।९५।।

आत्तापर्यंत जेंव्हा जेंव्हा । काहीही दादांना झाले तेंव्हा ।
करुन उपाययोजना । बरे वाटले ।।९६।।

यावेळीही आम्ही जवळच होतो । दादांकडे पहातच होतो ।
परी न लागला मागमूस तो । या गोष्टीचा ।।९७।।

दादांचा दृढ निश्चय । अवस्था केवळ अनिर्वाच्य ।
देहाचा सोडला आश्रय । निजसत्तेने ।।९८।।



ही बातमी सांगायचे । धाडस कोणी करायचे ।
कोण पुढे धजायचे । असे झाले ।।९९।।

हात पाय गळाटले । डोके सुन्न झाले ।
आपण कोठे आहोत हे विसरले । सर्व शून्य वाटे ।।१००।।

सांगण्याचे धैर्य न झाले । तरी चेहऱ्यावरी दिसले ।
ज्याने त्याने चेहरे वाचले । प्रत्येकाचे ।।१०१।।

कोण कोणास सांगणार । जो तो आपुल्यापरी चूर ।
म्हणे आता सर्वस्वसार । संपले आपुले ।।१०२।।

वार्ता हाहा म्हणता पसरली । अनेकांनी दिंडी गाठली ।
जरी ऐकून शक्ती खुंटली । गेल्याशिवाय रहावेना ।।१०३।।

डोळे अश्रूंनी भरले । हुंदके अनावर झाले ।
मौनातूनच भाव समजले । एकमेकांना ।।१०४।।

चेहरा अश्रूंनी भरला । अश्रूंच्या धारा लागल्या ।
जणू पाटची वाहू लागला । दु:खाश्रुंचा ।।१०५।।

जरी हा पाट अखंड वाहे । तरी तो कृष्णेस मिळोन जाये ।
रडरडून आवरता नये । शोक विरहाचा ।।१०६।।

अंगण खचाखच भरले । सारे एकमेकांस मिठी मारु लागले ।
आता सुख दु:ख आपुले । वाटले कोणास सांगावे ।।१०७।।

जेंव्हा आम्हास दु:ख झाले । किंवा जरी सुख वाटले ।
ते लडिवाळपणे सांगितले । हक्काने दादांना ।।१०८।।

हक्क आईवरी लेकराचा । तैसाच लेकरावरी आईचा ।
धागा निर्व्याज प्रेमाचा । अतूट पण अदृश्य ।।१०९।।

दादांनी दुःख ऐकले । उपाय सांगून निवारले ।
सुखाचेही वाटेकरी झाले । ते शतगुणित होण्या ।।११०।।

आमचे व्यावहारिक जीवन । तैसेच पारमार्थिक जीवन ।
सर्व जगलो स्मरण करुन । नव्हे प्रत्यक्ष साक्षीने ।।१११।।

दादांनी आमुचे लाड केले । सारे चोचले पुरवले ।
सहज सुकर प्रवाहीत राहिले । आयुष्य आमुचे ।।११२।।

प्रत्येकास दर्शन घेता । आठवल्या स्मृती क्षण न लागता ।
दादांची विराट विश्वबंधुता । अतर्क्य असे ।।११३।।

आण्णांचे मनी विचार । हे काय उभे ठेले समोर ।
ध्यानी मनी कधीच विचार । असा नव्हता ।।११४।।

दादा बसलेले होते । म्हणून सर्व पार पाडत होते ।
जरी ते दिसत नव्हते । काही करताना ।।११५।।

आता हे कसे पेलणार । माझेवरी संपूर्ण आला भार ।
दादा तुम्हीच यातून पार । करा सत्ता तुमची असे ।।११६।।

काही वेळाने आप्पाकाका आले । आण्णांजवळ येवून बसले ।
दादा म्हणून कोणास म्हणाले । आता हाक मारणार? ।।११७।।

तात्याकाका यायचे राहिले । ते पुण्यास होते गेले ।
त्यांचे काही काम निघाले । पुणे येथे ।।११८।।

काका काकू नुकतेच। चार दिवसांपूर्वीच ।
पुण्यास गेले तेंव्हा काहीच । असे घडेल नाही वाटले ।।११९।।

त्यांना फोनवरुन कळविले । ताबडतोब येण्यास निघाले ।
सांगलीत येईपर्यंत वाजले । पहाटेचे तीन ।।१२०।।



अनेक भक्तांनाही फोन केले । मुंबई पुण्यासही कळविले ।
मोठे धाडस करावे लागले । ही वार्ता सांगण्यासी ।।१२१।।

सकाळपर्यंत येणार काहीजण । त्या भक्तांना मिळण्या दर्शन ।
पुढले यथायोग्य सारे आपण । त्यानंतरच करु असे ठरले ।।१२२।।

दर्शनाच्या सोयीसाठी मंदिरात । कोटणीसमहाराजांचा फोटो जेथ ।
त्याखाली कॉटवरी ठेवित । कलेवर श्रीदादांचे ।।१२३।।

श्रीहनुमंतसद्गुरु माऊली । दादांवरी अविरत सावली ।
पाठीराखी अधिकारी शोभली । चिमडसंप्रदायात ।।१२४।।

स्त्री–पुरुष आम्ही मुले । भोवती सारे तटस्थ उभारले ।
वातावरण गंभीर निश्चल झाले । पराधीनता जाणवली ।।१२५।।

देह ठेविला हे मनास । पटवून द्यावे लागले सावकाश ।
दादांना पाहता न वाटे कोणास । खरोखरीच असे आहे ।।१२६।।

शांत निजले आहेत कॉटवर । उठतील काही वेळानंतर ।
भोळी आशा मानवास फार । गुरफटून ठेवते ।।१२७।।

देह ठेविल्यावरही विशेष । घाम येत होता कपाळास ।
ओला होत होता कापूस । सकाळपर्यंत ।।१२८।।

बराचवेळ दादांचे शरीर । न पडले गार ।
याचेही आश्चर्य फार । वाटले आम्हा ।।१२९।।

हे कोणत्या शास्त्रात बसते । परि प्रत्यक्ष दिसत होते ।
निसर्गाचे नियम लागू नव्हते । सत्ता संतांची ।।१३०।।

नियम फार मागे होते । दादा नियमांच्या पुढे होते ।
अनाकलनीय असे असते । संतांचे अमरत्त्व ।।१३१।।

काही वेळानंतर । टोपी घातली डोक्यावर ।
सर्वांगास लावले अत्तर । नामही लावला ।।१३२।।

गजाभाऊ केळकर जोशीकाका । भगवद्‌गीता म्हणती देखा ।
सुनील भाव धरुनि निका । म्हणे श्रीगुरुलिंगगीता ।।१३३।।

बराच वेळ पुढे सरला । अनेक भक्त येवून गेले दर्शनाला ।
पाच एक हजार माणसांनी घेतला । लाभ अंत्यदर्शनाचा ।।१३४।।

होता होता वाजले तीन । तात्याकाका काकू आले धावून ।
अंगणातच गर्दी पाहून । सद्‌गद झाले ।।१३५।।

दादांना शोधत आले । मंदिरात दादांना पाहिले ।
पायाशीच पटकन बसले । शोक आवरेना ।।१३६।।

दादा देह ठेवतील । असे काही पहावे लागेल ।
अकल्पित घटनेने शोकाकुल । व्यक्त सारे मौनात ।।१३७।।

सर्व प्रसंग उभे राहिले । जे जे दादांसमवेत घडले ।
तेच आठवून पाहिजे क्रमिले । पुढील जीवन ।।१३८।।

दादांचे चेहऱ्यावरील तेज । जणु भानुबिंब प्रगटले आज ।
परि चंद्राप्रमाणे हे तेज । शीतल असे ।।१३९।।

'श्रीराम जयराम जयजयराम' । घोष चालला पावन ।
मंदिरात पडवीत शोक आवरुन । सर्व भक्तांचा ।।१४०।।

हारांचे ढीगच्या ढीग झाले । दादांचे शरीर झाकोन गेले ।
जैसे अधिकार झाकोन राहिले । पुरी ऐंशी वर्षे ।।१४१।।

हळुहळु उजाडू लागले । परगावच्या भक्तगणांनी दर्शन घेतले ।
म्हणती दादा याहीवेळी थांबले । आमच्यासाठी ।।१४२।।



भजनीमंडळीही आली । भजनसेवा सुरु केली ।
ही अखेरची सेवा आपुली । दादांचेसमोर ।।१४३।।

आण्णांनी मन घट्ट केले । पुढील कार्यासाठी उठले ।
बरोबर कुटुंबीय भक्तही राहिले । धीर देण्यासी ।।१४४।।

ज्येष्ठ म्हणून जबाबदारी । सहजची आली आपुल्या शिरी ।
दादांच्या आठवणी बरोबरी । घेवून जावू पुढे ।।१४५।।

चालवणे आहे कीर्तन । चालत आले आजोबांपासून ।
जपले त्यांनी प्राणाहून । सात्त्विक परंपरा ।।१४६।।

पुढील तयारी सुरु झाली । मोठ्या गाडीची व्यवस्था झाली ।
श्रीझेंडेमहाराजांनी सूत्रे सांभाळली । कटाक्षाने ।।१४७।।

अश्रुपूर्ण नयन । फिरे पंचारती रस करुण ।
दादांच्या आरत्या दोन । म्हटल्या प्रभातसमयी ।।१४८।।

सुखसहिता दुःखरहिता । म्हटली आरती दादांपुढता ।
गुरुपदिष्ठमार्गाची प्रमाणभूता । जी असे ।।१४९।।

आरती झाल्यावर । बाहेर आणले दादांचे कलेवर ।
एकच हलकल्लोळ आत बाहेर । पुन्हा उठला ।।१५०।।

कलेवर ठेवण्यासाठी । जागा कोठेच दिसत नव्हती।
भक्त करुन दाटी-वाटी । ठेचले असंख्य ।।१५१।।

दादांचे कलेवर उचलले । शोकाने परमोच्च सीमेस गाठले ।
जरी अश्रू होते गोठले । रडरडुनी ।।१५२।।

पुरुष मार्ग क्रमू लागले । स्त्रियांनी तोंडास पदर लावले ।
तेथूनच डोळे मिटले । आवंढा गिळुनी ।।१५३।।

पार्थिव वाड्याचे बाहेर आणले । गाडीवरी हळुवार ठेवले ।
चिरंजीव चारही बसले । दादांचे पार्थिवापाशी ।।१५४।।

दादांची अंत्ययात्रा निघाली । दोन नंबर शाळेकडून पुढे आली ।
सिटी हायस्कूलसमोर आली । तेथे हार अर्पण केला ।।१५५।।

पुढे सरळ जाऊन । कैवल्यधामासमोर थांबली येवून ।
श्रीगुरुनाथमहाराज निधान । हार घालिती दादांना ।।१५६।।

श्रीगुरुनाथमहाराजांबरोबर । होते कोटणीस डॉक्टर ।
दोघांनीही आरतीही जरुर । केली असे ।।१५७।।

पुढे श्रीब्रह्मचैतन्य निवास । गोंदवलेकर महाराजांचा जेथे वास ।
उषाताई गोमेवाडीकर दर्शनास । उभ्या होत्या ।।१५८।।

दर्शन घेतले दादांचे । अभिषेकसिंचन अश्रुंचे ।
ऋणानुबंध प्रेम त्यांचे । केळकरांवर फार ।।१५९।।

तशीच यात्रा पुढे येवून । मामा-दादांच्या दिंडीपाशी येवून ।
थांबता स्त्रियांनी पुन्हा दर्शन । घेतले अखेरचे ।।१६०।।

एकदा मनात आले । जरी दादा उठले ।
नेऊ पुन्हा आम्ही सगळे । त्यांना राममंदिरी ।।१६१।।

परि हे भोळे मन । पुरवी त्याचे लाड कोण ।
लाड पुरविणारेच गेले निघोन । संपले सर्व ।।१६२।।

कोटणीससमाधीमंदिरासमोर । यात्रा पोचता झाला गजर ।
आरती आणि जयजयकार । पुन्हा झालासे ।।१६३।।

तेथे श्रीगोविंदमहाराज आले । साष्टांग दंडवत घातले ।
आरती करुन साधले । सेवापुण्य ।।१६४।।



अंत्यसंस्कार सुरु झाले । *श्रीगोविंदमहाराज पुढे आले ।
एकतारी भजन आरंभिले । भजनप्रेम संप्रदाय ।।१६५।।

देह अग्निरुप होवू लागला । श्रीदादांनी देहाश्रय सोडलेला ।
आधीच पाप-पुण्याचा नाश झाला । सषुम्नाकार जीवन ।।१६६।।

दादा सगुण रुप सोडून । झाले निर्गुण स्वरुपी लीन ।
घर आपुले करुन । राहिले अखंड श्रीरामनिकेतनी ।।१६७।।

सकल महाराजांचे हे वैभव । जेणे सुख मिळे सदैव ।
सुखे डोलती देवाधिदेव । येथील सोहळे पाहुनी ।।१६८।।

संतांचे चिरंतन अस्तित्त्व । हे स्थान जागृत सदैव।
सत्तेचा येतो अनुभव । कणाकणातुनी ।।१६९।।

असो अंत्यसंस्कार आवरले । मौनावस्थेत सारे परतले ।
आणि सायंकाळी न चुकता आले । नित्यकीर्तनासाठी ।।१७०।।

नेहमीचेवेळी कीर्तन । होणार हे जाणून ।
तृतीयपिढीचे हातोन । कीर्तनसेवा सुरु झाली ।।१७१।।

श्रीआण्णांनी नमन आरंभिले । श्रीरघुनाथप्रिय वंदिले ।
तबला पेटी झांज न घेता वाचले । नित्यपाठामृत ।।१७२।।

त्यादिवशीच्या कीर्तनाला । अभंग योगायोगे आला ।
'साधुबोध झाला तो नुरोनिया ठेला' । सार्थ दादांचे वर्णन ।।१७३।।

तिसरे दिवशी अस्थिविर्सन । काय घडले पहा महिमान ।
अधिकाराचे घडे दर्शन । श्रीदादांच्या ।।१७४।।

---

** प.पू.श्रीगोविंदमहाराज कुलकर्णी –*
*प.पू.श्रीपांडुरंगमहाराज ताम्हणकर यांचे शिष्य*

काही अस्थि नृसिंहवाडीला । काही अस्थि पंढरपूरला ।
काही अस्थि हरिपूरला । विसर्जित केल्या ।।१७५।।

हरिपुरात करिता अस्थिविसर्जन । फुलेही केली समर्पण ।
फुलांना ॐ चा आकार प्राप्त हे पाहून । भक्त अवाक् झाले ।।१७६।।

काकस्पर्शाचा दहावा दिवस । काक न स्पर्शी पिंडास ।
बराचवेळ झाला चिंता मनास । लागून राहिली ।।१७७।।

निरिच्छ संत मुक्त । आम्हा माहिती निश्चित ।
प्रथेप्रमाणे पूर्तता न होत । तोवरी अस्वस्थता ।।१७८।।

शिंगाडे यांना प्रेरणा अंतस्थ । श्रीसदाशिवमहाराजांना येथ ।
आणले पाहिजे सुचवित । पटले सर्वांनाच ।।१७९।।

घरी गेले मोटार घेऊन । आले महाराजांना घेऊन ।
जे उतरतात दार उघडून । त्या शांत आवारात ।।१८०।।

तोच काकस्पर्श झाला । श्रीदादांचा हेतू पूर्ण झाला ।
घट्ट धरुन मूळ गुरुपीठाला । रहावे हेच दाखविले ।।१८१।।

श्रीसदाशिवमहाराज । श्रीनिंबरगीकर महाराजांचे वंशज ।
मितभाषी सरळ सालस । स्वभाव मुळीचा ।।१८२।।

काकस्पर्शाचेवेळी एक शेळी । गर्दी असून पुढे घुसली ।
पिंडाजवळ येऊन गेली । पुन्हा मागुती ।।१८३।।

अवतारी संत सज्जन । त्यांचे सरदार श्रीनारायण ।
त्यांचे विशेष शिष्योत्तम । प्रल्हाद श्रीदादा ।।१८४।।

अवतार घेतला ती षष्ठी । देह ठेविला तीही षष्ठी ।
एकत्त्वाचीच अनुभूती। महिनाही श्रावणचि।।१८५।।



अवताराचे शक अठराशे बेचाळीस । निर्याणाचे एकोणीसशे तेवीस ।
दोन्हीतही आकड्यांची बेरीज । होते सहा ।।१८६।।

ज्यांनी सहा धुतले । तेची साधु झाले ।
येर वाऊगे श्रमले । या भवभ्रमी ।।१८७।।

काही महिने गेल्यावर । समाधी स्थापनेचा झाला विचार ।
मामांच्या समाधीप्रमाणेच सुंदर । करावी समाधी स्थापन ।।१८८।।

कोल्हापूरचे कारागीर कुशल । मामांच्या समाधीचे फोटो सकल ।
काढून काम सत्त्वर । सुरु केले ।।१८९।।

कल्याण शेटेंना बोलावले । दादांचे चित्र काढण्यास सांगितले ।
त्यांनीही सुरु केले । कौशल्याचे काम ।।१९०।।

प्रत्यक्षात समाधी उंच झाली । मामांची समाधी लहान राहिली ।
काय चुकले त्यावेळी । ते कळेना ।।१९१।।

कदाचित मामांना । घ्यावा वाटला असेल लहानपणा ।
जो पूर्ण अवतारी बाणा । अंगिकारला मामांनी ।।१९२।।

देह ठेवून चाळीस वर्षे झाली । तरीही महती न साहवली ।
रामजीस मोठेपणा देण्या राहिली । समाधी लहान मामांची ।।१९३।।

बावीस फेब्रुवारी दोन हजार दोन । माघ शु. दशमी पावन ।
सर्व अंक आले सम । समत्त्वाची समाधी स्थापन ।।१९४।।

श्रीगुरुलिंगप्पामहाराज निंबरगीचे । श्रीकाडसिद्धमहाराजही निंबरगीचे ।
श्रीपांडुरंगमहाराज चिमडचे । आले सोहळ्यासाठी ।।१९५।।

तसेच श्रीसदाशिवमहाराज सांगलीचे । श्रीगुरुनाथमहाराज सांगलीचे ।
डॉक्टर माधवराव कोटणीसही सांगलीचे । प्रवर्तले एकेवेळी ।।१९६।।

अंगणी मांडव घातला । सर्व आसमंत पावन झाला ।
दादांच्या आठवणीने उमाळा आला । भक्तगणांना ।।१९७।।

सर्व व्यवस्था चोख होती । जय्यत तयारी केली होती ।
युद्धपातळीवर कार्यपूर्ती । हातभार अनेकांच्या सेवेचा ।।१९८।।

महाराजांच्या स्वागतास शिंग फुंकले । सर्वांनी उत्थापन दिले ।
श्रीआण्णा व कुटुंबीय गहिवरले । स्थानापन्न केले महाराजांना ।।१९९।।

श्रीनिंबरगी मूळपीठ । श्रीरामचंद्र चिमडात ।
सांगलीत श्रीहनुमंतसंत । त्रयमूर्ती पातली ।।२००।।

श्री दीपकने प्रास्ताविक केले । श्री आण्णा स्वागतपर बोलले ।
श्री केशवकाकांनी वर्णिले । चरित्रसार श्रीदादांचे ।।२०१।।

श्रीगुरुलिंगप्पामहाराजांच्या हस्ते । प्रकाशन झाले परमार्थ प्रश्नोत्तरीचे ।
संकलन संपादन केशवकाकांचे । दादांचे तत्त्वज्ञान ।।२०२।।

सर्व संतमहंत । मंदिरात गेले आण्णांसमवेत ।
हार सिंहासनास समर्पित । मामा दादांचे समाधीवरी ।।२०३।।

'राजाधिराज सद्‌गुरुनाथ' । जयजयकार सर्वांचे मुखात ।
वातावरण झाले भारित । अध्यात्मिक उच्चारांनी ।।२०४।।

पुन्हा सर्व मंडपात आले । शाल हार गुच्छ देऊन गौरविले ।
प्रेमभरे दंडवतही घातले । महाराजांना ।।२०५।।

श्रीगुरुलिंगप्पामहाराजांनी । प्रवचन केले कानडीतूनी ।
दिधले सर्वाधिकार त्यांनी । अधिकारवाणीने आण्णांना ।।२०६।।

सर्वांना प्रसाद देण्यात आला । आणि हा सुंदर कार्यक्रम संपला ।
सायंकाळी नित्यकीर्तनास जमला । पुन्हा समुदाय ।।२०७।।



श्रीदादांच्या आठवणी गहिवरुन । हेच त्यादिवशीचे नित्यकीर्तन ।
रथपालखी सोहळा अंगणी भान । हरपले टाळांच्या गजरात ।।२०८।।

दृष्ट लागेल असा समारंभ । नसे कोणताही दंभ ।
समत्त्व हाचि मुळी आरंभ । कीर्तनसेवेचा ।।२०९।।

अफाट ज्ञानभांडार श्रीदादांचे । उत्स्फुर्त शब्द मोलाचे ।
चित्ती कोरून ठेवायचे । चिंतन अभ्यास करुनी ।।२१०।।

श्रीदासरामचरितामृत । स्मरणचित्रगाथा दर्शन यथार्थ ।
आरती संग्रहही प्रकाशित । झाला प्रथम पुण्यतिथीला ।।२११।।

मामा दादांनी निरंजनी घर केले । निराकारी निरंतर राहिले ।
त्यांचे मागुती सार्थ कार्य चालले । सामर्थ्यबळ आणि सत्ता ।।२१२।।

असो आता किती लिहिणार । शब्द कैसे पुरणार ।
कोठेतरी द्यावा लागणार । विराम लेखणीला ।।२१३।।

प.पू.श्रीआण्णांचे । तसेच श्रीनानाकाकांचे ।
आशीष,मार्गदर्शन मोलाचे । लाभले चरित्रलेखनासी ।।२१४।।

अखिल गुरुगृहाने । मला आपले म्हटले प्रेमाने ।
समावेश उदार अंत:करणाने । करुन घेतला कुटुंबात ।।२१५।।

आदरणीय श्री केशवकाकांनी । पाहिले चरित्र वाचुनी ।
यथायोग्य व्हावे म्हणुनी । महत्त्वाचे मुद्दे सांगितले ।।२१६।।

तसेच श्रीविनयानंदमहाराज । सद्‌गुरु ज्यांचे श्रीनिरंजनमहाराज ।
चरित्रपूर्तीसी मज । दिले बळ कृपेचे ।।२१७।।

संतकृपा हीच शिदोरी । धनदौलत आम्हा खरोखरी ।
वाटचाल अध्यात्ममार्गावरी । सदा रहावी ।।२१८।।

श्रीकेशवकाकांनी कष्टाने । संकलन करून अभ्यासाने ।
श्रीदासरामचरितामृत यथार्थपणे । लिहिले आहे ।।२१९।।

श्रीदादांचे चरित्र यथार्थ । वर्णन करण्यास मी असमर्थ ।
वर्णिला संक्षिप्त भावार्थ । सद्गुरुकृपेने ।।२२०।।

नक्कीच असेल काही न्यून । अंतरी जाणीव पूर्ण ।
पुनःपुन्हा आपुली विनवून । माफी मागतो ।।२२१।।

सामान्य जीव मी दुबळा । सद्गुरुचरणीचा पालापाचोळा ।
केवळ सद्रुकृपेचा उमाळा । हेचि ऐश्वर्य माझे ।।२२२।।

श्रीदादांनी मला जवळ केले । सदैव निर्व्याज प्रेम दिले ।
चरित्र लिहिण्यास निमित्तमात्र केले । सार्थकता जीवाची ।।२२३।।

इच्छा निर्माण होणे मनात । आणि ती पूर्ण होणे प्रत्यक्षात ।
महदंतर असते यात । श्रीसद्गुरुकृपेचे ।।२२४।।

वेडे वाकुडे गाईन । परि तुझाच म्हणवीन ।
श्रीसद्गुरुमाऊलींचे लेकरू सान । लोटांगण घाली ।।२२५।।

इति श्रीदासरामचरित्र । गुरुचरणीची गंगा पवित्र ।
दीन अर्पितो तुलसीपत्र ।
निर्याणप्रसंग वर्णननाम त्रयोदशोध्याय ।।१३।।

*****



# भावे गावे गीत

(१)

नमन माझे गुरुराया । महाराज रामराया ।।धृ।।
पुर्वपुण्य फळा आले। आपणासी देखियेले ।।१।।
कनवाळू मायबाप । सरती भवभयताप ।।२।।
संतजन वाखाणिती । अध्यात्माची दिव्य ज्योती ।।३।।
शरण शरण गा समर्था । उध्दरावे दासा आता ।।४।।

(२)

चला लगबगीनं जाऊ । सद्गुरुनाथ डोळा पाहू ।।धृ।।
डोळे निवतील कान । मना होय समाधान ।।१।।
काय सांगू यांची महती । कीर्तनात रंगुनी जाती ।।२।।
भाग्ये मिळता आशीष । सहज शब्दे उपदेश ।।३।।
राव रंक सारे सम । चोख अद्वैताचे धाम ।।४।।
दास पायी विनटला । पदरी घ्या या पामराला ।।५।।

(३)

श्री सद्गुरुनाथांसारिखा नाही देखिला ।।धृ।।
राम सगुण रुप धरी । येई नाथांचिया घरी ।
प्रभा विलसे मुखावरी ऐसा नाही देखिला ।।१।।
हनुमद्गुरु आले घरासी । कृपा चौदावे दिवशी ।
घोट अमृताचे प्राशी ऐसा नाही देखिला ।।२।।
मामा कीर्तनी तल्लीन । तेथे पेटीचे वादन ।
करी विसरे देहभान ऐसा नाही देखिला ।।३।।
महाराज निंबरगीकर । प्रगट झाले समोर ।
देती कानडी गीता मधुर ऐसा नाही देखिला ।।४।।
ज्ञान अभंगात गोवी । भक्त चित्ताते मुरवी।
स्वकरे देवद्वार दावी ऐसा नाही देखिला ।।५।।
नाम संकीर्तनमय । झाली दासाची सोय ।
न सोडावे कदा पाय ऐसा नाही देखिला ।।६।।

(४)

चाल-गुरुतृतीया ही गोड किती होय सुखाची ।
जा शरण तू झडकरी गुरुसी भेटी रे ।
आन न करी हा चोखाळी सत्य मार्ग रे ।।धृ।।
पसरली कलीयुगात मोहबंधने ।
मुख्य गौण विसरुनीया धावती मने ।
सद्गुरु हे दाविताती मुख्य काय रे ।।१।।.. आन न करी...
पाठीशी रहाती उभे भक्त रक्षणा ।
सद्विचार सदाचार हीच धारणा ।
चिंता भय नाही वृत्ती संथ करी रे ।।२।।
गुरुपदेश श्रेष्ठ भाग्य जाय उजळुनी ।
गुरुचरणी राहू सुखे नामसाधनी ।
भवसागर तरु सुपंथ अवीट सख्या रे ।।३।।

(५)

महाराज गुहेमाजी आले दर्शन दासरामा दिधले ।।धृ।।
लोभस सस्मित सोज्वळ मूर्ती नेत्री तेज भरले ।
पौषमासी नवमी तिथीसी सिद्धानंद आले ।।१।।
रामराय हे सहज साधनी रंगुनिया गेले ।
गुरुलिंगजंगमस्वामी दर्शने तृप्तचि ते झाले ।।२।।
महाराजांनी प्रल्हादासी कानडीत बोधिले ।
'येनु इल्लदानु' पद ऐकवुनि गुप्तचि ते झाले ।।३।।
अध्यात्माचे अंतरंग ते उकलुनि दावियले ।
प्रकाश स्फुरण श्रृतीरुपाने गुह्यचि प्रगटविले ।।४।।
गुरुलिंगगीतारूपे अमृत अवनीवरी आले ।
अमृत प्राशन करीता दासा समाधान झाले ।।५।।

(६)

महाराज पुन्हा कधी येणार बालका दर्शन कधी देणार ।।धृ।।
ज्ञानमूर्ती ती सतेज सस्मित सिंहासनी सजणार ।



सहजसाधनी सद्गुरुभजनी रंगुनीया जाणार ।।१।।
स्मितहास्याने शब्दावाचुन भक्ता तोषविणार ।
राव रंकही समान आपुल्या प्रेमाने भिजणार ।।२।।
ज्ञान जागते नित्य किर्तनी अमृत वर्षविणार ।
साधुबोध वचने श्रुत करिता वृत्ती पालटणार ।।३।।
चैतन्याच्या श्रेष्ठ अनुभवे उन्मनीत रमणार ।
संगती मिळता भाग्य उजळुनी वरदायी होणार ।।४।।
कृपा करुनिया सर्वसुखाची गोडी चाखविणार ।
दास पामरा पावन हस्ते पदरामध्ये घेणार ।।५।।

(७)

**श्रीमामांचा श्रीदादांचा दरबार**

असा हा मामांचा दरबार । असा हा दादांचा दरबार ।
जो आला तो रमला या भजनात रंगला । हर्ष मनी जाहला ।।धृ.।।
अगाध महिमा या क्षेत्राचा । अखंड कीर्तन परंपरेचा ।
श्रीराम जयराम जयजयराम । मंत्रोच्चार चालला ।।१।।
निंबरगीच्या महाराजा । चिमडमठीच्या साधुराजा ।
मस्तक नमवुनी हनुमंतपदी या । दंडवत घातला ।।२।।
अध्यात्माची वसली पेठ । दावी चोखळ मार्ग नीट ।
गाऊनी ऐकुनी तल्लीन होवुनी । शिष्यगण तोषला ।।३।।
संत अनेक येवुनी जाती । त्या चरणांची लागे माती ।
भवसिंधु उतराया जडजीवासी । तरणोपाय लाधला ।।४।।

(८)

धन्य निंबरगीच्या मंदिरी । नमो नारायण हरी ।।धृ।।
श्रेष्ठ चैतन्य आत्मतत्त्व । घ्यावा साधनी अनुभव ।
अधिष्ठान हे सकला तारी ।।१।।.. नमो नारायण हरी
दीननाथ कृपावंत । मोक्षश्रिया अलंकृत ।

तेज स्मितहास्य चेहऱ्यावरी ।।२।।
करु आनंदे जयजयकार । स्वामी उघडा देवद्वार ।
लोळे पतित चरणांवरी ।।३।।

(९)

करुणासागर सद्गुरुमाई । प्रेम स्वरुप भक्ताठायी ।
चरणी तुझिया आमुची डोई ।।धृ।।
संतसभेच्या द्वारी आलो । आनंदाने भरुनी पावलो ।।१।।.. चरणी तुझीया
ज्ञानभक्तीचे अभिनव मंदिर । अविरत कीर्तन प्रसन्न गुरुवर ।।२।।
सकल दैवते प्रगटचि येथे । दर्शन घेता मन हे निवते ।।३।।
अध्यात्माची गंगा पावन । विसरुनी सहजचि जावे मीपण ।।४।।

(१०)

हे चैतन्याचे वारे । हे वायुरुपचि सारे ।
हे विश्वामधल्या अणुरेणुतुनी संचरणारे वारे ।।धृ.।।
देहास चालवी श्वसन । श्वसनास चालवी प्राण ।
बुद्धी चेतना प्राणशक्तीरुप जीवनातले वारे ।।१।।
चिद्वायु स्थिरता जनन । तो निघोनी जाता मरण ।
चिद्वायूला ओळख साधनी तद्रूप होवुनी जा रे ।।२।।
वारा हा जगदात्मा । नाही दुजा परमात्मा ।
दासरामसद्गुरु सिद्धांत जगन्मान्य होईल रे ।।३।।

(११)

**- दिंडी -**

दिंडी चालली मामा दादांची, वारी कीर्तनपंढरीची ।।धृ।।
कृष्णातीरीचे सांगली स्थान । रामनिकेतनी नामसंकीर्तन ।
ओढ सद्गुरुमाहेराची ।।१।।.. वारी कीर्तनपंढरीची
राम सीता मारुती गजानन । देव्हाऱ्यात स्थापिले आनंदानं ।
घ्यावी प्रचिती या जागृतीची ।।२।।
पालखी रथोत्सव सोहळा सुंदर । प्रदक्षिणा शंखनाद बोला जयजयकार ।



फिरे पंचारती मौज येथीची ।।३।।
मांदियाळी भक्तांची उत्सव नामाचा । श्रीगुरुतृतीया पर्वकाळाचा ।
वंदू पाऊले गुरुरायांची ।।४।।

(१२)

आकाशी झेप घे रे तू नरा । सोडी देहाचा आसरा ।।ध्रु।।
देह दिधला त्या देवाने । परि भुलला जीव मायेने ।
मोहाच्या नित बंधाने । बघ देहांतरीच्या आत्मा सागरा ।।१।।
आत्म्याने देह समजतो । देहयोगे तो ना कळतो ।
जीव बहिर्मुखतेने जगतो । जा झडकरी भेटी गुरुला पामरा ।।२।।
देव आहे अभ्यंतरी । भेटी नाही जन्मवरी ।
नरदेही संधी अखेरी । हो अंतर्मुख तू भज रे गुरुवरा ।।३।।
जग नाही परि भासते । देवशक्ती ना उमगते ।
गुरूमाऊली बघ कळवळते । धरी हस्त गुरूंचा घेई सुख करा ।।४।।
देव आणिक नाही दुसरा । जगताचे मुळी हा वारा ।
देव भक्त तोचि वारा । तो वायुसाधनी पाही सुंदरा ।।५।।

(१३)

या वाऱ्याच्या बसुनी विमानी सहल करुया पंथाची ।
चला गड्यांनो आज पाहुया शाळा संतमहंतांची ।।ध्रु।।
या शाळेचे रुप आगळे संस्काराचे वेड भले ।
जो जो येई रंगुनी जाई आनंद तो त्यासीच मिळे ।
अपूर्व उत्तम कार्य चालले नसे वाच्यता कार्याची ।।१।।
मूळपीठ निंबरगीग्रामी सर्वापासून दूर असे ।
ब्रह्मस्वरूपी महाराजांचा पावन तेथे वास असे ।
चिमुट साखर देती भक्ता गोडी लागण्या पंथाची ।।२।।
चिम्मड क्षेत्री मठ स्थापिला विस्तृत करण्या कार्याला ।
आपुल्या रघुनाथप्रिय भक्ता आखुनी दिधले मार्गाला ।
तापनाशी ते तीर्थ प्राशिता नसे वार्ता दैन्याची ।।३।।

सांगलीतही या शाळेची शाखा सहजी आली असे ।
कोटणीसमहाराजे पावन या नगरीला केले असे ।
अखंड कीर्तन पंचवीस वर्षे मूर्ती कीर्तन प्रेमाची ।।४।।
कीर्तन सरिता रामनिकेतनी आली ही महाराजांची ।
मामांचे मनी आर्तभावना अखंड कीर्तन करण्याची ।
प्रगटुनी महाराजांनी केली पूर्ण कामना भक्ताची ।।५।।
या शाळेचे द्वार सर्वदा उघडे स्वागत करण्याला ।
किंवा
गुरूगृहीचा थाट आगळा पार नसे आनंदाला ।
मामा दादा प्रेमे तत्पर सर्वही पदरी घेण्याला ।
असो रंक वा राजा कुणीही नसे भिंत ती यातीची ।।६।।
सर्वा सोपे करुनी सांगती ज्ञानपीठ परमार्थाचे ।
नित्य कीर्तनी तल्लीन होती नसे भान कधी देहाचे ।
आधी करुनी तसे बोलती म्हणुनी छाप पडे त्यांची ।।७।।
कोणा देव म्हणावे कैसे साधन अंतरी साधावे ।
कळ नेमकी दाविती भक्ता वरवरी कधी ना सांगावे ।
तन्मय होती भक्त गुरूही कीर्तन गंगा सहजाची ।।८।।
ऐसे सद्गुरू आम्हा भेटले जगती याची तोड नसे ।
दुर्मिळ त्रिभुवनी अशी ही शाळा सदा यशाची खात्री असे ।
मायबाप तुम्ही सर्वही आमुचे अवीट गोडी चरणांची ।।९।।

(१४)

राम कृष्ण गोविंद हरी ।।ध्रु।।
राधासुत गोविंद नमो । इंदिरासुत राम नमो ।।१।।
सद्गुरू नारायण नमो । सद्गुरू श्रीहनुमंत नमो ।।२।।
नामरुप गोविंद नमो । चैतन्यरूप राम नमो ।।३।।
नामी रत गोविंद नमो । सहज साधनी राम नमो ।।४।।
कीर्तननिष्ठ गोविंद नमो । कीर्तन व्रतस्थ राम नमो ।।५।।
शांतीसागर संत नमो । दयासागर संत नमो ।।६।।



(१५)

संत/गुरु दर्शनाला जायाचं जायाचं जायाचं ।
आनंद पोटात माझ्या मावेना ।।ध्रु।।
तीर्थयात्रा करता शीण । मना नाही समाधान ।
या या देवाचे, दर्शन काही होईना ।।१।।
रामनिकेतनी थेट । घेऊ मामांची भेट । घेऊ दादांची भेट ।
या या भेटीची, ओढ पुरी होईना ।।२।।
तेजःपुंज सद्गुरूमूर्ती । करी लाभावीण प्रिती ।
ज्ञान-श्रवणाची, भूक काही भागेना ।।३।।
मग्न नित्य कीर्तनात । ओठी कंठी नामामृत ।
रंगी रंगता, देहभाव राहीना ।।४।।

(१६)

माऊली माऊली ।
जय जय रामराय माऊली, जय जय दासराम माऊली ।।ध्रु।।
कीर्तनावतार शोभली । जय जय दासराम माऊली ।।१।।
गुरुलिंगकृपा पावली । जय जय दासराम माऊली ।।२।।
हीनदीनांची साऊली । जय जय दासराम माऊली ।।३।।
सहजसाधनी रंगली । जय जय दासराम माऊली ।।४।।
संतमहंता भावली । जय जय दासराम माऊली ।।५।।
साष्टांगभावे नमिली । जय जय दासराम माऊली ।।६।।

(१७)

चाल :- अबीर गुलाल उधळीत रंग
निरुपण कीर्तनी प्रगटे श्रीरंग । दासराम सद्गुरू माझे ब्रह्मानंदी दंग ।।ध्रु।।
मंदिरात चाले नित्य अध्यात्मिक गान । पुण्यवंत होण्या घ्यावे संतांचे दर्शन ।
चित्त चरणी जडुनी जाता होई भवभंग ।।१।।
नामामृत घेऊ आम्ही नामामृत चाखू । कीर्तनाच्या गंगौघाने अद्भुत हरीखु ।
कृपा सद्गुरूंची होता भिजे अंतरंग ।।२।।

देवासाठी चाले कीर्तन सोहळा । नाही दंभ नाही धर्म एकचि जिव्हाळा ।
जाती भेद नुरूनी घडतो खरा संतसंग ।।३।।

(१८)

भूवैकुंठी रामनिकेतनी प्रगटे स्वारी देवाची ।
साक्षात्कारी सिद्ध मालिका नवलप्रभा चैतन्याची ।।ध्रु।।
या वास्तुचे दैवी वैभव कृपालोभ हा संतांचा ।
खडतर साधन साधुनी मामा भरती पाया निष्ठेचा ।
हनुमत् सद्गुरूरूप जाहले सीमा कीर्तनसेवेची ।।१।।
पुढे प्रगटला अथांग सागर श्रीदादांच्या ज्ञानाचा ।
सिद्धवाणी तशी सिद्धलेखणी वाङ्मय ठेवा मोलाचा ।
आत बाहेरी श्रीनारायण प्राप्ती कानडी गीतेची ।।२।।
परंपरेचे ज्ञान निरूपण साधन नित्य विसाव्याचे ।
नामतत्त्व आणि वायुतत्त्व हे गर्भित मामा दादांचे ।
तेवत ठेविती कीर्तनज्योती मिरासदारी वडिलांची ।।३।।
अनेक उत्सव झाले होतील खंड नसे अध्यात्माला ।
आत्मलाभ हे ध्येय लक्षुनी जागू शिष्य स्वधर्माला ।
गुरुसेवेचा अगाध महिमा गोडी अमृतधारेची ।।४।।

(१९)

**गवळण**

ध्वनी मंजुळ मंजुळ करी । धेनु वळविसी यमुनातीरी ।
शामसुंदरा हे मनमोहन गोवर्धन गिरीधारी । रे कान्हा मधुर तुझी बासरी ।।ध्रु।।
देवकी उदरी जन्मा येशी । यशोदेचा नंद तु होशी ।
नंदनृपा आनंद जाहला सुखासी नाही परी ।।१।।
दही दुध लोणी आवड मोठी । घरोघरीचे लाविसी ओठी ।
गवळणी थकल्या म्हणती शोधा उपाय काहीतरी ।।२।।
सुदाम्याने पोहे मुठभर । प्रेमभावे दिधले सत्वर ।
सुवर्णनगरी देऊनी त्यासी बसवी राज्यावरी ।।३।।



मेळा जमला गोपाळांचा । संगती राधा गोपिकांचा ।
काला वाटुनी घ्या रे सारे मौजची याची न्यारी ।।४।।

(२०)

**मूळदेवाची / चैतन्यरूपाची आरती**

जय जया मूळ देवा । देई आम्हा विसावा ।
चित्त होई सुप्रसन्न । मनोभावे करिता धावा ।।ध्रु।।
बहुविध रूपे तुझी । आदिकालापासूनची ।
परिस्थिती अनुरूप । करिसी सत्य कार्य तूची ।।१।।
गजानन विठ्ठल असो । दत्त मारुतीही असो ।
नाना देवी शक्तीपीठे । किंवा शिवरूप असो ।।२।।
नाम आणि रूप भिन्न । तत्त्व एकचि अभिन्न ।
बाह्य व्यर्थ पसारा हा । बाणावी ती अंतरखुण ।।३।।
जे जे झाले अवतार । अंश तुझाची साकार ।
एकामध्ये सर्व पाहणे । होतो तोचि श्रेष्ठाधार ।।४।।
अंतरी इच्छा झाली । सहजी पूर्णत्वास गेली ।
दादांच्या लेकरासी । गुरूमूर्ती आठविली ।।५।।

(२१)

**श्रीकुलदेवाची आरती**

आरती कुलदेवा । देई सकळा विसावा ।
तुमचे नाम उच्चारिता । समाधान मिळे जीवा ।।ध्रु।।
किती तरी तुम्ही दूर । परी ओढ असे फार ।
सदैव लक्ष तुमचे । आहे नक्की आम्हावर ।।१।।
कोकणी वास तुमचा । जरी असे कायमचा ।
स्मरणरूपे तुम्ही । प्रतिपाळ करिता आमुचा ।।२।।
सद्गुरूंची वाचा बोले । स्मरण तुमचे जरी केले ।
संकटे व्याधी आमुच्या । दूर जाती हे अनुभवले ।।३।।

(२२)

**प.पू.श्रीअनंत गंगाधर केळकर यांची आरती**

आरती अनंतराया । तुम्ही करावी माया ।
आपुलीया मातेसाठी । अती झिजवीली काया ।।ध्रु।।
यती दीक्षितांच्या करवी । पार्थिव पूजा घेतली ।
पंचप्राण समर्पोनी । अतिनिष्ठे चालविली ।।१।।
तात्यासाहेब महाराजांनी । तुम्हावरी प्रेम केले ।
मौजेचे पद म्हणता । मंदिर मौजेने डोले ।।२।।
लक्ष्मी-माईंसह तुम्ही । गोंदवले क्षेत्री गेला ।
गोंदवलेकर महाराजांचा । प्रेमाशीर्वाद मिळाला ।।३।।
सोमवार मनी योजिला । देह सार्थक केला ।
शिवरूप तुम्ही झाला । दास पायी विनटला ।।४।।

(२३)

आरती त्रयमूर्ती । सगुण ब्रह्मज्ञानज्योती ।
कलीयुगी अवतरती । निःखळ परमार्थ सांगती ।।ध्रु।।
हनुमंत सद्गुरुवर । मारुतीरायांचे अवतार ।
तीन तपे कीर्तन करुनी । पेठ वसविली थोर ।।१।।
मामामहाराज महासाधु । केला अमोलिक बोधु ।
रामपाठ परमार्थाचा । नेमका अर्थ सांगतू ।।२।।
रामराय गुरुमूर्ती । अधिकार थोर जगती ।
मुक्त हस्ते लूट करिती । कीर्तनमहर्षी होती ।।३।।
ऐसे तिन्ही देवची ते । अवतरले सांगलीते ।
दासा मनी कामना ते । नित्य अनुसंधानाते ।।४।।

(२४)

**प.पू.सद्गुरु श्रीदासराममहाराज केळकर यांची आरती**

संत महंता श्रीरामराया आरती ही तुजला ।
ओवाळीतो भक्तीभावे शांती द्यावी मला ।।ध्रु।।



कीर्तनसेवेसाठी ब्रह्म जगती हे आले ।
कोटणीसमहाराज कृपेने तृप्तचि ते झाले ।।१।।
बालवयातची अध्यात्माची दिसे दिव्य खूण ।
गुरुजन होती थक्क ऐकूनी अनुपम कीर्तन ।।२।।
गुरुलिंगजंगम महाराजांचे लक्ष वेधियेले ।
प्रसाद गीता कानडीतूनी वेदचि अवतरले ।।३।।
निरुपण कीर्तनी अंतर्बाह्य गेले रंगून ।
भक्तजनांसी ज्ञान कृपेने मिळे समाधान ।।४।।
रामनिकेतनी अनुदिन वर्षे कीर्तन अमृत ।
गोडी चाखुनी मिळतो दासा आनंद अद्भुत ।।५।।

(२५)

**प.पू.सौ.सीतावहिनी केळकर यांची आरती**

जय जय आरती श्रीसीतामाऊली । प्रेम आनंदरूप शक्ती अवतरली ।।ध्रु।।
रामराय महासंत पती ज्या लाभले । दिव्य पुण्यात्म्यांचे ऐक्य जाहले ।
कुटुंब सेवेतचि चित्त रंगले । चंदनापरी नित्य काया झिजविली ।।१।।
जो येई त्यासी घाली मायेची पाखर । वाटे प्रत्येकासी आपुले घर ।
उत्साह अलौकीक दयेचा पाझर । निःस्वार्थी पूर्ण त्यागी वात्सल्य साऊली ।।२।।
निर्याण समयासी अधिकार कळला । वहिनी चित्स्वरुपी मिळोनी गेल्या ।
आरती सेवेचा हा महालाभ झाला । दादांचे लेकरू लोळण घाली ।।३।।

**(२६)**

**कीर्तनपीठाची आरती**

**जयदेव जयदेव जय कीर्तनपीठा** । आरती ओवाळिता जाई भवचिंता ।।ध्रु।।
शुकाचार्य हे प्रथम कीर्तन करिती । सुखसोहळ्याचा अनुभव मुनी सारे घेती ।
ज्ञानाईंचे वय अल्प ते किती । धर्म कीर्तन ज्ञानेश्वरीतून करिती ।।१।।
नामदेवमहाराजांचे कीर्तन महाद्वारी । पांडुरंग नाचे तो येऊनी सामोरी ।
नाथमहाराजांच्या कीर्तन दरबारी । भक्तासाठी देव होई टाळकरी ।।२।।

तुकोबारायांची कीर्तनसेवा । श्रोता वक्ता म्हणती तूचि एक देवा ।
समर्थ कीर्तनी देती राम राम ठेवा । वैराग्याचा वाटे सर्वांना हेवा ।।३।।
हनुमंत सद्गुरूंचे कैवल्य कीर्तन । परमार्थाची लूट केली अनुदिन ।
मामामहाराज दिसती शांत वदन । कीर्तन करिता अंगी बिंबे गुरूनाम ।।४।।
दासराममहाराज खूणगाठ बांधिती । कीर्तनानुसंधानी तल्लीन होती ।
तुषार अध्यात्माचे अंतरी उडती । दास म्हणे प्रेम असेच द्या पुढती ।।५।।

(२७)

**श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचा पाळणा**

जो जो जो जो श्रीहनुमंता । ब्रह्मरूप सुतवंता ।।ध्रु।।
मारुतीरायांचे अवतार । अधिकारची बहू थोर ।।१।।
बालपणी तुम्ही भगिनीला । मोक्ष स्वये तो दिधला ।।२।।
चिमडमहाराजे कृपाकर । दिधता मिळे आधार ।।३।।
सांगलीत करिता कीर्तन । क्षेत्र झाले पावन ।।४।।
व्यवहारी परमार्थी जनतेची । वकीली केली साची ।।५।।
चिमडमठी देह कष्टविला । वेचुनी सर्वस्वाला ।।६।।
दास पाळणा गातसे । लोटांगण घालतसे ।।७।।

(२८)

**श्रीदासराममहाराज केळकर यांचा पाळणा**

जो जो जो जो श्री श्रीरामा । इंदिरा नंदना ।।ध्रु।।
हनुमंतसद्गुरु गृही आले । कृपावलोकन केले ।।१।।
बालपणीचाही विषय । ब्रह्ममाया साचार ।।२।।
प्रवचन कीर्तनी निरूपणी । दंग झाले ज्ञानी ।।३।।
गुरूलिंगजंगम थोर मुनी । बोध केला मनी ।।४।।
भक्तांचे तुम्ही आधार । झाला जगदोद्धार ।।५।।
दास गातसे पाळणा । स्वीकारा या दीना ।।६।।

✻✻✻✻



## प.पू.श्रीनिंबरगीकरमहाराजांची आरती

आरती नारायणा । धन्य जगज्जीवना ।
सगुण ब्रह्ममूर्ती । काय तपोनिधाना ।।ध्रु.।।
सद्गुरु काडसिद्ध । तुकाराम अवतार ।
साधन सांप्रदाय । वाढविला बडिवार ।।१।।
गुरुलिंगजंगम नावे । जगप्रसिद्ध जहाला ।
*दासराम* शरण येता । अंतरिये बोध केला ।।२।।

\- श्रीदासराममहाराज

## प.पू.श्रीतात्यासाहेब महाराजांची आरती

सद्गुरू भक्तीचा डंका गाजवुनी । कीर्तनी डोलविला गुरु राम ज्यांनी ।
संसारी दाविला सदाचार करुनी । गुरुरूपी तन्मय झाले काया संहरुनी ।।१।।
जय देव जय देव जय गुरु हनुमंता । तारी जड जीवा या श्रीलक्ष्मीकांता ।।ध्रु।।
*राम* लीन झाला धन्य तुझे चरणी । ओवाळी आरती तन मन वाहुनी ।
मायबाप तुम्ही असता कैची दीन वाणी । उरेल माझेपाशी सांगा देव धणी ।।२।।

\- श्रीदासराममहाराज

## प.पू.श्रीमामामहाराजांची आरती

आरती गोविंदा । नित्य कीर्तनानंदा ।
सच्चिदानंदकंदा । गुरुलिंग साधु बोधा ।।१।।
हनुमंत सद्गुरु आज्ञे । केले अखंड कीर्तन ।
सर्वस्व वेचियेले । समर्पिले पंचप्राण ।।२।।
ब्रह्मचैतन्यादी संत । भाऊराव समर्थ ।
रामचंद्र नारायण । नाम बोधी हे कथीत ।।३।।
श्रीराम जय राम जय जय राम । तेरा अक्षरे परम ।
संदेश निर्वाणीचा । पायी लोळे *दासराम* ।।४।।

\- श्रीदासराममहाराज

## प.पू.श्रीदासराममहाराजांची आरती

आरती रामराया । करी कृपेची छाया ।
दावोनी दीनी दया । धन्य धन्य महाराया ।।ध्रु।।

सद्‌गुरु हनुमंत । पिता गोविंद संत ।
बोधी गुरुलिंग सिद्‌ध । धरुनि रूप सिद्‌धानंद ।।१।।

सिद्‌धसाधनाने । स्वये ब्रह्मचि झाले ।
भावादरे *केशवाने* । चरणी मस्तक ठेविले ।।२।।

- प्रा.डॉ.के.वा.आपटे

## श्रीमत् सद्‌गुरु परमपूज्य श्रीरामराय गोविंद केळकर तथा श्रीदासराममहाराज, सांगली, यांचे निर्याणाचा अभंग

बुधवार, श्रावण शुद्‌ध ६, शके १९२३
दि.२५ जुलै २००१, (सायंकाळी ७.४० वा.)

शालिवाहन शके एकोणीसशे तेविसात । वृष नाम संवत्सरात दक्षिणायन ।।१।।
श्रावण शुद्‌ध षष्ठी आणि बुधवार । रात्रौ प्रथम प्रहर दुसरे तासी ।।२।।
श्रीदासरामांनी केले हो निर्याण । मुखात वचन नित्यकीर्तनाचे ।।३।।
दासरामांलागी कीर्तनाचा ध्यास । परमार्थी प्रकाश पाडियेला ।।४।।
लेखन प्रवचन नित्याचे कीर्तन । यामध्ये रममाण झाले साधू ।।५।।
जन्मतिथी षष्ठी निर्वाणतिथी षष्ठी । जन्ममरणाची गाठी पडियेली ।।६।।
आत्मारामी राम मिळोनिया गेले । स्मृतिरूपे उरले *केशव* मनी ।।७।।

– प्रा.डॉ.के.वा.आपटे

***



## श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

| क्रमांक | ग्रंथाचे नांव |
|---|---|
| १ | **नासदीय सूक्तावरील ओविबद्ध टीका** |
| २ | **श्रीदासरामगाथा** (अभंग गाथा) |
| ३ | **श्रीरामदासबोध** (ओवीबद्ध) |
| ४ | **संजीवन पाठ** (श्रीदासराममहाराज यांचे अभंग अर्थासह) |
| ५ | **श्रीचांगदेव पासष्टी एक नाम कला** (ओवीबद्ध टीका) |
| ६ | **श्रीदासराममहाराजकृत आरती संग्रह** |
| ७ | **ग्रंथत्रयी (**आत्मबोधप्रत्ययामृत, दासराम विंशिका व पंचविशी) |
| ८ | **श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग** |
| ९ | **श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन** |
| १० | **श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह** (३६५ वचने) |
| ११ | **श्रीगुरुमहिमा** |
| १२ | **श्रीदासरामगाथा पुरवणी** |
| १३ | **श्रीदासराममहाराज आत्मचरित्र** |
| १४ | **श्रीदासराममहाराज कृत श्लोकरचना** |
| १५ | **श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव** (श्रीदासरामकृत समओवी टीकेसह) |
| १६ | **रामदासस्वामीकृत आत्माराम** (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) |
| १७ | **श्रीगुरुर्लिंगगीता** (२२८ पदे) |
| १८ | **श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता** (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) |
| १९ | **श्रीदासराममहाराज लिखित लघु संतचरित्रे** |
| २० | **श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र** (श्रीदासरामलिखित) |
| २१ | **श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी** |
| २२ | **श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन** |
| २३ | **श्रीदासराममहाराज यांची प्रवचने** (१०८) |
| २४ | **समर्थ रामदासकृत करुणाष्टके** (श्रीदासराममहाराजकृत विवरणासह) |

| क्रमांक | ग्रंथाचे नांव |
|---|---|
| २५ | **श्रीगुरुलिंगगीता** (६६ पदे व अर्थ) |
| २६ | **श्रीदासराममहाराजकृत रामदासबोध** (विवरणासह) |
| २७ | **ज्ञानेश्वरी ६वा अध्याय** (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह) |
| २८ | **श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग** (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह) |
| २९ | **श्रीएकनाथकृत आनंदानुभव** (श्रीदासरामकृत टीकेसह) |
| ३० | **परमार्थ प्रश्नोत्तरी** |
| ३१ | **श्रीदासराम चिंतनिका** (श्रीदासराममहाराज लिखित लेख संग्रह) |
| ३२ | **श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ**(श्रीदादांचे १६अभंगांचे विवरण) |
| ३३ | **अक्षरे चैतन्याची भाग-१** (ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) |
| ३४ | **अक्षरे चैतन्याची भाग-२** (ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) |
| ३५ | **ज्ञानगंगा** (श्रीदासराममहाराजांची प्रवचने) |
| ३६ | **अक्षरधारा** (श्रीदासराममहाराजांचे संकीर्ण लेखन) |
| ३७ | **श्रीरामपाठांमृत** (श्रीदादांची रामपाठावरील कीर्तने) |
| ३८ | **श्रीनित्यपाठांमृत** (श्रीदादांची नित्यपाठावरील कीर्तने) |
| ३९ | **श्रीबाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र** (श्रीदासराम लिखित) |
| ४० | **कै. सौ. सीतावहिनी चरित्र** |



## साधकोपयोगी ग्रंथ

(खालील यादीतील ग्रंथ हे श्रीदासराम ग्रंथमाला पुष्पयादी व्यतिरिक्त आहेत.)

१. श्रीहनुमद्-गुरू-चरित्र-बोध-सार (श्रीमामामहाराज केळकर लिखित श्रीकोटणीसमहाराजांचे चरित्र)
२. श्रीगोविंद चरित मानस (प.पू.श्रीमामामहाराजांचे ओवीबद्ध चरित्र)
३. श्रवणी पाजुनी अमृतवाणी (प.पू.मामामहाराजांचे निवडक अभंगांचे विवरण)
४. नित्य नवा दिस जागृतीचा (श्रीदादांच्या ३६५ वचनांचे चिंतन)
५. श्रीहनुमत् गुरूचरित्र (न.दा.दिवेकर कृत श्रीकोटणीसमहाराजांचे ओवीबद्ध चरित्र)
६. श्रीदासरामगाथा (अभंग गाथा)
७. संजीवन पाठ (श्रीदासराममहाराज यांचे अभंग अर्थासह)
८. श्रीदासराममहाराजकृत आरती संग्रह
९. श्रीनित्यपाठांमृत (श्रीदादांची नित्यपाठावरील कीर्तने)
१०. साधन संध्या (श्रीरामनिकेतन येथील नित्यक्रम)
११. चिन्मय नित्यपाठ (श्रीरामनिकेतन येथील नित्यक्रम)
१२. अमृतवाणी (प.पू.श्रीमामामहाराज केळकर यांचा अभंग गाथा)
१३. सन्मार्ग दीप (चिमड मठ प्रकाशित)
१४. श्रीनारायणीय शिष्यप्रबोध अथवा भारतीय आत्मविद्या (प.पू.श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांची कीर्तने)
१५. श्रीगुरुलिंग गीतम् (प्रा.डॉ.के.वा. आपटे लिखित)
१६. श्रीदासराम गीतम् (प्रा.डॉ.के.वा. आपटे लिखित)
१७. श्रीदासराम वचनामृत (श्रीदादांची वचने)

## श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| १ | चिमड संप्रदाय | २००५ |
| २ | श्रीरामदासस्वामी चरित्र | २००६ |
| ३ | श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग | २००६ |
| ४ | श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन | २००७ |
| ५ | श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | २००७ |
| ६ | दासबोधातील तत्त्वज्ञान | २००७ |
| ७ | श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह | २००८ |
| ८ | श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | २००९ |
| ९ | साधन संध्या | २००९ |
| १० | अनंत अमृत स्मरण | २००९ |
| ११ | श्रीगुरुमहिमा | २००९ |
| १२ | श्रीज्ञानेश्वरी प्रसाद (श्रीज्ञानेश्वरीतील निवडक ओव्या अर्थासह) | २००९ |
| १३ | श्रीदासरामगाथा पुरवणी | २००९ |
| १४ | श्रीदासराममहाराज आत्मचरित्र | २०१० |
| १५ | श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०१० |
| १६ | श्रीदासराममहाराज श्लोकरचना | २०१० |
| १७ | श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव(श्रीदासरामकृत समओवी टीकेसह) | २०१० |
| १८ | श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्र | २०१० |
| १९ | रामदासस्वामीकृत आत्माराम(श्रीदासरामकृत गद्यार्थासह) | २०१० |
| २० | श्रीगुरुर्लिंगगीता (कानडी लिपीत) | २०१० |
| २१ | श्रीगुरुर्लिंगगीता (मराठी) | २०१० |
| २२ | श्रीरामनिकेतन (माहिती पुस्तिका) | २०११ |
| २३ | श्रीरामनिकेतनमधील आराधना | २०११ |



| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| २४ | ग्रंथत्रयी(आत्मबोधप्रत्ययामृत,श्रीदासरामविंशिका, श्रीदासरामपंचविशी) | २०११ |
| २५ | श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) | २०११ |
| २६ | अभंगदरबार (आवृत्ती १) | २०११ |
| २७ | सद्बोध दशक (श्रीदादांच्या १० अभंगांवरील विवरण) | २०११ |
| २८ | श्रीदासराममहाराज नित्यपाठचरित्र | २०११ |
| २९ | श्रीगुरुराजकथित ज्ञान आणि बोध (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०११ |
| ३० | प.पू.श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०११ |
| ३१ | पाठांतर सुलभ भगवत्‌गीता | २०११ |
| ३२ | श्रीदासराममहाराज लिखित लघु चरित्रे | २०११ |
| ३३ | श्रीतात्यासाहेबमहाराजकृत मनोबोध (निवडक अभंग विवरणासह) | २०११ |
| ३४ | प.पू.श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०११ |
| ३५ | महायोगिनी श्रीलक्ष्मीबाईअक्का चरित्र | २०११ |
| ३६ | तो हा दासबोध (दासबोधातील सारभूत ओव्या अर्थासह) | २०११ |
| ३७ | श्रीदासराममहाराज चरितामृत | २०११ |
| ३८ | श्रीनिंबरगीकरमहाराज चरित्र | २०११ |
| ३९ | श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०११ |
| ४० | श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र (श्रीदासरामलिखित) | २०११ |
| ४१ | श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी | २०११ |
| ४२ | श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन | २०१२ |
| ४३ | श्रीदासराममहाराज यांची प्रवचने (१०८) | २०१२ |
| ४४ | प.पू.श्रीमामामहाराज केळकर चरित्र | २०१२ |
| ४५ | श्रीदासरामगीतम् (श्रीदादांचे संस्कृत चरित्र व संस्कृत रचना) | २०१२ |
| ४६ | श्रीदासराममहाराज वचनसंग्रह (३६५ वचने) | २०१२ |
| ४७ | चैतन्यब्रह्म | २०१३ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| ४८ | **श्रीदासराममहाराजकृत वायुलहरी** (विवरणासह) | २०१३ |
| ४९ | **स.रामदासकृत करुणाष्टके** (श्रीदासराममहाराजकृत विवरणासह) | २०१३ |
| ५० | **श्रीगुरुलिंगगीता** (६६ पदे व अर्थ) | २०१३ |
| ५१ | **चिमड संप्रदायातील पंचपदी** (विवरणासह) | २०१३ |
| ५२ | **गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग -१** | २०१४ |
| ५३ | **श्रीदासराममहाराजकृत रामदासबोध** (विवरणासह) | २०१४ |
| ५४ | **श्रीदासरामायण** (श्रीदासराममहाराजांचे गीतचरित्र) | २०१४ |
| ५५ | **श्रीदासराममहाराज केळकर नामसाधना मंदिर वास्तुशांत** | २०१४ |
| ५६ | **श्रीदासराममहाराजकृत रेवणसिद्धपाठ** (विवरणासह) | २०१४ |
| ५७ | **गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग-२** | २०१५ |
| ५८ | **अभंग दरबार** (आवृत्ती २ री) | २०१५ |
| ५९ | **श्रीदासरामचरित्र** (ओवीबद्ध) | २०१५ |
| ६० | **आत्मारामपाठ** (श्रीदादांच्या २० अभंगांवरील विवरण) | २०१५ |
| ६१ | **ज्ञानेश्वरी ६वा अध्याय** (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह) | २०१५ |
| ६२ | **श्रीमद्दासबोधातील प्रपंचयोग** | २०१५ |
| ६३ | **अभंग दरबार भाग - २** | २०१५ |
| ६४ | **श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग** (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह) | २०१६ |
| ६५ | **श्रीएकनाथकृत आनंदानुभव** (श्रीदासरामकृत टीकेसह) | २०१६ |
| ६६ | **नासदीयसूक्त विवरण** | २०१६ |
| ६७ | **श्रीज्ञानदेवतेहेत्तिशी भावार्थ विवरण** | २०१७ |
| ६८ | **पाठांतर सुलभ भगवद्गीता आवृत्ती दुसरी** | २०१९ |
| ६९ | **दासबोधातील परमार्थ योग** | २०१९ |
| ७० | **चांगदेवपासष्टी एक नामकळा** (विवरणासह) | २०१९ |
| ७१ | **परमार्थ प्रश्नोत्तरी** (पुनर्मुद्रण) | २०१९ |



| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| ७२ | **चिन्मयबोध** (गुरुपरंपरेतील सिद्धपुरुषांची पदे अर्थासह) | २०१९ |
| ७३ | **श्रीदासराम चिंतनिका** (लेख संग्रह) | २०१९ |
| ७४ | **श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ**(श्रीदादांचे १६अभंगांचे विवरण) | २०१९ |
| ७५ | **अक्षरे चैतन्याची भाग-१**(ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) | २०२० |
| ७६ | **अक्षरे चैतन्याची भाग-२**(ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) | २०२० |
| ७७ | **ज्ञानगंगा** (श्रीदासराममहाराजांची प्रवचने) | २०२० |
| ७८ | **अक्षरधारा** (श्रीदासराममहाराजांचे संकीर्ण लेखन) | २०२० |
| ७९ | **श्रीनिंबरगी संप्रदाय दर्शन** (सचित्र मार्गदर्शन पुस्तिका) | २०२० |
| ८० | **श्रीरामपाठांमृत** (श्रीदादांची रामपाठावरील कीर्तने) | २०२० |
| ८१ | **नित्यकीर्तनानंदा** | २०२० |
| ८२ | **चैतन्याचा महामेरू** (श्रीदादांचा जन्मशताब्दी गौरवग्रंथ) | २०२० |
| ८३ | **सांप्रदायबोध** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०२० |
| ८४ | **अभंग सुधा** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०२० |